# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०५/ २०१७** **दिनांक २३-२४.०५.२०१७**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २३.०५.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली आहे. तसेच सोमवार दि.२२.०५.२०१७ रोजी दुपारी ०२.०० वाजता बांधकाम विभाग, जनसंपर्क विभाग, प्रकाशने विभाग, रुग्णालय विभाग व ब्लड डोनेशन, पालखी सम्मेलन यांचा आढावा घेतला जाईल. याचबरोबर बुधवार दि.२४.०५.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता व्यवस्थापन समितीने आजतागायत घेतलेल्या निर्णयांवरील कार्यवाहीच्या सद्य:स्थितीचा आढावा घेतला जाईल, असे इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ७५१/ २०१७, दिनांक १२ मे,२०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सोमवार दि.२२.०५.२०१७ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय/ ब्लडबँक, जनसंपर्क कार्यालय, प्रकाशने विभाग, कामगार/ संरक्षण विभाग (पालखी संमेलन), बगीचा विभाग (ग्रीन शिर्डी), बांधकाम विभाग, शताब्दी कक्ष (साई मॅरेथॉन) या विभागांमार्फत चालू असलेल्या मोठया प्रकल्पांची माहिती घेतली व त्यांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर मंगळवार दिनांक २३.०५.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता उपरोक्तप्रमाणे कळविलेनुसार मा.व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली. या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| ०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष | ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य | ०४. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| ०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्या | ०६. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या |

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले- सदस्य, मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग- सदस्य व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे- सदस्य यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते.

मा.डॉ.मनीषा कायंदे, सदस्या यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२३.०५.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याने, त्याचा खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची आढावा बैठक दि.२२/५/२०१७ व दि.२३/५/२०१७ रोजी व्यवस्थापन समितीच्या सर्वसाधारण बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी वचनपुर्ती केली नाही. माननीय शिवसेना पक्षप्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे यांना दिलेला शब्द पाळत नसल्याने, आम्हाला बैठकीस हजर राहण्यास स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२३.०५.२०१७ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविले. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २८.०४.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३५७** दिनांक २७.०३.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.२८१-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान हे जागतिक दर्जाचे धार्मिक स्थळ असून येथे येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे संस्थानसाठी मोठया प्रमाणावर पाण्याची आवश्यकता भासणार आहे. सदर डाव्या कालव्याचे काम लवकरात लवकर पुर्ण झाल्यास पाणी टंचाईच्या परिस्थितीत संस्थानला त्यामधून पाणी उपलब्ध होऊ शकेल, असे चर्चेअंती सर्व सदस्यांचे मत झाले. त्यामुळे सदर रकमेतून डाव्या कालव्याचे काम पुर्ण झाल्यास भक्तांना सोयी/ सुविधा व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यास मदत होणार आहे. तसेच निळवंडे धरणामध्ये पाणी आरक्षणाची व धरणाच्या भाग भांडवलाची रु.१८३.९३ कोटी मात्र रक्कम माफ करावी, अशी मागणी शासनाकडे करावी.

उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५००/- कोटी मात्र निधी परतीच्या बोलीवर महाराष्ट्र शासनास उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. सदरहू रु.५००/- कोटी मात्र निधी कोण-कोणत्या कामांवर व कशा पध्दतीने वापरणार आहे, याचा बृहद आराखडा समितीसमोर सादर करणेबाबत जलसंपदा विभागास कळविणेत यावे. परंतु या डाव्या कालव्याचे आत्तापर्यंत झालेल्या कामाच्या खर्चासाठी किंवा देयके अदा करणेसाठी हा निधी वापरता येणार नाही व एक विशेष बाब म्हणून हा निधी फक्त निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याचे यापुढील कामासाठीच वापरण्यात यावा व या डाव्या कालव्याचे काम जस-जसे काम पुर्ण होईल, त्याप्रमाणात टप्प्या-टप्प्याने निधी वर्ग करणेत येईल, अशी अट ठेवणेत यावी.

सदर रु.५००/- कोटी मात्र रक्कम टप्या-टप्प्याने परत करणेबाबत व इतर मुद्दयांबाबत जलसंपदा विभागाशी सविस्तर चर्चा करुन व कायदेशीर/ प्रशासकीय बाबींची पुर्तता करुन सदर रक्कम देणेची कार्यवाही करणेत यावी. तसेच सदर निधी हा मा.राज्यपाल महोदयांच्या विकास महामंडळांच्या निधी वाटपाच्या (निर्देशाबाहेर) सुत्रांबाहेर ठेवून फक्त डाव्या कालव्याच्या कामासाठी देण्यात येत आहे.

तसेच निळवंडे धरणामधून संस्थान पाणी पुरवठा योजनेसाठी आणावयाची बंदिस्त पाईपलाईन या कालव्याच्या भराव्यामधून टाकता येईल का, यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा अभिप्राय घेण्यात येऊन, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.

याचबरोबर याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधी वर्ग करणेत यावा. (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान हे जागतिक दर्जाचे धार्मिक स्थळ असून येथे येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे संस्थानसाठी मोठया प्रमाणावर पाण्याची आवश्यकता भासणार आहे. सदर कालव्यांचे काम लवकरात लवकर पुर्ण झाल्यास पाणी टंचाईच्या परिस्थितीत संस्थानला त्यामधून पाणी उपलब्ध होऊ शकेल, असे चर्चेअंती सर्व सदस्यांचे मत झाले. त्यामुळे सदर रकमेतून कालव्यांचे काम पुर्ण झाल्यास अधिनियम- २००४ मधील तरतूदीनुसार भक्तांना सोयी/ सुविधा व पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यास मदत होणार आहे. तसेच निळवंडे धरणामध्ये पाणी आरक्षणाची व धरणाच्या भाग भांडवलाची रु.१८३.९३ कोटी मात्र रक्कम माफ करावी, अशी मागणी शासनाकडे करावी.**

**उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, निळवंडे धरणाचे कालव्यांच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५००/- कोटी मात्र निधी परतीच्या बोलीवर महाराष्ट्र शासनास उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. सदरहू रु.५००/- कोटी मात्र निधी कोण-कोणत्या कामांवर व कशा पध्दतीने वापरणार आहे, याचा बृहद आराखडा समितीसमोर सादर करणेबाबत जलसंपदा विभागास कळविणेत यावे. परंतु या कालव्यांचे आत्तापर्यंत झालेल्या कामाच्या खर्चासाठी किंवा देयके अदा करणेसाठी हा निधी वापरता येणार नाही व एक विशेष बाब म्हणून हा**

**निधी फक्त कालव्यांचे यापुढील कामासाठीच वापरण्यात यावा व या कालव्यांचे काम जस-जसे काम पुर्ण होईल, त्याप्रमाणात टप्प्या-टप्प्याने निधी वर्ग करणेत येईल, अशी अट ठेवणेत यावी.**

**सदर रु.५००/- कोटी मात्र रक्कम टप्या-टप्प्याने परत करणेबाबत व इतर मुद्दयांबाबत जलसंपदा विभागाशी सविस्तर चर्चा करुन व कायदेशीर/ प्रशासकीय बाबींची पुर्तता करुन सदर रक्कम देणेची कार्यवाही करणेत यावी. तसेच सदर निधी हा मा.राज्यपाल महोदयांच्या विकास महामंडळांच्या निधी वाटपाच्या (निर्देशाबाहेर) सुत्रांबाहेरठेवून फक्त कालव्यांच्या कामासाठी देण्यात येत आहे.**

**तसेच निळवंडे धरणामधून संस्थान पाणी पुरवठा योजनेसाठी आणावयाची बंदिस्त पाईपलाईन या कालव्याच्या भराव्यामधून टाकता येईल का, यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा अभिप्राय घेण्यात येऊन, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.**

**याचबरोबर याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाची मान्यता मिळाल्यानंतर निधी वर्ग करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**(२) निर्णय क्र.३२२ (२)-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणारे पात्र निविदाधारकांपैकी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.एम.पी.एंटरप्रायजेस, पुणे व मे.बी.व्ही.जी इंडिया प्रा. लि.पुणे यांचे निम्नतम दर समान असल्याने सदर दोनही निविदाधारकांना समान विभागुन कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा.

तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारे पात्र निविदाधारकांपैकी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे व मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई यांचे निम्नतम समान दर आहेत त्यांनाही समान विभागुन कार्यादेश देण्यात यावा, असे कार्यकारी अधिकारी यांनी मत मांडले.

परंतु चर्चेअंती मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई यांना संस्थानचे सुरक्षा कामाचा अनुभव नाही व मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे यांनी यापुर्वी संस्थानमध्ये सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम केलेले आहे. तसेच त्यांचे काम समाधानकारक आहे व ऑक्टोंबर, २०१७ पासून समाधी शताब्दी महोत्सव सुरु होत असल्याने मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे यांना सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तसेच सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, या ठेकेदारांमार्फत कंत्राटी कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचाऱ्यांना, निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे वेतन दर, कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स (अंशदान), कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या रकमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम, वेतनदराचे रकमेवर ०.००००१ याप्रमाणे सर्व्हीस चार्ज रक्कम, महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर, प्रॉव्हीडंड फंड अंतर्गत प्रॉव्हीडंड फंड अंशदान दर व सर्व्हीस टॅक्स दर यामध्ये शासनाकडून वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारित दर लागू करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणारे पात्र निविदाधारकांपैकी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.एम.पी.एंटरप्रायजेस, पुणे, व मे. बी.व्ही.जी इंडिया प्रा. लि.पुणे यांचे निम्नतम दर समान असल्याने सदर दोनही निविदाधारकांना समान विभागुन कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कर्मचारी पुरविणेकामी कार्यादेश देण्यात यावा.

तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणारे पात्र निविदाधारकांपैकी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे व मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई यांचे निम्नतम समान दर आहेत त्यांनाही समान विभागुन कार्यादेश देण्यात यावा, असे कार्यकारी अधिकारी यांनी मत मांडले.

परंतु चर्चेअंती मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई यांना संस्थानचे सुरक्षा कामाचा अनुभव नाही व मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस अॅन्ड सिस्टीम्स लि., पुणे यांनी यापुर्वी संस्थानमध्ये सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम केलेले आहे. तसेच त्यांचे काम समाधानकारक आहे व ऑक्टोंबर, २०१७ पासून समाधी

शताब्दी महोत्सव सुरु होत असल्याने मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस ॲन्ड सिस्टीम्स लि., पुणे यांना सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

तसेच सदरहू इतिवृत्तास पुष्टी देत असताना, या ठेकेदारांमार्फत कंत्राटी कुशल, अकुशल व सुरक्षा कर्मचाऱ्यांना, निविदेमध्ये नमूद केलेप्रमाणे वेतन दर, कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स (अंशदान), कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या रकमेवर ८.३३% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम, वेतनदराचे रकमेवर ०.००००१ याप्रमाणे सर्व्हीस चार्ज रक्कम, महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर, प्रॉव्हीडंड फंड अंतर्गत प्रॉव्हीडंड फंड अंशदान दर व सर्व्हीस टॅक्स दर यामध्ये शासनाकडून वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारित दर लागू करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

**सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना, याचबरोबर अशीही चर्चा झाली की, संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामीचे निम्नतम दरधारक ठेकेदार मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस ॲण्ड सिस्टीम्स लि., पुणे यांना संस्थानमधील कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे व मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई हे संस्थानमध्ये प्रथमत:च काम करत आहेत. परंतु दोन्हीही ठेकेदारांचे दर समान निम्नतम असल्यामुळे, कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मे.रक्षक सिक्युरीटी सर्व्हीसेस ॲन्ड सिस्टीम्स लि., पुणे व मे.सेंन्ट्रल इनव्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस लि., मुंबई यांना समान विभागून कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**(३) निर्णय क्र.३४५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यक रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने (११ महिने कालावधीसाठी) तात्पुरत्या स्वरुपात भरणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांचा प्र.वैद्यकिय संचालक यांनी आढावा घेऊन, आवश्यक पदे जाहिरातीद्वारे ११ महिने कालावधीसाठी अथवा स्थायी स्वरुपात नेमणूक होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत आकृतीबंधातील संबंधीत पदांचे वेतनश्रेणीच्या (मुळ वेतन+ ग्रेड पे+ महागाई भत्ता+ एनपीए) जवळपासचे मानधनावर कंत्राटी पध्दतीने घेणेस व त्यांना संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच मा.डीन बी.जे. मेडीकल कॉलेज, पुणे यांनी प्रस्तावित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी व विहीत मुदतीत अर्ज मागविणेत येऊन, पात्र अर्जदारांच्या Walk-in-Intervew घेण्यात याव्यात. यासाठी पुढीलप्रमाणे समिति गठीत करणेत आली. (१) मा.कार्यकारी अधिकारी, (२) उपकार्यकारी अधिकारी, (३) जिल्हा शल्य चिकीत्सक किंवा त्यांचे प्रतिनिधी, (४) वैद्यकिय संचालक, (५) वैद्यकिय अधिक्षिका. या निवड समितीने Walk-in-Intervew मध्ये पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी जाहीर करावी. त्यानंतर या निवडयादीवर हरकती मागविणेत याव्यात व हरकती विचारात घेऊन नेमणूक आदेश देण्यात यावे. याचबरोबर श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील वैद्यकिय प्रशासनातील पदे (वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक इ.) स्थायी स्वरुपात स्वतंत्र जाहिरातीद्वारे भरणेत यावीत, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.०२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतीक व सामाजीक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतीक साई मंदिर विश्वस्त/ पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सुचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि

या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय**

१) मा. त्रिसदस्य समितीचे दि. १८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४७.

२) मा. त्रिसदस्य समितीचे दि. २१/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५८

३) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८९

**प्रस्तावना-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे. सदर कार्यक्रमांचे स्वरूप व रुपरेषा ठरविणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

अ) संस्थानचे संकेतस्थळावरुन साईभक्तांसाठी केलेले जाहीर आवाहन.

ब) मा.राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्ष नेते, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५/०२/२०१६ रोजी शिर्डी ग्रामस्थ व शासकिय व निमशासकिय विभाग यांचे समवेत झालेली बैठक.

ख) धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेबाबत संस्थानचे समन्वय विभागांची दि. २४/०६/२०१६ रोजी झालेली बैठक.

ड) मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये श्री. नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि.मुंबई यांची इव्हेंन्ट मॅनेजमेंटसाठी सल्लागार म्हणून नियुक्ती केलेली असल्याने त्यांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे ४० दिवसांचे दिवसागणिक दिलेले वेळापत्रक.

इ) शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम-उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे विश्वस्त यांच्या सुचना वजा अभिप्राय प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम /उपक्रम याबाबत सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.११/१२/२०१६ रोजी संपन्न झालेली जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद.

**प्रस्ताव-** उपरोक्त नमूद केलेप्रमाणे वेळोवेळी झालेल्या बैठका, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच साईभक्तांकडून प्राप्त झालेल्या सूचना-वजा-अभिप्राय यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोंबर, २०१७ ते १८ ऑक्टोंबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रकाचे फेरसादरीकरण मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ सभेत करण्यात आले होते. त्यावर निर्णय क्र.२८० खालीलप्रमाणे झालेला आहे.

"..श्री समाधी शताब्दी महोत्सवामधील कार्यक्रमांची रूपरेषा व स्वरूप ठरविणेकामी शताब्दी कक्ष या विभागाने तयार केलेले सादरीकरण सभेमध्ये दाखविण्यात आले. परंतू वेळेअभावी सादरीकरणावर चर्चा होऊ शकली नाही. या करीता सदरहू सादरीकरणाच्या छायांकीत प्रती सर्व मा. समिती सदस्यांना पुरविणेत याव्यात व समिती सदस्यांनी आपले सूचना-वजा-अभिप्राय पुढील सभेपर्यंत शताब्दी कक्षास कळवावे.."

उपरोक्त निर्णयास अनुसरून शताब्दी महोत्सवाचे प्रारूप वेळापत्रकाच्या छायांकीत प्रती दि.२८/०४/२०१७ रोजी मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना पुरविण्यात आलेल्या आहेत तसेच ई-मेलद्वारे ही पाठविण्यात आलेल्या आहेत.

त्यानंतर मा. अध्यक्ष सो. यांचे सूचनांनुसार सुधारीत प्रारूप वेळापत्रक तयार करणेत आले असून, ते ई-मेलद्वारे मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना पाठविण्यात आलेले आहे.

तरी शताब्दी महोत्सवाच्या कार्यक्रमांची अंतिम रुपरेषा व स्वरूप ठरविणेकामी विचार विनिमय होऊन धोरणात्मक निर्णय घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५८ शताब्दी महोत्सवाच्या कार्यक्रमांची अंतिम रुपरेषा व स्वरूप ठरविणेकामी खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा करणेत आली.**

शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी सोबत सादर केलेल्या नमुनयांमधील अ.नं.०३ चा नमुना सर्वानुमते मान्य करण्यात आला. या ध्वजासाठी भगव्या रंगाचे उच्च प्रतीचे रेशमी कापड वापरण्यात येऊन, त्यावर समाधी शताब्दीचा लागो व श्रींचा श्रध्दा –सबुरी हा मंत्र छापनेत यावा. तसेच ध्वजाची उंची साधारणपणे ६० फुट म्हणजेच रामनवमी उत्सवातील निमोणकर निशाणाचे उंची इतकी असावी व उन, वारा, पावसामुळे ध्वज खराब होईल, याकरीता प्रत्येक उत्सवाच्या वेळेस ध्वजाचे कापड बदलणेत यावे. ध्वजाची पाद्यपूजा, उभारणी व स्तंभ सरंजाम बागेत करावी. शताब्दी वर्षाचे सुरुवातीस करावयाच्या ध्वजारोहणासाठी व इतर धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे उदघाटन प्रसंगी मा.मुख्यमंत्री तसेच संत महंत आदि मान्यवरांना तसेच समारोपाच्या कार्यक्रमास मा.पंतप्रधान यांना निमंत्रित करणेत यावे याचबरोबर आयोजित होणाऱ्या निरनिराळया कार्यक्रमांसाठी मान्यवरांना निमंत्रित करणेत यावे सदर कार्यक्रमास प्रसिध्दी मिळणेसाठी देशभरातील चॅनल/ पत्रकारांना निमंत्रीत करावे

शताब्दी महोत्सवातील सर्व कार्यक्रमांचे जास्तीत जास्त चॅनलवर थेट प्रक्षेपण करणेसाठी कार्यवाही करणेत यावी. या महोत्सवाचा प्रचार व प्रसिध्दीसाठी श्री.सचिन तेडूंलकर किंवा श्री.अमिताभ बच्चन यांची ब्रॅण्ड अम्बेसिडर म्हणून नियुक्ती करणेसाठी पाठपुरावा करावा.

दि.२६ जानेवारी, २०१८ रोजी नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त होणा-या संचलनात साईबाबांच्या 'सबका मालिक एक' या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार होणेसाठी महाराष्ट्र राज्याच्या वतीने चित्ररथाचा समावेश करणेसाठी पाठपुरावा करावा.

समाधी शताब्दीच्या निमित्ताने श्री साईबाबांचे १० लक्ष टपाल तिकीट व इतर छपाईसाठी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी संबंधीतांकडे पाठपुरावा करुन इतर कार्यवाही पूर्ण करावी.

समाधी शताब्दी वर्षानिमित्त श्रीसाईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार होण्यासाठी राज्य व केंद्र शासनाच्या शालेय अभ्यासक्रमात श्रीसाईबाबांच्या पाठाचा अंतर्भाव होण्यासाठी संबंधीतांकडे तातडीने पाठपुरावा करावा.

शताब्दी निमित्ताने शिर्डीकडे पायी येणाऱ्या सर्व पालखी मार्गांवर वृक्षारोपण करावे व शिर्डी नगरपंचायत आणि "ग्रीन शिर्डी व क्लीन शिर्डी" संस्था यांचे संयुक्त विद्यमाने ग्रीन शिर्डी व क्लीन शिर्डी हा प्रकल्प वर्षभर राबवावा. तसेच संपूर्ण वर्षभर मंदिर व परिसरामध्ये फुलांची आकर्षक सजावट व विद्युत रोषणाई करणेची कार्यवाही करावी.

शताब्दी कालावधीत शिर्डी बसस्थानक, रेल्वे स्टेशन, महत्वाचे ठिकाणाच्या कपांऊडच्या दर्शनी भिंती व जागा आदि ठिकाणी श्रीसाईबाबांचे तैलचित्र/ पेटींग्ज लावणेबाबत साईभक्तांना/निरनिराळया संस्थाना आवाहन करणेत यावे. करीता याबाबतची संपूर्णतः कार्यवाही पार पाडणे.

शताब्दी वर्षात संस्थान प्रकाशित श्रीसाईलिला मासिकांचे लेखक /कवि यांचे स्नेहसंमलेन आयोजित करुन त्याबाबतचे नियोजन करावे.

समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने देशभरातील व जगभरातील सर्व साई मंदिरांमार्फत एकाच दिवशी रक्तदान शिबीर आयोजीत करण्यासाठी आवाहन करणे व शिर्डीमध्ये भव्य स्वरुपात कार्यक्रम राबविणे.

शताब्दीचे निमित्ताने नेत्रदान व अवयवदान करणाऱ्या इच्छूक दात्यांसाठी यंत्रणा उभारावी, दोन्ही रुग्णांलयामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वर्षभर विशेष आरोग्य तपासणी कार्यक्रम राबवावा. तसेच ०६ वर्षाचे आतील कुपोषीत बालके व त्यांच्या मातांसाठी आरोग्य विषयक कार्यक्रम राबविणेत येऊन, त्याबाबतचा अहवाल वेळोवेळी वरीष्ठांना सादर करावा.

शताब्दी वर्षाचे निमित्ताने श्रींचे जीवनावर टीव्ही मालिका तसेच समाधी ते शताब्दी या कालावधीचा लघूपट तयार करणेत यावा. टिव्ही मालिका तयार करणेकामी दि.१५/०६/२०१७ रोजी शिर्डी येथे श्री.रामानंद सागर, श्री.राजीव मेहरा, श्री.नितीन देसाई आदि व्यक्तींना बैठकीसाठी निमंत्रीत करावे.

श्रीसाईबाबांनी हाताळलेल्या वस्तूंच्या दर्शनाचा लाभ सर्वांना व्हावा यासाठी श्रीसाईबाबांच्या समकालीन भक्तांच्या वंशजांकडे असणाऱ्या वस्तू संस्थानकडे सुपूर्द करण्याचे त्यांना आवाहन करण्यात यावे.

समाधी शताब्दीच्या निमित्ताने संस्थानसाठी पुरातत्व विभागाची निर्मिती करण्यात यावी. तसेच सद्यस्थितीतील म्युझियमची तातडीने दुरुस्ती करावी व नवीन जागेत म्युझियम सुरु करणेसाठी तातडीने प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा.

समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने विविध भाषांमध्ये सेवा संबंधीचे (रुग्णालय व प्रसादालय संबंधी) "साईअर्पण सेवा" मासिक सुरु करणेत यावे व सध्याचे व्दैमासिक असलेले साईलिला हे दर महिन्यास प्रकाशित करणेत यावे. तसेच शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने स्मरणिका/कॉफी टेबल बुक तयार करुन, प्रसिध्द करणेत यावे.

समाधी शताब्दी वर्षाच्या निमित्ताने संस्थानचे सर्व माजी अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त व कार्यकारी अधिकारी तसेच कर्मचारी यांचा सत्कार करणे. तसेच आजतागायतच्या विश्वस्त मंडळाच्या नावाचे बोर्डस् मंदिर परिसरात दर्शनी भागात लावणेत यावेत.

श्रीसाईबाबांचे समकालिन भक्तांचे वंशज तसेच दानशूर साईभक्तांचे वेगवेगळे स्नेहसंमेलन आयोजीत करावे. श्रींचे समकालीन भक्तांचे वंशजाना ताम्रपत्र/ चांदीचे सन्मानपत्र देण्यात यावे तसेच देणगीदारांचाही सत्कार करणेत यावा.

संस्थानचे सर्व स्टेशनरी व प्रकाशनांवर (जसे देणगी पावती, निमंत्रण पत्रिका, डायरी, कॅलेंडर आदि) श्री साईबाबा समाधी शताब्दी, साईचरीत्रातील संदेश तसेच स्वच्छ भारत अभियान, झाडे लावा- झाडे जगवा, पाणी आडवा– पाणी जिरवा आदि संदेश छापावेत.

शताब्दी निमित्ताने नवीन पुजारी निर्मितीसाठी कार्यशाळा घेण्यात यावी. उभारावी तसेच शताब्दीचे प्रत्येक महिन्यात जगभरातील विविध साई मंदिरांमधील पुजाऱ्यांसाठी शिर्डी येथे पुजारी प्रशिक्षण कार्यक्रम राबवावा.

श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाच्या प्रचार–प्रसारासाठी विविध भाषिक कलावंताचा समावेश करुन "मिले सुर मेरा तुम्हारा" या गाण्याच्या धर्तीवर क्लिप तयार करावी व भारतातील प्रत्येक सिनेमागृहात प्रदर्शित करावी तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रदर्शित करणेसाठी सोशल मिडीया ग्रुप तयार करावा व त्यांचे स्नेहसंमेलन आयोजित करावे. (सोशल मिडीया गेट टुगेदर).

महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी संस्थानचे वतीने शिर्डी येथे वसतीगृह सुरु करावे व पदवीधर होईपर्यंत त्यांची अन्न, वस्त्र, निवास, शिक्षण आदि व्यवस्था मोफत करावी.

शिर्डी बसस्थानकाचे उदघाटन करणेत येऊन, त्यामधील वरच्या हॉलमध्ये कलादालन व विस्तृत स्वरुपाचे ग्रंथालय तयार करणेत यावे.

शताब्दीचे वर्षभर श्रींचे प्रचार प्रसारासाठी वर्तमान पत्रात लेखमाला सुरु करावी. यासाठी अ व ब दर्जाच्या वर्तमान पत्र मुख्य कार्यालयाशी पत्रव्यवहार करावा तसेच देशभरातील नामांकित लेखकांना (रश्मी बन्सल, चेतन भगत आदि) संस्थान व्यवस्थापन तसेच संस्थान उपक्रमावर पुस्तक लिहीणेबाबत विनंती करणेत यावी.

शताब्दी वर्षाचे प्रत्येक महिन्यात पादूका दर्शन कार्यक्रम आयोजित करावा. पादुका दर्शन सोहळयासाठी सर्व सोयीयुक्त संस्थान वाहन तयार करुन घेण्यात यावे. या कार्यक्रमाचे नियोजन व खर्च त्या त्या राज्यातील दानशूर साईभक्तांमार्फत किंवा मंदिरामार्फत करणेत यावे. तसेच देश-विदेशातील पादुका दर्शनासाठी दोन पादुकांचा सेटचा वापर करणेत यावा. तसेच महाराष्टातील सर्व जिल्हयात पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेत यावा.

संस्थानने शिर्डी व परिसरात असलेल्या वॅक्स म्युझीयम, साईबाबांची पुरानी शिर्डी, मालपाणी वॉटर पार्क इत्यादींची साईभक्तांना माहिती होणेसाठी प्रसिध्दी करावी. व त्याकामी संबंधीतांना चर्चेसाठी बोलविण्यात यावे.

शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांचा माहितीपट तयार करणेसाठी आऊट सोर्स पध्दतीने कार्यवाही करावी.

धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे स्वरूप पाहून संबंधीतांनामोफत कार्यक्रमसेवा सादर करणाऱ्या कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे. जे कलाकार मोफत कार्यक्रम सादर करणेस तयार नसतील, अशा कलाकारांकडून मानधनाबाबतचा प्रस्ताव घेऊन, या कार्यक्रमांसाठी देणगीदार/ प्रायोजक मिळतात का, ते पहावे. अन्यथा त्यांच्या मानधनाबाबत व्यवस्थापन समिती उचित निर्णय घेईल.

समाधी शताब्दी वर्षाचे सांगता समयी म्हणजेच पुण्यतिथी उत्सवाचे मुख्य दिवशी शिर्डीचे तसेच जगभरातील साईमंदिरांमाधून जागतिक स्तरावर अन्नदानाचा कार्यक्रम राबविणेसाठी साईमंदिरांना उद्युक्त करावे कार्यक्रमानंतर जगभरातून झालेल्या अन्नदान कार्यक्रमाबाबतचा अहवाल (संख्या) वरीष्ठांना सादर करावा.

**उपरोक्त चर्चेबरोबरच समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.०३** **श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तवापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प मौजे शिंगवे, ता.राहाता येथील शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे जागेत उभारणे अथवा मौजे निमगाव कोऱ्हाळेमधील संस्थान मालकीचे जागेत उभारणेबातचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधिल संबंधित तरतूदी–

१. कलम १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणे,

२. कलम १७ (२) खंड (झ) नुसार विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्यप्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी समिती करील.

३. कलम १७ (३) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मूदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही.

४. कलम २१(२) (दोन) नुसार स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीसाठी वाढ होण्यासाठी सहाय्य करणेची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्त विषया संदर्भात झालेले निर्णय-**

१. मा. त्रिसदस्य समितीचे दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९२
२. मा.त्रिसदस्य समितीच्या दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३३
३. मा. त्रिसदस्य समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८८
४ मा .त्रिसदस्य समितीचे दि.०८/०९/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१४
५. मा .त्रिसदस्य समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५६
६. मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ (१७)
७. मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८९१

**वरील विषयांकीत प्रकल्पाचे मान्यतेविषयी झालेले शासन निर्णय:**

१. *शासनाने सासंवि-१०१६/५९/प्र.क्र.११/का. १६ दि.०२ जून, २०१६ रोजीचे शासन निर्णयान्वये "संस्थान परिसर व शिर्डी नगरपंचायत हद्दीत निर्माण होणा-या कच-यातील प्लॅस्टीकची पुनःप्रक्रिया करण्याच्या यंत्रणेसाठी शेड उभारण्याकरिता रु.९,१६,६४१/- इतका निधी शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता दिलेली आहे."*

२. शासनाने सासंवि.-२०१५/९६९/प्र.क्र.१६७/का.१६ दि.३१ ऑगस्ट, २०१६ रोजीचे शासन निर्णयान्वये "संस्थान परिसर व शिर्डी नगरपंचायत हद्दीत निर्माण होण-या कच-याचे व्यवस्थापन करण्यासाठी मौजे. शिंगवे ता. राहाता अहमदनगर येथे उभारण्यात येणा-या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा अंतर्गत, संरक्षक भिंत, प्रकल्पाकडे जाणारा रस्ता विकसीत करणे, मशिनरी शेड, प्रकीयेसाठी कट्टा बांधणे, स्वच्छता गृह, भांडार, घनकचरा प्रक्रीया शेड बांधणे तसेच क्षेत्रीय कार्यालय बांधणे इत्यादी कामासाठी रु.२,५२,८६,६११/- इतका निधी शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

**प्रस्तावना-**

**अ) <u>मौजे शिंगवे ता. राहाता येथिल शिर्डी नगरपंचायत यांचे मालकीचे क्षेत्रात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तवापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रीया प्रकल्प उभारणे:-</u>**

शिर्डी येथे श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या गर्दीचे अनुषंगाने राहाता व शिर्डी परिसरातील निघणाऱ्या व जमा होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी संयुक्त घनकचरा प्रकल्प राबविण्यात आला होता. सदरहू कामास महाराष्ट्र शासनाचे जा.क्रं सांसवि/२०११/५३८/प्र.क्र.६९/पुन.१२/का.१६ दिनांक २३/०२/२०१५ रोजीचे निर्णयान्वये

मान्यता देण्यात आलेली आहे. या प्लांटमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणेचे काम सध्या स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे बंद आहे. त्यामुळे संस्थानचा निघणारा कचरा हा संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे हद्दीत गट नं. १८२ मध्ये खड्डे घेऊन टाकण्यात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३२ अन्वये संस्थानसाठी स्वतंत्र घनकचरा प्रकल्प उभारणीकामी जागा निश्चित करणेत यावी व या प्रकल्पासाठी, वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, पात्र कन्सलटंटची नेमणुक करणेत येऊन, प्रस्तावीत ब प्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले होते. दरम्यान, दि.१५/११/२०१४ रोजी मा.श्री. एकनाथ डवले, विभागीय आयुक्त, नाशिक भाग नाशिक यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांची शिंगवे येथिल जागा संस्थानला उपलब्ध करुन दिल्यास संस्थानने त्या ठिकाणी घनकचरा प्रकल्प उभारावा असे ठरले.

मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. नप/टिक्र-८/८८/२०१५ दि.१०/०१/२०१५ रोजीच्या पत्राने शिर्डी येथे दररोज २० ते २५ टन कचरा निर्मीती होत असून, मे. सुप्रीम कोर्टाचे सन २००० चे घनकचरा व्यवस्थापनाचे आदेशानुसार कच-यावर प्रक्रिया करणे आवश्यक असल्याने मौजे शिंगवे येथे नगरपंचायत मालकीचे गट क्र.६९/२/३ मधील १०.३० एकर जमीनीत कंपोस्ट डेपो उभारणी करण्याचे प्रस्तावीत केले.

सदर जागेस पिंपळवाडी – पुणतांबा रस्त्यावरुन उत्तर बाजूस २.० कि.मी. लांबीचा पोहच रस्ता असून सदर रस्ता अत्यंत खराब झालेला आहे. त्यामुळे सदर ठिकाणी कचरा वाहतुकीस अडथळा निर्माण होणार आहे. या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तसेच सदर जागेला कंम्पाउंड भिंत करणे कच-यावर प्रक्रिया करण्यासाठी शेड बांधकाम, घनकचरा प्रक्रियेसाठी कट्टा बांधकाम करणे, प्लान्टमध्ये चेजींग रुम, स्वच्छता गृह, भांडार गृह, कार्यालय इ. बांधकाम करावे लागणार आहे. त्याचप्रमाणे खत तयार करणेसाठी अद्यावत मशिनरी उभारणी करणे इत्यादी सर्व कामे करणे आवश्यक आहे. असे मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी कळविलेले होते. त्यासाठी त्यांनी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केले.

| अ.क्र | कामाचा तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | घनकचरा प्रकल्प जागेस संरक्षण भिंत बांधकाम करणे | ८१,७९,६७९.०० |
| २) | घनकचरा प्रकल्पाकडे जाणारा पोहच रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. | ६९,६९,५१३.०० |
| ३) | घनकचरा प्रकल्पातंर्गत मशिनरी शेड, प्रकीयेसाठी कट्टा बांधणे, स्वच्छता गृह, भांडार,घनकचरा प्रक्रीया शेड बांधणे तसेच क्षेत्रीय कार्यालय बांधणे भांडार | १,०१,३७,४१९.०० |
| ४) | घनकचरा प्रकल्पातंर्गत खत निर्मीतीकरीता अद्यावत मशिनरी उभारणी करणे. | २,००,००,०००.०० |
| | **एकूण** | **४,५२,८६,६११.००** |

विषयांकीत कामासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि०८/०१/२०१६ रोजीचे आदेशात, “Further work which is been sought to be done for the said purpose and machineries to be purchased shall be done by following e-tendering process by the Sansthan.” असे नमूद केलेले होते. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयानुसार शिर्डी नगरपंचायतीस रु.२,५२,८६,६११/- इतका निधी प्रदान करावा अथवा न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी याबाबत मार्गदर्शन घेणेसाठी मा.प्रधान सचीव, विधी व न्याय विभाग यांना संस्थानचे दि.१३/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

**ब) <u>सुक्या कच-यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना निधी उपलब्ध करुन देणे:-</u>**

शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्लास्टीक पासून ग्रान्युअल्स तयार करणेकामी मशिनसाठी शेड उभारणीकरीता संस्थानमार्फत रक्कम रु.९,९६,६४१/- मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार विषयांकीत कामासाठी मान्यता मिळणेसाठी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस इकडील जा. नं.५०११/२०१५ दि.०८/१२/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास शासनाने दि.०२/०६/२०१६ रोजीचे निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

याकामी शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा असा निर्णय झालेला होता. त्यानुसार विधी विभागामार्फत सदरहू निधी वर्ग करणेसाठी मा. उच्च न्यायालयात सिव्हील अर्ज दाखल करणेबाबत कार्यवाही सुरु होती. दरम्यान राज्य शासनाने दि.२८/०७/२०१६ रोजीचे आदेशान्वये संस्थानचा कारभार पाहणेसाठी नव्याने मा. व्यवस्थापन समिती नियुक्त केलेली असल्यामुळे व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेत मा. उच्च न्यायालयाची मान्यता

घेणेकामी दाखल केलेले ३३ सिव्हील अर्ज मागे (Withdraw) घेणेबाबत निर्णय क्र.५६६ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. सदरहू निर्णयानुसार विषयांकीत कामासाठी दाखल करावयाचा सिव्हील अर्ज मागे घेण्यात आलेबाबत विधी विभागाने जा. क्र.२१५८/२०१६ दि.०८/०९/२०१६ रोजीचे पत्राने कळविले आहे.

**क) <u>संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थान मालकीचे जागेत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तवापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रीया प्रकल्प उभारणे:-</u>**

मा. अध्यक्ष महोदय यांचेकडे या क्षेत्रातील काही तज्ञ सल्लागार /संस्थांनी घनकचरा प्रक्रीया प्रकल्पासाठी अत्याधुनिक पद्धती व मशिनरीबाबत माहितीचे सादरीकरण केलेले होते. त्यापैकी योग्य त्या प्रकारच्या प्रकल्पाची निवड करुन व सदर नियोजीत प्रकल्पासाठी जागा निश्चित करुन पुढील कार्यवाही करणेस निर्देश मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ चे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरहू सभेतील निर्णय क्र. ८९१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रकल्प राबविणेसाठी संस्थानचे हेलीपॅड शेजारील जागेची निश्चिती करण्यात आली. तसेच याठिकाणी घनकचरा प्रकल्प राबविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."*

याबाबत मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दि.१६/०४/२०१७ रोजी वाराणसी येथिल घनकचरा प्रक्रीया प्रकल्पाची समक्ष पाहणी केली आहे. सदरहू प्लान्ट हा Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचा आहे. त्याच स्वरुपाचा प्लान्ट शिर्डी येथे उभारणेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा असे समक्ष चर्चे दरम्यान सुचित करणेत आले आहे.

याबाबत उत्पादक तसेच इंटरनेटवरुन माहिती घेतली असता, सदर प्रकल्पाकरीता खालील पर्याय उपलब्ध असल्याचे दिसून येते.

a. Aerobic Composting
b. Vermi- Composting
c. Biomethanation / Bio-waste Derived Fuel
   i. **Thermophilic Anaerobic Digestion**
   ii. **Mesophilic Anaerobic Digestion**
d. Incineration
e. Plasma pyrolysis
f. Pelletization / Production of Refuse Derived Fuel (RDF)

सेंट्रल पोलुशन कन्ट्रोल बोर्ड यांचे घनकच-यावर प्रक्रीया करणेसाठी निवडावयाच्या पध्दतींबाबत माहिती घेतली असता, ५०, ००० ते १ लक्ष लोकसंख्येसाठी १० ते ३० TPD क्षमतेचा Biomethanation, Vermi- Composting किंवा Chemical Conversion, Refuse Derived Fuel (RDF) या प्रकारच्या तंत्रज्ञानांचा पर्याय उपलब्धअसल्याचे नमूद केले आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता, शिर्डी शहर व संस्थान परिसरात जमा होणा-या घनकच-यासाठी २० TPD क्षमतेच्या Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) प्रकल्पासाठी सुमारे १००० चौ.मी. जागेची आवश्यकता असून या तंत्रज्ञानानुसार १० TPD क्षमतेचे २ युनिट उभारणेसाठी अंदाजे रु.३.१९ कोटी मात्र इतका खर्च येईल. तसेच इतर ज्वलनशील कच-यासाठी सुमारे ५ ते ६ TPD क्षमतेचे बेलींग मशिनकरीता रु.३२,००,०००/- तसेच याव्यतिरीक्त उर्वरीत सुमारे २ TPD कच-यासाठी २ ते २.५ एकर जागेत १० वर्ष कालावधीसाठी लॅण्डफील करणे याकरीता अंदाजे रु.३ कोटी इतका खर्च येईल. त्यानुसार सदर प्रकल्पासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजे रु.६.५१ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच प्रकल्पांचे दैनंदिन देखभालीसाठी भविष्यात रु.६१.३२ लक्ष प्रती वर्ष (प्रथम वर्षासाठी व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी ०७ टक्के वाढ) इतका आवर्ती खर्च अपेक्षीत आहे.

दि.०३/०५/२०१७ रोजी मंत्रालय, मुंबई येथे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडयाचे अंमलबजावणी बाबत मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली संबंधीत विभागांचे मंत्रालय स्तरावरील अधिका-यांची बैठक झाली. सदर बैठकीत संस्थानने शिर्डी नगरपंचायत हद्दीत निघणा-या कच-यासाठीही प्रक्रिया व्यवस्था उभारावी असे ठरले आहे. त्यासाठी शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचे हद्दीतील कचरा संकलन करुन संस्थानच्या नियोजीत घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाचे जागेवर आणुन द्यावा अशा

सुचना सदर बैठकीत देणेत आलेल्या आहेत. याबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचे जा.क्र.न.पं./T-६/११३६/२०१७, दि.०९/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, शिर्डी नगरपंचायतीकडे शहरात निर्माण होणा-या घनकच-यावर प्रक्रिया करणेसाठी जागा उपलब्ध नसल्याने प्रक्रिया करता येत नाही. त्यामुळे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत शहरात निर्माण होणा-या कच-यावर प्रक्रिया प्रकल्प उभा करणेत यावा. शिर्डी नगरपंचायत शहरात निर्माण होणारा ओला व सुका कचरा वेगळा करुन आपल्या प्रक्रिया प्रकल्पापर्यंत पोहच करणार आहे. सदर प्रकल्प हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थानचे निधीतून उभा करणेत यावा. त्यास शिर्डी नगरपंचायत शिर्डी सहकार्य करेल. तसेच नगरपंचायत हद्दीत निघणारा कचरा श्री साईबाबा संस्थान यांचे जागेवर घेणेस व त्यावर संस्थान मार्फत विल्हेवाट लावणेबाबत उचीत कार्यवाही करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्त बाबी विचारात घेता श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी घनकचरा प्रकल्प उभारणेसाठी खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१. सुक्या कच-यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना रु.९,९६,६४१/- मात्र इतका निधी उपलब्ध करुन देणेकरीता शासनाने दि.०२/०६/२०१६ चे शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. तथापी आता उपरोक्त प्रस्तावात बेलींग मशीनचा समावेश करणेत आला आहे. तसेच शिर्डी नगरपंचायत हद्दीतील संपूर्ण कचरा ते प्रस्तावित प्रकीया प्रकल्पाचे ठिकाणी आणून देणार आहेत. त्यामुळे सदर निधी उपलब्ध करून देणेचा प्रस्ताव रद्द करून तसे शासनास कळविणेस मान्यता देणे.

२. शासनाने दि.३१/०८/२०१६ रोजीचे शासन निर्णयान्वये मौजे शिंगवे, ता.राहाता येथिल नियोजित घनकचरा प्रकीया प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना रु.२,५२,८६,६११/- इतका निधी उपलब्ध करणेस मान्याता दिलेली आहे. तरी सदर प्रस्ताव रद्द करुन तसे शासनास कळविणेस मान्यता देणे.

३. नियोजीत प्रकल्पासाठी मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या जमिनीपैकी प्रोसेसिंग एरीयासाठी १० आर व लॅण्डफीलसाठी दोन ते आडीस एकर याप्रमाणे एकूण अंदाजे ०१ हेक्टर जागेची निश्चिती करणे.

४. योग्य त्या तंत्रज्ञानाची निवड करुन त्यानुसार संस्थानकरीता १० TPD क्षमतेचा एक व शिर्डी नगरपंचायत यांचेकरीता १० TPD क्षमतेचा एक याप्रमाणे दोन घनकचरा प्रक्रीया युनिटस् उभारणीसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार येणारे रु६.५१ कोटी इतक्या भांडवली खर्चास तसेच या कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणे. तसेच सदर प्रकल्पाचे दैनंदिन देखभालीसाठी भविष्यात येणारे रु.६१.३२ लक्ष प्रती वर्ष (प्रथम वर्षासाठी व त्यापुढील प्रत्येक वर्षासाठी ०७ टक्के वाढ) इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देणे.

तरी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तवापरासाठी मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.१८२ मधिल संस्थान मालकीचे जागेत Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) स्वरुपाचे प्रत्येकी १० TPD क्षमतेचे दोन घनकचरा प्रक्रिया युनिटस् उभारणेत यावेत. सदर प्रकल्पाकरीता लॅण्डफीलची आवश्यकता नसल्याने लॅण्डफीलची व्यवस्था करण्यात येऊ नये. लॅण्डफील व्यतिरिक्त इतर सिव्हील कामे व युनिटस् उभारणीसाठी येणारा भांडवली खर्च तसेच दैनंदिन देखभालीसाठी प्रथम वर्षाकरीता अपेक्षित असलेला आवर्ती खर्च मिळून येणाऱ्या एकूण रु.४.५ कोटी मात्रचे खर्चास व सदर कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.**

**सदर प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरुस्तीकरण्याचा समावेश ई- निविदेत करण्यात यावा व शिर्डी नगरपंचायत यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सदर प्रकल्पास अनुदान प्राप्त करुन घेणेची कार्यवाही करावी व अनुदान प्राप्त झालेनंतर सदरहू अनुदान संस्थानकडे वर्ग करावे, या बाबीचा समावेश करणेत यावा. तसेच प्रस्तावात नमूद केलेनुसार सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक श्रेडींग करणेकरीता शेड उभारणीकामी व मौजे शिंगवे येथिल नियोजित घनकचरा प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायत यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्ताव रद्द करण्यात येत असून, तसे विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **साई रुग्णवाहिका प्रकल्पास व याबाबत मा.व्यवस्थापन समिती तसेच छाननी समितीने मंजुरी दिलेल्या नियमावलीस शासन मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये, "श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वतःच्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्ये संस्थान मार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तथापि, राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यामाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहीका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहीकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहीका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहीका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी" असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस-वशी-वाहन-४४५५-२०१६ दि.२३/११/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव , विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना सदर साई-रुग्णवाहिका प्रकल्पास शासन मान्यता मिळणे कामी पत्र देण्यात आलेले होते.

त्यानंतर दिनांक२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४ व निर्णय क्र.१४ अन्वये ''महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प राबविणेकामी अंतीम सुधारित नियमावली तयार करणेत येऊन त्यास मान्यता देण्यात आली व या सर्व कार्यवाहीस संस्थानच्या छाननी समितीची मान्यता घेऊन पुढील मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावा", असे ठरले.

सदर निर्णया नुसार,दिनांक २७/०३/२०१७ रोजीचे मा छाननी समितीचे सभेत सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पास व त्या बाबतचे सुधारीत नियमावलीस मान्यता घेणे कामी सादर करण्यात आला होता. या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे,

"वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. श्री साईबाबा संस्थानमार्फत ५०० रुग्णवाहिकांचा साईरुग्णवाहिका प्रकल्प राबविणेस व याकामी महिंद्रा व महिंद्रा कंपनीचे BS-III बोलेरो वाहन, विशेष किंमत रु.५ लक्ष प्रति रुग्णवाहिका या दराने खरेदी करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

सर्वसहमतीने असेही ठरले की, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्यात १०० रुग्णवाहिका खरेदी करण्यात याव्यात व त्यानंतर या १०० रुग्णवाहिकांच्या व त्या रुग्णवाहिका चालविणा-या संस्थाच्या कामकाजाबाबत आढावा घेवुन पुढील प्रकल्प राबविण्याची कार्यवाही करावी. श्री साईबाबा संस्थानचे रुग्णवाहिका संदर्भातील सर्व नियम हे संबंधीत संस्थांना लागु असतील. तसेच या प्रकल्पात लागु होणारे सर्व प्रकारचे सरकारी कर माफ करण्याचा विनंती प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. सर्वानुमते प्रस्तावीत नियमावलीस मान्यता देण्यात आली व सदरहु नियमावलीस व प्रकल्प राबविणेस शासनाची मान्यता घेणेसाठी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

यानुसार जा.नं.एसएसएस/वाहन/२५३/२०१७ दि.१५.०४.२०१७ अन्वये सदर प्रकल्पास व याबाबत मा व्यवस्थापन समितीने तसेच छाननी समितीने मान्यता दिलेले नियमावलीस शासन मान्यता मिळणेकामी पत्र देण्यात आले होते.

आता महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, यांचे क्र.सासंवि-१०१७/६७४/ प्र.क्र.२०/का.१६ दिनांक ०८ मे २०१७ रोजीचे प्राप्त पत्रात खालील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

*" उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर प्रकरणी संस्थानतर्फे करावयाच्या खर्चासाठी साईभक्तांना देणगी देण्याकरीता आवाहन करण्यात येणार आहे व सदर प्रयोजनासाठी भक्तांनी दिलेल्या देणगीतून रुग्णवाहिका खरेदी करण्यासाठी आवश्यक असणारा ७५ टक्के निधी*

*उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. मात्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम -२००४ मध्ये अशा प्रकारे भक्तांकडून देणगी घेऊन परस्पर अन्य संस्थाना देण्याची तरतूद नाही. अधिनियमाच्या कलत २१ (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतूदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्स्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या केवळ ३० टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस कलम २१(१क) आणि (एक) मध्ये नमुद प्रयोजनासाठी वेळोवेळी खर्च करता येतो.*

२. *श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यववस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ च्या कलम २१ (१क) आणि (एक) नुसार केवळ शासकीय विभाग, शासकीय महामंडळे, शासकीय कंपन्या किंवा शासकीय उपक्रम यांना तसेच एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणीक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना निराश्रीत अथवा शारिरीक दृष्टया विकलांक व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल घेण्यासाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी संबधीत असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनीक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्या कडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतीक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अर्थसहाय करण्याची तरतूद आहे. कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला आर्थिक अनुदान देण्याची अथवा अर्थसहाय करण्याची तरतूद अधिनियमात नाही.*

३. *श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यववस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता, भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतूदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी."*

साई-रुग्णवाहीका प्रकल्पांतर्गत दि.९/५/२०१७ पर्यंत रु.४,९८,८८,०७१/- इतकी देणगी रक्कम संस्थान खाती जमा झालेली आहे.

तरी सदरचा विषय व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ व चर्चेसाठी ठेवण्यास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३६०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, राज्यातील गोर-गरीब, दुर्बल, आदिवाशी रुग्णांच्या सेवेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामार्फत साई रुग्णवाहिका प्रकल्प सुरु करण्याचा समितीचा माणस आहे. सदरहू प्रकल्प राबविणेसाठी, अधिनियमातील तरतूदींचा सखोल अभ्यास करुन, तसेच संस्थान कायदे सल्लागाराचा सल्ला घेण्यात येऊन व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेबरोबर चर्चा करुन सविस्तर फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.०५** **साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतणीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तमालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्य्ाची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१. *दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.६४२ अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील ५३५४ चौ.मी. जागेमधील फ्लोरींगचे नुतनीकरण करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु अशीही चर्चा करणेत आली की, समाधी मंदिराच्या वास्तुपेक्षा फ्लोरींग उठावदार व आकर्षक नसावे, याकरीता फ्लोरींगचा रंग फिका ठेवण्यातत यावा तसेच कमी नक्षीकाम असावे, त्यासाठी मंदिर परिसरामध्ये करावयाच्या फ्लोरींगसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लाअगाराचा अभिप्राय घेण्यात यावा व नमुनादाखल ४X४ स्के. फुट जागेत वेगवेगळ्या प्रकारचे / नक्षीचे फ्लोरींग करणेत येऊन, त्याची चाचणी घेण्यात यावी. त्यानंतर जो नमुना पसंत पडेल त्यासाठी विहीत पध्दातीने ई-निविदा मागविणेत याव्या, असे ठरले."*

२. *दि.२२/१२/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र. ९०५ अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहासमोर तयार केलेल्या ०४ प्रकारच्या फ्लोअरींगच्या नमुन्यांनी समितीने पाहणी केली व सदरहू पाहणीअंती मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे कामासाठी प्रामुख्याने ग्रेनाईटचा वापर करणेत यावा. उन्हाळयात उष्णतेने साईभक्तांच्या तळपायांना त्रास होऊ नये, याकरीता फ्लोअरींगमध्ये काही भागात व्हाईट इंजि. आर्टीफीशियल टाईल्सचे पाथवे करणेत यावे, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."*

तसेच सदरहू फ्लोअरींग नुतनीकरण करणेचे काम रात्रीच्या वेळेसच जास्त करणेत यावे, अशा सुचना दिल्या."

**प्रस्तावना**: संस्थानतर्फे श्री साईबाबा मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्पाचे बांधकाम यापुर्वी सन १९९९ मध्ये पूर्ण करणेत आले आहे. त्यावेळी मंदिर परिसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये ब्लॅक कडप्पा व रेड आग्रा स्टोनमध्ये डिझाईन तयार करण्यात आलेली आहे. सदर फ्लोअरींगचे काम पूर्ण होऊन आता आठरा वर्षांपेक्षाही अधिक कालावधी झालेला आहे. काळाचे ओघात फ्लोअरिंग ब-याच ठिकाणी खराब झाली आहे. त्यास ब-याच ठिकाणी तडे गेलेले आहेत. त्यामुळे सदर फ्लोअरिंगचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे उपरोक्त निर्णयानुसार पहील्या टप्प्यात २९७५ चौ.मी. क्षेत्रफळामध्ये सध्याची फ्लोअरींग काढून त्याठिकाणी ग्रेनाईट + व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि.आर्टिफिशियल टाईल्स फ्लोअरींगसाठी रु.१.१४२ कोटी खर्चाचे कामासाठी ई-निविदा सूचना वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची वाढीव अंतिम मूदत दि.०५/०४/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. सदर मूदतीत खालील ०३ ई-निविदा अपलोड झालेल्या आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** | **आवक क्र.** | **दिनांक** |
|---|---|---|---|
| ०१ | सी-४ इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., नाशिक | २४१६३ | ०७/०३/२०१७ |
| ०२ | आर.के. सावंत, नाशिक | ०४१२ | ०५/०४/२०१७ |
| ०३ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव | २४३११ | ०९/०३/२०१७ |

सदर प्राप्त ई-निविदांमधिल तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.११/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, उपरोक्त तीनही ठेकेदार पात्र झाले आहेत.

ठेकेदार यांनी सादर केलेला ई-निविदांमधिल वाणिज्यीक निविदा मा.खरेदी समितीचे दि.०६/०५/२०१७ रोजीचे सभेपुढे उघडण्यात आल्या असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** | **रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | सी-४ इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., नाशिक | १,४१,०२,३६३/- | - |
| ०२ | आर.के. सावंत, नाशिक | **७४,८२,०००/-** | **निम्नतम** |
| ०३ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव | १,९४,०४,१८०.५० | - |

तदनंतर मा. अध्यक्ष सो यांनी काम लवकर पूर्ण होण्याचे दृष्टीने संपूर्ण मंदिर परिसरात(Area :9945 sqm) ग्रेनाईट फ्लोअरींग ऐवजी सध्याचे शहाबाद फरशीवर व्हिट्रीफाईड फ्लोरींग बसविणेत यावे असे निर्देश दिले आहेत. मंदिर परिसरात एकूण ९९४५ चौ.मी. इतक्या व्हिट्रीफाईड टाईल्सची आवश्यकता आहे. त्याकरीता एकुण रक्कम रु.१.१५ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी श्री समाधी मंदिर परिसरात २९७५ चौ.मी. ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी निम्नतम दरधारक ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांना रक्कम रु.७४,८२,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देणे अथवा सदर ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन मंदिर परिसरातील संपूर्ण ९९४५ चौ.मी. क्षेत्रात सध्याचे शहाबाद फ्लोअरींगवर अ‍ॅडेझिव मॉर्टर लावून व्हिट्रीफाईड टाईल्स बसविणे व त्याकरीता येणारे एकूण रु.१,१४,६९,५९३/- मात्रचे खर्चास व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा मागविणेस मान्यता देणे यापैकी योग्य त्या पर्यायानुसार फ्लोअरींगचे काम करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री समाधी मंदिर परिसरात २९७५ चौ.मी. जागेत ग्रेनाईट फ्लोअरींग व व्हाईट मायक्रोक्रिस्टल इंजि. टाईल्स बसविणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आर.के. सावंत, नाशिक यांचे एकत्रित रु.७४,८२,०००/- मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच मंदिर परिसरामधील उर्वरित ६९७० चौ.मी. जागेतही ग्रेनाईट फ्लोअरींग बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यावेळी अशीही चर्चा झाली की, मंदिर परिसराचे शेजारी बरेचसे अतिक्रमण झालेले असल्यामुळे मंदिराचा आकर्षकपणा दिसत नाही. याकरीता अतिक्रमण करणारांवर कडक कारवाई करणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस कळविणेत यावे.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **संस्थान कर्मचाऱ्यांचे गृहकर्ज व्याज सवलतीबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक २०-२१.०४.२००२ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील विषय नं.३०, निर्णय क्र.२३२ अन्वये गृहकर्ज पुरविणाऱ्या वित्तीय संस्थेकडून घेण्यात येणा-या गृहकर्जावर संस्थान कर्मचाऱ्यांना स्वत:चे मालकीचे जागेत घराचे बांधकामासाठी ६ % वरील व्याजाचा आर्थिक भार संस्थानने उचलण्याचे तत्वावर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून तसेच वैयक्तिक स्वरूपाच्या स्वतंत्र सदनिका बांधणीसाठी अथवा तयार स्वरूपाची सदनिका खरेदी करणेकामीची योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक २२ जून, २००४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील विषय नं.११, निर्णय क्र.२१९ नुसार संस्थान कर्मचाऱ्यांना वैयक्तिक गृहबांधणी कर्जाच्या व्याजातील संस्थानच्या अनुदानरुपी सहभागामध्ये ५० % पर्यंत वाढ (संस्थान हिस्सा ५० % व कर्मचारी हिस्सा ५०%) करणेबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. सदर योजनेत गृहकर्जाची रक्कम एकुण पगाराच्या ४० पट किंवा रु.१० लाख यापेक्षा जी कमी असेल ती रक्कम बॅंकेकडून कर्ज म्हणून घेणेकामी हमी दिली जाते.

त्या अनुषंगाने संस्थानने श्री साईश्रध्दा हौसिंग सोसायटी, श्री साईप्रसाद हौसिंग सोसायटी तसेच वैयक्तीक गृहकर्ज योजनेअंतर्गत आजतागायत साधारणतः ३५० कायम कर्मचा-यांना संस्थानच्या सवलतपात्र गृहकर्ज योजनेअंतर्गत उपरोक्त नमुद मान्यतेनुसार निम्म्या व्याजाची सवलत दिलेली आहे. त्यापैकी आत्तापर्यंत २०६ कर्मचा-यांचे गृहकर्ज निरंक झालेले असुन १४४ कर्मचा-यांना गृहकर्ज व्याजाची सवलत चालू आहे.

दिनांक १५.११.२००८ रोजीच्या झालेल्या मा.व्यवस्थापन समितीत निर्णय क्र.८३७ नुसार संस्थान कर्मचा-यांसाठी सवलतपात्र गृकर्जाच्या सुधारीत नियम व अटी खालीलप्रमाणेः

१) कर्मचा-याची सेवा ही ५ वर्ष झालेली असावी. तसेच त्याची उर्वरीत सेवा गृहकर्ज संपेपर्यंत असली पाहिजे.

२) ज्या कर्मचा-यांना गृहकर्ज घ्यावयाचे आहे त्यांचे स्वतःचे नांवावर जागा असेल तरच त्याला सवलत देता येईल. इतरांकडून घेतलेले संमतीपत्र चालणार नाही.

३) संस्थान कर्मचा-यांस गृहकर्ज हे त्याच्या पगाराच्या (Pay in Pay Band+Grade pay+DA) ४० पट किंवा जास्तीत जास्त रु.१० लाख यात जी रक्कम कमी असेल ती देण्यात येईल.

४) संस्थान कर्मचा-याने जामीनदार घेतांना त्यांचीही सेवा ही ५ वर्ष झालेली पाहिजे.

५) कर्जदाराकडून गृहकर्जाची परतफेड झाली नाही तर, त्याला संस्थानकडून देय असलेल्या रक्कमेतून वसूल करण्यात येईल. त्यातून परतफेड झाली नाही तर ती जामीनदाराकडून वसुल करण्यात येईल.

६) संस्थान संमतीशिवाय गृहकर्ज बॅंकेकडून परस्पर घेतले असेल तर त्यांना व्याजाची सवलत देण्यात येणार नाही. अशा प्रकरणात गृहकर्जाचा हप्ता वसुल करुन बॅंकेस भरणा करण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

७) गृहकर्जात भाग घेतलेल्या कर्मचा-यांना संस्थानची संमती घेतल्याशिवाय सदनिकेची विक्रि करता येणार नाही अथवा अन्यप्रकारे मालमत्तेची विल्हेवाट लावता येणार नाही.

८) ज्या कर्मचा-याने गृहकर्ज घेतलेले असेल व त्याने राजीनामा दिला किंवा काही कारणास्तव संस्थान सेवा संपुष्टात आली तर त्यांना देण्यात आलेली व्याजाची सवलत त्यांच्या देय रक्कमेतून वसुल करण्यात येईल.

९) ज्या कर्मचा-यांना गृहकर्जाची व्याजाची सवलत दिलेली आहे व त्यांची बांधलेली घरे/ तयार सदनिका/ सोसायटीतील घरे जर भाडयाने दिली असतील व ते संस्थानचे खोलीत राहत असतील तर त्यांना

व्याजाची सवलत देण्यात येणार नाही व आजपर्यंत दिलेल्या संस्थान व्याजाच्या सवलतीची वसुली करण्यात येईल. तसेच त्यांचा खोली वापारण्याचा सेवाआकार तिप्पट करण्यात येईल.

१०) ज्या कर्मचा-यांना गृहकर्जाची सवलत दिली आहे (वैयक्तीक, श्री साईश्रध्दा व श्री साईप्रसाद हैसिंग सोसायटी) परंतु ते सवलतीच्या बांधलेल्या घरात राहत नसुन त्यांनी घर भाडयाने दिलेले आहे व पुर्वीच्या जुन्या घरात राहत आहे अशा कर्मचा-यांच्या घराची तात्काळ पाहणी करुन संस्थान व्याजाची सवलत बंद करण्यात येईल व आजपर्यंत दिलेल्या संस्थान व्याजाच्या सवलतीची वसुली करण्यात येईल.

११) RBI च्या धोरणानुसार व्याजदरात वेळोवेळी बदल झाल्याने सर्व संबंधीत गृहकर्जधारकांना तो व्याजदर तात्काळ लागु करण्यात येईल.

१२) गृहकर्ज घेतलेल्या कर्मचा-यांच्या सदनिकेस वेळोवेळी स्थायी समितीचे सदस्य भेट देतील व निरिक्षणाबाबतचा अहवाल सादर करण्यात येईल.

१३) दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी गृहकर्जाची बैठक बोलविण्यात यावी.

१४) ज्या कर्मचा-यांनी १५ किमीच्या बाहेर घरे बांधलेली आहे व ते त्या घरात राहत नाही तसेच ती भाडयाने दिलेली आहे त्या कर्मचा-यांची संस्थान व्याजाच सवलत बंद करण्यात येईल तसेच ते संस्थान खोलीत राहत असतील तर सेवाआकार तिप्पट करण्यात येईल.

उपरोक्त नियमावलींच्या अटींस अधिन राहुन संस्थानकडून कर्मचा-याला गृहकर्ज मंजुर केले जाते.

सध्या बॅकांचे व्याजदर हे ९.५० ते १० % एवढे असुन गेल्या वर्षात (सन २०१६-१७) मध्ये संस्थानने कर्मचा-यांना निम्म्या व्याजाच्या सवलतीकामी रक्कम रु.२१,६६,१५४/- मात्र एवढे अनुदान दिले आहे. तसेच मागील वर्षात १३ कर्मचा-यांनी नव्याने गृहकर्ज घेतलेले आहे.

**संस्थान व शासनाकडील गृहकर्ज योजनेतील नियमावलींचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणेः**

| अ.क्र. | शासनाकडील नियमावली | संस्थानकडील नियमावली |
|---|---|---|
| १ | घर बांधणीसाठी तसेच घरासाठी जागा खरेदीकामी अग्रिम रक्कम मंजुर केली जाते व त्याची मर्यादा ३ लाखापासुन ते १५ लाखांपर्यंत आहे. | संस्थान अग्रिमाची रक्कम देत नाही व गृहकर्जाची मर्यादा १० लाखापर्यंत आहे. |
| २ | शासनात अग्रिम रक्कम ही त्याच्या पगाराच्या (Pay in Pay Band+Grade pay) ५० पट दिली जाते. | संस्थानमध्ये गृहकर्जासाठी मंजुर रक्कम ही त्याच्या पगाराच्या (Pay in Pay Band+Grade pay+DA) ४० पट दिली जाते. |
| ३ | शासनाकडून मंजुर झालेल्या घर बांधणी अग्रिम रक्कमेची वसुली कर्मचा-याकडून व्याजासह केली जाते त्याचा व्याजदर ९.५०% असा आहे. | संस्थानकडून बॅकेच्या प्रचलीत व्याजदरात निम्म्या व्याजाची सवलत(५०% ) कर्मचा-यांना दिली जाते. |
| ४ | एखादया कर्मचा-याने समजा २० वर्ष कालावधीकरीता अग्रिम घेतलेली असेल तर कर्मचा-याकडुन प्रथमतः१९२ महिन्यात मुळ अग्रिम व ४८ मासिक महिन्यात व्याज वसुली केली जाते. | संस्थानमध्ये बॅकेकडून विहित नियमावलीच्या अटींस अधिन राहून गृहकर्ज मंजुर झाल्यास सुरुवातीपासून संस्थानचा व्याजाचा निम्मा हिस्सा संस्थानमार्फत (५० %) आदा केला जातो. |
| ५ | कर्मचा-याची सेवा किमान ५ वर्ष झालेली पाहिजे तसेच पती व पत्नी दोघेही सेवेत असेल तर एकालाच याचा लाभ घेता येतो. | संस्थानध्येही याचप्रमाणे कार्यवाही होते. |
| ६ | कर्मचा-यांना स्वतःच्या मालकीच्या जागेत घर बांधणेकामी/ नवीन घर खरेदी करणेकामी तसेच स्वतःचे जुने घर मोडकळीस आल्यामुळे त्या जागी नवीन घर बांधणेकामी घरकर्ज मंजुर केले जाते . | संस्थानध्येही याचप्रमाणे कार्यवाही होते. |
| ७ | शासनात राष्ट्रीयीकृत बॅका, सहकारी बॅका, एचडीएफसी, महाराष्ट्र स्टेट हौसिंग फायनान्स कॉ. व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी मंजुरी मिळते. | संस्थानमध्ये राष्ट्रीयीकृत बॅका, एचडीएफसी व तत्सम शासन मान्य वित्तीय संस्थाकडून घरबांधीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी मंजुरी मिळते. |

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र शासन व संस्थानमार्फत गृहकर्ज योजनेअंतर्गत देण्यात येत असलेल्या रक्कमेबाबत तरतुदी आहे. परंतु संस्थानमध्ये कर्मचा-यांसाठी असणा-या निवासस्थानाची संख्या अत्यल्प असल्याने कर्मचाऱ्यांना संस्थानमार्फत निवासस्थान पुरविणे खूप अडचणीचे होत असल्याने सदर गृहकर्ज योजना लागू केलेली आहे.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर चर्चा आणि काही बदल करायचे असेल तर त्यावर निर्णयासाठी सादर.

**निर्णय क्र.३६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये कर्मचा-यांसाठी असणा-या निवासस्थानाची संख्या अत्यल्प असल्याने कर्मचा-यांना संस्थानमार्फत निवासस्थान पुरविणे खूप अडचणीचे होत आहे, याकरीता सदरहु गृहकर्ज योजणा लागु करणेत आलेली आहे, परंतु असे निदर्शनास येत आहे की, कर्मचारी संस्थानकडून गृह कर्जही घेतात व घर बांधुन झाले तरी संस्थान निवासस्थान खाली करत नाही, याकरीता अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय स्तरावरुन कारवाई करण्यात यावी व यापुढे या योजणेचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना संस्थान निवासस्थान देण्यात येऊ नये.**

**तसेच संस्थान कायम कर्मचाऱ्यांना गृहकर्ज योजनेची सवलत मिळणेकरीता सुधारित नियमावली तयार करणेत येऊन ती मान्यतेस्तव सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०७** **विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनाचे दि.१५.०४.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मा.व्यवस्थापन समिती दि.०५.११.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ (ब) हा रद्द करणे व त्या अनुषंगाने निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **कलम १३ (४)-** समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु, ज्या अधिका-यांला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहुन अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजुर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही.

**कलम २८(१) –** कार्यकारी अधिकारी किंवा समिती यांच्या कोणत्याही कार्यवाहीचे किंवा निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख हे, अशा कार्यवाहीचा कायदेशीरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचुकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वतःची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्यांची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे असे राज्य शासनास वाटल्यास त्यास तसेच करता येईल आणि कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल विलोपन किंवा प्रत्यावर्तन केले पाहिजे किंवा तो फेरविचारार्थ पाठविला पाहिजे, असे राज्य शासनास आढळून आले तर, राज्य शासनास त्याप्रमाणे आदेश काढता येतील.

**कलम २८(२) –** जेव्हा एखाद्या प्रकरणी पोटकलम (१) खाली राज्य शासनाने कार्यकारी अधिका-यांचा किंवा समितीच्या कोणत्याही कार्यवाहीचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा अभिलेख मागवला असेल तेव्हा राज्य शासनास त्या संबंधात पोटकलम (१) खाली असलेल्या आपल्या अधिकारांचा वापर करण्यात येईपर्यंत कार्यकारी अधिका-यांच्या किंवा समितीच्या अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

परंतु, संबंधित पक्षकारांना स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याशिवाय राज्य शासन पोटकलम (१) अन्वये कोणताही आदेश देणार नाही.

**कलम ३०(१)-** समितीचा कोणताही ठराव निर्णय अथवा आदेशांची अंमलबजावणी किंवा समितीकडून किंवा समितीच्या वतीने करण्यात यावयाची असेल किंवा करण्यात येत असले अशी कोणतीही कृती जनहिताच्या विरोधात व या अधिनियमाव्दारे वा अधिनियमान्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचे उल्लंघन करणारी किंवा त्या अधिकारांपेक्षा अधिक अधिकार वापरुन करण्यात येणारी कृती आहे अथवा त्यामुळे व्यवस्थापन निधीचा दुरुपयोग वा गैरवापर होण्याची किंवा अपव्यय होण्याची शक्यता आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर त्यास लेखी आदेशाव्दारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा एका किंवा अनेक कालावधींसाठी अशा ठरावाची वा आदेशाची अंमलबजावणी

तहकुब करता येईल किंवा अशी कोणतीही कृती प्रतिषिध्द करता येईल. अशा आदेशाची एक प्रत राज्य शासनाकडून समितीला आणि कार्यकारी अधिका-याला तात्काळ पाठविण्यात येईल.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. -**

१) मा. व्यवस्थापन समिती दि. ०५.११.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ (ब).

"कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर संबंधितांच्याहजर तारखेपासुन वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यास व देय होणारी फरकाची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आली."

२) मा. त्रिसदस्य समिती दि. ०६.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६८

"प्रस्तावात नमुद कलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ४ आरएमओ यांना त्यांचे हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागू करणेत यावी असे ठरले. "

३) मा. त्रिसदस्य समिती दि. २९.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १८५

"दि. ०५.११.२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ तसेच त्यास अनुसरुन काढणेत आलेल्या जा.नं. एसएसएस/वशी ०१/७५/२००५ दि. ०७.०१.२००६ चे आदेशाप्रमाणे दि. ०६.०१.२०१६ रोजीचे आदेशानुसार डॉ. शामकुवर व इ. ३ यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागु केलेली असल्याने त्याच धर्तीवर डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांनाही त्यांचे हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करावी असे ठरले. "

४) मा. व्यवस्थापन समिती दि. ३१.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८०७.

"निर्णय क्र. ८०७ प्रस्तावात नमुद केलेल्या अटी/शर्ती व अभिप्रायांचा विचार करता डॉ. शामकुवर, आरएमओ व इतर ३ आरएमओ तसेच वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) यांना आकृतीबंध मंजुर झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागु करण्यात यावी, असे समितीचे मत झाले. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन मा. उच्च न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी. "

५) मा. व्यवस्थापन समिती दि. ३१.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८७८

"निर्णय क्र. ८७८ उपरोक्त निर्णय क्र. ८०७ मध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे श्री साईबाबा वश्री साईनाथ रुग्णालयाकडील प्रस्तावित श्री अनिल गायकवाड व इतर ९ कर्मचारी यांनाही आकृतीबंध मंजुर झालेल्या तारखेपासुन वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, असे समितीचे मत आहे. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन मा. उच्च न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी. "

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा हॉस्पिटलची स्थापना सन २००५ मध्ये झालेली आहे. त्यावेळी हॉस्पिटसाठी आकृतीबंध मंजुर नसल्याने वैद्यकीय अधिकारी, टेक्निशियन, स्टाफनर्स, मॅनेजर्स इत्यादी पदांवर तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर भरती करणेत आली होती.

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कर्मचारी वर्गांना ठराविक मानधन देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती दि. ०५.११.२००५ रोजीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. ६६७ नुसार कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर संबंधितांच्याहजर तारखेपासुन वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यास व देय होणार फरकाची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन जा.नं. एसएसएस/वशी १/७५/२००५ दि. ०७.०१.२००६ अन्वये आदेश पारीत करणेत आलेला होता.

तथापि, श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व सुधारीत आकृतीबंधास (श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय) २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने श्री साईबाबा संस्थानकडून दि. ०५.११.२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयक्र. ६६७ ची अंमलबजावणी त्यावेळी करणेत आलेली नाही. परंतु सदर निर्णयाचा आधार घेऊन डॉ. दादासाहेब कांबळे, श्री साईनाथ रुग्णालय यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन ८९११/२०१३ दाखल केले होते. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि. १९.०३.२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

"In that view of the matter, writ petition is disposed off with direction to respondent to decide the representations dated 09.09.2012 and 23.02.2013 made by the petitioner, if already not decided, as expeditiously as possible, however, within two months from today. "

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार डॉ. कांबळे यांचे वेतनश्रेणीबाबत निर्णय घेणेसाठी दि ०३.०८.२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला होता. निर्णय क्र. ६५१ खालीलप्रमाणे झाला.

डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, असो कन्सल्टंट (त्वचारोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि. ०९.०९.२०१२ व दि. २३.०२.२०१३ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या नेमणूकीचे सुरुवातीपासून वार्षिक वेतनवाढ व वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.

अशाचप्रकारे डॉ. सुभाष श्रीराम शामकुवर, आरएमओ व इतर ३ यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर वेगवेगळे रिट पिटीशन्स दाखल केले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाने दि. ३०.०६.२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला.

Respondent no.2 shall decide the representation given by the petitioners with regard to pay scale, expeditiously and on its own merits, within a period of 4 months form today.

मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि. ०६.११.२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन सिमती सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता निर्णय क्र. ९६८ खालीलप्रमाणे झाला होता.

**"प्रस्तावात नमुद केलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ४ आरएमओ यांना त्यांचे हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागू करणेत यावी असे ठरले."**

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ मध्ये मान्यता मिळालेली असतानासुध्दा उपरोक्त निर्णय झालेला आहे असे दिसत.

समान मागण्या व समान मुद्दा असतांना एका प्रकरणात विनंती अमान्य करण्यात आली तर दुस-या प्रकरणात विनंती मान्य करण्यात आल्याने डॉ.कांबळे यांनी पुनश्च मा उच्च न्यायालयात रिटी पिटीशन क्र १०७०८/२०१४ दाखल केले होते. सदर पिटीशनमध्ये मा व्यवस्थापन समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे निर्णय क्र ६५१ नुसार संस्थानने याबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यामुळे दि. ०६/११/२०१४ च्या सभेतील निर्णय क्र ९६८ ची अंमलबजावणी स्थगित केली होती.

त्यानंतर, डॉ कांबळे यांनी पुन्हाविनंती अर्ज सादर केल्याने तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. १०/०२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

"वेतनश्रेणी अस्तित्वात आल्यापासूनच सर्वांना लागू करण्यात आली आहे. अस्तित्वात नसलेली वेतनश्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने लागु करण्याचा प्रश्न उदभवत नाही अन्य डॉक्टरांना देखील याच नियमाने वेतनश्रेणी लागु करण्यात आली असल्याने यामध्ये कोणतीही विसंगती नाही. सदरची बाब न्यायालयाच्या सविनय निदर्शनास आणण्यात यावी व्य. समितीला सध्या तसदी देण्याची आवश्यकता नाही."

तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६.११.२०१४ रोजीचे स्भेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी न करणेत आल्याने डॉ. शामकुवर व इतर ३ यांनी पुन्हा मा अध्यक्ष सो यांचेकडे निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी विनंती अर्ज केला होता. सदरहू अर्जावर निर्णयघेणेसाठी मा. अध्यक्षसो. यांनी याबाबतचा प्रस्ताव त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेबाबत निर्देश दिल्याने दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेमधील निर्णयक्र ९६८ निरस्त करणेबाबत दि. ११/१०/२०१५ व दि. १८/१२/२०१५ रोजी टिपण्या सादर करणेत आल्या होत्या. त्यानंतर मात्र तत्कालीन मा उपकार्यकारी अधिकारी व मा कार्यकारी अधिकारी यांनी दि. ०५/११/२००५ रोजीचे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ६६७ ला अनुसरून काढणेत आलेला आदेश क्र. जा.नं.एसएसएस/ वशी०१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ ची अंमलबजावणी करणेबाबत समक्ष निर्देश दिले. सदर निर्देशास अनुसरून दि. ०६/०१/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीनुसार दि. ०६/०१/२०१६ रोजी डॉ शामकुवर व इतर ३ यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करणेबाबतचा आदेश पारित करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे डॉ कांबळे यांनाही दि २९/०२/२०१६ रोजीचे मा त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र १८५ नुसार दि. १४/१०/२००५ पासून सन २००९ चे सुधारीत मंजुर आकृतीबंधात वैदकीय अधिकारी (त्वचारोग) पदासाठी असलेली मंजुर वेतनश्रेणी दि. २५/०४/२०१६ च्या आदेशान्वये लागु करणेत आलेली आहे.

डॉ कांबळे यांनी मा उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ मध्ये मा उच्च न्यायालयाने दि. ११/०४/२०१६ रोजी डॉ कांबळे यांना ८ आठवडयाच्या आत म्हणजेच ०६/०६/२०१६ पर्यंत त्यांना मॉनेटरी बेनिफिटस (Monetary benefits) देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.त्याप्रमाणे डॉ कांबळे यांना दि २०/०४/२०१६ च्या आदेशान्वये वेतनश्रेणी लागु करून व एप्रिल २०१६ चे पगारपत्रकापासून सुधारीत वेतन अदा करणेत येत आहे.

तदनंतर श्री. अनिल गायकवाड एक्स-रे अटेंडंट व इतर ९ श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालय यांनीही हजर तारखेपासुन वेतनश्रेणी मिळणेकामी अनुक्रमे अ.नं. ६८८२/२०१६ते ६८९१/२०१६ रिट पिटीशन दाखल केले होते त्यावर मा उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी दि०१ ऑगष्ट २०१६ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

"2. There is innocuous prayer in these petitions inasmuch as the petitioners have sought direction to respondent no.1 and 2 to decide their pending applications / representations. In the circumstances, we direct respondent nos. 1 and 2 to take decision, if already not taken, on pending applications / representations submitted by the petitioners an expeditiously as possible, however, within six months from today, on their own merits without being influenced by the fact that this court has given the above direction and communicate the decision so taken to the petitioners within the said period. All the writ petitioners disposed of accordingly.

The learned A.G.P. appearing for the respondent / state assures this court that this order will be communicated to respondent Nos. 1 and 2".

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व सुधारित आकृतीबंधास सन २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने दि. ०५/११/२००५ रोजी त्यावेळच्या मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला निर्णय क्र. ६६७ योग्य आहे किंवा कसे? याबाबत संभ्रमावस्था असल्या कारणाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी सन २००४ साली लागु झालेल्या अधिनियमातील खालील तरतुदींचा तसेच संस्थानचे मंजूर २००७ व सन २००९ चा आकृतीबंधातील अटी-शर्तींचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

सबब, मा. उच्च न्यायालयाने त्यांचे दि. ०१/०८/२०१६ रोजीचे आदेशात दिलेले वेळेचे बंधन, अधिनियमातील तरतुदी, सन २००७ व २००९ च्या मंजूर आकृतीबंधातील अटी-शर्ती तसेच मा. मुख्यलेखाधिकारी यांनी, अशाच समान मागणीमधील एका प्रकरणात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १३(५) मधील तरतुदीनुसार आकृतीबंध मंजूर होईपर्यंत कोणत्याही अधिकारी/ कर्मचा-यांची नेमणूक करता येत नाही. याचाच अर्थ आकृतीबंध मंजूरीच्या दिनांकापासून किंवा तदनंतर नियमित नेमणूका करता येतील त्यामुळे नियमीत वेतनश्रेणीसुद्धा त्याच दिनांकापासून किंवा तदनंतर नियमीत नेमणूका करता येतील त्यामुळे नियमीत वेतनश्रेणी सुद्धा त्याच दिनांकापासून देय होईल, असे अभिप्राय विचारात घेता अर्जदारांना हजर झालेचे तारखेपासून वेतनश्रेणी लागु करावी किंवा कसे? यासाठी विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन घेणेस तसेच विधी व न्याय विभागाचे निर्देश/ मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतरमा.उच्च न्यायालयात कर्मचा-यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन्स मध्ये दिलेल्या आदेशाबाबत (सहा महिन्याच्या मुदतीच्या आत म्हणजेचदि. ३१/०१/२०१७ पूर्वी) मा. उच्च न्यायालयात कामगार विभागामार्फत वस्तुस्थिती मांडण्यासाठी सदरचा विषय दि. २१.११.२०१६ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेत सादर करणेत आला होता. त्यावर अनुक्रमे निर्णय क्र. ८०७ व ८७८ खालीलप्रमाणे झाला आहे.

निर्णय क्र. ८०७ प्रस्तावात नमुद केलेल्या अटी/ शर्ती व अभिप्रायांचा विचार करता डॉ. शामकुवर, आरएमओ व इतर ३ आरएमओ तसेच वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) यांना आकृतीबंध मंजूर झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, असे समितीचे मत आहे. याबाबत विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन मा. न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात आली.

निर्णय क्र. ८७८ उपरोक्त निर्णय क्र ८०७ मध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयाकडील प्रस्तावित श्री अनिलगायकवाड व इतर ९ कर्मचारी यांनाही आकृतीबंध मंजूर झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, असे समितीचे मत झाले. याबाबतविधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन मा. उच्च न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी, असे ठरले.

दि. ३१/११/२०१६ रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ८०७ व निर्णय क्र. ८७८ नुसार उच्च न्यायालयात संस्थान कर्मचा-यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन्स मध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत (सहा महिन्याच्या मुदतीच्या आत म्हणजेच दि. ३१.०१.२०१७ पूर्वी) संस्थानतर्फे मा. न्यायालयात वस्तुस्थिती मांडण्यासाठी संस्थान अधिनियमातील तरतुदी, सन २००७ व २००९ चा सुधारित मंजूर आकृतीबंधातील अटी शर्ती व वेतन पडताळणी विभाग, नाशिक यांचे अभिप्राय विचारात घेता अर्जदारांना हजर झालेचे तारखेपासून वेतनश्रेणी लागू करता येईल? व लागु केल्यास फरक द्यावा किंवा कसे? याकामी मा. प्रधान

सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडून जानं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ २३३२/ २०१७ दि. १२/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये अभिप्रायमागविणेत आले होते. सदर पत्रास अनुरुन आवश्यक कागदपत्रेही जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/एचआर २४०५/२०१७ दि. २४/०१/२०१७ पत्रान्वये सादर करणेत आली होती.

दरम्यानचे कालावधीत डॉ.दादासाहेब लुमाकांबळे यांनी रिट पिटीशन १०७०८/२०१४ मध्ये कन्टेम्प्टपिटीशन दाखल केले होते. सदरचे रीट पिटीशन नामंजूर झाले असुन खालीलप्रमाणे आदेश झालेले आहेत.

"Since there is direction issued by this Court while disposing of the Writ Petition No. 10708 of 2014 on 11.4.2016 there arises no arises no question of committing breach thereof.

2. Contempt Petition accordingly stands rejected."

विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुबई, शासन निर्णयक्र. सासंवि १०१७/१६७/प्र.क्र.१६/का.१६ दि. १५/०४/२०१७ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"श्री साईबाबा संस्थानच्या तत्कालीन व्यवस्थापन समितीने दि. ०५.११.२००५ रोजीच्या बैठकीत संस्थान रुग्णालयातील कर्मचा-यांना शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय नियुक्त करण्याबाबत व संबंधित अधिकारी आणि कर्मचा-यांना पूर्वलक्षी प्रभावाने सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यातबाबत घेतलेला निर्णय ६६७ हा संस्थान अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असुन

व्यवस्थापन समितीने प्राप्त अधिकाराचा अधिक वापर करुन घेतला आहे. सदर ठराव अवैध तसेच नियमबाह्य असल्याने संस्थानच्या व्यवस्थापन समितीने रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी यांना कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाल्यानंतर संबंधिताच्या हजर तारखेपासून वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यास व देय होणारी रक्कम अदा करण्याबाबत दि. ०५.११.२००५ रोजी घेतलेला निर्णय क्र. ६६७ (ब) हा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ च्या कलम ३० मधील तरतुदीनुसार रद्द करण्यात येत आहे."

२. सदर शासन निर्णयाच्या प्रभावाने आवश्यक असणारी कार्यवाही कार्यकारी अधिकारी, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेद्वारे करण्यात येईल".

**मागणी–** शासननिर्णय क्र.सासंवि १०१७/१६७/प्र.क्र.१६/का.१६ दि. १५/०४/२०१७ नुसार कार्यवाही करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** मा.व्यवस्थापन समिती दि. ०५.११.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ (ब) दि. १५/०४/२०१७ रोजीचे शासन निर्णयाद्वारे रद्द झालेला आहे. सदर निर्णयाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

१) डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांनादि ०५/११/२००५ रोजीचे मा. व्य.स.सभेतील निर्णय क्र. ६६७ (ब) यास अनुसरुन, दि.२९/०२/२०१६ रोजीचे सभेत घेतलेला निर्णय क्र.१८५ व त्यास अनुसरुन डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागु करणेबाबत दि.२५/०४/२०१६ रोजी काढणेत आलेला आदेश रद्द करुन देणेत आलेले जादा वेतन बारा समान हप्प्यात वसुल करावे असे स्पष्ट मत आहे.

२) श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉ. सुर्यकांत पाटील, डॉ. दिपक कांदळकर, डॉ. उल्हास पवार व डॉ. शामकुवर या चार आरएमओ यांनी दाखल केलेले रिट पिटीशन ५२५९,५२६०, ५२६७, ५२७६/२०१४ मधील आदेशानुसार व त्यांचा दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ व दि. ०७/०१/२००६ रोजीचे आदेशानुसार हजर तारखेपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा दि. १८/०८/२०१४ रोजीच्या विनंती अर्जावर दि. ०६/११/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ९६८ हा संस्थान अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असुन मा. व्यवस्थापन समितीने प्राप्त अधिकाराचा अधिक वापर करुन घेतला आहे. त्यामुळे सदरचा निर्णय व त्या अनुषंगाने हजर तारखेपासून वेतनश्रेणी देणेबाबतचा दि. ०७/०१/२०१६ रोजीचा आदेश रद्द करुन त्यानुसार देणेत आलेले जादा वेतन बारा समान हप्यात वसुल करावे लागेल, असे मत आहे.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वेतनश्रेणी देणे ही बाब आकृतीबंध मंजूर झालेनंतरची आहे त्यामुळे प्रस्तावीत कर्मचारी व इतर मागणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आकृतीबंध मंजूर झाल्यापासून वेतनश्रेणी लागु करता येईल, असे समितीचे मत झाले. याकरीता विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. सासंवि/ १०१७/ १६७/ प्र.क्र.१६/ का.१६ दि.१५.०४.२०१७ अन्वये कळविलेनुसार मा.व्यवस्थापन समिती दि.०५.११.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६७ (ब) रद्द करणेत येऊन, सदरहु शासन निर्णयाच्या प्रभावाने आवश्यक असणारी कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

**याचबरोबर प्रस्तावातील विभागाचे अभिप्रायामध्ये नमुद केलेल्या १ व २ मुद्दयांप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०८** **प्रायोगिक तत्वावर साईभक्तांसाठी मुंबई-शिर्डी आणि शिर्डी दर्शन हवाईसेवा सुरु करणेबद्दल वाल्मीक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि. यांचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२९ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३६.

**प्रस्ताविक-** श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांनी त्यांचे दिनांक १०.०५.२०१७ चे पत्रात, "एअर एलोरा एविएशन प्रा.लि.कंपनी प्रायोगिक तत्वावर साईभक्तांसाठी माफक दरात मुंबई-शिर्डी आणि शिर्डीदर्शन सेवा सुरु करणेस इच्छुक असून आपल बहुमूल्य सहकार्य लाभल्यास ही सेवा आम्ही अल्पकालावधीत सुरु करु." असे कळविलेले आहे.

श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांनी त्यांचे सदर्भीय पत्राने साईभक्तांसाठी मुंबई-शिर्डी आणि साईदर्शन सेवा प्रायोगित तत्वावर सुरु करणेबाबत इच्छुक असलेबाबत कळविले आहे.

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०५.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२९ मध्ये संस्थान मालकीच्या हेलिपॅडचा वापर खाजगी संस्था/व्यक्ती/सार्वजनिक संस्था यांना उपलब्धतेनुसार सशुल्क करुन देणेत यावा असा निर्णय झालेला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६ अन्वये संस्थानचे हेलिपॅड वापर आकार रुपये २०००/- ऐवजी रुपये ५०००/- व ॲब्युलन्ससाठी प्रति तास रुपये १०००/- ऐवजी रुपये १५००/- आणि नाईट हॉल्टसाठी हेलिपॅड वापर आकार रुपये ५०००/- अधिक रुपये २०००/- असा एकूण रुपये ७०००/- इतका आकार आकारण्यात यावा असे असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी दिनांक २३.०३.२०१५ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच हेलीपॅडवर संरक्षणाचे दृष्टीने संरक्षण विभागामार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येते. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने हेलीकॉप्टार कंपन्याच्या मागणीनुसार व संस्थानच्या उपलब्धतेनुसार विविध खाजगी कंपन्या/व्यक्तींना संस्थान हेलीपॅड वापरास परवानगी देण्यात येते. जनसंपर्क विभागामार्फत हेलीकॉप्टर लॅण्डींगची कार्यवाही दिनांक ०१.१०.२००८ पासून सुरु करण्यात आलेली असून माहे.जानेवारी -२०१६ ते डिसेंबर – २०१६ या एक वर्षाचे कालावधीत संस्थान हेलिपॅडवर झालेल्या लॅण्डींगची माहिती पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | कालावधी | दिलेल्या परवानग्या | झालेले लॅण्डींग | प्राप्त रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी – २०१६ | १० | ०७ | ३५,०००/- |
| २ | फेब्रुवारी – २०१६ | ०७ | ०५ | २७,०००/- |
| ३ | मार्च – २०१६ | ०५ | ०३ | १५,०००/- |
| ४ | एप्रिल – २०१६ | ११ | ०४ | २२,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | मे – २०१६ | १२ | ०६ | ३०,०००/- |
| ६ | जून – २०१६ | ०० | ०० | -- |
| ७ | जुलै – २०१६ | ०० | ०० | -- |
| ८ | ऑगस्ट - २०१६ | ०२ | ०० | -- |
| ९ | सप्टेंबर – २०१६ | ०१ | ०१ | ५,०००/- |
| १० | ऑक्टोबर – २०१६ | ०५ | ०३ | १५,०००/- |
| ११ | नोव्हेंबर – २०१६ | ०९ | ०८ | ४६,०००/- |
| १२ | डिसेंबर – २०१६ | ०८ | ०६ | ३०,०००/- |
| | **एकुण-** | **७०** | **४३** | **२,२५,०००/-** |

माहे जानेवारी – २०१६ ते डीसेंबर – २०१६ या कलावधीत हेलीपॅड वापर आकार रुपये २,२५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख पंचवीस हजार मात्र) इतके उत्पन्न संस्थानला या सेवेतून प्राप्त झाले आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समतीचे दिनांक २८.१२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५९ अन्वये संस्थान अग्नीशमन वाहन वापरासाठी पहिले तीन तास रुपये ४,०००/- त्यानंतर प्रती तास रुपये १,०००/- या प्रमाणे तसेच फोमचा, सि.ओ.टू. व ड्राय पावडर सिलेंडरचा वापर झालेस खरेदी दराप्रमाणे दर आकारणी करण्यात यावी असा निर्णय झालेला असून त्यानुसार अग्नीशमन वाहनही संबंधीतास उपलब्ध करुन देता येईल.

तथापि मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार व खालील अटी/ शर्तीस अधिन राहून श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना हेलीपॅड वापरास परवानगी देता येईल.

१. हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी आवश्यक सर्व स्थानिक/शासकीय/निमशासकीय परवानग्या हेलीकॉप्टर कंपनीला घेणे बंधनकारक राहील.

२. लॅण्डींग रद्द करावयाचे असेल तर एक दिवस आधी तसे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना कळविणे आपणास बंधनकारक राहील

३. हेलीकॉप्टर लॅण्डिंग व टेक ऑफ करतांना अपघात होऊन जिवित हानी अथवा इतर प्रकारची कोणतीही हानी झाल्यास त्यास कंपनी जबाबदार राहील. याबाबत संस्थानची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

४. अतिमहत्वाचे व्ही.आय.पी.चे शिर्डी भेटीच्या दरम्यान अथवा आपतकालीन परिस्थितीत सदर हेलीपॅडचा वापर करणे आवश्यक असेल त्यावेळेस लॅण्डींग रद्द किंवा वेळ बदलणे ही बाब कंपनीवर बंधनकारक राहील. तशी पुर्व सुचना संस्थान कंपनीस देईल.

५. प्रत्येक लॅण्डींगपुर्वी किमान दोन दिवस आगोदर जनसंपर्क विभागाकडे हेलीकॉप्टर लॅण्डींगबाबत फॅक्स पाठवून कळविणे, परवानगी घेणे हेलीकॉप्टार कंपनीस बंधनकारक राहील.

६. संरक्षण विभागामार्फत हेलीपॅडवर सुरक्षा रक्षकची नेमणूक करण्यात येते. याव्यतिरिक्त इतर वाढीव सुरक्षा व्यवस्था संबंधीत कंपनीने करावी

७. हेलीकॉप्टर लॅण्डींगसाठी परवानगी देणे अथवा रद्द करणेबाबतचे सर्व अधिकारी संस्थान राखून ठेवत आहे.

श्री साईबाबा संस्थानचे हेलिपॅड वापरास विविध खाजगी कंपन्या/व्यक्ती नेहमीच मागणी करतात. तसेच सदरचे हेलिपॅडवर ब-याचवेळा मा.मुख्यमंत्री, मा.पंतप्रधान, मा.राज्यपाल, मा.राष्ट्रपती, केंद्रीय मंत्री, विविध राज्याचे मंत्री आदि महत्वाच्या/अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या मागणीनुसार हेलिपॅड वापरास आयत्यावेळी परवानगी द्यावी लागते. तरी श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना इतर खाजगी कंपन्याप्रमाणे त्यांचे मागणीअंती व संस्थानच्या उपलब्धतेनुसार वेळोवेळी परवानगी देणे उचित होईल असे वाटते.

**विभागाची मागणी-** श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना प्रायोगिक तत्वावर साईभक्तांसाठी मुंबई-शिर्डी आणि शिर्डी दर्शन हेलीकॉप्टार सेवा सुरु करणेसाठी परवानगी देणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** श्री साईबाबा संस्थानचे हेलिपॅड वापरास विविध खाजगी कंपन्या/व्यक्ती नेहमीच मागणी करतात. तसेच सदरचे हेलिपॅडवर ब-याचवेळा मा.मुख्यमंत्री, मा.पंतप्रधान, मा.राज्यपाल, मा.राष्ट्रपती, केंद्रीय मंत्री, विविध राज्याचे मंत्री आदि महत्वाच्या व्यक्तींच्या मागणीनुसार हेलिपॅड वापरास आयत्यावेळी परवानगी द्यावी लागते. तरी श्री.वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना इतर खाजगी कंपन्याप्रमाणे त्यांचे मागणीअंती व संस्थानच्या उपलब्धतेनुसार तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०२.२०१५ रोजीचे निर्णयानुसार वेळोवेळी परवानगी देणे उचित होईल.

तथापि सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाल्मीक केंद्रे, डायरेक्टर, एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांना साईभक्तांचे सोईसाठी प्रायोगिक तत्वावर एक महिन्यासाठी, सध्याच्या संस्थाननियमावलीच्या अधीन राहून, मुंबई-शिर्डी हवाईसेवा सुरु करणेस तत्व:त मान्यता देण्यात आली. तसेच शिर्डी दर्शन हवाईसेवा सुरु करणेसाठीचा एअर एलोरा एविएशन प्रा.लि., पुणे यांचेकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात यावा व या हवाईसेवेमुळे शिर्डी शहराच्या सुरक्षिततेवर काही अडचण येणार नाही, याची हमी त्यांचेकडून घेण्यात यावी.**

**याचवेळी अशीही चर्चा झाली की, हवाई सेवेव्दारे येणारे साईभक्त व्ही.आय.पी असतील, त्यांचेकडून मोठया स्वरुपाच्या देणग्या संस्थानला प्राप्त होतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे त्यांना हवाईसेवेच्या तिकीटावर दर्शन/ आरतीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. याकरीता एअर एलोरा एविएशन प्रा.लि.,पुणे यांचे सोबतचे करारामध्ये, संस्थानचे प्रचलित नियमानुसार दर्शन/ आरतीची रक्कम आकारणेची तरतुद करणेत यावी.**

**तसेच एअर एलोरा एविएशन प्रा.लि.,पुणे हे साईभक्तांना हवाईसेवेव्दारे शिर्डी दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणार आहेत व त्यामध्ये ते संस्थानचे विविध प्रकल्प माहितीसह दाखविणार आहेत. हेलीपॅडवर ॲम्ब्युलन्स, फायर फायटर सुविधा ते स्वत:ची वापरणार आहेत. ज्यावेळी कोणी मान्यवर शिर्डी येथे हेलीकॉप्टरव्दारे दर्शनासाठी येतील, त्यावेळी एअर एलोरा एविएशन प्रा.लि.,पुणे यांना परवानगी देता येणार नाही. त्याचबरोबर याकामी आवश्यक त्या सर्व परवानग्या संबंधीत कंपनीने प्राप्त करुन घ्याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०९** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१७ साजरा करणेस व याकामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** अधिनियम- सन २००४ महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ (१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव शनिवार, दि.०८/०७/२०१७ ते सोमवार, दि. १०/०७/२०१७ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस रविवार दि.०९/०७/२०१७ आहे. या उत्सवासाठी खालीलप्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| **अ.नं** | **तपशील** | **उत्सवात करावयाची कामे** |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात.<br>यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची संख्या १,८०,००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील.<br>तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट (न्यूज ॲटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | **अ ) कलाकार कार्यक्रम** |
| | शनिवार<br>दि.८/०७/२०१७.<br>(प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीरा शेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल. |
| | रविवार<br>दि.०९/०७/२०१७<br>(मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम समाधी मंदीराशेजारील उत्तरेकडील स्टेजवर होईल.<br>२) रात्रौ. ११.०० ते सकाळी ५.०० पर्यंत (०९/०७/२०१७) इच्छुक कलाकारांचा साईभजन कार्यक्रम होईल. यादिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |

| | | |
|---|---|---|
| | सोमवार<br>दि. १०/०७/२०१७.<br>(सांगता दिवस) | सायंकाळी ७.३० ते १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (समाधी मंदीराचे उत्तरेकडील स्टेजवर) उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत<br>**इच्छूक कलाकारांचे अर्ज व तक्ता नंतर सादर केला जाईल.** |
| | शनिवार<br>दि.०८/०७/२०१७<br>रविवार<br>दि.०९.०७.२०१७<br>सोमवार<br>दि.१०/०७/२०१७ | **ब) कीर्तन कार्यक्रम**<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात दि.०८/०७/२०१७ ते दि. १०/०७/२०१७ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पुजा भक्तांच्या गर्दीचा अंदाज घेऊन चालू किंवा बंद ठेवता येईल |
| ४ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदिरपरिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा- नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ५ | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात दिनांक ०८/०७/२०१७ रोजी सकाळी ५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.०९/०७/२०१७ रोजी सकाळी ०५.०० वाजता समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दि.०७/०७/२०१७ रोजी समाधी मंदिरासमोरील स्टेजवर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य हजर राहातील. |
| ६ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी सोमवार दिनांक ०८/०७/२०१७ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, रविवार दिनांक ०९/०७/२०१७ रोजी रात्रौ ९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ८ | प्रसाद- भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय तसेच निमंत्रित कलाकारांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीसाठी येणा-या व्यक्तीची प्रसाद भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणे केली जाईल. साईभक्तांचे सोयीसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीप्रमाणे देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी सुरु करणेत येईल. या सबंधीत विभागाकडुन नियोजन करण्यात येईल.<br>मा.कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करुन सन २०१७ चे गुरुपौर्णिमा उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ निश्चित करण्यात येतील. त्याप्रमाणे उत्सवात मिष्टान्न देता येईल. |
| ९ | लिलाव | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. |
| १० | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊंटर्स तीन शिफ्टमध्ये चालू ठेवण्यात येतील. |
| ११ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |

| | | |
|---|---|---|
| १२ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसर,प्रसादालय परिसर या ठिकाणी ठेवण्यात येईल. |
| १३ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १४ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान नं. १ व साई धर्मशाळा,द्वारावती,निवासस्थान, इ. इमारती मधुन पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या व सोबत येणाऱ्या भक्तांची व्यवस्था साईआश्रम ( धर्मशाळा ) परिसरात करण्यात येते. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टँकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| १६ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल.काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १७ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१६ मध्ये प्रत्यक्ष खर्च रु.२८,६७,५५८/- (रु.अठ्ठाविस लाख सदुसष्ठ हजार पाचशे अठ्ठावन्न ) मात्र इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन-२०१७ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रु.**४१,५६,४६३/-** (रुपये एकेचाळीस लाख, छपन्न हजार, चारशे त्रेसष्ट) मात्र खर्च अपेक्षीत आहे. |

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७ अंदाजपत्रक**

| **अ.क्र** | **खर्च तपशिल** | **श्री गरुपौर्णिमा उत्सव -२०१६** | | **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१७ अंदाजे खर्च** |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी, स्टेज व इतर | ६,९०,०००.०० | ४,९१,८९३.०० | ४,१९,१०९.०० |
| २ | कलाकार बिदागी (किर्तनकार व निमंत्रीत कलाकार कार्यक्रमासह ) | ३,१२,०००.०० | १८,७९८.०० | ५,००,०००.०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न (श्रम परिहार मजुरीसह) | ८,४९,०००.०० | ६,१६,४७२.०० | ८,३७,३५४.०० |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च) | १,२५,०००.०० | ७३,१७२.०० | १,००,०००.०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेरज, (आश्रयदाते विदेशी भक्तांसह) | १४,९०,०००.०० | १२,८४,१०४.०० | १३,००,०००.०० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक | ३,५०,०००.०० | ३,५२,८२२.०० | ४,००,०००.०० |
| ७ | (विदयार्थी ) मानधन | ३,२५,०००.०० | २६,२९७.०० | ३,००,०००.०० |
| ८ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | २,००,०००.०० | ०.०० | २,००,०००.०० |
| ९ | इतर खर्च | १,००,०००.०० | ४,०००.०० | १,००,०००.०० |
| | **एकुण रुपये** | **४४,४१,०००.००** | **२८,६७,५५८.००** | **४१,५६,४६३.००** |

उपरोक्त अ.नं ८ मध्ये बगीचा विभागामार्फत मंदिर व मंदिर परिसरात करावयाच्या फुल सजावटीसाठी देणगीदार साईभक्तांचा प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संस्थानमार्फत फुल सजावट करणेसाठी अंदाजीत खर्चासाठी नव्याने तरतूद करणेत आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१७ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. ४१,५६,४६३/- (रु.एकेचाळीस लाख, छपन्न हजार, चारशे त्रेसष्ट) मात्र चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१७ साजरा करणेस व याकामी येणाऱ्या रु. ४१,५६,४६३/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.**

**तसेच या उत्सवाच्या निमंत्रण पत्रिकांसोबत संस्थानमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची व समाधी शताब्दीबाबतची माहिती साईभक्तांना पाठविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१०** **दरवर्षीप्रमाणे सन २०१८ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७ नं. ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन कार्य,त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील."

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत.

सन २०१७ चे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी नवनियुक्त मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वृत्तपत्रात जाहिरातीस प्रसिध्दी देऊन, ई निविदा मागवून, पात्र निविदाधारकांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावून न्युनतम दरधारकांकडून छपाई पुरवठा करुन घेण्यात आला होता. त्यानुसार दि.३१.०३.२०१७ अखेर शिल्लक साठयाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मंजूर खरेदी दर | विक्री दर | आदेशीत संख्या | जमा संख्या | माहे एप्रिल २०१७ अखेर विक्री संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०१७ | ६२.६२ | **५५/-** | २५०००० | २३८८३५ | २३८८३५ |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका २०१७ ०१ पानी मोठे (१९"X२९") | १४.४० | **१५/-** | ३२५००० | ३२४५६० | ३२४५६० |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"X३५" | २२३.०० | **२००/-** | २०००० | २०००० | २०००० |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"X२७.२५" | २७३.०० | **२४०/-** | ७००० | ७००० | ७००० |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"X२७" | २२५.०० | **२००/-** | ४००० | ३९८८ | ३९८८ |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"X०७" | २०६ | **१८०/-** | १५००० | १५००० | १५००० |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. ०३, ०४ व ०६ मधील शिल्लक साठा संपल्याने डिलक्स दिनदर्शिका दि.०२.०२.२०१७ चे आदेशान्वये वाढीव कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यासाठी अ.नं. ०३ साठी ३५०० नग, अ.नं.०४ साठी ७२० नग व अ.नं. ०६ साठी २००० नग भक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

**मागणी:-** सन-२०१७ च्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिकांचा छपाई कामाचा कार्यादेश माहे ३० सप्टेंबर २०१६ रोजी देण्यात आला होता व दैनंदिनी व दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका दि. ०१ नोव्हेंबर २०१६ पासून विक्रीसाठी उपलब्ध झाल्या. भक्तांचा विक्रीचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद लक्षात घेता, खालील अ.नं. ०८ मध्ये नवीन कार्डबोर्ड डेस्क दिनदर्शिका (टेबल) चा समावेश करण्यात आला असून त्यात श्री साई समाधी मंदिर, व्दारकामाई व श्री साईबाबा वस्तू संग्रहालयातील फोटो छपाई करण्यात येतील. सन २०१८ करीता प्रस्तावित छपाई संख्या, अंदाजे दर व अंदाजे दराने अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अ.नं. | तपशिल (सन २०१८ साठी) | प्रस्तावति छपाई संख्या | अंदाजे सरासरी छपाई दर | छपाईकामी होणारा अंदाजे एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स (मेटपेट कव्हर, थ्रीडी स्टीकर सह आतील पेज नेचरल शेड पेपर डिलक्स प्रकारात) साईज- १८ से.मी.X २५ से.मी. | १,००,००० | १५०/- | १,५०,०००,००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | श्री साई दैनंदिनी डिलक्स<br>(आर्ट पेपरवर लॅमिनेट सह श्री साईबाबा फोटो युव्ही कोटींग, आतील पेज नेचरल शेड पेपर सह डिलक्स प्रकारात)<br>साईज- १८ से.मी.X २५ से.मी. | २,००,००० | १२५/- | २,५०,०००,००/- |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका<br>०१ पानी मोठे (१९"X२९") इंच | ५,००,००० | २५/- | १,२५,००,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल<br>कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"X३५" इंच | २०००० | २५०/- | ५०,०००,००/- |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट<br>कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"X२७.२५" इंच | १०००० | ३००/- | ३०,०००,००/- |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज)<br>आकार १९"X२७" इंच | ५,००० | २५०/- | १२,५०,०००/- |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क<br>कॅलेंडर्स (७ पेजेस)<br>आकार ९.७५"X०७" इंच | १०,००० | २२५/- | २२,५०,०००/- |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस)<br>आकार ९.७५"X०७" इंच कार्ड बोर्ड पेपरवर | १०,००० | १००/- | १०,०००,००/- |
| | | | एकूण रुपये. | **६,५०,०००,००/-** |

(अक्षरी रु. सहा कोटी पन्नास मात्र.)

**संस्थानचे अधिनियम / ठराव यानुसार छाननी करुन शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्टः-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव माहे ऑक्टोबर- २०१७ पासून सुरु होत असल्याने वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे दैनंदिनी व दिनदर्शिका छपाई कामकाज सुरु करणे, तसेच यावर्षी शताब्दी महोत्सव वर्षा निमित्त दरवर्षी छपाई करण्यात येणा-या दैनंदिनीपेक्षा वाढीव साईजमधील व डिलक्स दोन प्रकारातील दैनंदिनी छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेचा मानस असून त्यात एक दैनंदिनी रु.१५०/- व दुस-या दैनंदिनीची किंमत रु.१००/- पर्यंत राहील असे नियोजन करुन साईभक्तांना शताब्दी महोत्सवा निमीत्य रु.१००/- मध्ये दैनंदिनी मिळाल्यास, संस्थान व्यवस्थापन मंडळाकडून साईभक्तांसाठी एक विशेष चांगल्या प्रतीची दैनंदिनी योग्य देणगी मूल्य असलेली मिळाल्याने त्यांच्या आनंदात भरच पडेल असा विश्वास वाटतो.

**अ)** संस्थानचे नियमीत पुरवठादार मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांनी अध्यक्ष महोदय यांची समक्ष भेट घेऊन मॅटेलिक प्रकारातील डायरीचा नमुना सादर केला आहे. सदर दैनंदिनीसाठी त्यांनी अंदाजे छपाई किंमत प्रती नग रु.१५०/- खर्च येईल असे सांगितले असल्याने त्यास अनुसरुन वरील तक्त्यातील अ.नं. ०१ मध्ये दर्शविलेल्या दैनंदिनीच्या ०१ लाख प्रती छपाई करुन घेता येईल.

ब) उपरोक्त तक्त्यातील अ.नं.०२ मध्ये दर्शविलेल्या प्रकारातील आर्ट पेपरवर लॅमिनेट सह श्री साईबाबा फोटो युव्ही कोटींग, आतील पेज नेचरल शेड पेपरसह डिलक्स प्रकारातील दैनंदिनी तयार करुन घेणे कामी अंदाजे छपाई खर्च रु.१२५/- पर्यंत येईल. सदर डायरी देखील डिलक्स डायरी सारखीच दिसेल.

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, ई निविदा मागवून, निविदाकारांना निम्नत्तम दराने छपाई कार्यादेश देणेत येतील. याकामी अंदाजे रु. ६,५०,०००,००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात पुस्तके/फोटो/ श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु. ९,५५,१०,०००/- चे अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल. सदर श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका साईभक्तांना देणगी मूल्य स्वरुपात उपलब्ध करुन दिल्या जातात.

सबब प्रस्तावित दैनंदिनी/ दिनदर्शिकांची २०१८ छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

१) छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ६,५०,०००,००/- खर्चास मान्यता असावी.

२) जनसंपर्क कार्यालयव्दारा वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास व संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी देणेस मान्यता असावी.

३) संस्थान संकेतस्थळावर ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

४) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी समिती सभेपुढे तांत्रिक बीड उघडून प्राप्त स्पर्धक निविदाकारांचा तक्ता तयार करणे, त्यानंतर मा.उपव्यवस्थापन समिती सभेपुढे व्यावसायीक बीड उघडणे व निविदाकारांचा तुलनात्मक तक्ता तयार करणे व त्यातील L-1 निविदाकारांना कार्यादेश पारित करणे इ. कामकाज पध्दतीस मान्यता असावी.

५) श्री साई समाधी शताब्दी महोत्सव वर्ष असल्याने प्रस्ताविक दैनंदिनी व दिनदर्शिका नगांचा शिल्लक साठा संपत आलेस, पुन्हा प्रथम आदेशातील मागणी संख्येच्या २५% जादा छपाई करुन घेणेस व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

उपरोक्त सन २०१८ साठी मागणी तक्त्यात दर्शविलेनुसार श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन घेण्यास मंजूरी मिळणेस, सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका- २०१८ छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या अनं.०१ व ०२ पैकी एकाच प्रकारची डिलक्स दैनंदिनीची छपाई करणेत यावी व या दैनंदिनीचे विक्री मुल्य रु१००/- मात्रपेक्षा जास्त असू नये. तसेच या दैनंदिनी- २०१८ मध्ये समाधी शताब्दी वर्षामधील कार्यक्रमांच्या माहितीची छपाई करणेत यावी व साईभक्तांना शताब्दी महोत्सवापुर्वी उपलब्ध होईल, अशी कार्यवाही करावी.**

**त्याचबरोबर साईभक्तांना संस्थानमार्फत पॉकेट साईट डायरी उपलब्ध करुन देण्यात यावी, असे कार्यकारी अधिकारी यांनी सुचविले. ते समितीने मान्य केले व विहीत पध्दतीने पॉकेट साईज डायरीची छपाई करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.११** **नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाकरीता येणारे अपेक्षित खर्चास मान्यता देणे, तसेच आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांची आर्किटेक्ट फी ठरविणे व त्यांचेशी करारनामा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

| अ.नं. | कलम | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम / उपकलम क्रमांक | तरतुदीचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समिती ची कर्तव्ये असतील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत खालिलप्रमाणे नि. क्रं.२४१ संमत करणेत आलेला आहे.

*"..... यावर सविस्तर चर्चा होवून,साईभक्तांच्या सोयीसाठी जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या जुन्या इमारती काढून त्याठिकाणी नवीन दर्शनरांग इमारतीचे बांधकाम करणेस मान्यता देण्यात आली. याकामी आर्कीटेक्ट माथुर ॲण्ड कापरे असो., नवी दिल्ली यांचेकडून नियोजीत इमारतीचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करून घेण्यात यावे. तसेच जुने प्रसादालयासह साईप्रसाद नं.१ व २ या इमारतीमध्ये साईभक्तांसाठी चालविण्यात येणारे विविध सेवा-सुविधांचे काऊंटर्स योग्य जागेची निश्चिती करण्यात येऊन, इतरत्र स्थलांतरीत करण्यात यावे व या जुन्या इमारती पाडणेसाठी (Demolition) प्रथमतः स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्या, असे ठरले."*

**मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबादयांचे मान्यतेबाबतचा आदेश :-**

**Civil Application No.12347/2014 in Public Interest Litigation No.18/2011** वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०५/०४/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्टची नेमणूक करणे व रु.३४०.२० कोटी मात्र खर्चास राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता घेण्याचे अटीवर मान्यता प्रदान केलेली आहे.

**राज्य शासनाचे मान्यतेचा तपशिल:-** महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे कडील पत्र क्र. सासंवि-१०१६/६०४/प्र.क्र.८५/का.१६ दि.१९/०९/२०१६ अन्वये वरील विषयांकीत प्रकल्पाकरीता आर्कीटेक्ट यांचेशी करारनामा करणेसाठी खालिल अटींवर मान्यता दिलेली आहे.

*"....संदर्भाधीन पत्रान्वये उपरोक्त विषयाबाबत आपण सादर केलेल्या प्रारुप करारनाम्याची या विभागाच्या विधी शाखेद्वारे छाननी करण्यात आली असून या संदर्भात विधी शाखेद्वारे प्राप्त अभिप्रायानुसार आपणास कळविण्यात येते की, प्रस्तावित करारनाम्यावर निळया शाईने नमूद करण्यात आलेल्या सुधारणांप्रमाणे प्रारुपांमध्ये आवश्यक बदल करण्यात यावेत तसेच रिक्त ठेवण्यात आलेल्या जागा भरुन आणि खाली नमूद अटींचे तंतोतंत पालन करुन करारनामा अंतिम करण्यात यावा.*

*1. The Shirdi Sansthan is requested to see that the terms and conditions of the agreement are in the interest of the Sansthan.*

*2. It is advisable to add in Clause 2 under caption 'Schedule of Services'—assist the owners in tender process of contractor, if deemed necessary.*

*3. It is advisable to provide for time schedule for completion of work of the Architect. In case of delay in the work, it is advisable to provide for penalty clause.*

*4. It is advisable to put the burden of obtaining approval to drawings of the project from the statutory bodies on the architect.*

*5. In Clause 4.02 considering the deduction towards TDS etc., the sentence is added in blue ink.*

*विभागाच्या सुचनांप्रमाणे संस्थानद्वारे अंतिम करण्यात येणा-या करारनाम्याच्या प्रारुपाची प्रत या विभागाच्या माहितीस्तव सादर करण्यात यावी. विभागाने नमूद केलेल्या सर्व सूचनांची तंतोतंतअंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान यांची राहील."* असे कळविले आहे. विधी व न्याय विभाग यांचेकडील सदरहु पत्र व त्यासोबतचा दुरुस्त्या केलेला करारनामा मसुदा सोबत अवलोकनार्थ जोडले आहेत.

1. शिर्डी सर्व्हे नं.२/४,३/१,३/७ मधील संस्थान मालकीचे क्षेत्रावर अंदाजे रु.१५७ कोटी अपेक्षित खर्चाचे नियोजीत श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणेसाठी तेथील साईप्रसाद नं१ व २ जुन्या इमारती पाडणेसाठी संस्थान पत्र क्र.एसएसएसटी/बांधकाम/२४०/२०१७ दि.१३/०४/२०१७ अन्वये राज्य शासनाचे मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदरहू प्रस्ताव राज्य शासनाचे मान्यतेचे प्रतिक्षेत आहे.

**प्रस्तावना:-** आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असो. यांचेशी यापुर्वी मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पासाठी दि.०९/११/१९९७ रोजी करणेत आलेल्या करारनाम्यातील शर्त क्रं.०३ अन्वये प्रकल्पाच्या किंमतीचे ३.५% इतकी फी ठरविणेत आली होती. सदरहू करारनाम्यातील शर्त क्रं.०५ नुसार प्रकल्पाचे कामकाजासाठी आर्किटेक्ट व त्यांचे प्रोफेशनल स्टाफला प्रवास, लॉजिंग व बोर्डीग याकरीता प्रत्यक्ष येणा-या खर्चाची प्रतीपुर्ती संस्थानकडून करणेबाबत ठरलेले आहे. तसेच प्रेझेंटेशन मॉडेलची आवश्यकता असल्यास त्याची किंमत स्वतंत्ररित्या अदा करणेबाबत अटीचा समावेश आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील वर नमूद निर्णय क्रं.२४१ नुसार इकडील विभागामार्फत साईप्रसाद नं.१ व २ तसेच सदर परिसरातील इतर अनुषंगिक कीरकोळ बांधकामे व शेड्स काढणे (demolition) कामासाठी वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली असून त्यानुसार ई-निविदा

सादर करण्यासाठी दि.०४/०५/२०१७ अखेर मूदत देण्यात आलेली आहे. नियोजित दर्शन रंग प्रकल्पाचे बांधकामासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.१५७ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

आता आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे यांनी दि.०५/०४/२०१७ रोजीचे पत्राद्वारे scope of work, schedule of services, professional fees payable यांचा तपशिलवार प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार आर्कीटेक्ट यांनी सदर कामासाठी प्रकल्पाच्या किंमतीचे ३.५% अधिक प्रचलित दराने सर्व्हीस टॅक्स इतक्या फीची मागणी केलेली आहे.

**प्रस्ताव:-** तरी दर्शनरांग प्रकल्पाकरीता उपरोक्त विषयाचे अनुषंगाने खालिल बाबींविषयी निर्णय होणे आवश्यक आहे.

1. माथूर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांची सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट फी ठरविणे.
2. प्रारुप करारनाम्यातील कलम ५ नुसार आर्कीटेक्ट व त्यांचे प्रोफेशनल स्टाफला प्रवास, लॉजिंग, बोर्डींग, तसेच प्रेझेंटेशन मॉडेल, ॲनिमेशन फिल्म याकरीता आलेल्या प्रत्यक्ष खर्चाची प्रतीपुर्ती करणे.
3. विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी वर नमूद पत्र दि.१९/०९/२०१६ अन्वये कळविलेल्या अटींचे पालन करुन, तसेच सोबत जोडलेल्या प्रारुपामध्ये केलेल्या सुधारणा करुन त्यानुसार आर्किटेक्ट यांचेशी करारनामा करणे.

तरी वरील बाबींविषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६७** **नियोजित श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी श्रीमती सोनिया काप्रे यांनी आजचे सभेसमोर दर्शनरांग प्रकल्पाचे सादरीकरण दाखविले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, बेसमेंट तयार करणेसाठी पैसा व वेळ दोन्हीही जास्त लागतो. याकरीता या प्रकल्पातील बेसमेंट रद्द करावे व ग्राऊंड + २ अशी इमारत तयार करावी. तथापी आर सी सी डिझाईन ग्राऊंड + ३ मजल्यांकरीता सक्षम असावे. या इमारतीमधील मजल्यांची उंची ६ मी. इतकी दर्शविण्यात आलेली आहे ती एनबीसी चे विहीत मानकांप्रमाणे तसेच बांधकाम नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीनुसार ठेवणेत यावी. या इमारतीतील वेटींग हॉल्समध्ये सेंट्रलाईज / फूल ए.सी. करु नये. त्याऐवजी डक्टेबल स्प्लीट ए.सी. करणेत यावा. ५०% टॉयलेटस् वेस्टर्न व ५०% इंडीयन पध्दतीचे असावेत. नकाशात दर्शविलेले एस्कलेटर्स रद्द करुन हॉलची साईज वाढविणेत यावी. दर्शन रांग इमारत मंदिर परिसरास जोडणारा स्कायवॉक एकेरी म्हणजेच फक्त जाण्यासाठी असावा. त्याचबरोबर याठिकाणच्या लिफ्टची क्षमता कमी करणे शक्य आहे का, याबाबत आर्किटेक्ट यांनी सखोल अभ्यास करुन कळवावे, याप्रमाणे नकाशात सुधारणा करुन सुधारीत अंदाजपत्रक तयार करावे व त्यानुसार सदर कामासाठी ई- निविदा मागविणेत याव्यात.**

**तसेच आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे असोसिएटस्, नवी दिल्ली यांना सादर प्रकल्पासाठी कामाच्या किंमतीचे ३.५% + सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे फी अदा करणेस मान्यता देणेत आली. त्यानुसार आर्किटेक्ट यांचेशी करारनामा करणेत यावा. परंतु त्यापुर्वी प्रस्तावितकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **बांधकाम ठेकेदार यांची विविध बांधकाम कामांची अंतीम देयके अदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** खाली नमूद केलेली बांधकामे संस्थानमार्फत पूर्ण करणेत आलेली असून, ठेकेदार यांनी पूर्ण केलेल्या कामांची बिले आर्किटेक्ट/ सल्लागार/ इकडील विभागामार्फत तपासणी करणेत येऊन, त्यांचे बिलांचा "ब" तक्ता मा. व्यवस्थापन समितीचे दि.09/03/2017 रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.191अन्वये *".. ..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये चालू असलेली बांधकामे व पुर्ण झालेल्या कामांचे अंतीम बील अदा करणेचा प्रस्ताव तक्त्यांसह सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार पूर्ण झालेल्या कामांचे अंतीम बीले अदा करणेबाबत प्रस्ताव तक्ता स्वरूपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

**१. <u>शिर्डी येथील स.नं. 171/12 मधील बसस्थानकाचे एक्स्टर्नल इलेक्ट्रीक व स्ट्रीट लाईट केबलकरीता आर.सी. पाईप टाकणे व चेंबर बांधकाम करणे.</u>**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एस.जी.गायकवाड, राहाता |
| मंजूर निविदा रक्कम | रु. 6,59,340/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.151(5), दि.28/05/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु. 5,04,915/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.3,78,000/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,26,915/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.1,54,425/- (२३.४२%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 2 महिने, दि.15/10/2015 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.10/05/2016 |

ठेकेदार यांनी उपलब्ध झालेल्या जागेमध्ये आर.सी.सी. पाईप टाकणे व चेंबर बांधणेचे काम पूर्ण केलेले आहे. बसस्थानक इमारतीचे बांधकाम ठेकेदार यांचे मार्फत दरम्यानचे काळात परिसर विकास कामातील ट्रिमिक्स कॉंक्रीट तसेच ड्रेनेज लाईनचे काम सुरु होते. सदर कामासाठी आणलेले मटेरीअल आर.सी.सी. पाईप लाईनचे काम करावयाचे ठिकाणी असल्यामुळे तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी भूखंडाचे पश्चिम बाजूकडील हद्द निश्चित न केल्यामुळे त्यालगतची आर.सी.सी लाईन टाकणेचे काम करणे. ठेकेदार यांना शक्य झाले नाही. दि.09/04/2016 रोजीचे पत्रान्वये विभाग नियंत्रक राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग यांनी पश्चिम बाजूकडील पूर्वीचे कम्पाऊंड भिंतीवर वीट बांधकामात कम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेबाबत कळविले त्यानुसार सदरचे काम ठेकेदार यांनी दि.10/05/2016 रोजी पूर्ण केलेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे विलंबापोटी होणारी दंडाची रक्कम रु.32,967/- मात्र सदरहू अंतिम बिलातून ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवता येईल. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.5,04,915/- मात्र मंजूर होऊन त्यापोटी उर्वरीत देय रक्कम **रु. 1,26,915/-** मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

२. **शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील पुर्वीचे स्वागत कक्ष जागेत शौचालय बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एस.जी.गायकवाड, राहाता |
| मंजूर निविदा रक्कम | रु. 9,70,192/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (4), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु. 8,47,018/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु. 7,34,961/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु. 1,12,057/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.1,23,174/- (१२.६९५%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.21/06/2016 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२१/०७/२०१६ |

ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.12/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.21/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.9,000/- ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.8,47,018/- मात्र मंजूर होऊन त्यापोटी देय्य उर्वरीत रक्कम **रु.1,12,057/-** मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

३. **संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळ्या जागेत शौचालय बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एस.जी.गायकवाड, राहाता |
| मंजूर निविदा रक्कम | रु.9,70,192/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (5), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.8,25,892/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.7,16,462/- |

| | |
|---|---|
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,09,430/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.1,44,300/-( 14.887%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.21/06/2016 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.21/07/2016 |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.12/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.21/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.9,000/- ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.8,25,892/- मात्र मंजूर होऊन त्यापोटी देय्य उर्वरीत रक्कम **रु.1,09,430/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

४. **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (500खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पूर्व बाजुने मोकळया जागेत शौचालय बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता |
| मंजूर निविदा रक्कम | रू.9,70,192/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (6), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु. 8,78,557/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु. 7,55,953/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु. 1,22,604/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु. 91,635/- (9.445% ) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.21/06/2016 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि. 21/07/2016 |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.12/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.21/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. ठेकेदार यांनी सदर कामासाठी मूदतवाढ मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला असून त्याबाबत स्वतंत्र टिपणी सादर करणेत येत आहे. त्यामुळे सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.9,000/- ठेकेदार यांचे डिपॉझिट खाती राखून ठेवण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.8,78,557/- मात्र मंजूर होऊन त्यापोटी देय्य उर्वरीत रक्कम **रु.1,22,604/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

५. **सेवाधाम इमारतीचे तळमजल्यावर साईभक्त व नागरिकांकरीता वाढिव शौचालयांचे बांधकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री. निखिल अजित गुजराथी, कोपरगाव. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.7,87,050/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (14), दि.16/02/2016. |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.5,62,949/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.3,97,800/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,65,149/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.2,24,101/- (28.47 %) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.15/06/2016 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.02/07/2016 |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 03 महिन्यांचा कालावधी (दि.15/06/2016 अखेर) होता. प्रत्यक्षात काम दि.02/07/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.5,100/- ठेकेदार यांचे देयकातून कपात करण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.5,62,949/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम रु.1,65,149/- अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

६. **मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. 87, 88 मध्ये साई प्रसादालयातील कर्मचा-याचे दुचाकी वाहनांकरीता पार्किंग शेड तयार करणेबाबत**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एम.बी. शेख, अहमदनगर |
| मंजूर निविदा रक्कम | रु. 8,88,083/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.03 (04), दि.02/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु. 7,65,374/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु. 6,87,523/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु. 77,851/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु. 1,22,709/- (13.817% )कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 04 महिने, दि.14/10/2016 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.14/10/2016 |
| ठेकेदार यांनी उपरोक्त काम विहीत मूदतीत पूर्ण केले आहे. तरी त्यांचे अंतिम बिल रक्कम रु.7,65,374/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु.77,851/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

७. **श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे दक्षिण बाजुची कंपाऊंड भिंत बांधकाम करणे**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.एम.बी. शेख, अहमदनगर |
| मंजूर निविदा रक्कम | रु.9,00,568/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.03(05), दि.02/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रू.3,73,596/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रू. 2,80,000/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रू.93,596/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रू.5,26,972/- (58.51%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 04 महिने, (दि.22/06/2016 ते दि.21/10/2016) अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.06/10/2016 |
| ठेकेदार यांनी दि.06/10/2016 रोजी काम पूर्ण केलेले आहे. सदरचे कामातील कामातील कंपाउंड बांधकामाची लांबी तसेच बांधकाम प्लास्टर चेनलिंग फेन्सिग याबाबीचे परिमाणात बचत झाल्याने कामाची रक्कम कमी झाली आहे. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल रु3,73,596/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु.93,596/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

८. **श्री साईनाथ रुग्णालय इमारतीचे आतिल भागाचे रंगकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.डी.बी. फोपसे, वैजापूर |
| मंजूर निविदा रक्कम | रु.28,13,781/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.77 (07), दि.16/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.27,92,379/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.24,75,380/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.3,16,999/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.21,402/- (0.76%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, दि.12/09/2016 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.09/09/2016 |
| ठेकेदार यांनी दि.09/09/2016 रोजी काम पूर्ण केले आहे. तरी अंतिम बिल रु.27,92,379/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु. 3,16,999/-**अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**९. साई आश्रमभक्तनिवास येथे ॲम्फीथिएटरच्या पूर्वबाजुकडील मोकळ्या जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | ए.एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| मंजूर निविदा रक्कम | रु.6,69,987/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.469, दि.10/11/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.5,27,141/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.3,95,000/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,32,141/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.1,42,846/- (21.320%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 05 महिने, (दि.02/02/2016 ते दि.01/07/2016) |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.20/09/2016 |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे काम पूर्ण केले आहे. करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेसाठी 05 महिन्यांचा कालावधी दि.01/07/2016 अखेर होता. प्रत्यक्षात काम दि.20/09/2016 रोजी पूर्ण झालेले आहे. सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.33,500/- ठेकेदार यांचे देयकातून कपात करण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रक्कम रु.5,27,141/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु.1,32,141/-**अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१०. संस्थानचे शैक्षणिक संकुल इमारतींचे आतिल बाजुनेरंगकाम करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री.अतुल विठ्ठल चव्हाण, अहमदनगर |
| मंजूर निविदा रक्कम | रु.14,05,569/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.470, दि.10/11/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.13,65,474/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.12,59,147/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,06,327/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.40,095/- (2.85%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०3 महिने दि.14/04/2016 ते दि.13/07/2016 |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.30/11/2016 |
| ठेकेदार श्री. अतुल विठ्ठल चव्हाण, अहमदनगर यांनी दि.30/11/2016 अखेर सदरचे रंगकाम पूर्ण केले आहे. विलंबाचे कालावधीतील दंडाची रक्कम रु.42,000/- ठेकेदारयांचे अंतीम बिलांतून कपात करण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल रु.13,65,474/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु. 1,06,327/-**अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**११. प्रसाद लाडू विक्री कांऊटरसाठी चार बंदिस्तॲल्युमिनीअम केबीन्स व कॉम्प्युटर टेबल तयार करणे**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री. तान्हाजी रंगनाथ मोरे,शिर्डी |
| मंजूर निविदा रक्कम | रु.4,16,840/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र. 30 (2), दि. 18/03/2015 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.4,15,962/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | -- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.4,15,962/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.878/- (0.21% ) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 2 महिने दि.18/06/2015 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.16/01/2016 |
| ठेकेदार श्री. तान्हाजी रंगनाथ मोरे,शिर्डी यांनी दि. 16/01/2016 अखेर ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये कॅबीन व कॉम्प्युटर टेबल तयार करणेचे काम पूर्ण केले आहे. सदरकामी झालेल्या विलंबानुसार होणारी दंडाची रक्कम रु.42,400/- मात्र अंतिम बिलातून कपात करण्यात येत आहे. तरी ठेकेदार यांचे अंतिम बिल रु4,15,962/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय रक्कम रु.4,15,962/-अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१२. श्री साई प्रसादालयाचे पूर्वेकडील कंपाउड भिंतीची उंची वाढविणेबाबत.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी |
| मंजूर निविदा रक्कम | रु.8,45,399/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र. ०3 (03) दि. 02/02/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.7,03,849/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.5,70,960/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,32,889/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.1,41,550/- (16.743% ) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 05 महिने दि.13/11/2016 |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.13/01/2017 |
| ठेकेदार मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी यांनी दि.13/01/2017 अखेर सदरचे काम मूदतीत पूर्ण केले आहे. तरी ठेकेदार यांना अंतीम बिल रु7,03,849/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु.1,32,889/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१३. श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचे महाव्दारावर सुरक्षा मार्चे उभारणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी |
| मंजूर निविदा रक्कम | रु.8,37,000/- |
| मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र. 418 (02) दि. 14/07/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु. 8,37,000/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.6,83,102/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,53,898/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | ---- |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 04 महिने दि.30/01/2017 |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.13/01/2017 |
| ठेकेदार मे. जय डेव्हलपर्स, शिर्डी यांनी दि.13/01/2017 अखेर सदरचे काम मूदतीत पूर्ण केले आहे. तरी ठेकेदार यांना अंतीम बिल रु8,37,000/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु.1,53,898/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१४. श्री साईनाथ रुग्णालयाचे इमातींना ॲल्युमिनीअम व स्लायडींग विंडो बदलणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | ॲल्युमिना कन्सेप्टस, नाशिक |
| मंजूर निविदा रक्कम | रु.16,66,400/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.584 (2) दि.31/08/2016 |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.16,59,223/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.10,50,666/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.6,08,557/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.7,177/- (0.43%) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने दि.21/01/2017 अखेर |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.11/02/2017 |
| ठेकेदार मे ॲल्युमिन कन्सेप्टस, नाशिक यांनी मूदतीत काम पूर्ण केले असून झालेल्या कामाचे अंतिम बिल सादर केले आहे. तरी ठेकेदार यांना अंतिम बिल रु16,59,223/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु.6,08,557/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१५. श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कुलमध्ये लॉनचे पुर्वेस पेव्हिंग ब्लॉक बसविणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद. |
| मंजूर निविदा रक्कम | रु.3,38,851/-. |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.733 (1), दि.09/10/2016. |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.2,86,727/-. |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.2,15,000/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.71,727/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.52,124/- (15.38% )कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 03 महिने, (दि.01/03/2017 अखेर) |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.11/02/2017 |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे व विहीत मुदतीत काम पूर्ण केले आहे. तरी ठेकेदार अभिषेक कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे अंतिम बिल रु2,86,727/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु. 71,727/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

**१६. साईसहवास स्टाफ क्वाटर्स परिसरात अधिकारी व डॉक्टर्स यांचे वाहनांकरीता पार्किंग शेड तयार करणे.**

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | श्री. रविंद्र एस. शिंदे,कोल्हार |
| मंजूर निविदा रक्कम | रु.7,45,767/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र.689 (26), दि.09/10/2016. |
| अंतिम बिलाची रक्कम | रु.6,34,474/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | रु.4,75,800/- |
| उर्वरीत शिल्लक देय्य रक्कम | रु.1,58,674/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.1,11,293/- (14.923% ) कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | 05 महिने, (दि.16/05/2017 अखेर) |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.04/03/2017 |
| ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे व विहीत मुदतीत काम पूर्ण केले आहे. तरी ठेकेदार श्री. रविंद्र एस. शिंदे, कोल्हार यांचे अंतिम बिल रक्कम रु.6,34,474/- मात्र मंजूर होवून सदर बीलापोटी देय उर्वरीत रक्कम **रु. 1,58,674/-** अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. | |

प्रस्ताव: तरी उपरोक्तप्रमाणे पूर्ण झालेल्या कामांची अंतीम बिले अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेली कामे पुर्ण झालेली असल्याने बांधकाम ठेकेदार यांची कामांची अंतीम देयके अदा करणेसाठी मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१३** **Video Conferencing सेवा सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:** संस्थानमार्फत साईभक्तांना पुरविणेत येणा-या सोयी सुविधांसदर्भात अनेक वेळेस तांत्रिक स्वरुपाचे प्रकल्प उभारणीची कार्यवाही करावी लागते. याकामी सदरील क्षेत्रात काम करत असलेल्या नामवंत कंपन्यांची चर्चा करुन त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाची माहिती करुनघेण्यात येते. सदरकामी बहुतेक वेळेस साईबाबा संस्थानचे शिर्डी येथील सभागृहामध्ये बैठकींचे आयोजन करणेत येत असते. अनेक कंपन्याहे त्यांचेकडे उपलब्ध असलेले तंत्रज्ञान तथा याबाबतची संकल्पना Video Conferencing सारख्या सुविधांचा वापर करुन सादरीकरण (Presentation) करणेबाबत आग्रही असतात. उपरोक्त नमुद परिस्थीतीत एकाचवेळी अनेक ठिकाणांहून अनेक व्यक्तींशी दृकश्राव्य पद्धतीने संपर्क साधण्याचे झाल्यास Video Conferencing सारख्या सुविधांचा वापर करता येणे शक्य होईल. सध्यस्थितीत संस्थानकडे अशाप्रकारची सुविधा उपलब्ध नाही.

Video Conferencing सुविधासंस्थानमध्ये उपलब्ध केल्यास आवश्यकतेप्रमाणे संबंधीतांशी Video Conferencing द्वारे संपर्क साधता येईल व याद्वारे निर्णयप्रक्रिया गतिमान करता येईल.

सबब, संस्थानमध्ये Video Conferencing सुविधा शिर्डी येथील व्हिआयपी मिटींग हॉल (साईज 32"6"X 29"6") व मुंबई येथील संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय यांचे कार्यालय (साईज 14"6"X 13"9") येथे प्राथमिक स्वरुपात सुरू करता येईल. याकामी सध्यस्थितीत बाजारात उपलब्ध असलेल्या हार्डवेअर व सॉफ्टवेअर आधारीत Video Conferencing सुविधेचे प्रात्यक्षिक मा.कार्यकारी महोदया यांचे उपस्थितीत दि.29.04.2017 रोजी शिर्डी येथे आयोजित करणेत आलेले होते. सदरवेळी M/S Laser Telesystems Pvt. Ltd यांनी हार्डवेअर आधारीत Video Conferencing व M/s People Link Unified Communications Pvt. Ltd. Hyderabad. यांनी सॉफ्टवेअर आधारीत प्रात्यक्षिक सादर केलेले आहे.

उपरोक्त प्रतिनिधींकडून त्यांचे याकामीचे दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यासअनुसरून त्यांनी पुढीलप्रमाणे दरपत्रक सादर केलेले आहेत.

(१) **Laser Telesystems Pvt. Ltd. Mumbai यांचे Brand -Panasonic साठीचे दरपत्रक**

| Sr. No. | Equipment | Technical Description | Specification | Qty | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Video Conferencing Unit (1-1 Sites) | HDVC Video Conferencing Unit 1-1 sites Point to Point Codec + 4X PTZ Camera + Boundary Microphone + & With 3 years Partner Premium | IP Based Full HD Video Conference Unit Point To Point Site Connection Single Monitor Connectivity Full-HD 1080/60p AV-QoS Technology Comes Along with PTZ Camera & Boundary Microphone | 1 | 180200.00 |
| 2 | Video Conferencing Unit (1+5=6 Sites) | HDVC Video Conferencing Unit 1+5=6 sites Multi-Point Codec + 12X PTZ Camera + Digital Boundary Microphone + & With 3 years Partner Premium | IP Based Full HD Video Conference Unit Multi-Point Site Connection Triple Monitor Connectivity Full-HD 1080/60p AV-QoS Technology Comes Along with PTZ Camera & Boundary Microphone | 1 | 556500.00 |
| 3 | Video Conferencing Unit (1+9=10 Sites) | HDVC Video Conferencing Unit 1+9=10 sites Multi-Point Codec + 12X PTZ Camera + Digital Boundary Microphone + & With 3 years Partner Premium | IP Based Full HD Video Conference Unit Multi-Point Site Connection Triple Monitor Connectivity Full-HD 1080/60p AV-QoS Technology Comes Along with PTZ Camera & Boundary Microphone | 1 | 832100.00 |
| 4 | Software Liences | Mobility Liecense-Android/Win./IOS(Optional)*- 1 time/Lifetime | | 1 | 42400.00 |
| 5 | Display Unit | 55" Full HD, HDMiX3, VGAX1, USB X2 | | 1 | 106000.00 |
| 6 | Display Unit | 65" Full HD, HDMiX3, VGAX1, USB X2 | | 1 | 159000.00 |
| 7 | Installation programming and commissioning charges | | | 1 | 11500.00 |

**(२) PeopleLink Unified Communications Pvt. Ltd. Hyderabad. यांचे Software Based साठीचे दरपत्रक.**

| Sr. No. | Equipment | Technical Description / Specification | Qty | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | PVCS UTP Plus 720p | PeopleLink Unified Telepresence Plus all standard Features with like Recording, Screenshare, Media Sharing, data sharing,Video mixing 720p Encode and 2160p decode included with H.323 &H.239 and Mobile user module | 1 | 1,304,100.00 |
| 2 | PeopleLink iCam WHD-1080 12X USB | PeopleLink iCam WHD-108P USB delivers 1080p Video with 12x Zoom with wide angle for instant real time, wide angle FoV with face-to-face experience through its powerful design that enhances your collaboration experience with PTZ features. | 1 | 157,500.00 |
| 3 | PeopleLink Voice Collaboration PVC 50 WSC (4C) | PeopleLink PVC 50 WSC is a Portable, Plug & Play, Wireless digital cascade (4 Units) conference microphone (only) which is ideal for Huddle room based Conference.<br>(External Speakers required additionally) | 1 | 168,000.00 |
| 4 | Active loudspeaker set | A stylishly designed, amplified loudspeaker set that consists of a passive loudspeaker and an active loudspeaker.Active 2-way HiFi Pro with 5.25" HiFi PP Shielded Woofer. 2 x 30 watts low impedance dynamic power | 1 | 33,777.50 |
| 5 | 60" LED display | 60" Large format professional LED display system to deliver Full HD content output | 1 | 170,605.00 |
| 6 | Display mount kit | Wall mountable kit for 60" display | 1 | 18,892.50 |
| 7 | PeopleLink iCam WHD-720 USB | PeopleLink iCam HD-720 3X USB delivers 720p Video with 3x Optical Zoom and wide angle for a wider coverage in a smaller boardroom for instant real time, face-to-face experience through its powerful design that enhances your collaboration experience with PTZ features. | 2 | 73,500.00 |
| 8 | PeopleLink Voice Collaboration PVC 50 | PeopleLink PVC 50 is a Portable, Plug & Play, USB based digital wired conference phone which is ideal for high-end network video & audio conference. | 2 | 54,600.00 |
| 9 | Installation, Configuration and Training | Installation, Configuration of Software MCU, Product training on client Side Features and Admin training, includes 1 year online technical support and 3 times free installation of Servcer MCU Software if required | 1 | 57,250.00 |
| 10 | Cables & connectors | Speaker cables for connectivity between Wireless receiver to speaker and Connectors for the above | 1 | 40,075.00 |

Video Conferencing सुविधा उपलब्ध करावयाची झाल्यास पुढीलप्रमाणे साहित्य संस्थानला खरेदी करावे लागेल.

| Sr. No. | Equipment | Technical Description | Specification | Qty | Remark |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Video Conferencing Unit (1+5=6 Sites) | HDVC Video Conferencing Unit 1+5=6 sites Multi-Point Codec + | IP Based Full HD Video Conference Unit Multi-Point Site Connection Triple Monitor Connectivity | 2 | Brand- Cisco, Panasonic, Polycome, Siemens |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 12X PTZ Camera + Digital Boundary Microphone + & With 3 years Partner Premium | Full-HD 1080/60p AV-QoS Technology Comes Along with PTZ Camera & Boundary Microphone | | |
| 2 | Maintenance | 3 years Comprehensive on site Warranty | | - | |
| 3 | Setup | Installation programming and commissioning charges | | One Time | |
| 4 | Software Liences | Mobility License-Android/Win./IOS(Optional)*- 1 time/Lifetime | | 1 | |
| 5 | Display Unit | 55" Full HD, HDMiX3, VGAX1, USB X2 | | 1 | सी.सी.टिव्ही कक्षाकडून घेता येईल. |
| 6 | Display Unit | 65" Full HD, HDMiX3, VGAX1, USB X2 | | 1 | |
| 7 | Internet Links as per feasibility | | | - | माहिती तंत्रज्ञान व मुंबई कार्यालय |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे साहित्य खरेदी करणेसाठी यास एकूण (टिव्ही संच व इंटरनेट सुविधा वगळता) अंदाजे रक्कम रुपये13,00,000/- + कर इतका खर्च येईल.

**मागणी:** उपरोक्त नमुद केलेप्रमाणे, मा. अध्यक्ष महोदय कक्ष, मुंबई कार्यालय व व्हिआयपी मिटींग हॉल, शिरडी येथे Video Conferencing सेवा सुरु करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 13,00,000/- + कर तसेच टिव्ही संच सीसीटीव्ही कक्षामार्फत व शिरडी येथील इंटरनेट सुविधा आयटी विभागामार्फत, मुंबई कार्यालय येथील इंटरनेट सुविधा संबंधीत विभागामार्फत घेणेच्या व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** मा.अध्यक्ष महोदय कक्ष, मुंबई कार्यालय व व्हिआयपी मिटींग हॉल, शिरडी येथे Video Conferencing सेवा सुरु करणेकामी अंदाजे रक्कम रुपये 13,00,000/- + कर तसेच टिव्ही संच सीसीटीव्ही कक्षामार्फत व शिरडी येथील इंटरनेट सुविधा आयटी विभागामार्फत, मुंबई कार्यालय येथील इंटरनेट सुविधा संबधीत विभागामार्फत घेणेच्या व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास तसेच Video Conferencing सेवेसाठी ई-निविदा मागविण्याच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.३६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Hardware based Video Conferencing सेवा सुरु करणेस व त्यासाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस तसेच त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती व्यावसायिक दराने प्रसिध्दीस देणेबाबत विधी व न्याय विभागाचे प्राप्त पत्र सभेसमोर सादर.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक –**मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३०.०३.२००२ चे सभेतील निर्णय क्रमांक १८६, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ चे सभेतील निर्णय क्रमांक ७८६ व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ६१९.

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक ३०.०३.२००२ चे सभेतील निर्णय क्रमाक १८६ अन्वये,"संस्थानबाबत स्थानिक सार्वजनिक सदभावना जोपासण्याच्या दृष्टीने संस्थानमार्फत देण्यात येणा-या जाहिरती या खाजगी एजन्सीमार्फत न देता पुर्वीचीच पध्दत चालू ठेवावी." असा निर्णय झालेला होता. त्यानुसार श्री साईबाबा संस्थानमार्फत प्रसिध्दीस देण्यात येणा-या जाहिराती वर्तमान पत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत व्यावसायीक (खाजगी) दराने प्रसिध्दीस देण्यात येत होत्या.

तथापि, श्री.संजय भास्कर काळे, कोपरगांव यांनी दिनांक०२.०७.२०१२ रोजीचे पत्रात,"श्री साईबाबा संस्थान शिर्डी सन २००४ मध्ये राज्य शासनाने अधिनियमाव्दारे आपल्या नियंत्रणात घेतले. शासनाच्या विधी व न्याय विभाग संस्थावर कारभार पहाण्यासाठी, कारभार चालवण्यासाठी विश्वस्त मंडळाची नियुक्ती करते. श्री साईबाबा संस्थान विविध वृत्तपत्रात आपल्या जाहिराती देत असते. सदरच्या जाहिरातीवर लक्षावधी रुपयांचा खर्च होतो. सदर जाहिराती या सरकारी दराने देणे संस्थानवर बंधणकारक आहे." असे कळविले होते. श्री.काळे यांनी दिलेले पत्राचे अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०९.२०१२ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येतात.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ६१९ अन्वये, "श्री साईबाबा संस्थानच्या विविध जाहिराती शासकीय दराने दिल्या जात असल्यामुळे या जाहिराती ब दर्जाच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होतात व त्यांना पुरवठादारांचा योग्य प्रतिसादमिळत नाही. त्यामुळे बहुतेक जाहिराती फेरप्रसिध्द कराव्या लागत आहे व करावयाच्या कामासाठी जास्त कालावधी लागतो. सबब संस्थानच्या विविध जाहिराती देशपातळीवर प्रसिध्द झाल्यास, जास्तीत जास्त पुरवठाधारकांचा चांगला प्रतिसाद मिळून स्पर्धात्मक दर प्राप्त होतील. तसेच नामांकित/दर्जेदार कंपन्यांच्या सेवा मिळतील, यासाठी यापुढे संस्थानच्या जाहिराती व्यावसायिक दराने देणेबाबत मार्गदर्शन/मान्यता घेणेकामी प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा." असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना दिनांक ३०.०९.२०१६ रोजी संस्थानच्या जाहिराती व्यावसायिक दराने देणेबाबत मार्गदर्शन/ मिळणेबाबत पत्र दिले होते. त्यानुसार संदर्भ क्रमांक ५ अन्वये विधी व न्याय विभागाचे पत्र दिनांक २१.०४.२०१७ रोजी प्राप्त झाले असून सदर पत्रात खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"दि.२९.११.२०१६ रोजी मंत्रीपरिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार दि.३०.०३.२०१६ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आली असून सर्व शासकीय विभागांनी आणि त्यांच्या नियंत्रणाखालील मंडळे/ महामंडळे/ प्राधिकरण/ उपक्रम यांनी त्यांच्या दर्शनी जाहिराती (Display Advertisement) तयार करण्याचे, वितरणाचे व सर्वकष जाहीरात मोहिमा आखणी व अंमलबजावणीचे काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालया मार्फत करावे. कोणत्याही परीस्थितीत ही कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येवू नये अशा स्पष्ट सूचना दि.०५.०१.२०१७ च्या शासन निर्णयात देण्यात आल्या आहेत.

श्री साईबाबा संस्थान शिर्डीच्या जाहिराती पूर्वी वर्तमानपत्रांच्या स्थानिक प्रतिनिधींमार्फत व्यावसायीक दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येत होत्या. व्यवस्थापन समितीच्या सन २०१२ च्या निर्णयानुसार संस्थानच्या जाहिराती शासकीय दराने प्रसिध्दीसाठी देण्यात येत आहेत. संस्थानच्या जाहिराती पुर्वी व्यावसायीक दराने टाईम्स ग्रुप, दै.लोकमत व दै.सकाळ या वृत्तपत्रांना वितरीत केल्यामुळे आता सदर वृत्तपत्रे संस्थानच्या जाहिरती शासनमान्य दराने स्विकारत नाहीत. शासनमान्य यादीवरील उर्वरीत जी वृत्तपत्रे संस्थानच्या जाहिराती शासनमान्य दराने स्विकारण्यास तयार आहेत त्या वृत्तपत्रांना संस्थानच्या जाहिराती वितरीत करण्यात येतील. महासंचालनालयाच्या शासनमान्य यादीत राज्याबाहेरील वृत्तपत्र समाविष्ट नाहीत. संस्थानच्या देश पातळीवरील विविध जाहिरती डीएव्हीपी दराने स्वीकारणा-या वृत्तपत्रांना करता येतील.

शासन मान्य यादीवरील जी वृत्तपत्रे शासकीय दराने जाहिरात स्वीकारत नाहीत ही बाब नवीन शासकीय जाहीरात धोरणात विचारार्थ ठेवण्यात येईल.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जाहिरात शाखेने दिलेल्या पूर्वपृष्ठावरील अभिप्रायांस अनुसरुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या जाहिराती देण्याबाबत कार्यवाही करण्यात

यावी."असे कळविले आहे. तरी सदरचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सादर करणेस मान्यता असावी.

**मागणी-** श्री साईबाबा संस्थानच्या जाहिराती व्यवसायीक दारने प्रसिध्दीस देणेबाबत विधी व न्याय विभागाचे प्राप्त पत्र मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३१.०८.२०१६ चे सभेतील निर्णयान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना दिनांक ३०.०९.२०१६ रोजी संस्थानच्या जाहिराती व्यावसायिक दराने देणेबाबत मार्गदर्शन/ मिळणेबाबत सादर केलेल्या पत्रावर विधी व न्याय विभाग यांनी संदर्भ क्र५ चे पत्रान्वये कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे. सोबत विधी व न्याय विभागाचे पत्रात निर्देशीत केलेले दिनांक ३०.०३.२०१६ व दिनांक ०५.०१.२०१७ रोजीचा शासन निर्णय सादर केलेला आहे. तरी संस्थानच्या जाहिराती प्रसिध्दीबाबत विधी व न्याय विभागाकडून प्राप्त झालेले पत्र मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये राबविण्यात येणाऱ्या मोठया प्रकल्पांच्या जाहिराती व्यावसायिक दराने दिल्यास, ठेकेदार/ पुरवठाधारकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळेल, असे समितीचे मत आहे. याकरीता संस्थानच्या मोठया प्रकल्पांच्या जाहिराती व्यावसायिक दराने प्रसिध्द करणेबाबत मा.आयुक्त, माहिती व जनसंपर्क संचनालययांचेकडून मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.१५** **संस्थानकरीता अद्यावत दुरध्वनी यंत्रणा प्रस्थापित करणेकरीता नेमण्यात आलेल्या DSG Consultant, Mumbai यांचेकडून सुरु असलेल्या अद्यावत दुरध्वनी यंत्रणेची निविदा प्रक्रिया व नवीन पुवठादाराची नेमणुक होईपर्यंत सध्या कार्यान्वित असलेल्या सिमेंस व मॅट्रीक्स या कंपनीचे सर्व्हिस प्रोव्हायडर यांना मागील वर्षाचे AMC चे कार्यादेशास अनुसरुन प्रतिमाह रक्कम अदा करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागांना अंतर्गत व बाहेरील दुध्वनी संपर्कासाठी शांतीनिवास इमारतीमध्ये सिमेंस कंपनीची दुध्वनी यंत्रणा बसविण्यातत आलेली आहे. सदर मुख्य दुध्वधनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे (१) समाधी मंदिर परीसर (२) श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय, साईनगर स्टॉफ क्वार्टर्स व व्दारावती निवासस्थारन (३) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम्स, शैक्षणिक संकुल, अधिकारी व डॉक्टर्स क्वार्टर्स (४) नविन प्रसादालय, माहिती तंत्रज्ञान या चार ठिकाणी सिमेंस कंपनीच्या दुध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत. सदर दुध्वनी यंत्रणा विनाखंडीत चालु राहणेकामी प्रोजीलीटी टेक्नॉलॉजीस, मुंबई यांचेशी दि.२४/०६/२०१६ ते दि.२३/०६/२०१७ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी रु.२,९९,९४८/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास दुध्वनी यंत्रणा दुरुस्ती देखभाली करीता कार्यादेश देण्याहत आलेला आहे. त्यानुसार त्यांना प्रथम सहा महिन्याचे (दि.२४/०६/२०१६ ते दि.२३/१२/२०१६ अखेर) बील रु.१,४९,९२४/- मात्र अदा करण्यात आलेले असुन, त्यांची पुढील सहा महिन्याची दुरुस्ती देखभालीची मुदत दि.२३/०६/२०१७ रोजी संपणार आहे.

तसेच साई आश्रम १ व साई धर्मशाळा या दोन्ही ठिकाणी अंतर्गत व बाहेरील संपर्कासाठी मॅट्रीक्स कंपनीच्या दुध्वशनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या असुन, सदर दुध्वयनी यंत्रणा विनाखंडीत चालु राहणेकामी युनिव्हर्सल कम्युतनिकेशन, नाशिक यांना अंतर्गत दुध्वनी यंत्रणेच्या दि.०१/०६/२०१६ ते दि.३१/०५/२०१७ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी करारनाम्याशनुसार रु.२,५०,०००/- (सर्व करांसहीत) मात्र देय होत आहे. त्यानुसार त्यांना प्रथम सहा महिन्याचे (दि.०१/०६/२०१६ ते दि.३१/११/२०१६ अखेर) बील रु.१,२५,०००/- मात्र बील अदा करण्यायत आलेले असुन, त्यांची पुढील सहा महिन्याची दुरुस्ती देखभालीची मुदत दि.३१/०५/२०१७ रोजी संपणार आहे.

तथापी, मा.व्यवस्थांपन समितीचे निर्णयानुसार टेलीफोन विभागातील अद्यावत दुध्वीनी (EPABX System) यंत्रणेसाठी नेमण्यात आलेले तांत्रिक सल्लालगार DSG Consultant Pvt.Ltd.,Mumbai यांनी तयार केलेल्या DBR चे प्रात्येक्षिक दि.१९/०४/२०१७ रोजी सादर केले असुन, प्रात्यक्षिकावेळी झालेल्या चर्चेत DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai यांनी संस्थानचे विहीत पध्दरतीने ई-निविदा प्रक्रियाव्दारे नविन पुरवठादाराची नेमणूक होऊन प्रकल्प पुर्ण होणेस साधारणत: ६/८ महिने कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या Progility Technologies Pvt. Ltd.,Mumbai व Universal Communication, Nashik या दोन्ही पुरवठादाराच्या AMC बाबत तांत्रिक सल्लागार DSG Consultant Pvt. Ltd. Mumbai यांनी Existing vendors AMC will be extended on monthly basis The rates

shall be derived from existing contracts असे सुचीत केले आहे. सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल. त्यानुसार सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या Progility Technologies Pvt.Ltd., Mumbai व Universal Communication, Nashik या दोन्ही कंपनीचे प्रतिनिधींचा याबाबत अभिप्राय घेतला असता, ते मागील वर्षाचे पुरवठा आदेशातील दराप्रमाणे AMC monthly basis प्रमाणे काम करण्यास तयार असल्याचे त्यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे.

सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या Progility Technologies Pvt.,Ltd., Mumbai व Universal Communication, Nashik या दोन्ही पुरवठादाराच्या सद्यस्थितीतील AMC बाबतचा व त्यांना नविन पुरवठादाराची नेमणूक होईपर्यंत त्याच जुन्या दराने प्रतिमाह दयावयाच्या दरांचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | मागील वार्षिक AMC रक्कम रुपये (सर्व करांसहीत) | AMC कालावधी | नविन पुरवठादाराची नेमणूक होईपर्यंत जुन्या AMC दराने दरमहा देय होणारी रक्कम सर्व) (करांसहीत |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रोजीलिटी टेक्नॉलॉजीस, मुंबई | २,९९,९४८-/ | दि.२४/०६/२०१६ ते दि.२३/०६/२०१७ | रु.२४,९९५/- |
| ०२ | युनिव्हर्सल कम्युनिकेशन, नाशिक | २,५०,०००-/ | दि.०१/०६/२०१६ ते दि.३१/०५/२०१७ | रु.२०,८३३/- |

**मागणी-** उपरोक्त तक्यात नमुद केलेप्रमाणे, अद्यावत दुरध्वनी यंत्रणा प्रस्थापित करण्याकरीता नेमण्यात आलेल्या व DSG Consultant, Mumbai यांचेकडुन सुरु असलेल्या अद्यावत दुरध्वनी यंत्रणेकरीता निविदा प्रक्रिया व नविन पुरवठादाराची नेमणुक होऊन नविन दुरध्वनी यंत्रणा कार्यान्वित होईपर्यंत सध्या कार्यान्वित असलेल्या सिमेंस व मॅट्रीक्स या दोन्ही दुरध्वनी यंत्रणेकरीता सद्यस्थितीत असलेले प्रोजीलिटी टेक्नॉलॉजीस,मुंबई व युनिव्हिर्सल कम्युीनिकेशन, नाशिक या कंपनीचे पुरवठादारांना त्यांचा AMC कालावधी संपलेनंतर त्याच AMC चे कार्यादेशातील अटी शर्तीस अधिन राहून त्यांना अनुक्रमे रक्कम रुपये २४,९९५/- व रक्कम रुपये २०,८३३/- प्रतिमाह रक्कम अदा करणेकामीचे प्रस्तावास मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किमतीसह कमी करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत. कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतुद आहे.

**"**श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील**"**

**व्यवस्थापन समितीचा ठराव:- दि.०७.०८.२०१६ निर्णय क्रं.४५२**

**प्रास्तविक:-** सन २०१६-२०१७ या कालावधीत संस्थानचे मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, मा. सदस्य व मा. कार्यकारी अधिकारी यांना व संस्थान अंतर्गत खात्याचे संबंधीत संपर्कातील अधिकाऱ्यांना व वेगवेगळया क्षेत्रातील अतिमहत्वाच्या व्यक्तींना त्यांच्या शिर्डी भेटीत, जनसंपर्क कार्यालयामार्फत आयोजीत पत्रकार दिन, संतकवी दासगणु महाराज पुण्यतिथी उत्सव कार्यक्रम, कॉपीराईट ॲक्ट रजिस्ट्रेशन करिता देण्यात आलेली प्रकाशने, शैक्षणिक संकुलात होणारे कार्यक्रम व सेवानिवृत्त कर्मचारी निरोप समारंभ, देणगीदार साईभक्त मान्यवरांना भेट म्हणुन देण्यात आलेले प्रकाशने साहित्य इकडील विभागाकडुन सन २०१६-२०१७ साठी मागणीनुसार व विभागांचे मंजुरीनुसार निशुल्क देण्यात आले असुन सदरचा तपशील खालील तक्त्यात सादर करुन यादी अंतर्गत लेखापरिक्षक, लेखाशाखा यांचेकडुन तपासुन घेण्यात आलेली आहे.

| अ.नं | पीयुबी कोड नं. | पुस्तकांचे नाव | भाषा | प्रती | देणगी मुल्य | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पी यु बी नं १ | श्री साईचरित्र पोथी | मराठी | १५३ | १००.०० | १५३०० |
| २ | पी यु बी नं २ | श्री साईचरित्र | हिंदी | १७ | ४५.०० | ७६५ |
| ३ | पी यु बी नं ३ | श्री साईचरित्र | इंग्रजी | ३० | ४०.०० | १२०० |
| ४ | पी यु बी नं ४ | श्री साईचरित्र | गुजराथी | ७ | ४५.०० | ३१५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | पी यु बी नं ५ | श्री साईचरित्र | कन्नड | ५ | ६०.०० | ३०० |
| ६ | पी यु बी नं ६ | श्री साईचरित्र | तेलुगु | २१ | ६०.०० | १२६० |
| ७ | पी यु बी नं ७ | श्री साईचरित्र | तामीळ | १७ | ६०.०० | १०२० |
| ८ | पी यु बी नं ८ | श्री साईचरित्र | हिंदी | २ | १००.०० | २०० |
| ९ | पी यु बी नं ९ | श्री साईचरित्र | सिंधी | ५ | ८०.०० | ४०० |
| १० | पी यु बी नं १० | श्री साईलीलामृत | मराठी | ५ | २०.०० | १०० |
| ११ | पी यु बी नं १४ | श्री साईनाथ सगुणोपासना | मराठी | ५ | ५.०० | २५ |
| १२ | पी यु बी नं १९ | श्री साईनाथ स्तवन मंजिरी | मराठी | १५५ | ३.०० | ४६५ |
| १३ | पी यु बी नं २० | श्री साईनाथ स्तवन मंजिरी | हिंदी | ५ | ३.०० | १५ |
| १४ | पी यु बी नं २१ | श्री साईनाथ स्तवन मंजिरी | इंग्रजी | ५ | ५.०० | २५ |
| १५ | पी यु बी नं २२ | श्री साईनाथ स्तवन मंजिरी | गुजराथी | ६ | ५.०० | ३० |
| १६ | पी यु बी नं २३ | चार अध्याय | मराठी | ५ | ७.०० | ३५ |
| १७ | पी यु बी नं २४ | रुद्राध्याय | मराठी | ५ | ५.०० | २५ |
| १८ | पी यु बी नं २६ | श्री साईनाथ भजनमाला | मराठी | ५ | ३५.०० | १७५ |
| १९ | पी यु बी नं २७ | श्री साईनाथ भजनमाला | हिंदी | ५ | ४०.०० | २०० |
| २० | पी यु बी नं ३० | मुलांचे साईबाबा | हिंदी | ५ | ७.०० | ३५ |
| २१ | पी यु बी नं ३२ | मुलांचे साईबाबा | गुजराथी | ५ | १०.०० | ५० |
| २२ | पी यु बी नं ३३ | मुलांचे साईबाबा | कन्नड | ५ | १०.०० | ५० |
| २३ | पी यु बी नं ३४ | मुलांचे साईबाबा | तेलुगु | ५ | १०.०० | ५० |
| २४ | पी यु बी नं ३९ | खापर्डे डायरी | इंग्रजी | ५ | ९.०० | ४५ |
| २६ | पी यु बी नं ४१ | गुरुपाठाचे अभंग | मराठी | ५ | ३.०० | १५ |
| २७ | पी यु बी नं ४२ | श्री साईचरित्र पोथी | गुजराथी | २ | ९०.०० | १८० |
| २८ | पी यु बी नं ४३ | श्री साईचे सत्यचरित्र | मराठी | ६ | ११५.०० | ६९० |
| २९ | पी यु बी नं ४६ | श्री साईचरित्र | उर्दु | ५ | ५०.०० | २५० |
| ३० | पी यु बी नं ४७ | श्री साईनाथ स्तवन मंजिरी | कन्नड | ५ | ५.०० | २५ |
| ३१ | पी यु बी नं ४८ | खापर्डे डायरी | मराठी | ५ | १०.०० | ५० |
| ३२ | पी यु बी नं ५४ | दैनंदिन साईबोध | मराठी | ५ | ७५.०० | ३७५ |
| ३३ | पी यु बी नं ५६ | श्री साईनाथ सगुणोपासना | हिंदी | ५ | १०.०० | ५० |
| ३४ | पी यु बी नं ६२ | श्री साईचरित्र | बंगाली | ५ | ७०.०० | ३५० |
| ३५ | पी यु बी नं ६५ | श्री साईचरित्र (ओवी टू ओवी) | तेलुगु | ५ | १२०.०० | ६०० |
| ३६ | पी यु बी नं ६६ | चिलड्रेंस साईबाबा | इंग्रजी | ५ | ७५.०० | ३७५ |
| ३७ | पी यु बी नं ६७ | श्री साईचरित्र दोहावली | हिंदी | ५ | ७०.०० | ३५० |
| ३८ | पी यु बी नं ६९ | श्री मातृ साई | तेलुगु | ५ | ४०.०० | २०० |
| ३९ | पी यु बी नं ७४ | श्री साईसतचरित्र - झरिन | इंग्रजी | ५ | १३५.०० | ६७५ |
| ४० | पी यु बी नं ७५ | श्री साईसतचरित्र – विमला शर्मा | तेलुगु | ५ | १३५.०० | ६७५ |
| ४१ | पी यु बी नं ७७ | श्री साईचरित्र | पंजाबी | ५ | ७८.०० | ३९० |
| ४२ | पी यु बी नं ७८ | श्री साईचरित्र | ओरिया | ५ | ४५.०० | २२५ |
| ४३ | पी यु बी नं ७९ | दैनंदिन साईबोध | गुजराथी | ५ | ७०.०० | ३५० |
| ४४ | पी यु बी नं ८० | श्री साईचे शिकवण व तत्त्वज्ञान | गुजराथी | ५ | ३०.०० | १५० |
| ४५ | पी यु बी नं ८१ | श्री साईचे अवतार व कार्य | गुजराथी | ५ | ४५.०० | २२५ |
| ४६ | पी यु बी नं ८२ | शिलधी | गुजराथी | ५ | ११.०० | ५५ |
| ४७ | पी यु बी नं ८३ | श्री साईचरित्र | गुजराथी | ५ | १७५.०० | ८७५ |
| ४८ | पी यु बी नं ८६ | श्री साईचरित्र | नेपाळी | ५ | ५५.०० | २७५ |
| ४९ | पी यु बी नं ८७ | श्री साईनाथ सगुणोपासना | मराठी | ८ | ४.०० | ३२ |
| ५० | पी यु बी नं ८८ | साई कि ओर पहला कदम | हिंदी | ५ | १०५.०० | ५२५ |
| ५१ | पी यु बी नं ८९ | श्री साईनाथ स्तवन मंजिरी | तेलुगु | ५ | ३.०० | १५ |
| ५२ | पी यु बी नं ९० | श्री साईचरित्र | मल्यालम | ५ | ६०.०० | ३०० |
| ५३ | पी यु बी नं ९१ | श्री साईचरित्र | कोकणी | ५ | १०५.०० | ५२५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५४ | पी यु बी नं ९३ | श्री साईनाथ सगुणोपासना | पंजाबी | ५ | २०.०० | १०० |
| ५५ | पी यु बी नं ९५ | श्री साईचरित्र | असामी | ५ | ४०.०० | २०० |
| ५६ | पी यु बी नं ९६ | श्री साईनाथ सगुणोपासना | जर्मन | ५ | १८.०० | ९० |
| ५७ | पी यु बी नं ९७ | श्री साईनाथ स्तवन मंजिरी | जर्मन | ५ | १८.०० | ९० |
| | | | | | **एकुण रुपये** | **३१,३६७/-** |
| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **सीडीचे नाव** | **भाषा** | **प्रती** | **देणगी मुल्य** | **एकुण रुपये** |
| ५८ | पी यु बी नं २०७ | सीडी रोम | इंग्रजी | ५ | ५०.०० | २५० |
| ५९ | पी यु बी नं २०८ | श्री साईंच्या आरत्या व मंत्रोच्चार | मराठी | ६ | ७५.०० | ४५० |
| ६० | पी यु बी नं २०९ | शिर्डी दर्शन | हिंदी | ५ | ५०.०० | २५० |
| ६१ | पी यु बी नं २१२ | श्री साईचरित्र | मराठी | ५ | १००.०० | ५०० |
| ६२ | पी यु बी नं २१३ | श्री साईचरित्र | हिंदी | ५ | ९०.०० | ४५० |
| ६३ | पी यु बी नं २१४ | श्री साईंच्या आरत्या व मंत्रोच्चार | मराठी | ५ | ३०.०० | १५० |
| | | | | | **एकुण रुपये** | **२,०५०/-** |
| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **श्री साई डायरी व कॅलेंडर्स २०१७** | **वर्ष** | **प्रती** | **देणगी मुल्य** | **एकुण रुपये** |
| ६४ | पी यु बी नं ३१३ | श्री साई डायरी | २०१७ | ३३९८ | ५५.०० | १८६८९० |
| ६५ | पी यु बी नं ३१४ | श्री साई डायरी डिलक्स २०१७ | २०१७ | १३ | ५७५.०० | ७४७५ |
| ६६ | पी यु बी नं ४५६ | श्री साई कॅलेंडर्स (०१ पाने) २०१७ | २०१७ | १५३३ | १५.०० | २२९९५ |
| ६७ | पी यु बी नं ४५७ | श्री साई कॅलेंडर्स (०७ पाने) २०१७ | २०१७ | ३ | २००.०० | ६०० |
| ६८ | पी यु बी नं ४५८ | श्री साई कॅलेंडर्स (०७ पाने) २०१७ | २०१७ | १ | २४०.०० | २४० |
| ६९ | पी यु बी नं ४५९ | श्री साई कॅलेंडर्स (०७ पाने) २०१७ | २०१७ | ५७ | १८०.०० | १०२६० |
| ७० | पी यु बी नं ४६० | श्री साई कॅलेंडर्स (०१ पाने) २०१७ | २०१७ | १० | २००.०० | २००० |
| | | | | | **एकुण रुपये** | **२,३०,४६०/-** |

| **अ.नं** | **पी यु बी कोड नं.** | **फोटोंचा तपशील** | **प्रती** | **देणगी मुल्य** | **एकुण रुपये** |
|---|---|---|---|---|---|
| ७० | पी यु बी नं ७०१ | दगडावर बसलेले बाबा B/W (साईज १४X२०) | ५ | ४.०० | २० |
| ७१ | पी यु बी नं ७०२ | दगडावर बसलेले बाबा कलर (साईज १४X२०) | ५ | ५.०० | २५ |
| ७२ | पी यु बी नं ७०४ | भिंतीलगत उभे असलेले बाबा (साईज १७X२४) | ६ | ८.०० | ४८ |
| ७३ | पी यु बी नं ७०८ | कानाला हात लावलेले बाबा (साईज १४X२०) | ५ | ५.०० | २५ |
| ७४ | पी यु बी नं ७१३ | श्री साईबाबा मुर्ती (साईज १४X२०) | ५ | ३.०० | १५ |
| ७५ | पी यु बी नं ७२८ | व्दाराकामाईत बसलेले बाबा (साईज २०X२८) | ५ | ७.०० | ३५ |
| ७६ | पी यु बी नं ७२९ | कानाला हात लावलेले बाबा (साईज २०X२८) | ४ | ८.०० | ३२ |
| ७७ | पी यु बी नं ७३० | श्री साईबाबा पालखी (साईज २०X२८) | ५ | ७.०० | ३५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७८ | पी यु बी नं ७३१ | श्री साईबाबा मुर्ती (साईज २०X२८) | ५ | ७.०० | ३५ |
| ७९ | पी यु बी नं ७३८ | 3D साईबाबा फोटो फायबर फ्रेम | १५७ | ४००.०० | ६२८०० |
| | | | | **एकुण रुपये** | **६३,०७०/-** |

| **अ.नं** | **तपशील** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|
| ०१ | पुस्तके | **३१,३६७/-** |
| ०२ | सीडी | **२,०५०/-** |
| ०३ | श्री साई डायरी व कॅलेंडर्स २०१७ | **२,३०,४६०/-** |
| ०४ | फोटो | **६३,०७०/-** |
| | **एकुण रुपये** | **३,२६,९४७/-** |

(अक्षरी रु.तीन लाख सहवीस हजार नऊशे सत्तेचाळीस )

**मागणी:-** दरवर्षी प्रमाणे आर्थिक वर्ष २०१६-२०१७ करिता संस्थान मार्फत भेट देण्यात आलेली प्रकाशने पोस्टेज स्टॉकमधुन किंमतीसह कमी करणे बाबत.

**संस्थानचे अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर व आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** आर्थिक दृष्ट्या खर्चिक मात्र संस्थानचे नावलौकिकात भर घालणारे असे आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रमाणे दि.०१.०४.२०१६ ते ३१.०३.२०१७ अखेर पुस्तके, फोटो, सीडी, डायरी व कॅलेंडर्स पोस्टेज स्टॉकमधुन मोफत देण्यात आलेली आहेत. याकामी एकुण रक्कम रुपये. ३,२६,९४७/- झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस व सदर खर्च प्रकाशने विभाग (Publication Expenses) खाती खर्ची टाकणेस मंजुरी मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१७** **संस्थान प्रकाशित श्री साईचरित्र प्रकाशनास परवानगी देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७. नं ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** उपरोक्त विषयांकित संदर्भीय पत्रास अनुसरुन श्री मनिष सभरवाल, नवी दिल्ली यांनी त्याचे पत्रात संस्थान प्रकाशित साईचरित्र व मंदिरात गायल्या जाणा-या आरत्या व मंत्रोपचार तसेच फोटो व संस्थानतर्फे आयोजित केले जाणारे उपक्रम याबाबतची सर्व माहिती एकत्रित करुन ती भारतातील टाईम्स ग्रुप्सचे वितरण केंद्र व ऑनलाईन योजनेव्दारे वितरीत करणेबाबतचा मनोदय संकल्पीत करुन श्री साईबाबां विषयीची महती/माहिती सर्व साईभक्तांना माहित व्हावी असा उद्देश पत्रातील मजकूरातून दिसून येत आहे.

सदर संकल्पीत प्रकल्पाबाबत श्री. मनिष सभरवाल यांनी मा. अध्यक्ष महोदय यांच्याशी ई-मेलवरुन संपर्क केला असून, मा. अध्यक्ष महोदय यांनी खालील प्रमाणे ०५ प्रश्नांबाबत माहिती विचारली ती खालील प्रमाणे.

१) तुम्ही किती प्रती खरेदी करणार आहात?

- आम्ही १० हजार प्रती प्रिंट करणार असून त्या इतर धार्मिक ग्रंथाप्रमाणे त्याची रचना असेल.

२) प्रिंट केलेल्या प्रती कशा पध्दतीने वितरीत करणार?

- प्रिंट केलेल्या प्रती टाईम्स ग्रुप्सचे वितरण व्यवस्थतेतून तसेच ऑनलाईन वितरणव्यवस्थेनुसार (उदा. Flipkart व Amazon.)

३) आपण मार्केटिंग करणार असल्याने पुस्तकांची विक्री करणार का? मोफत देणार आहात?

- सदर प्रिंटची किंवा पुस्तकांची विक्री करणार असून त्यात फक्त पुस्तक सजावट, मार्केटिंग (विक्रय व्यवस्था) व जाहिरातीवरील झालेल्या खर्चाचा विक्री किंमतीत समावेश असेल.

४) याबाबत आपला हेतू स्पष्ट करा?

- टाईम्स ग्रुप्सचे भागधारक यांचे मनोदयानुसार आम्ही टाईम्स ग्रुप्सचे दैनिक वर्तमानपत्रातून धार्मिक व अध्यात्मीक स्तंभ प्रकाशित करित असतो. असे एकूण ६५ प्रकारच्या अध्यात्मीक भाषांमध्ये लेख प्रसिध्द केले आहेत.
- संतांची शिकवण याबाबत आतापर्यंत ३० हजार अध्यात्मीक लेख प्रसिध्द झालेले आहेत.
- श्री साईबाबांना विविध भाषा व प्रांतमधील भक्त मानत असल्याने त्या सर्वांच्या अनुभवातून संस्थेने 'Saibaba Is Still Alive' या नावाने पुस्तक तयार करुन आतापर्यंत त्याच्या ३० हजार प्रती वितरीत केल्या आहेत.

५) संस्थानच्या काही कार्यक्रम / उपक्रम विषयी माहिती आपणास दिल्यास ती प्रकाशित कराल काय?

- संस्थानचे जे कार्यक्रम / उपक्रम ज्यात बदल होणार नाही अशी माहिती साई सच्चरित या पुस्तकात शेवटून प्रसिध्द करता येईल.

**मागणी:-** निरंक.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमान:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०३.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७४ (२०) नुसार संस्थान प्रकाशित बाबांचे साहित्य रजिस्ट्रेशन करुन पुस्तकांचे सर्व हक्क (Copy Right) संस्थान स्वाधीन केलेले आहे. जेणेकरुन भविष्यात खाजगी व्यक्ती/ संस्था उपरोक्त बाबींचा परस्पर उपयोग करु शकणार नाहीत व आपला हक्क सांगू शकणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री. सभरवाल, नवी दिल्ली यांचे पत्रातील आशय पहाता व मा.अध्यक्ष महोदय यांनी विचारलेली प्रश्नावलीस अनुसरुन त्यांनी दिलेली उत्तरे, तसेच दि.१९.०४.२०१७ रोजी श्री. सभरवाल यांचेशी दुरध्वनीवरुन समक्ष माहिती घेतली असता खालील प्रमाणे अभिप्राय सादर केला आहे.

अ) सदर टाईम्स ग्रुप संस्थान प्रकाशित पुस्तके खरेदी करणार नसून, संस्थानकडील प्रकाशित साहित्यांची PDF Format मध्ये मागणी केलेली आहे. सदर साहित्यातून साईबाबांची महती, भक्तांना आलेले अनुभव, चमत्कार, शिकवण व तत्वज्ञान विषयीची माहिती तसेच मंदिरात गायल्या जाणा-या ०४ आरती, संस्थानतर्फे साजरे होणारे उत्सव अशी एकूण माहिती असलेली पुस्तिका २४८ पानांमध्ये तयार करुन तसेच सदर पुस्तिकेसाठी चांगल्या प्रकारचा पेपरवर बाईडिंग, सोनेरी कडा असलेली तयार करणार असून त्या पुस्तिकेस "श्री साई सच्चरित्र" या नावाने तयार करण्याचा टाईम्स ग्रुप बुक्स यांचा मनोदय दिसुन येत आहे.

ब) टाईम्स ग्रुप यांचे पत्रातील आशय पहाता वरील 'अ' प्रमाणे जी माहिती मागणी करुन त्यास "श्री साई सच्चरित्र" या नावाने पुस्तक प्रकाशित करणार आहेत. परंतू संस्थान प्रकाशित मूळ ग्रंथ हा "श्री साई सच्चरित" या नावाने असल्याने त्यांना सदर नावाबाबत संमती देता येणार नाही.

क) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१२.०३.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७४ (२०) नुसार संस्थान प्रकाशित बाबांचे साहित्य रजिस्ट्रेशन करुन पुस्तकांचे सर्व हक्क (Copy Right) संस्थान स्वाधीन केलेले आहेत. जेणेकरुन भविष्यात खाजगी व्यक्ती/ संस्था उपरोक्त बाबींचा परस्पर उपयोग करु शकणार नाहीत व आपला हक्क सांगू शकणार नाहीत. असा निर्णय झालेला आहे.

करिता उपरोक्त **अ, ब** आणि **क** नुसार प्रस्ताव मान्य करता येणार नाही. टाईम्स ग्रुप यांनी पत्रात नमुद केले प्रमाणे २४८ पानांमधुन "साईचरित्र" या नावाने बुक्स तयार करुन त्यात शिर्डी मंदिरात गायिल्या जाणाऱ्या चार ही आरती, बाबांची शिकवण, भक्तांना आलेले अनुभव, मा. व्यवस्थापन मंडळाचे कामकाज इत्यादी स्वरुपात माहिती संकलित करुन "साईचरित्र" या नावाने बुक्स तयार करणार असलेचा त्यांचा मानस आहे. अशा प्रकारे श्री साईबांबा विषयी माहिती असलेले प्रकाशन मार्केटमध्ये उपलब्ध करुन दिल्यास श्री साईबांबाचे प्रचार व प्रसार कार्यास मदतच होईल, असे वाटते.

तथापि उपरोक्त अ, ब व क चा विचार करता सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, टाईम्स ग्रुप यांना साईचरित्र छपाई करणेकामीची परवानगी दिल्यास त्यामधुन निश्चीतच साईबाबांचे शिकवणूकीचा प्रचार व प्रसार होणेस मदत होईल असे समितीचे मत झाले. याकरीता टाईम्स ग्रुप यांना साईचरित्राची छपाई करणेस परवानगी देण्यात आली. परंतु साईचरित्र छपाईचे अधिकार फक्त साईबाबा संस्थानलाच आहेत. हे छपाईचे अधिकार दुसऱ्यांना देता येतील का, याबाबत कार्यकारी अधिकारी यांनी तपासून घ्यावे. तद्नंतर याकामी टाईम्स ग्रुप यांचेबरोबर कायदेशीर**

**करारनामा करुन घेण्यात यावा व त्यामध्ये या पुस्तकाचे सर्व हक्क संस्थानचे राहिल. समाधी शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर मर्यादीत प्रतींची एकवेळेसच छपाईसाठी परवानगी देण्यात येत आहे, संस्थानमार्फत राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळया प्रकल्पांची माहिती सदरहु पुस्तकामध्ये प्रकाशित करावी. तसेच समाधी शताब्दी वर्षाचे अनुषंगाने या सोहळयाचा प्रचार व प्रसिध्दीच्या दृष्टीने आवश्यक सहकार्य टाईम्सग्रुपने करावे, याबाबींचा समावेश करणेत यावा. असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१८** **संस्थानद्वारा भावार्थ श्री साईसचरित ग्रंथ मराठी व हिंदी भाषेमध्ये प्रकाशित करणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७. नं मध्ये ठ खालील प्रमाणे तरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** श्री.दिलीप पवार, साई-केशर प्रकाशन, पुणे यांचे दि.०१.०४.१७ चे पत्रास अनुसरुन संस्थान प्रकाशित श्री साईसच्चरित मराठी पोथीचा मराठी व हिंदी भाषेतील भावार्थ श्री साईसच्चरित या ग्रंथाचे १००० प्रती आवृत्ती छापून संस्थानला देणगी स्वरुपात देण्याचा मानस व्यक्त केलेला आहे.

बाबांच्या शताब्दी महोत्सवाच्या काळात हा ग्रंथ साईभक्तांना उपलब्ध करुन भावार्थ मराठी व हिंदी खंडाच्या प्रत्येकी १००० प्रती छपाईचा सर्व खर्च ते स्वत: करणार असून, संस्थानतर्फे ते प्रकाशित करावे अशी विनंती केलेली आहे.

**मागणी:-** श्री.दिलीप पवार (पवारकाका) पुणे यांनी केलेली विनंती मान्य करुन भावार्थ श्री साई सच्चरित ग्रंथाच्या प्रथम १००० प्रती संस्थानकडे प्राप्त झालेनंतर संस्थानचे बुकस्टॉवरुन भक्तांसाठी संस्थानतर्फे उपलब्ध करुन देता येतील. व भक्तांच्या प्रतिसाद पाहुन संस्थानतर्फे पुर्नमुद्रणाबाबत निर्णय घेता येईल.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमान:-** धोरणात्मक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** संस्थानचा श्री साईसच्चरित- मराठी पोथी ग्रंथ हेमाडपंत लिखीत हा ग्रंथ प्राकृत भाषेत असलेने काही भक्तांना त्यातील काही शब्दांचा बोध होत नाही. करिता श्री पवार काका यांनी सोप्या भाषेत अनुवादीत केलेला भावार्थ ग्रंथाचे मराठी व हिंदी भाषेतील २-२ खंड तयार केले असून, सुरुवातीस दोनही भाषेतील १०००-१००० प्रती संस्थानतर्फे प्रकाशित करण्यात याव्यात व त्याकरीताचा सर्व खर्च श्री पवार काका स्वत: करणार आहेत.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यास हरकत नाही, असे विभागाचे मत आहे. करिता सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.दिलीप पवार, पुणे हे स्वखर्चाने छपाई करुन देणार असल्यामुळे, त्यांनी अनुवादीत केलेल्या मराठी व हिंदी भाषेतील श्री साईसचरित्र भावार्थ ग्रथांचे प्रत्येकी १००० प्रती संस्थानतर्फे प्रकाशित करणेस मान्यता देण्यात आली. परंतु या प्रती स्विकारणेपुर्वी त्या तज्ञांकडून तपासून घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१९** **साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे सम्मेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेकामी रु.९०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळणेबाबत तसेच परिसरातील फुल सजावटदारांकडून दरपत्रके मागवून फुल सजावट करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमध्ये साईसेवक योजना सुरु करणेसंदर्भात, शिर्डीस पालखी घेऊन येणारे पालखीधारकांची सेवा घेणेकामी दि.28/05/2017 रोजी त्यांचे प्रतिनिधींचे संमेलन आयोजीत करणेत येणार आहे. सदर संमेलनाच्या नियोजनाचा आढावा घेणेकामी दिनांक 15/04/2017 रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षामध्ये आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये कार्यक्रमाच्या स्टेजला फ्लॉवर डेकोरेशन तसेच सन्मा. पाहुण्यांच्या स्वागतासाठी बुकेंची व्यवस्था करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार दि.28/05/2017 रोजीच्या आयोजीत साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करुन सुशोभीकरण करावयाचे आहे. तसेच आलेल्या मान्यवरांच्या स्वागतासाठी बुके खरेदी करावयाची आहेत.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- आर्थीक विषय आहे.

मागणी- दि.28/05/2017 रोजीच्या आयोजीत साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी खालीलप्रमाणे बुके व फुलांची सजावट करावयाची आहे.

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| 01 | 40 x 30 फुट मापाच्या स्टेजच्या समोरील बाजूस फुलांचा पट्टा लावणे, (जरबेरा, ऑर्कीड व कार्नेशन एकत्रीत) |
| 02 | स्टेजवर फुलांच्या माळा सोडणे |
| 03 | 20 फुट कमानीला फुलांची सजावट करणे (तोरण) |
| 04 | स्टेजवर पाठीमागील बाजुस बॅनरवर फुलांच्या माळा सोडणे |
| 05 | 50 नग गुलाब बुके (राऊंड बुके) |
| 06 | 1 ते 1.5 फुट ऊंचीचे काटे काढलेले डंच गुलाब (2000 नग) |

तरी उपरोक्त प्रमाणे बुके खरेदी करणेकामी व कार्यक्रमाच्या स्टेजला फुलांची सजावट करणेकामी साधारणत: अंदाजे रु.90,000/- (नव्वद हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी परिसरातील फुलसजावट करणारे कारागीर यांचेकडुन विहीत पध्दतीने कोटेशन घेऊन न्युनत्तम दराने सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करता येईल. किंवा जर कोणी साईभक्तांनी देणगी स्वरुपात फुलांची सजावट करुन देणेस तयार असल्यास त्यांना फुल सजावटीसाठी परवानगी देता येईल.

विभागाचा अभिप्राय/- दि.28/05/2017 रोजीच्या आयोजीत साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलन कार्यक्रमाच्या ठिकाणी मान्यवरांच्या स्वागतासाठी बुके खरेदी करणे व फुलांची सजावट करणेकामी परिसरातील फुलसजावटदरांकडुन कोटेशन मागविणेस तसेच आलेले कोटेशन माखरेदी समिती सभेपुढे उघडुन न्युनत्तम दर धारकास कार्यादेश देणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.90,000/- (नव्वद हजार) मात्र खर्चास मान्यता मिळणेस अथवा सदरची फुलसजावट साईभक्तांनी देणगी स्वरुपात करुन दिल्यास त्यांचेकडुन फुलसजावट करुन घेता येईल

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे होणाऱ्या साईपालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलनामध्ये मान्यवरांचे स्वागतासाठी बुके खरेदी करणे व कार्यक्रमाचे ठिकाणी फुलांची सजावट करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये प्रस्तावीत कामी दानशुर साईभक्तांकडून देणगी मिळाल्यास, सदरहु काम देणगी स्वरुपात करुन घेण्यात यावे.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **जनहित याचिका क्र.२५/ २०१२ मधील चौकशी अधिकारी श्री.पी.एस. परांजपे साहेब यांनी केलेल्या चौकशीचे अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.३७६** सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.२१** **लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता ISO मानांकनाचे नियमावलीनुसार दैनंदिन वापरासाठी स्टेनलेस स्टील भांडी खरेदी करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) -** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

**ठराव –** नविन प्रस्ताव

**प्रास्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे निर्णय क्र.५३७ अन्वये, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन दैनंदिन ३०००० ते ३५००० लाडु पाकीटे विक्री करणेसाठी तसेच ४०००० ते ४५००० बुंदी पाकीटे मंदिरामध्ये दर्शन लाईनमध्ये मोफत वाटप करणेसाठी तयार करुन पाठविली जातात.

श्रीं चा प्रसाद तयार करणेसाठी म्हणजेच मोतीचुर बुंदी तयार करुन हाताने लाडु वळविणे, सुटी बुंदी तयार करुन सुकविणे व स्टॉक करणे इ. कामांसाठी सध्या लाडु निर्मिती विभागाकडे सर्व ॲल्युमिनियम वस्तु

(उदा. पातेले, घमेले, पराती, चंचुपात्र, बादली, स्टील टप, लोखंडी कढई, लोखंडी झारे इ.) वापरण्यात येत आहेत. लाडु व बुंदी प्रसाद निर्मिती करुन वितरीत करणेसाठी उपरोक्त नमुद सर्व साहित्यांची दैनंदिन नितांत आवश्यकता असते.

उपरोक्त नमुद केलेली सर्व भांडी सन २००७-०८ मध्ये खरेदी करणेत आलेली असुन, सदरचे साहित्य/भांडी ७ ते ८ वर्षापासुनच्या सतत वापरामुळे झिज होऊन खराब झालेली आहेत, तुटलेली आहेत. सदरची भांडी तुटलेली/खराब झालेली असल्याने त्यातुन लाडु व बुंदी तयार करतांनी मटेरीयल जमिनीवर सांडते व नुकसान होते. त्यामुळे लाडु वळण्यास व बुंदी सुकवणेस वेळ व श्रम वाया जात आहे.

त्याचप्रमाणे ISO लेखापरीक्षक, अन्न व औषध प्रशासन कार्यालय, अ.नगर तसेच संस्थानचे दक्षता पथक यांनी अॅल्युमिनियम भांड्यांचा लाडु व बुंदी प्रसाद बनविणेकरीता वापर करण्यात येऊ नयेत, असे आक्षेप वेळोवेळी लेखापरीक्षण/पाहणी अहवालात नोंदविले आहेत. त्यामुळे सदरचे भांडी/साहित्यांअभावी भक्तांना लाडु व बुंदी प्रसाद पुरविणेस अडचणी येत आहेत. साईभक्तांना वेळेत व विनाप्रतिक्षा प्रसाद मिळावा या हेतुने, त्याचप्रमाणे ISO लेखापरीक्षक व दक्षता पथक यांनी केलेल्या सुचनांनुसार लाडु व बुंदी प्रसाद तयार करणेसाठी वापरण्यात येणा-या व खराब होऊन तुटलेली अॅल्युमिनियमची भांडी बदलणे अत्यंत आवश्यक आहे.
सध्या वापरात असलेल्या अॅल्युमिनियम भांड्यांऐवजी स्टेनलेस स्टीलची सर्व भांडी वापरल्यास लाडु वळणे व बुंदी सुकविणे सोईचे होईल व लवकर झीज होणार नाहीत, दिर्घकाळ टिकतील.

लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागास आवश्यक असणारी चांगल्या प्रतीचे ३०४ ग्रेडची स्टेलनेस स्टील भांडी/साहित्यांबाबत तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे –

| अ.नं. | तपशिल | साईज | ०१ किलोचा अंदाजे दर | ०१ नगासाठी अंदाजे दर (रुपये) | आवश्यक नग संख्या | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | स्टेनलेस स्टील पातेले (मध्यम) | ४५ X "२१" | ४६६/- | ४४,२००/- | १२ | **५,३०,४००/-** |
| ०२ | स्टेनलेस स्टील कढई (मोठी) | ५३.५ X "१५.५" | ५००/- | १,४५,०००/- | १५ | **२१,७५,०००/-** |
| ०३ | स्टेनलेस स्टील कढई (मध्यम) | ३६ X "११.५" | ५०/- | ४१,०००/- | ४० | **१६,४०,०००/-** |
| ०४ | स्टेनलेस स्टील पराती | ४८ रुंदी ६ खोली | ५०४/- | ७,८००/- | १०० | **७,८०,०००/-** |
| ०५ | स्टे.स्टील ट्रे (मोठे) | ३८ | ५२३/- | ८,१००/- | १०० | **८,१०,०००/-** |
| ०६ | स्टे.स्टील बादली | १० लिटर | १२८/- | ४५०/- | २५ | **११,२५०/-** |
| ०८ | स्टे.स्टील बादली | ०५ लिटर | १०८/- | २७०/- | २५ | **६,७५०/-** |
| ०९ | स्टे.स्टील कडी टप | १८ X "११" | २९२/- | १,०८०/- | १०० | **१,०८,०००/-** |
| १० | स्टे.स्टील चंचुपात्र(गंज) | १४ X "१२" | ३७५/- | २,२५०/- | १०० | **२,२५,०००/-** |
| ११ | स्टे.स्टील टोप (लहान) | २२ X "१२" | १३५/- | ५४००/- | २५ | **१,३५,०००/-** |
| १२ | स्टे.स्टील ट्रे (लहान) | २ X "१" | ५४०/- | १०८०/- | १०० | **१,०८,०००/-** |
| १३ | स्टेनलेस स्टील पातेले (मोठे) | ४८ X "१८" | ४७६/- | ५०,०००/- | २५ | **१२,५०,०००/-** |
| १४ | स्टेनलेस स्टील पातेले (लहान) | ४० X "१८" | ५२०/- | ४४,२५०/- | ३० | **१३,२७,५००/-** |
| | **एकुण** | **----** | **---** | **----** | **----** | **९१,०६,९००/-** |

उपरोक्तप्रमाणे नवीन भांडी खरेदीसाठी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात खरेदीकरीता मात्र रक्कम **रु.२४,००,०००/-** इतकी आर्थिक तरतुद करणेत आलेली असल्याने सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात उर्वरीत रक्कम रु.६७,०६,९००/- तरतुद करावी लागणार आहे.

**मागणी –** उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे, स्टे.स्टील साहित्य/उपकरणे ही सन २००७-०८ पासुन सतत वापर केल्यामुळे झिज होऊन खराब झालेली आहेत. तसेच ISO लेखापरीक्षक व दक्षता पथक यांनी सुचविलेनुसार उपलब्ध अॅल्युनिमिनियम भांडी वापरणे भक्तांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक आहेत.

त्यासअनुसरुन सदरची स्टेलनेस स्टील भांडी/साहित्य श्रीं चा प्रसाद बनविणेकामी वापरण्यात येणार असुन, सदरच्या साहीत्याअभावी भक्तांना लाडु व बुंदी प्रसाद पुरविणेकामी अडचणी येवु नयेत, यासाठी उपरोक्त नमुद केले प्रमाणे सर्व स्टेलनेस स्टील भांडी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा मागवुन खरेदी करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** शासन निर्णय क्र.भांखस/प्र.क्र.८२/भाग-०३/उद्योग-०४, दि.३० ऑक्टोंबर, २०१५ चे खरेदी प्रक्रीयेनुसार ज्या निविदांचे अंदाजीत मुल्य रुपये ३ लाखापेक्षा जास्त आहे अशा सर्व

निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात व रुपये ३ लाखांपेक्षा कमी असेल तेंव्हा दरपत्रके मागवुन खरेदी करण्यात यावी, अशी मुभा देण्यात आलेली आहे.

त्यानुसार मोतीचुर लाडु व बुंदी प्रसाद तयार करुन साठवण करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सर्व स्टेलनेस स्टील भांडी विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत ई-निविदा मागवुन खरेदी करता येईल, अथवा देणगी स्वरुपात मिळत असल्यास देणगी घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे अडचणी व भविष्यातील शताब्दी वर्षात संभाव्य गर्दीचा आढावा घेऊन तयार होणा-या नविन इमारतीतील लाडु युनिटला अनुसरुन लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता आवश्यक असणारी सर्व भांडी/साहित्य

अ) देणगी स्वरुपात मिळत असल्यास ती देणगी म्हणुन स्विकारण्यास,

ब) किंवा विहीत पध्दतीने खरेदी विभागामार्फत ई-निविदा मागवुन खरेदी करण्यास, त्यासाठी वर्तमान पत्रात जाहीरात देणे आलेल्या ई-निविदा खरेदी समिती पुढे (तांत्रिक व वाणिज्यीक) उघडणे त्यास उपसमिती तसेच व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश देणे इत्यादी.

क) व सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात रक्कम रु. ६७,०६,९००/- ची वाढ करणेस आणि भांडी खरेदीकामी येणाऱ्या या अंदाजे रक्कम रु. ९१,०६,९००/- (अक्षरी– एक्क्यान्नव लाख सहा हजार नऊशे मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकरीता ISO मानांकनाचे नियमावलीनुसार दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेली स्टेनलेस स्टीलची भांडी देणगी स्वरुपात मिळणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच विशिष्ठ कालावधीमध्ये सदरहु भांडी देणगी स्वरुपात न मिळाल्यास ती खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९१,०६,९००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)

---

**विषय नं.२२** **समाधी मंदिरातील शोरुम मधील वस्तुंना देणगीदाखल चांदी बसविणेस परवानगीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रींचे समाधी मंदिरामधील सभामंडपाचे दक्षिणेकडे शोरुम आहे त्यामध्ये श्रींनी हयातीमध्ये असतांना वापरलेल्या पादुका व सटका आहे (मंदिर विभागाकडे बाबांनी वापरलेले एकुण तीन पदुका व एकच सटका आहे). तसेच याठिकाणी श्रींचा जुना फोटो इ. वस्तु ठेवणेत आलेल्या आहेत. श्रींच्या पादुका व सटका ह्या साईभक्तांचे दर्शन होणेसाठी पारदर्शी ॲक्रेलिक बॉक्समध्ये ठेवण्यात आल्या आहेत. तसेच सदर बॉक्स लाकडी पाटावर ठेवणेत आलेला आहे. श्रींचा जुना फोटो लाकडी सिंहासनामध्ये ठेवण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव-** साईभक्त श्री प्रशांत श्रीवास्तव, रा.नोएडा यांनी त्यांचे दि२५/०४/२०१७चे विनंती अर्जान्वये श्रींचे पादुकांचे शोरुममधील १) लाकडी सिंहासन, २) श्रींचा फोटो ३) सटका कव्हर व पादुका बॉक्सची साईडची बॉर्डर व ४) लाकडी पाट (पादुका ठेवलेल्या) इ. करीता आवश्यक चांदी ते देणगी स्वरुपात देणेस तसेच त्यासाठी लागणार सर्व खर्चही करणेची इच्छा श्री.श्रीवास्तव यांनी अर्जाद्वारे प्रदर्शित केली आहे.

**विभागाचे मत/ अभिप्राय-** श्रींचे समाधी मंदिराचे सभामंडपाचे दक्षिणेकडील शोरुममधील १) लाकडी सिंहासन २) श्रींचा फोटो ३) पादुका व सटका पारदर्शी बॉक्सला व ४) लाकडी पाट या सर्व वस्तुंना देणगी स्वरुपामध्ये चांदी बसवुन घेता येईल. परंतु, सदर वस्तुंना चांदी बसवितांनाखालील गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.

१) हे काम करतांना सदर वस्तु कोणासही हाताळु न देणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे

२) श्रींच्या पादुका व सटका तसेच श्रींचा फोटो व इतर वस्तुंना कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

३) श्रींच्या पादुका व सटका यांचे अॅक्रेलीक कव्हर अधीक वापरामुळे खराब होते, ते आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदलण्यात येते. याचा विचार करुन त्यानुसार चांदीची आकर्षक पट्टी तयार करण्यात यावी व ती पुन्हा नवीन कव्हरला बसविता येईल याची काळजी घ्यावी लागेल.

४) प्रत्येक वर्षी मंदिर विभागाचे वैधानिक लेखापरिक्षक यांचेमार्फत सोने-चांदीच्या वस्तूंची वजन व नोंदी याची तपासणी करण्यात येते. सदर चांदी वस्तुंना फिट केल्यास वजनाची नोंद अथवा ऑडीटकरणेकामी अडचण निर्माण होते. त्याकरीता योग्य त्या पद्धतीने चांदी बसवुन घेणे गरजेचे आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे सर्व बाबींचा विचार करुन समाधी मंदिराचे शोरुममधील वस्तुंना वरील गोष्टींचा विचार होऊन देणगीदाखल चांदी बसवुन घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी मंदिराचे सभामंडपाचे दक्षिणेकडील शोरुममधील लाकडी सिंहासन, श्रींचा फोटो, पादुका व सटका ठेवलेल्या पारदर्शी बॉक्सला तसेच पादुका ठेवलेल्या लाकडी पाटास श्री.प्रशांत श्रीवास्तव, नोएडा यांचेकडून देणगी दाखल चांदी बसवून घेणेस मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी समिती सदस्य मा.श्री.सचिन तांबे यांनी अशी सभेस अशी माहिती दिली की, व्दारकामाईतील श्रींच्या पादुका खराब झालेल्या असुन एका साईभक्ताने त्या पादुका नविन बनविणेसाठी आवश्यक असलेले सोने देणगी देण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे. सदरहू देणगी स्विकारणेस समितीने संमती दिली. तथापि, देणगी स्विकारणेपुर्वी मंदिर व लेखाशाखा विभागाने विहीत कार्यपध्दतीची अंमलबजावणी करावी, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३** **मंदिर विभागाकरीता कापडी पिशव्या खरेदी करणे/ देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम- २००४ तरतुद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्र. | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलं/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढीव प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

__प्रस्तावना__:- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दैनंदिन शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना श्रीसत्यनारायण पूजा करण्याची सुविधा देण्यात येते. पूजेचे सर्व साहित्य संस्थानमार्फत पुरविण्यात येते. श्रीसत्यनारायण पूजा झालेनंतर पूजेला बसलेल्या व्यक्तीस एका तिकीटावर १ श्रीफळ व अंदाजे ५००ग्रॅम शिराप्रसाद देण्यात येतो. श्रीफळ व प्रसाद सोबत घेऊन जाणेकामी, तसेच मंदिर विभागाकडे दैनंदिन श्रींचे दर्शनाकरिता महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्ती येत असतात. सदर व्यक्तींचा संस्थानचे वतीने सत्कार करण्याची प्रथा आहे. त्यावेळी मान्यवरांना सत्काराचे साहित्य सोबत न्यावे लागते. याकरीता प्रिंटेड कापडी बॅग खरेदी करणे आवश्यक आहे.

__प्रस्ताव__:- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दैनंदिन शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना श्रीसत्यनारायण पूजा करण्याची श्रीशनि मंदिराचे मागील श्रीसाईसत्यव्रत पूजा दालनामध्ये सुविधा देण्यात येते. पूजेचे सर्व साहित्य संस्थानमार्फत पुरविण्यात येते . श्रीसत्यनारायण पूजा झालेनंतर पूजेला बसलेल्या व्यक्तीस एका तिकीटावर १ श्रीफळ व अंदाजे ५००ग्रॅम शिराप्रसाद देण्यात येतो. प्रसाद रुपाने मिळालेले साहित्य सोबत घेऊन जाणेकामी कापडी पिशवीची आवश्यकता आहे.

तसेच मंदिर विभागाकडे दैनंदिन श्रींचे दर्शनाकरिता महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्ती येत असतात. सदर व्यक्तींचा संस्थानचे वतीने सत्कार करण्याची प्रथा आहे. त्यावेळी मान्यवरांना सत्काराचे साहित्य सोबत न्यावे लागते. सदरचे साहित्य नेणेकामी कापडी पिशवीची आवश्यकता आहे. त्यानुसार सन २०१७-१८ या वर्षाकरीता साधरण १,५०,००० कापडी पिशव्या खरेदी कराव्या लागणार आहे. त्यानुसार १,५०,००० कापडी पिशव्या अंदाजे रु.४/- प्रती नग प्रमाणे खरेदीकामी अंदाजे रु.६,००,०००/- (अक्षरी सहा लाख मात्र) इतका खर्च येणार

आहे. (<u>दराचा संदर्भ</u>:- दि.११/१२/२०१६ रोजीचे “जागतिक साई मंदिर परिषद-२०१६”चे प्रिंटेड कापडी बॅग दर रु.३/-)

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-** उपरोक्त नमूद केल्यानुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दैनंदिन शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना श्रीसत्यनारायण पूजा झालेनंतर, प्रसाद रुपाने मिळालेले साहित्य सोबत घेऊन जाणेकामी तसेच श्रींचे दर्शनाकरिता महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्ती येत असतात. सदर व्यक्तींचे सत्काराचे साहित्य सोबत नेणेकरीता कापडी पिशवी सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदीकामी येणा-या अंदाजे खर्च रु.६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा लाख मात्र ) चे खर्चास, तसेच सदर साहित्य खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रीयेद्वारे खरेदी करणेकामी दरपत्रक घेणे, उघडणे व याकामी येणा-या खर्चास किंवा देणगीस्वरुपात मिळालेस देणगी स्विकारणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.३७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागाकरीता आवश्यक असलेल्या कापडी पिशव्या विनाशर्त देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारणेत याव्यात. या कापडी पिशव्यांवर संस्थान खेरीज दुसरे नाव असु नये, अन्यथा विहीत पध्दतीने खरेदी करणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **चपाती/ पुरी, अन्नपाकिटे तयार करणेकामी तसेच प्रसादालयामधील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलकामी असलेले ठेकेदार यांना ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होईपावेतो मुदतवाढ देणे.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

**प्रस्तावना:-** वरील विषयास अनुसरुन, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये अ) चपाती/पुरी तयार करणे व ब) अन्नपाकीटे तयार करणेकामी दि.यशोधरा महीला सह. उत्पा. संस्था, नाशिक तसेच क) प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोलकामी स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१६/०६/२०१६ ते १५/०६/२०१७ या कालावधीकरीता मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आहे.

उपरोक्त चपाती/पुरी, अन्नपाकीटे व प्रसादालयातील हाऊसकिपींग स्वच्छतेकामी असलेले ठेकेदारांचा ठेका दि.१५ जून २०१७ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेकामी इकडील विभागामार्फत वरील तीनही (अ, ब, क) विषयांचे प्रस्ताव दि.२८ जानेवारी २०१७ रोजी कार्यालयीन टिपणी अन्वये ०५ महिने अगोदर प्रशासनाकडे सादर करण्यात आलेले होते. त्यानूसार सदर प्रस्तावावर मा.का.अ. यांची स्वाक्षरी झालेनंतर मा.व्य.समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेले होते.

उपरोक्त श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये अ) चपाती/पुरी तयार करणे व ब) अन्नपाकीटे तयार करणेकामी तसेच क) प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोल करणे. या तीनही प्रस्तावाबाबत सविस्तर माहीती खालीलप्रमाणे.

**अ)** मा.व्य.समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील विषय क्रं.१९ चपाती/पुरी तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहीरात देणे व ई-निविदा मागविणेबाबतचा निर्णय क्रं.१५४ नूसार, यावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की, “श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनासाठी आवश्यक असणा-या चपात्या तयार करणेकामी चपाती मशिन कार्यरत असून अजुनही मशिन्स घ्यावयाचे प्रस्तावित आहे. याकरीता मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करुन घेणे आवश्यक वाटत नाही. यामुळे सदरहु प्रस्ताव रद्द करणेत यावा. ” असा निर्णय झालेला होता.

तथापी सदरचे निर्णयास अनुसरुन, श्री साई प्रसादालयात सध्या २०,००० क्षमतेचे एकच मशिन कार्यरत आहे. सदर मशिन तांत्रिक बिघाडामुळे अथवा काही कारणास्तव बंद पडले तर पर्यायी दुसरे चपाती मशिन प्रसादालयात उपलब्ध होईपावेतो, तसेच श्रींचा शताब्दी महोत्सव-२०१८ करीता भक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने दि.१६/०६/२०१७ ते १५/०६/२०१८ या एक वर्ष कालावधीकरीता संस्थानकडे पर्यायी व्यवस्था असावी म्हणून मनुष्यबळाव्दारे चपाती/पुरी तयार करुन घेणेकामी सदरची ई-निविदा प्रक्रिया राबविणेकरीता पुन्हा इकडील विभागामार्फत दि.११/०३/२०१७ रोजी उपरोक्तप्रमाणे फेर प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करणेत आला. मा.का.अ.यांचे स्वाक्षरीनंतर सदरचा प्रस्ताव मा.व्य.समिती दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत ‘फेरसादर’ करणेत आला. सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून, “श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनामध्ये

स्वामी नारायण पोळी (चपाती)/पुरी मनुष्यबळाव्दारे आऊटसोर्सिंग पध्दतीने तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली."

**ब)** अन्नपाकीटे तयार करणेकामी पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेकामी इकडील दि.२८/०१/२०१७ रोजी कार्यालयीन टिपणी तसेच मा.व्य समिती सभेपुढील विषयाची टिपणीही सादर करणेत आली होती. परंतू सदर टिपणीवर मा.मुख्यलेखाधिकारी यांनी दि.१०/०२/२०१७ रोजी काही मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्दयांवर प्र.अधीक्षक, प्रसादालय विभाग यांनी मुख्यलेखाधिकारी व मा.उप.का.अ.साहेब यांचे सोबत चर्चा केली. चर्चेव्दारे सदर मुद्दयांचे निरसन करण्यात आले. तदनंतर सदर टिपणीवर मा.का.अ.साहेब यांची स्वाक्षरी झाली. तोपर्यंत दि.२५/०२/२०१७ रोजीची मा.व्य.समिती सभा होवून गेली. त्यामुळे या सभेमध्ये सदरहु विषय होण्याचे राहुन गेले.

पुन्हा सदरचा प्रस्ताव दि.११/०३/२०१७ रोजी तयार करुन मा.व्य.समिती सभा दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आला. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून, "श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. "

त्यानूसार उपरोक्त अ) व ब) चे प्रस्तावाबाबत मान्यता प्राप्त निर्णय इकडील विभागास प्राप्त होणेकामी काही दिवसाचा कालावधी गेला तोपर्यंत चपाती/पुरी तयार करणे व अन्नपाकीटे तयार करुन घेणे कामाचे ई-निविदेचा मसुदा तयार करुन कामगार विभाग,विधी विभाग,वशी-७ए,मुख्यलेखाधिकारी यांचेकडून तपासून घेतला असून त्यात त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या करणेत आलेल्या आहेत.

तदनंतर सदर ई-निविदेचा मसुदा व जाहीरात मसुदा तयार करुन त्यावर मा.का.अ.मॅडम यांची स्वाक्षरी झालेली असून सदर जाहीरात मसुदा दि.२६/०४/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता जनसंपर्क कार्यालयाकडे सादर करणेत आलेला आहे. जनसंपर्क कार्यालयाकडे जाहीरात मसुदा देतांना, त्यावर पुढील १० दिवस नंतरच्या तारखा कळविणेत येतात. त्यामुळे चपाती/पुरी,अन्नपाकीटे ई-निविदा डाऊनलोडींग तारीख ०४/०५/२०१७ अंतिम तारीख १६/०५/२०१७ व तांत्रिक निविदा उघडणेची तारीख १९/०५/२०१७ अशा कळविणेत आलेल्या आहेत.

चपाती/पुरी, अन्नपाकीटे ई-निविदा प्रक्रिया दि.१६ जुन-२०१७ पर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटते. परंतू काहीशा (उदा.मा.व्य.स.सभेच्या तारखा मागे-पुढे झाल्यास) कारणास्तव सदर प्रक्रीयेस विलंब झाला तर, सध्या असलेले चपाती/पुरी,अन्नपाकीटे ठेकेदार यांना निविदेतील अटी/शर्ती नूसार सन २०१७-२०१८ करीता सुरु असलेली ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होवून नवीन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो, आहे त्याच मंजूर दराने मुदतवाढ दयावी लागेल असे नम्र मत आहे.

**क)** श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोकामी पुढील कालावधीसाठी ई-निविदा मागविणेबाबत दि.२८ जानेवारी २०१७ रोजी कार्यालयीन प्रस्ताव सादर करणेत आला होता. मंजुरीनंतर सदरचा प्रस्ताव मा.व्य.समिती दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यानूसार सदरचे सभेत यावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की," श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामीची अंदाजपत्रकीय रक्कम खूपच जास्त आहे. याकरीता सदरहु तपासून विवरणासह प्रस्ताव फेरसादर करणेत यावा असे ठरले." सदरहु निर्णय इकडील विभागाकडे दि.१०/०३/२०१७ रोजी प्राप्त झालेला आहे.

तथापी सदरचे निर्णयास अनुसरुन, श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्टकंट्रोल करुन घेणेकामीचा मा.व्य.समिती सभेपुढील फेरप्रस्ताव इकडील विभागामार्फत प्र.अधीक्षक यांची स्वाक्षरी घेवून तसेच प्रशासकीय अधिकारी यांची दि.१८/०३/२०१७ रोजी स्वाक्षरी घेवून मा.उप.का.अ. साहेब यांचेकडे स्वाक्षरीसाठी पाठविणेत आला. मा.उप.का.अ. यांनी मला सांगितले की, " सदरचा विषय फेरसादर होत आहे, त्यावर मुख्यलेखाधिकारी यांचेशी चर्चा करुन त्यांनी सांगितलेले बदल करुन प्रस्ताव व्यवस्थीत करावा लागेल. घाई करुन जमणार नाही." असे सांगितले. त्यावर मुख्यलेखाधिकारी यांचेशी चर्चा करुन सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला. तदनंतर सदरचे प्रस्तावावर मा.उप.का.अ.साहेब यांची स्वाक्षरी झालेली आहे. तोपर्यंत मा.व्य.समितीची दि.२७/०३/२०१७ रोजीची सभा होवून गेली होती. त्यामुळे सदरहु विषय मा.व्य.समिती सभेमध्ये देणेस विलंब झालेला आहे.

आता, सदरचा प्रस्ताव दिनांक १९/०४/२०१७ रोजी तयार करुन दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्य.समिती सभेत सादर करणेसाठी सभाकामकाज विभागाकडे सादर करणेत आलेला आहे. त्यामुळे सदरहु

विषयाचा निर्णय झालेनंतर ई-निविदा मसुदा तयार करुन तपासून घेणे, जाहीरात प्रसिध्द करणे यासर्व बाबीस विलंब होणे नाकारता येत नाही.

**मागणी :-** वरीलप्रमाणे अ) चपाती/पुरी ब) अन्नपाकीटे क) हाऊसकिपींग स्वच्छता व पेस्टकंट्रोलची कामे सध्या असलेल्या ठेकेदारांना, भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता ई-निविदांची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारांना कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच अटी/शर्तीवर, केलेल्या करारनाम्यानूसार संबंधीत ठेकेदारांना मुदतवाढ दयावी लागेल. करीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत सादर करणे गरजेचे आहे. असे नम्र मत आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय :-** तरी उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, श्री साई प्रसादालयामध्ये सध्या काम करत असलेल्या अ) चपाती/पुरी ब) अन्नपाकीटे तयार करणेकामी असलेले ठेकेदार, दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांना तसेच क) हाऊसकिपींग स्वच्छता व पेस्टकंट्रोल कामी असलेले मे.स्पिक-एन-स्पॅन सर्व्हीसेस, मुंबई या तीनही ठेकेदारांना, भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता ई-निविदांची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारांना कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच अटी/शर्तीवर, केलेल्या करारनाम्यानूसार संबंधीत ठेकेदारांना मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चपाती/ पुरी, अन्नपाकिटे तयार करणे तसेच प्रसादालयामधील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलची कामे करुन घेणेकामी पुढील वर्षातील वार्षिक ई-निविदा प्रक्रिया पुर्ण हाईपर्यंत साईभक्तांची गैरसोय होऊ नये, याकरीता सदरहु कामे करणाऱ्या सध्याचे ठेकेदारांना आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५** **श्री साई प्रसादालयात कामगार विभागामार्फत अनुभवी, कुशल कंत्राटी आचाऱ्यांची नेमणूक होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम 2004 मधील तरतूद:- सन-2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 14(भाग4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीमय मधील 21 (1घ) नुसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्ताविक :- श्री साई प्रसादालयात प्रसाद भोजन घेणा-या भक्तांची संख्या दिवसें दिवस वाढत असून सध्या दररोज सरासरी सुमारे ३५,००० ते ५५,००० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. उत्सव व सलग सुट्टयांमध्ये गर्दीचे काळात जवळपास ६० हजार ते ८५ हजार भक्त श्रींचे प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. प्रसादभोजनामध्ये ०२ भाज्या, (कडधान्य व पालेभाजी) भात, आमटी, शेंगदाणा चटणी, चपाती/पुरी, व बर्फी इ.पदार्थ बनविण्यात येतात.

प्रसादालयाचे कामकाज सकाळी ७ ते ३ व दुपारी ३ ते ११ या प्रमाणे दोन शिफटमध्ये चालते. सकाळी १० ते रात्रौ १० अशी प्रसादभोजनाची वेळ आहे. सध्या प्रसादालयात ०३ कायम आचारी व ०१ कायम सहाय्यक आचारी तसेच ०२ कुशल कंत्राटी कर्मचारी हे दोन शिफटमध्ये काम पहातात. अशा पध्दतीने प्रत्येक शिफटला कायम व कंत्राटी मिळून एकूण ०३ आचारी कामे पहातात.

| **श्री साई प्रसादालयातील आकृतीबंधानूसार'आचारी' मंजूर पदांची माहीती खालीलप्रमाणे. पदनाम** | **मंजूर पदे** | | | **भरलेली पदे** | | | **रिक्त पदे** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थायी | कंत्राटी | एकूण | स्थायी | कंत्राटी | एकूण | स्थायी | कंत्राटी | एकूण |
| आचारी | १० | १४ | २४ | ०४ | ०२ | ०६ | ०६ | १२ | १८ |

श्री साई प्रसादालयाचे वरील मंजूर आकृतीबंधामध्ये १० स्थायी, १४ कंत्राटी असे एकूण २४ आचारी कर्मचाऱ्यांची मंजूरी देण्यात आलेली आहे. पैकी आजमितीस ०४ स्थायी, ०२ कुशल कंत्राटी असे एकूण ०६ कर्मचारी नांवे खालीलप्रमाणे दोन शिफटमध्ये आचाऱ्याचे काम करत आहे.

| **अ.नं.** | **स्थायी आचारी** | **कर्मचाऱ्यांची शारीरिक क्षमता सद्यस्थिती** |
|---|---|---|
| 1) | श्री धन्नाराम अण्णाराम पुरोहीत | श्री पुरोहीत, वय-वर्षे-५३ आहे. त्यांना वयोमानानूसार जास्त कामे होत नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| 2) | श्री प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले | श्री कर्डीले, वय-वर्षे- ४५ आहे. त्यांचेवर दोन ते तीन शस्त्रक्रिया (ऑपरेशन) झालेले आहे. त्यामुळे त्यांना जड उचलता येत नाही. जास्त कामाची दगदग सहन होत नाही. |
| 3) | श्री दिलीप बाबसाहेब सांबारे | श्री सांबारे, वय-वर्षे-४० आहे. |
| 4) | श्री भरत विनायक जाधव | श्री जाधव, वय -वर्षे-३६ आहे. |
| **कंत्राटी कुशल आचारी** | | |
| 5) | श्री गोवर्धन चांगदेव दाभाडे | |
| 6) | श्री विजय लक्ष्मण कोळगे | |

उपरोक्त सर्वश्री पुरोहीत, कर्डीले यांचे वय व त्यांचा शारिरिक क्षमतेचा विचार करता त्यांच्या क्रयशक्तीवर मर्यादा येत असून प्रसादालयामध्ये श्रींचे प्रसादभोजन घेणारांची संख्या पुर्वीचे व सध्याचे यामध्ये कालानुरुप तसेच नव्यातने सुरु करणेत आलेली मोफत प्रसादभोजन सुविधा यामुळे मोठया प्रमाणात वाढ होत आहे व सद्यस्थितीत मंजूर पदांपेक्षा आचारी पदाचे कर्मचारी (कुशल-अकुशल) अत्यंत तुटपूंजे आहेत.

तसेच यापूर्वी प्रसादालयात ०३ कुशल कंत्राटी आचारी कार्यरत होते. त्यातील दोन आचारी काम करत आहेत. पैकी श्री रावसाहेब कोकाटे हे दि.१४/०७/२०१५ रोजी मयत झालेले आहे. त्यामुळे त्यांचे जागी अद्यापपर्यंत कुशल कंत्राटी आचारी देण्यात आलेला नाही.

वेळोवेळी येणारे सन्माननीय अतिथी, व्यवस्थापन मंडळाच्या मिटींग, कॅश काउटींग, खातेप्रमुख मिटींगकरीता, तसेच इतर विभागांचे मागणीनुसार नाष्टा व हॉस्पीटलमधील पेशंटस्साठी दोन वेळचे जेवण दयावे लागते. त्यासाठी वेगळी तरतुदही करणेत आलेली नाही. त्यामुळे कमी आचारी संख्येमुळे आचा-यांची ऐनवेळी खूपच धावपळ होते, दमछाक होते. त्या मुळे त्यांचे कामावर त्याचा मोठा परिणाम होवून त्यां चे सुट्टयांचे प्रमाणही वाढलेले आहे.

वरील कर्मचाऱ्यांनी रजा,सुट्टया घ्यावयाचे झाल्यास अथवा कर्मचारी आजारी पडल्यास रसोडयामध्ये आचारी मिळणे मुश्किल झाले आहे. शिवाय श्रींचा प्रसादभोजनासाठी येणारी गर्दी विचारात घेता तेथील कामाचा व्यापही मोठयाप्रमाणात वाढलेला असल्यामुळे आचारी व कर्मचारी यांची कमतरता यामुळे श्रींचे प्रसादामधील पदार्थांचा चवीचा दर्जाही घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सबंधीत कर्मचाऱ्यांना काही शिक्षा करावयाची झाल्यास पर्यायी व्यवस्थाही उपलब्ध नसल्यामुळे संबंधीत आचारी, सहाय्यक आचारी यांना, “कर्मचारी हे अत्यंत कमी आहेत. आम्हालाही मर्यादा आहेत. आचारी, सहाय्यक आचारी वाढवून मिळावेत.” अशी मागणी करण्याची संधी असते व ती वस्तूस्थिती खरीही आहे. शिवाय प्रसादालयात आचारी, सहाय्यक आचारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे आपलेवर कोणतीही कार्यवाही होवू शकत नाही अशी भावना बळावण्याची शक्यता नाकारता येत नाही. श्री साई प्रसादालयातील दिवसेंदिवस वाढत्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता आचारी कर्मचारी कमी पडत आहेत. तसेच कार्यरत असलेल्या आचारी कामगारांच्या रजा/सुटया, आजारी रजा सोडविणे कामी आचारी कर्मचारी उपलब्ध होत नाहीत, प्रसंगी अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आचाऱ्याचे कामकाज करुन घेतले जाते. त्यामुळे त्यांचेकडून जेवणाच्या चवीमध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रसादभोजन चविष्ठ व रुचकर बनविणे हे काम जिकरीचे व जबाबदारीचे असल्याने अकुशल कंत्राटी कर्मचाऱ्यांवर प्रसाद भोजन बनविण्याची जबाबदारी सोपविता येत नाही. त्यामुळे आचाऱ्यां अभावी प्रसादभोजन व्यवस्था पुरविणे अत्यंत अडचणीचे होत आहेत.

मागणी :- प्रास्तविक केलेप्रमाणे श्री साई प्रसादालयातील सध्याचा विचार करता व साइ भक्तांना चविष्ठ व रुचकर प्रसादभोजन मिळावे यासाठी प्रति दिन भाजी बनविणेकामी ०४, आमटी बनविणेसाठी ०२ असे एका शिफटमध्ये ०६ आचारी व दोन शिफटमध्ये १२ आचारी आवश्यक आहेत. त्यांचे रजा/सुट्टया सोडविणेसाठी ०२ आचारी असे एकूण १४ आचाऱ्यांची अत्यंत आवश्यकता आहे तसेच श्री साईबाबा यांचे महानिर्वाण सन-२०१८ मध्येण एक शतक पुर्ण होत आहे. त्याचनिमित्तह संस्थातन व्यवस्थायपनामार्फत सन २०१७-२०१८ हे वर्ष श्री साईबाबा समाधी शताब्दीत वर्ष म्हतणून साजरा करण्यासचे प्रयोजन आहे. या शतक महोत्सतवी श्री क्षेत्र शिर्डीस येणा-या साईभक्तां साठी मुलभुत सेवा सुविधांसह या वर्षात आयोजित करावयाचे विविध स्तीरावरुन नियोजन सुरु आहे. त्या् अनुषंगाने शिर्डीस येणा-या भक्तांतसाठी अल्पोवपहार व प्रसादभोजन सुविधेमध्येन वाढ करावी लागणार आहे.

करीता, सध्या प्रसादालयात आचारी पदाचे काम करत असलेले ०२ अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना कुशल करण्यात यावे व उर्वरीत राहीलेले १२ आचाऱ्यांची पदे संस्थानचे लेबर कॉन्ट्रक्टर यांचेमार्फत कंत्राटी पध्द तीने तातडीने भरणेत येणे अत्यंत गरजेचे आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :- श्री साईबाबा यांचे महानिर्वाण सन-२०१८ मध्यें एक शतक पुर्ण होत असल्याडने या शतक महोत्स्वी श्री क्षेत्र शिर्डीस येणा-या साईभक्तांयसाठी अल्पोपहार व प्रसादभोजन सुविधेमध्ये वाढ करावी लागणार आहे. तसेच प्रसादभोजनातील पदार्थ चविष्ठ, रुचकर मिळावेत यासाठी प्रसादालयात सध्या आचारी पदाचे काम करत असलेले ०२ अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना कुशल करणेत येवून नियमित नेमणूका होईपर्यंत कंवाटी पदध्तीने तात्पुरत्या स्वरुपात काही कुशल आचारी नेमणे बाबतची टिपणी मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयास्तव सादर

**निर्णय क्र.३८१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साई प्रसादालयामध्ये दिवसेंदिवस वाढणाऱ्या गर्दीचा विचार करता व साईभक्तांना चविष्ठ/ रुचकर प्रसादभोजन मिळावे याकरीता तेथे कंत्राटदारामार्फत ०६ अनुभवी कुशल कंत्राटी आचाऱ्यांची नेमणूक करणेत यावी मात्र यामध्ये सध्या काम करत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करणेत यावा.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.२६** **श्री साईप्रसादालयातील डिश वॉशिंग (ताटे धुणे) मशिन करीता व भांडी धुणेसाठी लिक्वीड सोप खरेदी करणे व प्रसादभोजनकामी पत्रावळी वापरणेचा विचार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भकतांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक :-** श्री साई प्रसादालयात दरारोज सरासरी ३५ ते ४० हजार साईभक्त प्रसादाचा लाभ घेतात. उत्सव व गर्दीच्या कालावधीमध्ये प्रसाद- भोजन घेणा-या भक्तांची संख्या ६० ते ६५ हजारापर्यंत जाते. प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांना जेवण देण्यासाठी स्टिल ताटांचा वापर करण्यात येतो. सदर पदार्थ बनविणेसाठी तेलाचा व तुपाचा वापर करण्यात येत असल्यामुळे पदार्थ बनवण्यासाठी लागणारे कढई, पातेले, प्रसाद भोजनाची ताटे व जेवण वाढण्यासाठी हॉलमध्ये वापरण्यात येणा-या स्टेनलीस स्टीलच्या फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, भातवाढ्या तेलकट व तुपकट होतात परिणामी त्यांचा खराब वास येतो त्यामुळे सदर ताटे व डिशेस फक्त पाण्याने धुतल्यामुळे स्वच्छ होत नसल्याने लिक्विड सोपचा वापर करावा लागतो.

प्रसादालयातील भांडी धुणेसाठी प्रतिदिन अंदाजे ५० लिटर याप्रमाणे एका वर्षासाठी १८२५० लिटर व भांडे मशिनकरीता अंदाजे प्रतिदिन १० लिटर प्रमाणे ३६५० लिटर लिक्विड सोप असे एकुण २१९०० लिटर लिक्विड सोपची गरज लागणार आहे.

सध्या प्रसादालयामध्ये दि.२८/०४/२०१७ अखेर १०० लिटर लिक्विड सोप शिल्लक आहे. पुरवठा आदेशाचे २५% म्हणजेच खरेदी विभागामार्फत व्यापा-याकडून २६२५ लिटर लिक्विड सोप येणे बाकी आहे. प्रसादालयाकडील शिल्लक १०० लिटर लिक्विड सोप व खरेदी विभागामार्फत व्यापा-याकडून येणे बाकी असलेले २६२५ असे एकूण २७२५ लिटर लिक्विड सोप प्रसादालयाकडे सध्या शिल्लक आहे. सदर लिक्विड सोप प्रसादालयास ४५ दिवस पुरेल इतके शिल्लक आहे.

सन २०१६-१७ करीता मे.स्टारवीन परफेक्ट म्यॅन्यू.कं.प्रा.लि.मुंबई यांचेकडून हाताने भांडी धुणेकरीताचे लिक्विड सोप -रु.३४.८५ प्रती लिटर व मे.ब्ल्यू ओशन क्लिनिंग सोल्युशन्स, मुंबई -भांडी मशिनकरीताचे लिक्विड सोप-दर रु.१०.०० प्रती लिटर आहे. पुढील कालावधीकरीता प्रसादालयासाठी आवश्यक असणारे लिक्विड सोपचे दराबाबत कोपरगांव व राहाता येथील लिक्विड सोप पुरवठा करणा-या व्यापा-यांना विचारणा केली असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **लिक्विड सोप पुरवठा करणारे व्यापारी** | **लिक्विड सोपचा दर** | |
|---|---|---|---|
| | | **हाताने भांडी धुणेकरीता** | **भांडी मशीनकरीता** |
| १ | साई प्रॉडक्ट्स, कोपरगांव (दि.२५.४.१७ चे पत्र) | रु.३०.०० | रु.२०.०० |
| २ | कुंदन सुपर मार्केट, राहाता (दुरध्वनीव्दारे) | रु.४०.०० | -- |
| ३ | सनलाईट (Sunlight) कं -ऑनलाइनव्दारे | रु.३०.०० | -- |
| ४ | (Exo) कं.- ऑनलाइनव्दारे | -- | रु.८०.०० |

उपरोक्त दरांचा विचार करता निम्नतम दरानुसार सदर लिक्विड सोप खरेदीसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **लिक्विड सोपचा वापर** | **मागणी (लिटरमध्ये)** | **अंदाजे दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | हाताने भांडी धुणेसाठी | १८२५० लिटर | रु.३०.०० | ५,४७,५००.०० |
| २ | डिश वॉशिंग मशिनसाठी | ३६५० लिटर | रु.२०.०० | ७३,०००.०० |
| | | | **एकुण =** | **६,२०,५००.००** |

उपरोक्त दिलेल्या दरामध्ये भविष्यात चढ- उतार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी प्रसादालयास मंजूर रकमेत जेवढे लिक्विड सोप मिळेल तेवढे लिक्विड सोप प्रसादालयास खरेदी करुन मिळावे.

सदरचा खर्च अंदाजपत्रकीय तरतूद सन २०१७-२०१८ मधील प्रसादालय खर्च या सदराखालील मंजूर असलेल्या रकमेतून करता येईल.

**मागणी**:- श्री साई प्रसादालयातील डिश वॉशिंग मशिनसाठी व प्रसाद भोजनाची भांडी, कढया, पातेले, फुड सर्व्हिस ट्रॉलीज, चमचे, वाट्या व इतर तेलकट उपकरणे धुणेसाठी लिक्विड सोप खरेदी करणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान**:- आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**:- तरी प्रसादालयाकरीता पुढील ०१ वर्ष कालावधीसाठी हाताने भांडी धुणेसाठी लागणा-या १८२५० लिटर लिक्विड सोपकरीता अंदाजे रु.५,४७,५००/- व भांडी मशिनकरीता लागणा-या ३६५० लिटर लिक्विड सोप करीता अंदाजे रु.७३,०००/- असा एकुण अंदाजे रु.६,२०,५००/- चे न्युट्रल व चांगल्या दर्जाचे २१९०० लिटर लिक्विड सोप खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजित रक्कम रुपये ६,२०,५००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साई प्रसादालयामध्ये वापरणेसाठी केळीच्या खुंटापासून पत्रावळया तयार करता येतील का याची चौकशी करुन सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, याकामी समिती सदस्य मा.श्री.सचिन तांबे यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना व कार्यालयीन कामकाजाकरीता छापील स्टेशनरी छपाई करणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करस सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**प्रस्तावित :-** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व व्यवसायातील प्रथम व व्दितीय वर्ष यामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना थिअरी लिहीणे,जॉब ड्रॉईंग काढणे, प्रात्यक्षिकासाठी टिपण लिहीणे, दिवसभर केलेल्या दैनंदिन नोंदी करणे व इतर कामाकरीता तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता आवश्यक असलेली खालील स्टेशनरी छपाई करुन घ्यावी लागणार आहे.

| अ.क्र. | छापील स्टेशनरीचा तपशिल | आवश्यक नग/पॅड | अंदाजे दर | अंदाजे एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | जॉबशिट वही ६० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम, दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग११.७ कि.ग्रॅम ३४ X २१ सें.मि. (नमुन्या प्रमाणे) | ३५० नग | ६०/- | २१०००.०० |
| २ | जॉबशिट वही १०० पानी मॅपलिथो कागद ८० जीएसएम, दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ११.७ कि.ग्रॅम ३४ X २१ सें.मि. (नमुन्या प्रमाणे) | १५० नग | १००/- | १५०००.०० |
| ३ | २ क्वायर रजिष्टर मॅपलिथो कागद ८० जीएसएम, दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग११.७ कि.ग्रॅम ३४ X २१ सें.मि. (नमुन्या प्रमाणे) | ५०० नग | ५०/- | १२५००.०० |
| ४ | ड्रॉईंग इंपेरीयल रजिष्टर २५ शिटांचे एक रजिष्टर सन-शाईन कागद ५६ X ३६ सें.मि. (नमुन्या प्रमाणे) | ३०० नग | १००/- | ३००००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | प्रात्यक्षिक परीक्षा उत्तर पत्रिका २ पानी | ३००० नग | १/- | ३०००.०० |
| ६ | टर्म फी बुक (डयुप्लीकेट) १०० पावतीचे एक बुक (नमुन्या प्रमाणे) | १० बुक | ६०/- | ६००.०० |
| ७ | जनरल रिसीट बुक (डयुप्लीकेट) १०० पावतीचे एक बुक (नमुन्या प्रमाणे) | १० बुक | ६०/- | ६००.०० |
| ८ | बजेट रजिष्टर २ क्वायर मॅपलिथो कागद ८० जीएसएम, दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ११.७ कि.ग्रॅम ३४ X २१ सें.मि. (नमुन्या प्रमाणे) | ०४ नग | ५०/- | २००.०० |
| ९ | २ क्वायर, बोनाफाईड दाखला वाटप रजिष्टर मॅपलिथो कागद ८० जीएसएम, दोन्ही बाजुंनी पुठ्ठा बायडींग ११.७ कि.ग्रॅम ३४ X २१ सें.मि. (नमुन्या प्रमाणे) | १२ नग | ५०/- | ६००.०० |
| | | | | **८३,५००.००** |

**मागणी:-** सदरील छापील स्टेशनरी छपाई करणेकामी अंदाजे रक्कम रु.८३,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल. छपाईदारांकडून दरपत्रके मागवुन न्यूनतम दर असलेल्या छपाईदाराकडून पुरवठा आदेश देऊन स्टेशनरी छपाई करुन घेता येईल.

**अनुमान:-** वरीलप्रमाणे छापील स्टेशनरी छपाई करणेकामी छपाईदारांकडून दरपत्रके मागविणेस व त्याकरीता येणा-या अंदाजे रक्कम रु.८३,५००/- (रुपये त्र्यांऐंशी हजार पाचशे मात्र ) चे खर्चास मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना व कार्यालयीन कामकाजाकरीता आवश्यक असलेली छापील स्टेशनरी छपाई करुन घेणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८३,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रस्तावीत छपाईकामी जास्तीत जास्त प्रेसधारकांचा प्रतिसाद मिळणेसाठी स्थानिक प्रेसधारकांना ई-मेलव्दारे कळविणेत यावे व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**विषय नं.२८** **नियोजीत दर्शनरांग प्रकल्प उभारणीकामी साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती बंद करुन साईउद्यान इमारतीचा वापर पुर्ववत सुरु करणे.**

**प्रस्ताव-** <u>**अधिनियम २००४ मधील तरतूद**</u> **-**२१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

<u>**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**</u>**–** दि.२७/०३/२०१७ रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभा विषय नं. ०८ व निर्णय क्र.२४१

<u>**प्रस्तावना**</u>**–** बांधकाम विभागाचे जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/५७३/२०१७ दि.२४/०४/२०१७ चेपरिपत्रकान्वयेदि.२७/०३/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग प्रकल्प बांधकामास मान्यता मिळाली असून दर्शनरांग प्रकल्प उभारणीसाठी सध्याचे जुनेप्रसादालय परिसरातील साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारती, जुने प्रसादालय तिकीट शेड, किचन, पश्चिमेकडील चप्पल स्टॅण्ड, मोबाईल लॉकर शेड या इमारती व शेड पाडण्याकरीता ई-निवीदा मागविण्याचे प्रस्तावीत आहे.

तरी सदर इमारतीमध्ये साईप्रसाद निवासस्थान विभागाचे असलेले साहित्य काढण्याचे काम केव्हा पुर्ण होईल याबाबतची माहिती कळविणे बाबत सुचित करणेत आले आहे.

जुना प्रसादालय परिसरात साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती असून त्यामध्ये १५७ नॉन ए.सी.खोल्या आहेत. सदर खोल्यांमध्ये ३५६ कॉट्स व ३५६ फोमगाद्या, उशा तसेच बेडशीट, चादर, कापुसगाद्या वापरात आहेत. याशिवाय साईप्रसाद नं.०१ मधील ०६ रुम श्वान पथकासनिवास / कार्यालयासाठी दिल्या असून व ०३ रुम मध्ये विभागाचे साहित्य ठेवणेत आले आहे. तसेच साईप्रसाद नं.०२ मध्ये तळमजल्यावर निवासस्थान कार्यालय असून त्यामध्ये ०१ स्टोअर रुम आहे. या इमारती मधील ०१ रुम श्री मेतकर, प्रतिनिधी-बेटर कम्युनिकेशन्स, प्रा.लि.मुंबई यांना निवासाकरीता दिलेली आहे

नवीन दर्शनरांग प्रकल्प उभारणीसाठी साईप्रसाद नं.०१ व ०२ ही निवासस्थाने बंद करुन या निवासस्थानांमधील साहित्य काढून घेणेकामी खालील प्रमाणे नियोजन करावे लागेल. .

साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारती बंद करुन त्यामधील ३५६ कॉट्स व फोमगाद्या तसेच इतर बेडशीट, चादर, कापुस गाद्याइत्यादि साहित्य श्रींचे मंदिरा लगत सध्या वापरासाठी बंद असलेल्या साईउद्यान इमारतीत शिफ्ट करुन सदर इमातीचा वापर साईभक्तांचे निवासाकरीता सुरु करता येईल. साईउद्यान इमारतीत सध्या साईभक्तांच्या वापरासाठी २० खोल्या, ११ हॉल व ९९ लॉकर उपलब्ध आहेत त्यामध्ये सदर साहित्याचा पुर्ववत वापर होऊन तेथे प्रतिदिनी ९९२ साईभक्तांची निवासव्यवस्था होईल.

तसेच साईप्रसाद नं.१ इमारती मधील श्वान पथकास दिलेल्या रुम संस्थानच्या पिंपळवाडी रोड लगत असलेल्या शांतीनिकेतन इमारतीत बदलून देता येतील व साईप्रसाद नं.०२ मधील श्री मेतकर यांना दिलेली रुम साईबाबा भक्तनिवास येथे बदलून देता येईल. तसेच विभागाचे साहित्य साईउद्यान इमारतीच्या एका हॉल मध्ये ठेवता येईल.

सध्याचे साईप्रसाद निवासस्थान विभागाचे रुमबुकिंग कार्यालय येथून साईउद्यान इमारतीत स्थलांतरीत करुन सदर इमारतीतील रुम्स, हॉल्स व लॉकर्सची बुकिंग तेथूनच करता येईल.

तसेच साईनिवास अतिथीगृहाकरीता तेथील काऊंवर स्वतंत्र रुमबुकिंग काऊंटर तेथे चालू करता येईल. साईनिवास अतिथीगृह येथे वेळोवेळी मा.व्यवस्थापन समिती सदस्य येत असतात अशा वेळी त्यांची निवासव्यवस्था तथा त्यांनी सुचीत केलेल्या मान्यवरांची व्यवस्था तसेच जनसंपर्क कार्यालयाकडून येणा-या व्ही.आय.पींच्या निवासव्यवस्थेचे योग्य नियोजन करणे तसेच तेथे वेळोवेळी होणा-या मिटींगचे वेळी उपस्थितांची निवास, बैठक, चहापान, नाष्टा व भोजन इ व्यवस्थेचे नियोजन करावे लागते याकरीता साईनिवास अतिथीगृह येथे मागील बाजूस किचन शेजारी अधिक्षक यांचे कार्यालय सुरु करता येईल.

दि.१८/०४/२०१७ पासून मंदिर परिसरातील सर्व मोबाईल लॉकर, क्लोकरुम व चप्पल स्टॅंड साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत विनामुल्य सुरु करणेत आले आहे. जुने प्रसादालय परिसरात ०२ मोबाईल लॉकर, ०२ क्लोक रुम व ०२ चप्पल स्टॅंडची व्यवस्था आहेत. सदची व्यवस्था इतरत्र ठिकाणी स्थलांतरीत करावी लागेल.

**<u>मागणी-</u>** जुना प्रसादालय परिसरात दर्शनलाईन प्रकल्प उभारणी करता खालील प्रमाणे तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे.

१. साईप्रसाद नं. ०१ व ०२ या इमारतींचा वापर दि.१५/०५/२०१७ पासून बंद करुन त्यामधील ३५६ कॉट्स व ३५६ फोम गाद्या, उशा, बेडशीट, चादर, कापूसगाद्या तसेच विभागाचे स्टोअर मधील साहित्य साईउद्यान इमारतीत स्थलांतरीत करुन सदर इमारतीचा दि.०१/०६/२०१७ पासून वापर सुरु करणे.

२. साईउद्यान इमारती मधील रुम्स, हॉल्स व लॉकर्सचा वापर पुर्ववत साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणे.

३. साईप्रसाद नं.०१ मधील श्वानपथकास दिलेल्या खोल्या शांतीनिकेतन इमारती मध्ये व साईप्रसाद नं.०२ मधील श्री मेतकर यांना दिलेली खोली साईबाबा भक्तनिवास येथे बदलून देणे.

४. साईप्रसाद निवासस्थान विभागाचे रुमबुकिंग कार्यालय साईउद्यान इमारतीत व अधिक्षक कार्यालय साईनिवास अतिथीगृह इमारतीत स्थलांतरीत करणे.

५. जुना प्रसादलाय परिसरातील मोफत मोबाईल लॉकर, क्लोक रुम व चप्पल स्टॅंड बांधकाम / मेकॅनिकल विभागामार्फत इतरत्र ठिकाणी स्थलांतरीत करणे व तेथे आवश्यक सुविधा उपल्बध करुन देणे.

**<u>विभागाचा स्पष्ट अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** जुना प्रसादालय परिसरात नवीन दर्शनलाईन प्रकल्प उभारणी करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.३८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत दर्शनरांग प्रकल्प उभारणीकामी साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती बंद करुन साईउद्यान इमारतीचा वापर पुर्ववत सुरु करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.२९** **माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचे विभागनिहाय तपशिलवार तक्ते प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाचे शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा बाबत मा.विश्वस्तांचे सूचने नुसार उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार **माहे एप्रिल-२०१६ ते माहे मार्च-२०१७** अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे देत आहोत.

| अ.नं | कालावधी | अकुशल | | कुशल | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या |
| ०१ | **एप्रिल- २०१६** | | | | | | |
| | लेबर | १०३१ | २५२२२ | ५५५ | १२२३४ | १५८६ | ३७४५६ |
| | सिक्युरीटी | ६७९ | १७८५५ | ७२ | ११७७ | ७५१ | १९०३२ |
| ०२ | **मे-२०१६** | | | | | | |
| | लेबर | १०३४ | २५७६४ | ५५५ | १२०७७ | १५८९ | ३७८४१ |
| | सिक्युरीटी | ६९६ | १८०१२ | ७२ | ११७२ | ७६८ | १९१८४ |
| ०३ | **जून- २०१६** | | | | | | |
| | लेबर | १०३५ | २४८६३ | ५६० | १२१८९ | १५९५ | ३७०५२ |
| | सिक्युरीटी | ६९६ | १८१२६ | ७२ | ११३७ | ७६८ | १९२६३ |
| ०४ | **जूलै- २०१६** | | | | | | |
| | लेबर | १०३९ | २५४६५ | ५६१ | १२४६९ | १६०० | ३७९३४ |
| | सिक्युरीटी | ६९६ | १८२९४ | ७२ | ११२८ | ७६८ | १९४२२ |
| ०५ | **ऑगष्ट- २०१६** | | | | | | |
| | लेबर | १०४६ | २५८५८ | ५७२ | १३०४२ | १६१८ | ३८९०० |
| | सिक्युरीटी | ६९६ | १७६३४ | ७२ | ११३९ | ७६८ | १८७७३ |
| ०६ | **सप्टेंबर- २०१६** | | | | | | |
| | लेबर | १०५८ | २५२५२ | ५७९ | १२५३४ | १६३७ | ३७७८६ |
| | सिक्युरीटी | ६८९ | १७६६३ | ७० | ११७५ | ७५९ | १८८३८ |
| ०७ | **ऑक्टोंबर- २०१६** | | | | | | |
| | लेबर | १०९२ | २५८५६ | ६०२ | १२७७४ | १६९४ | ३८६३० |
| | सिक्युरीटी | ७०५ | १८२१५ | ७२ | ११३८ | ७७७ | १९३५३ |
| ०८ | **नोव्हेंबर- २०१६** | | | | | | |
| | लेबर | १११४ | २४३४६ | ६०४ | ११९९९ | १७१८ | ३६३४५ |
| | सिक्युरीटी | ७०५ | १६९५८ | ७२ | १०९५ | ७७७ | १८०५४ |
| ०९ | **डिसेंबर- २०१६** | | | | | | |
| | लेबर | ११२३ | २७८५७ | ६०३ | १३४९१ | १७२६ | ४१३४८ |
| | सिक्युरीटी | ७०५ | १८७८९ | ७२ | ११४३ | ७७७ | १९९३२ |
| १० | **जानेवारी-२०१७** | | | | | | |
| | लेबर | १०१६ | २६१३६ | ५३३ | १२३८८ | १५४९ | ३८५२४ |
| | सिक्युरीटी | ६७९ | १७६७२ | ७२ | ११८० | ७५१ | १८८५२ |
| ११ | **फेब्रूवारी-२०१७** | | | | | | |
| | लेबर | ११४६ | २३८१८ | ६४२ | १२४५७ | १७८८ | ३६२७५ |
| | सिक्युरीटी | ७२४ | १७७३६ | ७२ | ११५१ | ७९६ | १८८८७ |
| १२ | **मार्च-२०१७** | | | | | | |
| | लेबर | १०२० | २६२२५ | ५५३ | १२८७५ | १५७३ | ३९१०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिक्युरीटी | ६७९ | १८४६६ | ७२ | १२७१ | ७५१ | १९७३७ |
| | **एकूण संख्या** | **२११०३** | **५२२०८२** | **७७८१** | **१६४४३५** | **२८८८४** | **६८६५१७** |

उपरोक्त नमूद केले प्रमाणे माहे एप्रिल-२०१६ ते माहे मार्च-२०१७ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार आवश्यकतेप्रमाणे लावणेत आलेले आहे. तरी त्याची नोंद घेणेत येवून, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे एप्रिल-२०१६ ते माहे मार्च-२०१७ अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत आवश्यकतेनुसार पुरविणेत आलेल्या कुशल अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदिन व श्रमदिन संख्येचे अवलोकन करण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच वेळोवेळी सभेमध्ये सुचना देण्यात येऊनही कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या नाही. याबाबत सभेने नाराजी दर्शविली व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या त्वरीत बदल्या करण्यात याव्या, असे निर्देश दिले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.३०** **संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.जयभवानी एन्टरप्रायजेस, पुणे यांना टर्मिनेट नोटीस देऊन, काळया यादीत टाकणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानला सध्या कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविण्याचे कॉन्ट्रक्ट १. मे. जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे व २) मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरिटी फोर्स लि., पुणे या दोन लेबर ठेकेदार यांना दि.२८.२.२०१८ अखेर ३ वर्षा करीता देण्यात आलेले आहे. परंतु संस्थानचे मागणी प्रमाणे कंत्राटी कर्मचारी पुरवठा होत नसलेने, तसेच सदर दोनही एजन्सीचे कंत्राटी कर्मचारी यांचे वेळोवेळची गैरशिस्तवर्तने, कंत्राटी कर्मचा-यांवर देखरेख व नियंत्रण नसणे, एजन्सीचे कंत्राटी कर्मचारी यांना गणवेश व ओळखपत्र न देणे, मुदतीत कंत्राटी कर्मचारी प्रायव्हेट सिक्युरीटी लायसेन्स सादर न करणे, तसेच दर महिन्यास सिक्युरीटी पॉईंट खाली जाणे इ. बाबत संबधित ठेकेदारांना वेळोवेळी नोटीस देवूनही काहीही सुधारणा झालेली नसल्याने, तसेच वेळोवेळी करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केल्याने व सदर कंत्राट चालविण्यास असमर्थ असल्याने त्यांना टर्मीनेट करणेबाबत कायदेशिर नोटीस देवून नविन ठेकेदारांची १ वर्षाकरीता नेमणूक करणेबाबत उपरोक्त संदर्भीय, मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय पारित झालेला आहे.

**प्रस्तावना:-** अ)उपरोक्त मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार संस्थानचे कायदेशिर सल्लागार ॲड. श्री अशोक पाटील, अहमदनगर यांचा कायदेशिर सल्ला घेवून मॉडर्न व्ही.आर,सिक्यरिटी फोर्स, पुणे यांना जा.नं.एसएसएस/ वशी७-ए/३६२३/२०१६ दि.८/१०/२०१६ व मे.जयभवानी एंन्टरप्रायजेस, पुणे यांना जा.नं.एसएसएस वशी७ए/३६२२/ २०१६ दि.८/१०/२०१६ अन्वये तुम्ही वेळोवेळी करारनाम्याचा भंग केल्यामुळे तुम्हास टर्मिनेट का करण्यात येऊ नये ? याबाबत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत.

ब) त्यानुसार मे. जय भवानी यांनी दि.२५.१०.२०१६ रोजी त्यांचा लेखी खुलासा सादर केलेला असून, त्यात त्यांनी -आमचे एजन्सी मार्फत लावणेत आलेल्या सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांचे वेळोवेळी पोलीस व्हेरीफिकेशन केलेले आहे. तसेच लावणेत आलेले सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे वेळोवेळी ट्रेनी कॅम्प घेतलेले असून,त्यांना ट्रेनिंग दिलेले आहे. पुरविणेत येत असलेल्या सर्व कर्मचा-यांना युनिफॉर्म, आयडेंटी कार्ड, सिक्युरीटी कर्मचा-यांना काठी,शिट्टी,लाईन यार्ड इ.साहित्यासह युनिफॉर्म दिलेले आहे असे नमूद केलेले आहे.

क) मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स,लि.पुणे यांनी दि१४.१०.२०१६ रोजी त्यांचा लेखी खुलासा सादर केलेला असून, त्यात त्यांनी कंत्राटी कर्मचा-यांचे पेमेंट वेळेत करीत असून, आमचे एजन्सी मार्फत लावणेत आलेल्या ६० टक्के सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांचे वेळोवेळी पोलीस व्हेरीफिकेशन केलेले आहे. तसेच लावणेत आलेले सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे वेळोवेळी ट्रेनी कॅम्प घेतलेले असून,त्यांना ट्रेनिंग दिलेले आहे. पुरविणेत येत असलेल्या सर्व कर्मचा-यांना युनिफॉर्म, आयडेंटी कार्ड, पुरविणेत आलेले आहे असे नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** मे. जय भवानी एंटरप्रायजेस ,पुणे व मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स,पुणे यांनी उपरोक्त प्रमाणे सादर केलेले नोटीसीचे खुलासे हे चूकिचे असून ते वस्तु स्थितीशी धरुन नाही. त्यांनी त्यांचे एजन्सी मार्फत लावणेत आलेल्या सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांचे अदयाप पावेतो पोलीस व्हेरीफिकेशन केलेले नाही.

तसेच त्यांचेकडील लावणेत आलेले सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे ट्रेनी कॅम्प घेतलेले नसून त्यांना कोणत्याही प्रकारचे ट्रेनिंग दिलेले नाही. तसेच अदयाप पावेतो बरेचशे अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचा-यांना गणवेष दिलेले नाही. तसेच सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांपैकी काही कर्मचा-यांना काठी,टोपी यांचे अद्याप वाटप केलेले नाही.याबाबत संबंधित दोन्ही एजन्सींना वेळोवेळी पत्रे व नोटीसा दिलेल्या आहेत तरी देखील त्यांचे कामात समाधानकारक सुधारणा झालेली नाही.

तसेच त्यांनी वेळोवेळी करारनाम्यातील व वर्कऑर्डर मधिल अट व शर्त क्र.११ नुसार कंत्राटी कामगारांना विनामुल्य ओळखपत्र व गणवेष देणे त्यांचेवर बंधनकारक राहील त्याबाबत संस्थानकडे कंत्राटी कामगारांची कोणत्याहि प्रकारची तक्रार येणार नाही असे नमुद करणेत आलेले आहे. परंतु सदर एजन्सीने त्यांचे सर्वच कर्मचा-यांना गणवेष वाटप केलेले नसून श्री साईबाबा हॉस्पिटल मधिल त्यांचे कंत्राटी कर्मचा-याना अद्याप पर्यंत गणवेष वाटप केलेले नाही. याबाबत त्यांना वेळोवेळी मिटींग घेवून व लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे तरी देखील त्यांनी नियमानुसार योग्य ती पुर्तता केलेली नाही.

तसेच करारनामा व वर्कऑर्डर मधिल अट व शर्त क्र.२७ नुसार कंत्राटी पध्दतीने कामास घेतलेल्या कंत्राटी कामगारांना प्रत्येक महिन्याचे ०१ तारखेस नविन डयुटी कार्ड (यलो कार्ड) देणे त्यांचेवर बंधनकारक राहील व महिना भरल्यानंतर सदरचे डयुटी कार्ड पुढील कार्यवाहीसाठी कामगार विभागाकडे पाठविणे बाबत नमूद आहे. परंतु संबंधित एजन्सीला याबाबत वेळोवेळी मिटींग घेवून ,लेखी कळवूनही अद्याप पर्यंत एकदाही कंत्राटी कर्मचा-यांचे येलो कार्ड सदर एजन्सीने कामगार विभागास जमा केलेले नाही.

तसेच अटी व शर्तीतील क्र.२३च्या अटीनुसार कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० चे नियम नं.२५(१) नुसार लेबर लाससेन्स घेवून त्याची एक प्रत इकडील कार्यालयास १५ दिवसांचे आत सादर करावी लागेल. तुम्हांस प्रायव्हेट सिक्युरीटी एजन्सीस (रेग्युलेशन ) अॅक्ट २००५ व महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरीटी एजन्सी (रेग्युलेशन) रुल्स, २००७ चे तरतुदीस अनुसरुन पोलीस

कमिश्नर ऑफीस कंट्रोलींग अॅथॉरिटी यांचेकडून/फॉर्म नं.VI मधील प्रायव्हेट सिक्युरीटी एजन्सी लायसेन्स प्रत १५ दिवसांचे आत सादर करावी लागेल. तुम्ही लेबर लायसेंस, प्रायव्हेट सिक्युरीटी लायसेन्स विहीत मुदतीत घेणे व त्याचे नुतनीकरण विहीत मुदतीत करणे हे तुमचेवर बंधनकारक राहील. लेबर लायसेंन्स/ प्रायव्हेट सिक्युरिटी लायसेंस घेणेस व नुतनीकरण करण्यास विलंब झाल्यास प्रत्येक विलंबाचे दिवसास रु.५०/- मात्र प्रतिदिनी याप्रमाणे दंडाची रक्कम लेबर/प्रायव्हेट सिक्युरिटी लायसेंस घेणेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत व नुतनीकरण करणेबाबत पुर्तता होईपर्यंत त्यांचे मासिक बिलातुन लेखाशाखेमार्फत/कपात करणेत येईल.असे नमुद आहे. या प्रमाणे सदर एजन्सीने प्रायव्हेट सिक्यूरिटी लायसेंन्स वर्क ऑर्डर मिळाल्यापासुन १५ दिवसात सादर करणे आवश्यक होते. असे असतानाही मे.जय भवानी एंटरप्रायझेस यांनी सदर प्रायव्हेट सिक्युरिटी लायसेंन्स तब्बल ०१ वर्ष उशीराने म्हणजे मार्च २०१६ मध्ये सादर केलेले आहे. सदर विलंबाबत संबंधित एजन्सीचे प्रत्येक महिन्याचे बिलातुन दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे मे जय भवानी एंटरप्रायजेस या ठेकेदाराने वर्क ऑर्डरमधील व करारनाम्यातील अटी व शर्तीचा वेळोवेळी भंग/उल्लंघन केलेले आहे.

तरी, संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरवित असलेले ठेकेदार १) मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे व २)मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स लि.पुणे यांनी सादर केलेले नोटीसीचे खुलासे चुकीचे व दिशाभूल करणारे असुन ते समाधान कारक नाही, त्यांचे संस्थानकडे असलेले सिक्युरिटी डिपॉजिट जप्त करुन त्यांना टर्मिनेट करणेत येत असले बाबत संबंधितांना आदेश देण्यात येत आहे.

तरी मे.मॉडर्न व्ही.आर सिक्युरिटी फोर्स प्रा.लि. पुणे व मे. जयभवानी एंन्टरप्रायजेय, पुणे यांचे काम समाधानकारक नसल्यामुळे व त्यांनी कार्यादेश, करारनाम्यातील अटी/शर्तीचा भंग केलेला असुन, ते सदरहु कंत्राट चालविणेस असमर्थ आहे त्यामुळे त्यांना काळया यादीत टाकणेबाबत (Black Listed करणेबाबत) निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.जयभवानी एन्टरप्रायजेस, पुणे यांनी कार्यादेश, करारनाम्यातील अटी/शर्तीचा भंग केला असून त्यांचे कामही समाधानकारक नाही, यावरुन ते सदरहु कंत्राट चालविणेस असमर्थ आहेत, याकरीता त्यांचा समावेश संस्थानच्या काळया यादीत करण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.३१** **अग्निशमन केंद्र अधिकारी पदाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मा.उपसमिती दि.०७/११/२०१६ रोजीचे सभेत मा.श्री.प्रताप भोसले साहेब यांनी अग्निशमन केंद्र अधिकारी हे पद तातडीने भरणेचे निर्देश दिलेले होते. फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचा सुधारीत आकृतीबंध तयार करुन तो जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/१६५७/२०१६ दि.०६ जुलै २०१६ अन्वये शासनास मान्यतेसाठी सादर करणेत आलेला आहे. त्यानुसार अग्निशमन केंद्र अधिकारी पदासाठी निश्चित केलेली शैक्षणिक पात्रता, मंजुर आकृतीबंधातील अटी-शर्ती तसेच फायर ॲण्ड सेफ्टी सल्लागार यांनी दिलेल्या निर्देशानुसार शैक्षणिक पात्रता या सर्व बाबींचा एकत्रित प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.८४६ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"यापुर्वी शासनास मान्यतेसाठी सादर केलेल्या सुधारीत आकृतीबंधात नमुद केलेली शैक्षणिक पात्रता निश्चित झालेनंतर अग्निशमन केंद्र अधिकारी पद भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, परंतु तोपर्यंत काही अनुचित प्रकार घडु नये, याकरिता या पदास शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने अग्निशमन केंद्र अधिकारी भरणेसाठी तात्काळ जाहिरात प्रसिध्द करणेत यावी."

**ब)** सदर निर्णयानंतर, श्री.सर्जेराव अशोकराव कोते, शिर्डी यांनी दि.२७/१२/२०१६ रोजीचे अर्जान्वये अग्निशमन विभागाचा सुधारीत आकृतीबंध शासन मान्यतेसाठी पाठविणेत आलेला आहे. त्यास शासनाकडून मान्यता मिळालेली नाही. तरी आपण कोणत्याही प्रकारचे या पदासाठी ठेकेदारी अथवा मानधनावर पदे भरु नये. भरल्यास पुढे होणा-या परिणामास संबंधीत अधिकारी व कर्मचारी जबाबदार राहतील, असे कळविलेले आहे.

तसेच, श्री.प्रतापराव संपतराव कोते, कुपन विक्रेता, फायर ॲण्ड सेफ्टी विभाग यांनी दि.०३/०१/२०१७ रोजीचे अर्जान्वये मी सन २००६ पासून कायम कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. माझी फायर ॲण्ड सेफ्टी विभागासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता पुर्ण असल्याने मला सन २०१० पासुन फायर ॲण्ड सेफ्टी विभागामध्ये नियुक्त करणेत आलेले आहे.

त्यानुसार मी फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे आज अखेरपर्यंत संपुर्ण कामकाज पाहत आहे. मी केंद्र सरकारचा उप अग्निशमन अधिकारी हा कोर्स संस्थान शिफारशीने नागपुर यांचेमार्फत भुवनेश्वर, ओडीसा येथे दि.०४/०७/२०१६ ते दि.२३/१२/२०१६ असा ०६ महिने या कालावधीत स्वखर्चाने व मी माझी संस्थानमार्फत कायम कर्मचा-यांस देण्यात येत असलेली अर्जित रजा उपभोगून सदरचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे.

मी उप अग्निशमन अधिकारी कोर्स पूर्ण करुन दि.३०/१२/२०१६ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी फायर ॲण्ड सेफ्टी विभागामध्ये हजर झालेलो आहे. संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचा सुधारीत आकृतीबंध महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे सुधारीत आकृतीबंधास शासनाची मंजुरी मिळेपर्यंत कंत्राटी अथवा कायम अग्निशमन अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार मी स्विकारणेस तयार आहे. शासनाची मंजुरी मिळेपर्यंत मी संस्थानकडे कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त मोबदला मागणार नाही. तरी संस्थानचे आस्थापना विभागामार्फत कंत्राटी अग्निशमन अधिकारी भरणेकामी कार्यवाहीस स्थगिती देऊन मा.महोदय यांनी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार होणेस विनंती.

तसेच, माजी खासदार तथा विश्वस्त, श्री.भाऊसाहेब वाकचौरे साहेब यांनी दि.१६/०१/२०१७ रोजीचे पत्रान्वये श्री.प्रतापराव कोते हे सन २००६ पासून संस्थानमध्ये कायम कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. सन २०१० पासून त्यांची फायर ॲण्ड सेफ्टी विभागामध्ये प्रशासकीय बदली करणेत आली आहे. त्यांची फायर ॲण्ड सेफ्टी विभागा संबंधीत शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव पाहता, सुधारीत आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळेपर्यंत कंत्राटी अथवा कायम अग्निशमन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार त्यांना देण्यात यावा. त्याबद्दल ते कोणतेही अतिरिक्त मोबदला घेणार नाही, असे त्यांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे.

तरी या सर्व बाबींचे अवलोकन करुन श्री.प्रतापराव कोते यांना फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचा प्रमुख पदाचा तात्पुरता कार्यभार देण्यास सदर पत्रान्वये शिफारस आहे. तसेच करीत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल देऊन अवगत करावे, ही विनंती.

त्याचबरोबर विश्वस्त, मा.श्री.सचिन भागवत तांबे साहेब यांनी दूरध्वनीद्वारे अग्निशमन केंद्र अधिकारी हे पद भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देऊ नये असे निर्देश दिलेले आहेत.

श्री.प्रतापराव संपतराव कोते यांना दि.०४/०७/२०१६ ते दि.२३/१२/२०१६ असा ०६ महिने या कालावधी करिता उप अग्निशमन अधिकारी पदाचे कोर्स करणेसाठी परवानगी देण्यात आलेली आहे. सदरचा कोर्स पूर्ण करुन ते दि.३०/१२/२०१६ रोजी कार्यालयीन वेळेपुर्वी कामावर हजर झालेले आहेत. त्यांनी सदरचा

कोर्स हा स्वखर्चाने पूर्ण केलेला आहे. तसेच श्री.प्रतापराव कोते हे दि.०५/१२/२०१३ पासून फायर ॲण्ड सेफ्टी संबंधातील कामकाज पहात आहेत.

**क)** आता, विश्वस्त, श्री.प्रताप भोसले यांनी दि.२४/०४/२०१७ रोजी प्रशासकीय अधिकारी, आस्थापना विभाग यांना दूरध्वनीद्वारे अग्निशमन केंद्र अधिकारी पद भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देण्यात यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच आता, शासनाने दि.३० जानेवारी, २०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मध्ये करण्यात आलेल्या तरतूदी अत्यंत स्पष्ट असताना देखील संस्थान स्तरावर अधिनियमातील तरतूदींचे वारंवार उल्लंघन होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. संस्थानच्या आकृतीबंधामध्ये समन्वय अधिकारी हे पद मंजूर नसताना संस्थानने डॉ.संजय पत्तीवार यांची समन्वय अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती ही नियमबाह्य असल्याने अशा प्रकारे आकृतीबंधाबाहेर जाऊन संस्थानस्तरावरच अधिकारी वा कर्मचा-यांच्या नियुक्त्या करु नयेत. भविष्यात अशा प्रकारे अनियमितता निदर्शनास आल्यास त्यासंदर्भात शासन स्तरावर गंभीर दखल घेण्यात येईल आणि अशा स्वरुपाच्या अनियमिततेबाबत कार्यकारी अधिकारी तसेच संस्थानच्या संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल, यांची नोंद घेण्यात यावी.

संस्थान स्तरावर झालेल्या अनियमिततेमुळे संस्थानला काही आर्थिक भुर्दंड सोसावा लागल्यास त्याचे दायित्व देखील कार्यकारी अधिकारी आणि संस्थानच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निश्चित करण्यात येईल, असे सदर शासन पत्रात नमूद करणेत आलेले आहे.

२) तसेच शासनाने दि.२३ जानेवारी, २०१७ रोजीचे पत्रान्वये यापुर्वी फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचा आकृतीबंध नामंजुर केलेला असून संस्थानचे विविध संवर्गातील ८० टक्के पेक्षा जास्त पदे रिक्त असल्यास नविन पद निर्मितीचा विचार करण्यात येऊ नये. त्याचबरोबर नव्याने पदनिर्मिती प्रस्तावीत असलेल्या पदांऐवजी उपलब्ध कर्मचा-यांच्या कामाचे पुर्नवाटप करुन अतिरिक्त पदे कामी आणता येतील अथवा कसे याचा फेर आढावा घेणेबाबत तसेच संस्थानचा आस्थापना विषयक बाबींवर होणारा खर्च विचारात घेऊन थेट नवीन पद निर्मिती प्रस्तावीत न करता विविध प्रशासकीय विभागात कार्यरत अधिकारी आणि कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता आणि अनुभव विचारात घेऊन त्यांच्या कामाचे Re-engineering करण्यात यावे आणि उपलब्ध मनुष्यबाळाचा वापर आवश्यक पदांवर करता, येईल अथवा कसे याचा सर्वंकष आढावा घेण्यात यावा, असे कळविले आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीत विचारात घेता, अग्निशमन केंद्र अधिकारी पद कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत मा.व्यवस्थापन समिती दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेत झालेला निर्णय व सदर निर्णयाबाबत सर्वश्री.सर्जेराव कोते, प्रतापराव कोते यांनी दिलेले लेखी निवेदन तसेच मा.विश्वस्त, श्री.भाऊसाहेब वाकचौरे व श्री.सचिन तांबे यांनी केलेली शिफारस त्याचबरोबर दि.३० जानेवारी, २०१७ व २३ जानेवारी २०१७ रोजीचे पत्रान्वये शासनाने दिलेले निर्देश विचारात घेता अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाची भरती करणे उचित होणार नाही, असे मत आहे. तरी सदरचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, दि. २३.०१.२०१७ व दि.३०.०१.२०१७ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाने दिलेले निर्देश विचारात घेता, अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाची भरती करण्यात येऊ नये, तसेच हे पद भरणेसाठी यापुर्वी दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय रद्द करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.३२** **सेवानिवृत्त कर्मचारी श्री.एम.डी.धनेश्वर यांचे ताब्यातील संस्थान निवासस्थानाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री.एम.डी.धनेश्वर, कनिष्ठ कामगार अधिकारी हे दि.३१/०५/२०१५ रोजी संस्थान सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवेत असतांना त्यांना संस्थानमार्फत साईध्यान ०२/०४ हे निवासस्थान उपलब्ध करुन देणेत आलेले होते. सेवानिवृत्तीनंतर श्री.धनेश्वर यांचेकडून निवासस्थान रिक्त न झालेमुळे, त्यांना निवासस्थान रिक्त करणेसाठी दि.१३/०८/२०१५ रोजीचे पत्राने कळविणेत आलेले होते. पत्र मिळालेनंतर श्री.धनेश्वर यांनी दि.१९/०८/२०१५ रोजीचे अर्जाने, घराचे बांधकाम चालू असल्याचे कारणास्तव ०६ महिनेसाठी निवासस्थानामध्ये राहण्याची मुदतवाढ मागितलेली होती. श्री.धनेश्वर यांचे समवेत सेवानिवृत्त झालेले इतर कर्मचारी श्री.रामराव शेळके, श्री.भाऊसाहेब साबळे व श्री.सुभाष गर्कळ यांना घराचे बांधकाम चालू असल्याचे कारणास्तव शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रथम ०३ महिने नियमीत दराने व त्यापुढील कालावधीचे चालू बाजारभाव दराने भाडे वसुलीचे अटीवर निवासस्थानामध्ये राहणेची मुदतवाढ दिलेली होती. त्याच धर्तीवर

श्री.धनेश्वर यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/३७०६/२०१५ दि.३०/१२/२०१५ रोजीचे आदेशाने प्रथम ०३ महिने नियमीत दराने व त्यापुढील कालावधीचे चालू बाजारभाव दराने भाडे वसुलीचे अटीवर निवासस्थानामध्ये राहणेची मुदतवाढ दिलेली आहे.

**(ब)** तथापी, मुदतवाढीचा ०६ महिन्याचा कालावधी उलटून गेल्यानंतरही श्री.धनेश्वर यांनी संस्थान निवासस्थान रिक्त न केल्यामुळे त्यांचे ताबेतील निवासस्थान बळपूर्वक रिक्त करुन घेणेकामी काय कायदेशीर तरतूद आहे? याबाबत ॲड.जे.के.गोंदकर मु.पो.शिर्डी यांचा कायदेशीर अभिप्राय घेणेत आलेला असून त्यांनी,"संस्थानला बळजबरीने (Forcefully) श्री.धनेश्वर यांचेकडून निवासस्थानाचा ताबा घेता येणार नाही. त्यासाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन (due process of law) सदर निवासस्थानाचा ताबा घेता येईल. तथापी,त्यांचेकडून आपणास नुकसान भरपाईची सुध्दा मागणी करता येईल. मात्र बळाचा वापर करुन ताबा घेणे हे उचित नाही." असे कळविलेले होते. ॲड.गोंदकर यांचे अभिप्रायानुसार श्रीधनेश्वर यांचे ताबेतील निवासस्थान कायदेशीर मार्गाने रिक्त करुन घेणेकामी सदरचे प्रकरण विधी विभागाकडे वर्ग करणेबाबत दि. ०२/०४/२०१६ टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी निवासस्थान तात्काळ रिक्त करुन घेण्याचे निर्देश दिलेले होते. त्यानुसार दि.२२ मार्च, २०१६ रोजीचे पत्राने, श्री.धनेश्वर यांना निवासस्थान रिक्त करणेबाबत पुनःश्च कळविणेत आले. त्यानुसार श्री.धनेश्वर यांनी दि.२९ मार्च, २०१६ रोजीचे पत्राने,"मी मा.अध्यक्ष साहेब (तत्कालीन) यांना समक्ष भेटून व त्यांचे निर्देशानुसार शासन निर्णयासअनुसरुन संस्थानमध्ये पुर्ननेमणूकीसाठी अर्ज सादर केलेले आहे." तसेच माझ्या मुलीचा विवाह ठरलेला असून त्याकामी पुढील ०६ महिनेसाठी निवासस्थानामध्ये राहण्याची परवानगी मिळणेची विनंती केलेली होती. श्री. धनेश्वर यांचे दि. १९/०८/२०१५ व दि.२९/०३/२०१६ रोजीचे दोन्ही निवासस्थान मुदतवाढीचे अर्जाचे अवलोकन केले असता अर्जात दोन वेगवेगळी कारणे नमूद करुन केवळ वेळकाढूपणा करत असल्याचे स्पष्ट दिसून येत होते. सबब, श्री.धनेश्वर यांना प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष बोलावून निवासस्थान रिक्त करुन देणेबाबत कळविणेत आले. त्यांनतरही श्री.धनेश्वर यांनी निवासस्थान रिक्त करुन देणेसाठी असमर्थता दर्शविलेमुळे त्यांचे ताबेतील निवासस्थान रिक्त करुन घेणेकामी सादर करणेत आलेल्या दि.१७/१०/२०१६ रोजीचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी महोदयांनी श्री धनेश्वर यांचे ताबेतील निवासस्थान कायदेशीर कार्यवाही करुन रिक्त करुन घेणेचे तोंडी निर्देश दिलेले होते.

**(क)** दि.१७/१०/२०१६ रोजीच्या टिपणीवरील मा.कार्यकारी अधिकारी महोदयांचे निर्देशानुसार श्री.धनेश्वर यांचे विरुध्द कायदेशीर दावा दाखल करणेकामी विधी विभागाकडून अभिप्राय घेणेत आलेला असून, विधी विभागाने दि.२४/११/२०१६ रोजीचे पत्राने दावा दाखल करणेसाठी संस्थान पॅनलवरील ॲड.जगनाथ कारभारी गोंदकर, शिर्डी यांचे नाव सुचविले असून दावा दाखल करणेस व याकामी येणा-या एकूण खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल असे कळविले होते. त्यानुसार श्री.धनेश्वर यांचे विरुध्द ॲड.जगन्नाथ गोदंकर यांचे मार्फत कायदेशीर दावा दाखल करणेस व यासाठी येणा-या एकूण खर्चास मान्यता घेणेसाठीचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि. २२/१२/२०१६ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला असता, त्यावर निर्णय क्र.११९ अन्वये, सेवानिवृत्त कर्मचारी श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांचे निवासस्थान खाली करुन घेणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष बोलावून त्यांचेबरोबर चर्चा करावी व निवासस्थान खाली करणेबाबत श्री.धनेश्वर यांचेकडून लेखी स्वरूपात घेण्यात यावे, असे ठरले. संमत निर्णयानुसार, श्री.धनेश्वर यांनी दि.२१/०१/२०१७ रोजी तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी महोदयांशी याबाबत समक्ष चर्चा केलेली असून, एप्रिल २०१७ अखेर संस्थान निवासस्थानामध्ये राहणेची मुदतवाढ मागीतलेली होती. त्यानुसार तत्कालीन कार्यकारी अधिकारी महोदयांनी श्री.धनेश्वर यांना तसे लेखी लिहून देणेचे अटीवर परवानगी दिलेली होती. त्यानुसार दि.२४/०१/२०१७ रोजी पत्राने एप्रिल २०१७ अखेर संस्थान निवासस्थानामध्ये राहणेची मुदतवाढ देणेत यावी असे लेखी लिहून दिलेले आहे.

**(ड)** श्री.धनेश्वर यांनी मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी झालेल्या चर्चेनुसार दि.२४/०१/२०१७ रोजी लिहून दिलेल्या पत्रानुसार, त्यांची संस्थान निवासस्थानामध्ये राहणेची मुदत दि.३० एप्रिल, २०१७ रोजी संपलेली आहे. याबाबत श्री.धनेश्वर यांना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी दि.०३/०५/२०१७ रोजी संस्थान निवासस्थान केव्हा रिक्त करणार ? याबाबत समक्ष विचारले असता त्यांनी याबाबत उडवा-उडवीचे उत्तरे देऊन अद्यापपर्यंत संस्थान निवासस्थान रिक्त केलेले नाही. सबब, श्री धनेश्वर यांचेविरुध्द कायदेशीर दावा दाखल करता येईल, असे मत आहे.

तरी श्री.मच्छिंद्र दिगंबर धनेश्वर यांनी सेवानिवृत्तीनंतर संस्थान निवासस्थान साईध्यान ०२/०४ चा ताबा न सोडल्यामुळे त्यांच विरुध्द संस्थान पॅनलेवरील कायदेतज्ञ ॲड.जगन्नाथ गोदकर, मु.पो.शिर्डी यांचे मार्फत कायदेशीर दावा दाखल करणेस व याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सेवानिवृत्त कर्मचारी श्री.एम.डी.धनेश्वर यांना वेळोवेळी लेखी व तोंडी स्वरुपात कळविणेत येऊनही ते संस्थान निवासस्थान खाली करुन देत नाहीत. याकरीता त्यांना सेवानिवृत्तीनंतर देण्यात येणारी ग्रॅच्युईटीची रक्कम संस्थान जमा करुन घेण्यात येईल, असे कळविण्यात यावे. त्यानंतरही त्यांनी निवासस्थान खाली करणेस असमर्थता दर्शविल्यास प्रशासकीय अधिकारी, सामान्य प्रशासन यांचे उपस्थितीत पोलिस बंदोबस्त घेऊन निवासस्थान खाली करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३३** **श्री.साईप्रसाद साहेबराव वाघ, वर्ग-०४ कर्मचारी, श्री साईप्रसादालय विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.साईप्रसाद साहेबराव वाघ, हे दि.०१-०९-२०१६ ते आजअखेरपर्यंतचे या कालावधीत विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीले. त्यांनी तोंडी, लेखी कळविले नाही. त्यांचे अचानक गैरहजेरीमुळे साईभक्तांना सेवा पुरविणेस अडचण निर्माण झाली. व भक्तांना प्रसाद भोजनकामी प्रतिक्षा करावी लागली. पर्यायाने साईभक्तांची गैरसोय झाली.असे त्यांचे विरुद्ध प्र. अधिक्षक, श्री साई प्रसादालय यांचे निवेदन आलेले आहे. श्री.वाघ यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर स्वरूपाचे गैरवर्तनात मोडते.

तसेच उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.वाघ यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२४७०/२०१६, दि.२९-०९-२०१६, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/२५७६/२०१६ दि.०८-१०-२०१६, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४३१६/ २०१६, दि.१७-११-२०१६, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४८६३/२०१६, दि.१७-१२-२०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस रजि.ए.डी. पोष्टाने घरच्या पत्त्यावर पाठविण्यात आल्या होत्या परंतु श्री वाघ सदर पत्त्यावर राहत नसल्याने पत्राची पाकीटे परत आलेली आहे. तथापी, सदर कारणे दाखवा नोटीस दि.११-१-२०१७ रोजी श्री वाघ यांना समक्ष बजविण्यात आल्या तरीही त्यांनी लेखी खुलासा सादर केलेला नाही. यावरुन सदर गैरशिस्त वर्तन केल्याचे त्यांना मान्य आहे असे दिसुन येते.

तसेच श्री वाघ यांना गैरहजेरीबाबत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५३४५/२०१७, दि.१८-०१-२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीसरजि.ए.डी. पोष्टाने घरच्या पत्त्यावर पाठविण्यात आली होती. परंतु श्री वाघ सदर पत्त्यावर राहत नसल्याने पत्राची पाकीटही परत आलेली आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ मधीलविनियम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-**

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.
(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;
(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री. साईप्रसाद साहेबराव वाघ, वर्ग-४ कर्मचारी, श्री साईप्रसादालय विभाग यांनीउपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक)विनियम,२०१३ मधील विनियम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे.उपरोक्त कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री. वाघ यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते. तसेच सदर गैरशिस्तवर्तनाबाबत श्री वाघ यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४०५३/२०१७, दि.१५-०२-२०१७ अन्वये अभिकथनपत्र देण्यात आले होते.

श्री.वाघ यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, खाते चौकशी अधिकारी यांचेमार्फत पूर्ण करण्यात आली असून त्यांनी पूर्णतः नैसर्गिक न्यायतत्वानुसार खातेचौकशीचे काम पुर्ण करुन त्यांचा दि.१८-३-२०१७ (आवक दिनांक २४-०३-२०१७ ) रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे.

कसुरदार श्री.वाघ यांनी आरोप पत्राचे चौकशीकामी हजर राहून, चौकशीत भाग घेतलेला असुन खाते चौकशीचे कामकाज पुर्ण केलेले आहे.

**आदेश-**

१) श्री. साईप्रसाद साहेबराव वाघ, वर्ग-४ कर्मचारी, श्री साईप्रसादालय यांना दिनांक १५/२/२०१७ रोजी दिलेल्या अभिकथन पत्रातील आरोप नि:संशयी रित्या शाबीत झाल्याने श्री.वाघ दोषी आहेत.

२) श्री. सा.सा. वाघ यांनी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) चा भंग केला आहे म्हणून श्री. वाघ दोषी आहेत.

तसेच श्री. साईप्रसाद साहेबराव वाघ यांची संस्थान सेवेत दि.१७-६-२००८ पासूननियुक्ती करण्यात आलेली असून श्री वाघयांना गैरशिस्त वर्तनाबाबत यापुर्वी आजपर्यंत लेखी समज- १ वेळा, ताकीद-३ वेळा सक्त ताकीद-३वेळा, एक दिवस संस्थान सेवेतून निलंबीत -१ वेळा, दोन दिवस संस्थान सेवेतून निलंबीत-३ वेळा, तसेच ठपका -९ वेळा अशा एकुण-२० वेळा शिक्षा झालेली असून देखील त्यांचे सेवेत व वर्तनाबाबत सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

दरम्यान श्री वाघ यांनी त्यांचे दि. १४-०२-२०१७ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे त्यात त्यांनी “ वरिल विषयास अनुसरुन कारणे विनंती अर्ज की, १-९-२०१६ ते १३-२-२०१७ अखेर गैरहजर होतो. कारण मी आजारी असल्यामुळे कामावर येऊ शकलो नाही. आता मला बरे वाटते. मी कामावर येण्यास तयार आहे. माझ्यामुळे माझ्या साईभक्तांची गैरसोय झाली याबद्दल क्षमा मागतो. व यापुढे माझ्याकडून अशी चुक होणार नाही झाल्यास होणा-या नुकसाणीस मी स्व:त जबाबदार राहिल. तरीही मेहरबान साहेबांनी मला एक संधी द्यावी. आपणास नम्रतेची विनंती करतो. तरीही मेहरबान साहेबांनी मला माफ करुन माझ्या हातुन गैरवर्तन घडल्यास आपण द्याल त्या शिक्षेस मी पात्र राहिल ही विनंती. ” असे म्हटले आहे.

सदरचा अर्ज श्री वाघ यांनी प्र. अधिक्षक, प्रसादालय विभाग यांचे मार्फत सादर केला असून त्यावर प्र. अधिक्षक, प्रसादालय विभाग यांनी फक्त स्वाक्षरी केली आहे.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधीलप्रकरण ३ विनियम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया

(१) ठपका ठेवणे,
(२) पदोन्नती रोखणे,
(३) त्याने हयगय, किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.
(४) वेतनावाढी रोखुन धरणे,
(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,
(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,
(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-**श्री.साईप्रसाद साहेबराव वाघ, वर्ग-४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभाग याचे विरुद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले आहेत. तरी श्री.वाघ यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत शिक्षा देता यईल.

श्री.साईप्रसाद वाघ यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा म्हणून त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधीलप्रकरण ३ विनियम ५(८) नुसार, सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फकरावयाचे असल्यास संस्थानचे वतीने मा.कामगार व औद्योगिक न्यायालय,

अहमदनगर व मा. दिवाणी न्यायालय सिनीयर डिव्हीजन, कोपरगाव व ज्युनियर डिव्हीजन, राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

तरी श्री.साईप्रसाद साहेबराव वाघ, वर्ग-४ कर्मचारी, श्री साई प्रसादालय विभागयांनासेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधीलप्रकरण ३ विनियम ५(८) मधीलमोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे ही शिक्षा देणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.साईप्रसाद साहेबराव वाघ, वर्ग-४ कर्मचारी, श्री साईप्रसादालय विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी शिक्षा करुनही, त्यांचे वर्तनामध्ये फरक पडत नाही, यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांचे खातेचौकशीमध्येही ते दोषी आढळून आलेले आहेत. त्यामुळे श्री.साईप्रसाद साहेबराव वाघ, वर्ग-४ कर्मचारी, श्री साईप्रसादालय विभाग यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ (८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३४** **श्री.बबन छबु अडांगळे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. बबन छबु अडांगळे दि.०१-०९-२०१६ ते दि.२७-१०-२०१६ या कालावधीत सतत कामावर गैरहजर होते. तसेच दि. २८-१०-२०१६ ते २९-१०-२०१६ अखेर फक्त दोन दिवस कामावर हजर होऊन दि.३०-१०-२०१६ रोजी आठवडा सुट्टी घेऊन पुन्हा दि.३१-१०-२०१६ रोजी पासून आजअखेरपर्यंतचे कालावधीत पुर्व परवानगीशिवाय व रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली. श्री.अडांगळे यांना विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहण्याची सवय झालेली आहे. असे प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री.अडांगळे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर स्वरूपाचे गैरवर्तनात मोडते.

तसेच उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.अडांगळे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ३६२५/ २०१६ दि.०८-१०-२०१६,जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४०८७/२०१६ दि.०३-११-२०१६ व जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ ४३१५/२०१६ दि.१७-११-२०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून खुलासा मागविण्यात आलेला होता. तथापी सदर कारणे दाखवा नोटीसा दि.१४-१०-२०१६, दि. ०८/११/२०१६ व दि. २१/११/२०१६ रोजी प्राप्त होवुन देखिल, श्री.अडांगळे यांनी लेखी खुलासा सादर केला नाही. तसेच जा.नं.एसएसएस/वशी-७ए/ ४८६१/ २०१६ दि.१७-१२-२०१६ अन्वये रजि.ए.डी. पोष्टाने घरच्या पत्त्यावर पाठविण्यात आलेले कारणे दाखवा नोटीस असेलेले पाकीट परत आलेली आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे विनियम ३(१) अन्वये संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच:-**

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.बबन छबु अडांगळे, मदतनीस, कॅन्टीन विभागयांनीउपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे विनियम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे.उपरोक्त कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. सदर गैरशिस्त वर्तन श्री. अडांगळे यांनी केलेले असल्याचा आरोप त्यांचेवर ठेवणेत आले होते. तसेच सदर गैरशिस्तवर्तनाबाबत श्री अडांगळे यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५६५४/२०१७, दि.०१-०२-२०१७ अन्वये अभिकथनपत्र देण्यात आले होते.

श्री.अडांगळे यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, खाते चौकशी अधिकारी यांचेमार्फत पूर्ण करण्यात आली असून त्यांनी पूर्णतः नैसर्गिक न्यायतत्वानुसार खातेचौकशीचे काम पुर्ण करुन त्यांचा दि.१५-३-२०१७ (आवक दिनांक-२४-३-२०१७) रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे.

कसुरदार श्री.अडांगळे यांनी आरोप पत्राचे चौकशीकामी हजर राहून, चौकशीत भाग घेतलेला असुन खाते चौकशीचे कामकाज पुर्ण केलेले आहे.

**आदेश-** श्री. बबन छबु अडांगळे, मदतनीस, कॅन्टीन विभाग दोषी आहेत. श्री अडांगळे यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३(१) चा भंग केला आहे.

तसेच श्री. बबन छबु अडांगळे यांची संस्थान सेवेत दि.२१-१०-२००३ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून श्री.अडांगळे यांना गैरशिस्त वर्तनाबाबत यापुर्वी आजपर्यंत करण्यात आलेल्या शिक्षेंचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे सुचना- १ वेळा, ताकीद-८ वेळा सक्त ताकीद-६वेळा, दोन दिवस संस्थान सेवेतून निलंबीत-४ वेळा, चार दिवस संस्थान सेवेतून निलंबीत-४ वेळा, तसेच ठपका -३ वेळा अशा एकुण-२६ वेळा शिक्षा झालेली असून देखील त्यांचे सेवेत व वर्तनाबाबत सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ विनियम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-**श्री.बबन छबु अडांगळे, मदतनीस, कॅन्टीन विभाग याचे विरुद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले आहेत. तरी श्री.अडांगळे यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत शिक्षा देता यईल.

श्री.बबन अडांगळेयांचे गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा म्हणून त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ विनियम ५(८) नुसार, सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फकरावयाचे असल्यास संस्थानचे वतीने मा.कामगार व औद्योगिक न्यायालय, अहमदनगर व मा. दिवाणी न्यायालय सिनीयर डिव्हीजन, कोपरगाव व ज्युनियर डिव्हीजन, राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल

तरी श्री.बबन छबु अडांगळे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांनासेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५(८) मधीलमोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे ही शिक्षा देणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.बबन छबु अडांगळे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी शिक्षा करुनही, त्यांचे वर्तनामध्ये फरक पडत नाही, यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांचे खातेचौकशीमध्येही ते दोषी आढळून आलेले आहेत. त्यामुळे श्री.बबन छबु अडांगळे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ (८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३५** **श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कामगार, आरोग्य विभागहे दि.०१-१०-२०१६ ते ३१-१०-२०१६, दि.०१-११-२०१६ ते दि.१०-११-२०१६ व दि.२१-११-२०१६ ते आजअखेरपर्यंतचे विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहीले आहे. त्यामुळे कामाची गैरसोय झाली.श्री.बोर्डे यांना विनाकारण, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर राहण्याची सवयच झालेली आहे. असे प्र.अधिक्षक,आरोग्य विभाग यांची निवेदने प्राप्त झालेली आहे. श्री.बोर्डे यांचे सदरचे कृत्य हे बेकायदेशीर असून, गंभीर स्वरुपाचे गैरवर्तनात मोडते.

तसेच उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.बोर्डे यांना अनुक्रमे जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३१०३/२०१६, दि.२४-११-२०१६, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३४२१/२०१६ दि.२३-१२-२०१६,व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/५३४४/२०१७, दि.१८-०१-२०१७ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून खुलासा मागविण्यात आलेला होता. श्री.बोर्डे यांनी सदर कारणे दाखवा नोटीसला अनुसरुन दि२८-०१-२०१७ रोजी खुलासा सादर केला असुन त्यात त्यांनी "मी दि.०१-१०-१६ ते दि.३१-१०-१६ अखेर (३१) दिवस तसेच १-११-१६ ते दि.१०-११-१६ व दि.२१-११-१६ ते दि.३०-११-१६ असे एकुन (२०) दिवस दि.१-१२-१६ ते ३०-१२-१६ असे एकुन (३०) दिवस तसेच १-१-१७ ते २८-१-१७ असे एकुन (२८) दिवस गैरहजर होतो कारण घरच्या भांडणामुळे मी एवढया दिवस गैरहजर होतो तेव्हा कामावर घेण्यासाठी मा. कार्यकारी अधिकारी साहेबांना मी विनंती करतो. मला वेळेस माफ करुन कामावर घ्यावे हि नम्र विनंती." असे म्हटलेले आहे.श्री बोर्डे यांचा सदरचा खुलासा असमाधानकारक आहे.

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ कलम ३ प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानच्या कर्मचा-यांचे कर्तव्य:-**

(१) संस्थानचा प्रत्येक कर्मचारी नेहमीच :-

(i) संपुर्ण प्रामाणीकपणा कायम राखेल.

(ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल ;

(iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही.

श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांनी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक)विनियम,२०१३ चे कलम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे. त्यांचे हे कृत्य गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. म्हणूनसदर गैरशिस्तवर्तनाबाबत श्री बोर्डेयांना जा.नं.एसएसएस//वशी-७ए/४०५१/ २०१७, दि.१५-०२-२०१७ अन्वये अभिकथनपत्र देवून, त्यांचेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ विनियम ३ (१) अन्वये त्याप्रमाणे आरोप ठेवण्यात आले होते.

श्री.बोर्डे यांचेवर ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, खाते चौकशी अधिकारी यांचेमार्फत पूर्ण करण्यात आली असून त्यांनी पूर्णतः नैसर्गिक न्यायतत्वानुसार खातेचौकशीचे काम पुर्ण करुन त्यांचा दि.२२-३-२०१७ रोजीचा खातेचौकशी निष्कर्ष अहवाल सादर केला आहे.

कसुरदार श्री.बोर्डे यांनी आरोप पत्राचे चौकशीकामी हजर राहून, चौकशीत भाग घेतलेला असुन खाते चौकशीचे कामकाज पुर्ण केलेले आहे.

**आदेश-** श्री. भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग दोषी आहेत. श्री बोर्डे यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे.

तसेच श्री. भिमराज पंढरीनाथ बोर्डे यांची संस्थान सेवेत दि.०५-१२-२००६ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून श्री बोर्डे यांना गैरशिस्त वर्तनाबाबत लेखी समज- १ वेळा, ताकीद-१२ वेळा सक्त ताकीद-२१वेळा, एक दिवस संस्थान सेवेतून निलंबीत -०१ वेळा,दोन दिवस संस्थान सेवेतून निलंबीत-४ वेळा, चार दिवस संस्थान सेवेतून निलंबीत-४ वेळा, तसेच ठपका -१७ वेळा अशा एकुण-६० वेळा शिक्षा झालेली असून देखील त्यांचे सेवेत व वर्तनाबाबत सुधारणा होत नसल्याचे दिसून येते.

दरम्यान श्री बोर्डे यांनी त्यांचे दि. ३१-०१-२०१७ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे त्यात त्यांनी "मी घरच्या भांडणामुळे मी कामावर येवू शकलो नाही. तेव्हा मी मा.कार्यकारी अधिकारी साहेबांना विनंती करातो की माझ्या वरील परिस्थीचा विचार करुन मला कामावर घेण्यात यावे इथुन पुढे मी नियमी कामावर येईल. याची दक्षता घेईल एवढया वेळेस मला माफ करावे हि नम्र विनंती. " असे म्हटले आहे.

सदरचा अर्ज श्री बोर्डे यांनी प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग यांचे मार्फत सादर केला असून त्यावर प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग यांनी "संबधीत कर्मचारी श्री भिमराज पंढरीनाथ बोर्डे यांचा माफीचा अर्ज माहितीसाठी सादर." असा अभिप्राय दिलेला आहे.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त व अपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ विनियम ५ अन्वये **किरकोळ दंडात्मक कारवाया**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

**मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-**श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग याचे विरुद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपपत्रातील आरोप शाबीत झालेले असल्याने, व ते खातेचौकशीत दोषी आढळुन आलेले आहेत. तरी श्री.बोर्डे यांना आरोप पत्रात नमुद केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत शिक्षा देता यईल.

श्री.भिमराज बोर्डे यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत शिक्षा म्हणून त्यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधीलप्रकरण ३ विनियम ५(८) नुसार, सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फकरावयाचे असल्यास संस्थानचे वतीने मा.कामगार व औद्योगिक न्यायालय, अहमदनगर व मा. दिवाणी न्यायालय सिनीयर डिव्हीजन, कोपरगाव व ज्युनियर डिव्हीजन, राहाता येथे कॅव्हेट अर्ज दाखल करावे लागेल.

तरी श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे,सफाई कर्मचारी, आरोग्य विभागयांनासेवा (शिस्त आणि अपिल) विनियम,२०१३ मधीलप्रकरण ३ विनियम ५(८) मधीलमोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थानसेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे ही शिक्षा देणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग यांना गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी शिक्षा करुनही, त्यांचे वर्तनामध्ये फरक पडत नाही, यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांचे खातेचौकशीमध्येही ते दोषी आढळून आलेले आहेत. त्यामुळे श्री.भिमराज पंढरीनाथ बोर्डे, सफाई कर्मचारी, आरोग्य विभाग यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ (८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३६** **खातेचौकशी अधिकारी नेमणुकीकामी श्री.ए.एम. देशमुख यांचे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे कामगार विभागामार्फत गैरशिस्त वर्तन प्रकरणांची खातेचौकशी करणेकामी, सन, १९९२, पासून खातेचौकशी अधिकारी म्हणून, ॲड. बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, हे काम पाहत आहेत. त्यांचेमार्फत सध्या दहा गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी सुरु आहेत, ॲड.काळवाघे, यांना सध्या प्रतिमाह ५०००/- इतके मानधन देण्यात येते, ॲड. बी.वाय.काळवाघे, यांचे मानधन वाढीबाबतच, मा.व्यवस्थापन समितीचे, दि.३०.११.२०१६, रोजीचे सभेमध्ये विषय नं. २४ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता निर्णय क्र.७७८ नुसार या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, खाते चौकशी अधिकारी, ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव, यांचे वयोमान जास्त झालेले असल्यामुळे त्यांचेकडून खातेचौकशीचे कामकाज अपेक्षीत गतीने पुर्ण होत नाही, याकरीता नवीन खाते चौकशी अधिका-याची नेमणूक करणेसाठी विहीत पद्धतीने जाहिरात प्रसिद्ध करणेत यावी. तसेच संस्थान पॅनेलवर असणा-या वकीलांनाही विचारणा करण्यात यावी व त्यानंतर आलेल्या अर्जानुसार खातेचौकशी अधिकारीनेमणूकीबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले,आहे.

तरी श्री साईबाबा संस्थानचे विवीध विभागात गैरशिस्त वर्तन करणारे कर्मचा-यांचे खातेचौकशी करणेकरीता नविन खातेचौकशी अधिकारी नेमणेकरीता अर्ज सादर करणेसाठी, दि.२५.२.२०१७, रोजीचे दैनिक सार्वमत या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच जा. नं. एसएसएस/वशी-७ए/ ६११३/ २०१७, दि.३.३.२०१७, अन्वये, संस्थान पॅनेलवर असणा-या वकीलांनाही अर्ज करणेस कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार विहीत मुदतीमध्ये (दि.१०/३/२०१७ पर्यंत) १८ अर्ज व मुदतीनंतर १अर्ज असे एकुण १९ अर्ज प्राप्त झालेले आहेत. या आलेल्या अर्जांबाबत मान्यतेस्तव टिपणी सादर करण्यात आलेली आहे.

श्री.ए.एम. देशमुख यांनी इमेल व्दारे अर्ज केला असून त्यात त्यांनीसन २००७ पासून ते महाराष्ट्र शासनाचे सामान्य प्रशासन शाखेच्या पॅनलवर असून शासनाचे कर्मचा-यांचे खातेचाकशी अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. श्री देशमुख हे समान पद्धतीने संस्थानमध्ये खातेचौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास तयार आहेत. त्याकरीता शासन दराप्रमाणे मानधन व इतर चार्जेस अदा करावे. खातेचौकशीचे कामकाज शिर्डी येथे चालेल. असे नमूद केले आहे.

**खातेचौकशी अधिकारी यांना द्यावयाचे मानधनाबाबत माहिती:-**

खातेचौकशी अधिकारी यांचे मानधनाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण– १०१४/प्र.अ..५५/११-अ, मंत्रालय, मुंबई, दि.१६-०२-२०१५ नुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

**शासन निर्णय**

१. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिका-यांच्या प्रचलीत मानधनात बदल/वाढ करुन एक अपचारी असलेलल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु.८०००/- इतक्या मानधना ऐवजी रु.१२,०००/- इतके मानधन देण्यात यावे. सुधारीत मानधन या आदेशाच्या दिनांका पर्यंत त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी व त्या पुढील प्रकरणाबाबत अनुज्ञेय राहील.

२. एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु. १५,००/- इतके वाढीव मानधन मूळ मानधनाच्या रकमेत (रु.१२,०००) वाढवून देण्यात यावे. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी राहिल.

३. वरील मानधना व्यतिरिक्त चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिका-याने स्वत: नियुक्त केलेल्या लिपिक/टंकलेखक यांच्यासेवेपोटी रु.२०००/- एवढी अतिरिक्त ठोक रक्कम मंजूर करावी.

या शासन निर्णयाप्रमाणे संस्थानमध्ये नेमणूक करण्यात येणारे खाते चौकशी अधिका-यास प्रति खाते चौकशी एक आरोपीकरीता रु.१२,०००/- एकापेक्षा जास्त आरोपी असल्यास प्रती आरोपी रु.१५,००/- इतकी वाढ तसेच तसेच प्रत्येक खाते चौकशी करीता टंकलेखन कामाकरीता नियुक्त केलेल्या लिपीक-टंकलेखक यांच्या सवेपोटी अतिरीक्त रु.२०००/- प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी श्री. ए.एम. देशमुख यांची गैरशिस्त वर्तन करणारे संस्थान कर्मचा-यांचे खातेचौकशी कामी खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणेस तसेच त्यांना प्रति खाते चौकशीकरीता शासन निर्णयाप्रमाणे मानधन व इतर चार्जेस देणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.३९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार श्री.ए.एम. देशमुख यांची गैरशिस्त वर्तन करणाऱ्या संस्थान कर्मचाऱ्यांचे खातेचौकशीकामी खातेचौकशी अधिकारी म्हणून नेमणुक करणेस व याकामी त्यांना शासन निर्णयाप्रमाणे मानधन तसेच इतर चार्जेस देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच शासनाच्या पॅनेलवरील आणखी खातेचौकशी अधिकारी संस्थानला सेवा देण्यास तयार असतील, तर त्यांनाही विचारणा करणेत येऊन, तसा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.३७** **प्लास्टीक ट्रे खरेदीकामी आलेल्या ई-निविदा तसेच प्लास्टीक ट्रे खरेदी पुर्नविचार घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लाडूप्रसाद निर्मिती विभागाने सन २०१५-१६ वर्षासाठी प्लॅस्टिक ट्रे दोन कोटी नग खरेदी करून मिळणेची मागणी केलेली होती.

याकामी ३ वेळेस ई-निविदा प्रक्रिया राबवण्यात आल्या होत्या. तथापि त्याला प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे याकामी चौथ्यांदा दि. २१.०२.२०१७ ते १४.०३.२०१७ या कालावधीत ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. याकामी ८ ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

सदर ८ ई-निविदा तांत्रिक बीड उघडणेकामी दि.०३.०४.२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेमध्ये सादर केले असता, सदर प्लॅस्टिक ट्रे ची Estimated Cost रु.३ कोटी असल्यामुळे व एवढया मोठया प्रमाणावर खर्चाची आवश्यकता आहे काय? याबाबत पुन्हा विचार करण्यासाठी हा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्याचे ठरले आहे.

मे. अन्सीलरी इंडस्ट्रीज, मुंबई यांनी लाडू पॅकिंग मशीन देणगी दिले आहे त्याची किंमत रू.५ लाख आहे. सदर मशिनवर प्लॅस्टिक ट्रे मध्ये ३ लाडू Manually ठेवून सदर ट्रे कनवेयर बेल्टवरून पुढे सरकून, या ट्रे ला पेपर रोलने पॅकिंग अॅटोमॅटीक होण्याची व्यवस्था या मशीनमध्ये आहे व या ट्रे मध्ये लाडू व्यवस्थित पॅक होऊन अशा पध्दतीने पॅकींग झालेले लाडू पॅकेट साईभक्तांना प्रसाद म्हणून विक्री करण्याची संकल्पना आहे. तसेच या मशिनमध्ये नायट्रोजन गॅस Filling ची व्यवस्था आहे परंतु पेपर रोलचे पॅकींगमध्ये ही व्यवस्था वापरता येणार नाही. असे मेकॅनिकल विभागाकडून माहिती घेता समजले.

सध्या याकामी पेपर पिशवी ६" X ७" साईजची वापरली जाते. यामध्ये ३ लाडू Manual पध्दतीने भरले जाऊन पिशवी पॅक केली जाते. सध्या सदर एका पेपर पिशवीची किंमत ०.४३ पैसे पडत आहे. तथापि पुढीलवर्षी संस्थानला ही पिशवी अंदाजे रू.०.५० पैसेपर्यंत उपलब्ध होईल असे गृहीत धरले तरी दोन कोटी नग पेपर पिशवी खरेदीसाठी अंदाजे रु.१ कोटीपर्यंत खर्च येईल. तर दोन कोटी पेपर ट्रेसाठी अंदाजे २.५० ते ३ कोटीपर्यंत खर्च येईल.

थोडक्यात सदर लाडू पॅकिंग मशिनचा प्लॅस्टीक ट्रे वापरुन वापर केल्यास पेपर पिशवी खरेदीचे खर्चापेक्षा अंदाजे रु.१.५० ते २ कोटींपर्यंत जास्त खर्च येईल.

तरी वरील नमूद वस्तुस्थिती विचारात घेता-

अ. लाडू पॅकिंगसाठी सध्याच्या पध्दतीप्रमाणे पेपर पिशवीचा वापर करावा? अगर

आ. प्लॅस्टिक ट्रे चा वापर करावा?

इ. प्लॅस्टिक ट्रेसाठी चालू असलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करावी? अगर

ई. ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करून प्लॅस्टिक ट्रे खरेदी करावेत.

तरी वरील 'अ' किंवा 'आ' व 'इ' किंवा 'ई' बाबत उचित निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, लाडू प्रसाद पॅकींग मशिनपेक्षा त्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्लॅस्टीक ट्रे खरेदीचा खर्च खुपच जास्त असल्यामुळे प्लॅस्टीक ट्रे खरेदी करणेकामी यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत यावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३८** **विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीकामी तिसऱ्यांदा व चौथ्यांदा राबविणेत आलेल्या ई-निविदेतील खालील "ख" मधील आयटेम्ससाठी निम्नतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** खरेदी विभागाकडून दि.२८.११.२०१६ ते दि.१९.१२.२०१६ या कालावधीत विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागांचे साहित्य २१३ Items खरेदीकामी चौथ्यांदा ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. याकामी प्राप्त

झालेल्या तीन ई-निविदा मा.स्थानिक उपसमितीचे दि.१७.०२.२०१७ रोजीचे सभेत उघडण्यात येऊन मा.उपसमितीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला होता. तोच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेत कायम करण्यात येऊन खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.१३६/२० "यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन या विभागांचे वार्षिक साहित्य खरेदी करणेकामी परिशिष्ठ "अ"म्हणून सादर करण्यात आलेल्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करण्यात येऊन, त्यामधील निम्नतम दर स्विकारणेत येऊन संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या साहित्यांसाठी समान निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, असे साहित्य खरेदीकामी समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा व जे साहित्य खरेदी करणेकामी ०३ पेक्षा कमी निविदाधारकांनी दर दिलेले आहेत, अशा साहित्यांसाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

वरील निर्णयाप्रमाणे सोबत सादर केलेले तुलनात्मक तक्त्यातील खालील नमुद **"क"** प्रमाणे १२९ Items साठी ३ निविदा दर प्राप्त झालेले आहेत. त्यांना पुरवठा आदेश देता येतील.

क) सदर तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.१,२,३,४,७,८, ९,१०,११,१२,१३, १५,१६,१८,१९, २०,२१,२२, २३, २४,२७,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३८,३९,४०,४१,४२,४३,४६,४७,४८,४९, ५०,५१,५२, ५३, ५४, ५५, ५७,५८,५९,६२,६४,६५,६८,६९,७१,७४,७६,७७,७८,७९,८०,८१,८२,८३,८४,८५, ८६,८७,८९, ९२, ९३,९४,९५,९७,९८,९९,१००,१०१,१०२,१०३,१०४,१०५,१०६,१०७,१०८, १०९,११०,१११,११२, ११३, ११४,११९,१२०,१२१,१२३,१२५,१२६,१२७,१२८,१२९,१३३,१३५, १३८,१३९,१४०,१४१, १४३, १४६,१४७,१४९,१५०,१५१,१५२,१५३,१५४,१५५,१५६,१६३,१६५,१६६,१६७,१६९,१७०,१७२,१७३, १७५,१८०,१८१,१८४,२०१ एकूण १२९ Items

**<u>उर्वरीत खालील "ख" मध्ये नमूद केल्याप्रमाणे Items साठी ३ पेक्षा कमी निविदाधारकांनी निविदा दर दिलेले आहेत.</u>**

ख) सदर तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ५,६,१४,१७,२५,२६,२८,३७,४४,४५,५६,६०,६१,६३,६६, ६७, ७०, ७२, ७३,७५,८८,९०,९१,९६,११५,११६,११७,११८,१२२,१२४,१३०,१३१,१३२, १३४,१३६,१३७, १४२, १४४, १४५,१४८,१५७,१५८,१५९,१६०,१६१,१६२,१६४,१६८,१७१,१७४,१७६, १७७,१७८, १७९, १८२,१८३,१८५,१८६,१८७,१८८,१८९,१९०,१९१,१९२,१९३,१९४,१९५,१९६,१९७,१९८,१९९,२००, २०२, २०३,२०४,२०५,२०६,२०८,२०९,२१०,२११,२१२,२१३ एकूण ८३ Items

ग) तुलनात्मक तक्त्यातील दर प्राप्त न झालेला Item क्रं.२०७

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार **"ख"** मध्ये नमुद केलेल्या साहित्यासाठी पुन्हा निविदा करण्याचे ठरले आहे. तथापि सदर विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागांचे साहित्य खरेदीची सविस्तर वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

प्रथम विदयुत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाकडील ४८५ आयटेम्ससाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यामध्ये १ निविदा अपात्र ठरलेमुळे दुस-यांदा पुन्हा ४८५ आयटेम्ससाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या.

यामध्ये ३२३ आयटेम्ससाठी पुरवठा आदेश देण्यात आले होते व उर्वरित १६२ आयटेम्ससाठी तिस-यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये १४७ आयटेम्ससाठी पुरवठा आदेश देण्यात आले होते व १५ आयटेम्ससाठी दर प्राप्त न झालेमुळे हे १५ आयटेम्स व वरील ३२३ मधील आयटेम्सपैकी (निर्णय प्रक्रियेत वेळ गेल्यामुळे-सोबत शॉर्ट माहिती टिपणी सादर केली आहे) पुरवठाधारकांनी पुरवठा न केलेले १९८ आयटेम्स असे मिळून २१३ आयटेम्ससाठी चौथ्यांदा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

थोडक्यात वरील **"क"**, **"ख" व "ग"** मध्ये नमुद २१३ पैकी १९८ आयटेम्ससाठी तिस-यांदा व १५ आयटेम्ससाठी चौथ्यांदा ही ई-निविदा प्रक्रिया शासनाचे दि.३०.१०.२०१५ चे खरेदी नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन राबविण्यात आलेली होती.

शासनाचे दि.०१.१२.२०१६ चे सुधारित खरेदी नियमावलीतील ४:४:३:१ निविदा कालावधीस मुदतवाढ यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**<u>४:४:३:१ निविदा कालावधीस मुदतवाढ-</u>**

निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, संबंधीत खरेदी अधिका-याने प्रथम किमान एक आठवडयाची मुदतवाढ

द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखिल तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ द्यावी. त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देऊ नये.

कामाची पूर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (दोन वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ३ निविदा पेक्षा कमी प्रतिसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेऊ शकेल व त्यासाठी सुसाध्य कारणे नमुद करेल. अशा प्रसंगी, किमतीच्या वाजवीपणाची खात्री करण्यासाठी खरेदी समितीला अतिरिक्त काळजी घ्यावी लागेल.

वरील नमुद वस्तूस्थिती व शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील वरील तरतुदीस अनुसरुन वरील **"ख"** मध्ये नमुद केलेले ८३ Items साठी पुरवठा आदेश देणेबाबत फेर निर्णयार्थ/निर्णयात दुरुस्तीसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्युत, मेकॅनिकल व टेलिफोन विभागाचे वार्षिक साहित्य खरेदीकामी तिसऱ्यांदा व चौथ्यांदा राबविणेत आलेल्या ई-निविदेतील "ख" मधील साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेली वस्तुस्थिती तसेच शासनाचे सुधारीत खरेदी नियमावलीतील तरतुदीस अनुसरुन सदरहू "ख" मध्ये नमुद केलेल्या ८३ साहित्यांसाठी निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा.**

**तसेच भविष्यात अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावित सुधारीत खरेदी नियमावलीप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३९** **श्री साईप्रसादालय इमारतीचे छतास असलेल्या पॉलीकार्बोनेट डोमचे नुतणीकरण करणेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनांसाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** साई प्रसादालय इमारतीमध्ये साईभक्तांकरीता प्रसाद भोजन दि.०८/०१/२००९ पासून उपलब्ध करुन देणेत येत आहे. श्री साई प्रसादालय येथे दररोज सरासरी ४०,००० प्रसाद भोजनाचा लाभ घेत असतात. सदरहू हॉलची उत्तर दक्षिण लांबी ३६७ फुट इतकी असून, पुर्व पश्चिम रुंदी १२१ फुट आहे. म्हणजेच ४४,४०४ चौ. फुट एवढा मोठा हॉल आहे. त्याकरीता भोजन हॉलमध्ये भरपूर प्रमाणात सुर्यप्रकाश व हवा खेळती राहावी याकरीता व्हेंटीलेटरसह पॉलीकोर्बोनेट शिट व कौलासह डोम आहेत. एकूण २३ डोमपैकी ०४ डोमची दुरुस्ती यापुर्वी करण्यात आलेली आहे. उर्वरीत १९ पॉलीकोर्बोनेट शिट खराब झालेले असल्यामुळे पावसाळयात त्यामधून पाण्याची गळती होते. तसेच हवेसाठी मोकळ्या ठेवलेले व्हेटींलेटरमधून पावसाचे पाणी येते. कौलारु छताची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते. पॉलीकोर्बोनेट शिट बदलणे आवश्यक असल्याने तसेच त्यामुळे पॉलीकोर्बोनेट शिटमध्ये फ्रेमसह छज्जा तयार करुन आत पावसाचे पाणी येणार नाही अशी व्यवस्था करता यईल. याकामी खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ. नं. | तपशिल | डोमची संख्या | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ.** | **मुख्य व व्ही.आय.पी. डायनिंग हॉलवरील १० डोम** | | | | | |
| १ | स्ट्रक्चरल स्टिल वर्क | १० | ०.४५ | मे.टन | ५४,०६१.०० | २,४३,२७४.५० |
| २ | १० एम एम जाडीचे पॉलीकोर्बोनेट शिट बसविणे | १० | १०८.०० | चौ.मी. | २,६००.०० | २८,०८,०००.०० |
| ३ | कलर कोटेड शिट -०.५० एमएम टी.सी.टी | १० | २१.२४ | र.मी. | ४३५.०० | ९२,३९४.०० |
| | **एकूण रुपये** | | | | | **३१,४३,६६९.००** |
| **ब.** | **प्रसादालय वेटींग रांग व सर्व्हीस पॅसेसमधील डोम** | | | | | |
| १ | १० एम एम जाडीचे पॉलीकोर्बोनेट शिट बसविणे प्रतिक्षा रांग-०७ डोम, सर्व्हीस पॅसेज -०२ डोम | | ५५२.०० | चौ.मी. | २६००.०० | १४,३५,२००.०० |
| | | | | | **एकूण रुपये** | **१४,३५,२००.००** |
| | | | | | **एकूण अ + ब रक्कम रुपये** | **४५,७८,८६९.००** |

दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार प्रत्येक विभागाने टेंडरमध्ये नमूद करण्यात येणारी इस्टीमेट कॉस्ट ही मार्केट कॉस्टपेक्षा २० ते ३० टक्के कमी नमूद करावी असे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार वर नमूद एकूण रकमेतून २०% कपात करुन अंदाजपत्रकीय रक्कम रु.३६,६३,०९५/- मात्र इतकी येते.

**प्रस्ताव:** तरी श्री साई प्रसादालय इमारतीचे छतास असलेले पॉलीकार्बोनेट छताचे नूतनीकरण करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३६,६३,०९५/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारतीचे छतास असलेल्या डोमचे नुतणीकरण करणेसाठी बाजारामध्ये नवीन आकर्षक वॉटरप्रुफ डोम आलेले आहेत, त्याचा अभ्यास करुन, ते बसविणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत यावा.**

**तसेच श्री साईप्रसादालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खुपच अतिक्रमण झालेले आहे, ते काढणेसाठी शिर्डी नगरपंचायतीस कळविणेत यावे, त्याचबरोबर प्रसादालयासाठी पर्यायी रस्ता तयार करता येईल का, याची माहिती घेऊन, सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४०** **मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना-** दि.०८/०१/२००९ पासून श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन देणेस सुरुवात करण्यात आली. श्री साई प्रसादालय येथे सरासरी दैनंदिन सुमारे ४०,००० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. श्री साई प्रसादालय हॉलमध्ये सध्या व्हेट्रीफाईड टाईल्सचे फ्लोअरींग आहे. प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन पदार्थ वाढणेची ट्रॉली, खरकटे ताटे वाहणेची ट्रॉली व पिण्याचे पाणी वाटप करणेची ट्रॉली तसेच प्रसाद भोजनाचा आस्वाद घेणा-या साईभक्तांची व प्रसादालयातील कर्मचा-यांची वर्दळ व डायनिंग टेबलाचे हॅन्डलींग होत असल्याने प्रसादालयात बसविण्यात आलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स फ्लोअरींगची दिवसेंदिवस जास्त प्रमाणात फुटतूट होते. त्यासाठी इकडील विभागामार्फत प्रसादालय हॉल मधील व्हेट्रीफाईड फ्लोअरींगची वेळोवेळी दुरुस्ती करण्यात येते. प्रसादालय हॉल मधील व्हेट्रीफाईड टाईल्स पूर्णतः बदलून येथील फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेबाबत अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग यांनी कळविले आहे. तसेच प्रसाद भोजन हॉलमधील भिंतींना ६ फुट उंचीचा व्हीट्रीफाईड टाईल्समध्ये डॅडो लावणेत आलेला आहे. सदर टाईल्स चांगल्या स्थीतीत असल्याने बदलण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे फक्त हॉलमधील कॉलमचे भोवतीची डॅडो टाईल्स बदलावी लागेल.

श्री साई प्रसादालयाचे मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये सध्या ट्रिमिक्स कॉन्क्रीट फ्लोअरींग केलेली आहे. सदर ठिकाणी स्वयंपाक तयार करणेसाठी मोठया स्वरुपाचे भांडे वापरण्यात येतात व किचनमध्ये कायमचा ओलावा असतो त्यामुळे किचन मधील काही भागातील ट्रिमीक्स कॉन्क्रीटला खड्डे पडलेले आहेत. प्रसादालयात प्रसाद भोजन बनविणेचे काम दररोज सुरुच असल्याने सदरच्या ठिकाणी दुरुस्ती केल्यानंतरही ती फार काळ टिकत नाही. याकरीता सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग करणे गरजेचे आहे. किचनमधील भिंतींना ८ फुट उंचीचे सिरॅमिक टाईल्स डॅडो लावणेत आलेली आहे. सदर टाईल्स चांगल्या स्थीतीत असलूयाने बदलण्याची आवश्यकता नाही. किचनमधील छोटया पार्टीशन वॉलच्या टाईल्स खराब झालेल्या असल्याने, सदर टाईल्स काढून त्या ठिकाणी नवीन टाईल्स बसविणे गरजेचे आहे.

श्री साई प्रसादालय मुख्य डायनिंग हॉल मधील सध्याची फ्लोअरींग काढून सदर ठिकाणाचा वापर लक्षात घेऊन हेवी डयुटी फ्लोअरींग बसविणेकामी आर्किटेक्ट शक्ती परमार अॅण्ड असो., मुंबई यांना फ्लोअरींगचा पर्याय सुचवून येणा-या खर्चाचे अंदाजपत्रक देणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार आर्किटेक्ट शक्ती परमार यांचे प्रतिनिधींनी शिर्डी येथे भेट देऊन श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसादभोजन हॉलची पाहणी केली. सदर हॉलमध्ये चांगली स्वच्छता रहावी यासाठी सदर ठिकाणी हेवी डयुटी ग्रेनाईट फ्लोअरींग बसवावी असे त्यांनी सूचविले. याशिवाय प्रसादालयातील हॉल मधील फ्लोअरींग करीता पॉलिश कॉन्क्रीट इंडस्ट्रीयल फ्लोअरींग व १६ ते २० mm जाड Endura flooring किंवा त्याप्रकारच्या इतर कंपनीच्या हेवी डयुटी फ्लोअरींग टाईल्स हे पर्याय उपलब्ध आहेत.

**अ)** श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉलमध्ये (क्षेत्रफळ फ्लोअरींग – ४१४४ चौ.मी., कॉलम डॅडो – ५०.४० चौ. मी.) फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेकामी खालील तिन पर्यायांचा विचार करता येईल.

| पर्याय क्र. | तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| पर्याय क्र. १ | **ग्रेनाईट फ्लोअरींग -**श्री साई प्रसादालयामध्ये आर्किटेक्ट शक्ती परमार अँण्ड असो., मुंबई यांनी सुचविल्याप्रमाणे प्रसादालयाचे मुख्य भोजन हॉलचे फ्लोअरींग व हॉलमधील कॉलमचे भोवती डॅडो करीता १८ ते २० एमएम जाड ग्रेनाईट स्टोन बसविणे व पाणी वाहून जाण्यासाठी स्टेनलेस स्टील नाल्या बसविणे. | **रू. १,३५,९६,९४७/-** |
| पर्याय क्र.२ | **इंडयुरा फ्लोअरींग/ सिम्पोलो फ्लोअरींग -** श्री साईप्रसादालयातील मुख्य भोजन हॉल मध्ये EnduraKreoकिंवा त्याप्रकारच्या इतर कंपनीच्या हेवी डयुटी १६ ते २० mm जाडीची व्हिट्रीफाईड फ्लोअरिंग टाईल्स बसविणे व हॉलमधील कॉलमचे भोवती डॅडो बसविणे तसेच पाणी वाहून जाण्यासाठी स्टेनलेस स्टील नाल्या बसविणे. | **रू. १,४०,०८,१७२/-** |
| पर्याय क्र. ३ | **पॉलीशड् कॉन्क्रीट इंडस्ट्रीयल फ्लोअरींग -**जड वाहनांची वर्दळ असणाऱ्या इंडस्ट्रीमध्ये अशा प्रकारची फ्लोअरींग केली जाते. सदरचे काम करणेसाठी सध्या मुख्य प्रसाद भोजन हॉलमध्ये बसविलेली व्हेट्रीफाईड फ्लोंअरींग व त्याचे खालील सिमेंट माल (Mortar) काढून PCC वर LDPE Sheet (250 micron) टाकले जाईल. त्यावर M 25 ग्रेडचे ३ इंच जाडीचे कॉन्क्रीट टाकले जाईल व त्यावर १२ kg/sqmहार्डनर टाकून सरफेस पॉलीश केली जाईल सदरचे फ्लोअरींग हे डस्ट प्रुफ व स्मुथ फीनीश असेल तथापी या प्रकारचे फीनीश उभ्या पृष्ठभागावर म्हणजेच कॉलम डॅडोला करता येणार नाही. | **रू. १,२१,१५,२३७/-** |

**ब)** तसेच श्री साईप्रसादालयामधील मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये फ्लोअरिंग करीता खालील दोन पर्यायांचा विचार करता येईल. (क्षेत्रफळ फ्लोअरींग –१३२३ चौ.मी., डॅडो –२३३ चौ. मी.)

| पर्याय क्र. | तपशिल | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| पर्याय क्र. १ | **ग्रेनाईट फ्लोअरींग -**मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये सध्याचे ट्रिमीक्स कॉन्क्रीट फ्लोअरींग चार ते पाच इंच पर्यंत तोडून त्यावर २० ते २५ एम एम जाड लेदर फीनीश ग्रेनाईट फ्लोअरींग बसविणे तसेच किचन मधील छोटया पार्टीशन वॉलच्या भिंतींना डॅडो करीता १८ ते २० एमएम जाड ग्रेनाईट बसविणे व किचनमधील पाणी वाहून जाण्यासाठी स्टील नाल्या बसविणे. | **रू. ८८,६५,८०३/-** |
| पर्याय क्र. २ | **पॉलीश्ड् कॉन्क्रीट इंडस्ट्रीयल फ्लोअरींग -**मुख्य किचन व बुंदी किचनमधील सध्याचे ट्रिमीक्स कॉन्क्रीट फ्लोअरींग २ ते ३ इंच पर्यंत तोडून त्यावर LDPE sheet (250 micron) टाकणे,M25 ग्रेडचे ३ इंच कॉन्क्रीट करणे. या कॉन्क्रीटवर 12 kg/5gm हार्डनर टाकून सरफेस पॉलीश करणे. सदरचे फ्लोअरींग हे डस्ट प्रुफ व स्मुथ फीनीश असेल या प्रकारचे फ्लोअरींग हे उभ्या पृष्ठ भागावर म्हणजेच कॉलम व भिंतीचे डॅडोला करता येणार नाही. त्यामुळे किचन मधील छोटया पार्टीशन वॉलच्या भिंतींना डॅडोला १८ ते २० एमएम जाड हेवी डयुटी व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणे व किचनमधील पाणी वाहून जाण्यासाठी स्टिल नाल्या बसविणे.सदरचे स्मुथ फीनीश फ्लोअरींग मुळे किचनमध्ये स्वच्छता राखणे सोपे होईल. परंतू पाणी सांडल्यास फ्लोअरींग स्लिपरी होऊ शकतो तसेच जड भांडे व ट्रॉलीच्या वर्दळीमुळे भविष्यात पुन्हा फ्लोअरींगवर खड्डे पडू शकतात. | **रू. ८३,७५,९१०/-** |

**प्रस्तावः-** उपरोक्त पर्यायांपैकी प्रसाद भोजन हॉलमध्ये Endura किंवा तत्सम फ्लोअरींग बसविणे योग्य होईल. याकामी रु.१,४०,०८,१७२/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तसेच मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये २० ते २५ एमएम जाड लेदर फीनिश ग्रेनाईट फ्लोअरींग बसविणे योग्य होईल. याकामी रक्कम रु. ८८,६५,८०३/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. याकामी एकूण रक्कम रु.२,२८,७३,९७५/- मात्र खर्च येईल. तरी सदरहू पर्यायांनुसार फ्लोरींग व डॅडोचे काम करणे योग्यहोईल असे इकडील विभागाचे मत आहे.

तरी श्री साईप्रसादालयाचे मुख्य भोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचनमध्ये फ्लोरींग व डॅडोचे काम करणेसाठी वरिलपैकी एक पर्याय निश्चित होणेस व त्यानुसार येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो बसविणेबाबत प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्र.१ नुसार कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **शिर्डी येथील सर्व्हे न.१७१/१२ मधील बस स्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्नीशमन यंत्रणा बसविणे व रेनवॉटर हार्वेस्टींग प्रकल्प राबविणे बाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियमाचे कलम–१७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

**महाराष्ट्र शासन मान्यताः-** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि. २००६/ ६०७/ (८७) का.सोळा, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ दि.१३/०१/२००९ अन्वये संस्थानतर्फे बस स्थानक बांधकामाकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्रचे खर्चास शासन मान्यता देणेत आली आहे.

**प्रस्तावनाः-** शिर्डी येथिल सर्व्हे नं.१७१ पैकी मधिल जागेत जुने बस स्थानक इमारतीचे जागेवर संस्थान निधीतून अद्ययावत बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणेकामी प्रकल्पाचे आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी बांधकाम नकाशे व निविदा प्रपत्रे सादर केली होती. त्यामध्ये आर्किटेक्ट यांनी अग्नीशमन संयंत्रणा बसविणे व रेनवॉटर हार्वेस्टींग या बाबीचा समावेश केलेला नव्हता. शिर्डी बस स्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम काही किरकोळ कामे वगळता पूर्ण झालेले आहे. सदर इमारतीचा वापर सुरु करणेकामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचा वापर परवाना मिळणेकामी अग्नीशमन संयंत्रणा व रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार या प्रकल्पाचे आर्किटेक्ट काबरे चौधरी आर्किटेक्टस् यांचेकडून अंदाजपत्रक प्राप्त झाले असून, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ) शिर्डी बसस्थानक येथे अग्नीशमन यंत्रणा बसविणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.**

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण/ एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | फायर यंत्रणेकरीता ३० एच पी मुख्य पंप बसविणे. | ०२ नग | १,१९,८५१/- | २,३९,७०२/- |
| ०२ | १५ एच पीचा जॉकी पंप बसविणे | ०१ नग | ४४,७२७/- | ४४,७२७/- |
| ०३ | ७.५ एच पी. बुस्टर पंप | ०१ नग | ३३,२१६/- | ३३,२१६/- |
| ०४ | सी क्लास ७५ एम एम व्यासाची जीआय पाईपलाईन. | १२ र. मी. | ८१०/- | ९,७२०/- |
| ०५ | सी क्लास १०० एम एम व्यासाची जीआय पाईपलाईन. | २७० र.मी. | १,११,६००/- | ३,०१,३२०/- |
| ०६ | कास्ट आयर्न (८० व्यासाचा) फुट व्हॉल्व्ह | ०१ नग | ४,४०३/- | ४,४०३/- |
| ०७ | १०० एम एम व्यासाचा कास्ट आयर्न मटेरियलमधील फुट व्हॉल्व्ह. | ०२ नग | ५,९७८/- | ११,९५६/- |
| ०८ | १०० एम एम व्यासाचे लाईनला Strainer | ०१ नग | ६,१७३/- | ६,१७३/- |
| ०९ | कास्ट आयर्न मटेरियलमध्ये १०० एम एम व्यासाचा डबल फ्लेंज स्लुईस व्हॉल्व्ह. | ०७ नग | ६,१७३/- | ४३,२११/- |
| १० | कास्ट आयर्न मटेरियलमध्ये ८० एम एम व्यासाचा डबल फ्लेंज स्लुईस व्हॉल्व्ह. | ०१ नग | ४,७५६/- | ४,७५६/- |
| ११ | ८० एम एम व्यासाचा डबल फ्लॅन्ज नॉन रिटर्न व्हॉल्व्ह. | ०१ नग | ६,१०८/- | ६,१०८/- |
| १२ | १०० एम एम व्यासाचा डबल फ्लॅन्ज नॉन रिटर्न व्हॉल्व्ह. | ०३ नग | ७,५४३/- | २२,६२९/- |
| १३ | २० एम एम व्यासाचे गन मेटल गेट व्हॉल्व्ह. | ०८ नग | ८५४/- | ६,८३२/- |
| १४ | सिंगल आऊटलेचा गन मेटल हायड्रंट व्हॉल्व्ह. | ०८ नग | ५,१६९/- | १४,३५२/- |
| १५ | ३० मी लांबीचा होज रिल ड्रम. | ०८ नग | ६,९२८/- | ५५,४२४/- |
| १६ | ६३ एम एम व्यासाचे व १५ मी लांबीचा होज पाईप. | १६ नग | ५,३८१/- | ८६,०९६/- |
| १७ | ६३ एम एम व्यासाचे स्टेनलेसस्टील पाईपला २० एम एम व्यासाचे नोझलसह. | ०८ नग | १,८०८/- | १४,४६४/- |
| १८ | १५० एम एम व्यासाचे हेडर पाईप. | ०२ नग | १०,७८२/- | २१,५६४/- |
| १९ | २५ एम एम व्यासाचे एअर रिलीज कॉक | ०१ नग | ७१९/- | ७१९/- |
| २० | प्रेशर गेज | ०५ नग | ६८५/- | ३,४२५/- |
| २१ | प्रेशर बटन | ०४ नग | १,६७८/- | ६,७१२/- |
| २२ | होज पाईप ठेवणेसाठी होजबॉक्स | ०८ नग | ७,४०६/- | ५९,२४८/- |
| २३ | स्वयंचलित पंपासाठी कंट्रोल पॅनल | ०१ नग | २,००,०००/- | २,००,०००/- |
| २४ | फायर अलार्म सिस्टीम साठी Break glass push buton | ०८ नग | ४९१/- | ३,९२८/- |
| २५ | Hooters (भोंगा) | ०८ नग | ५३२/- | ४,२५६/- |
| २६ | 2 core 1.5 sqm copper conductor केबल | ५०० र.मी. | १००/- | ५०,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | फायर अलार्म कंट्रोल पॅनल | ०१ नग | ३०,८८२/- | ३०,८८२/- |
| **एकूण रक्कम रु.** | | | | **१२,८५,८२३/-** |

**ब) शिर्डी बसस्थानक परिसरात रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम राबविणे.**

शिर्डी शहर व परिसरात भूजल पातळी अत्यंत खोलावर गेलेली आहे. गेल्या काही वर्षात पर्जन्यमानातही घट झालेली आहे. त्यामुळे विशेषतः उन्हाळयामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे. त्यामुळे उपलब्ध होणा-या पाण्याची बचत करणे गरजेचे आहे. त्यासाठी Rain Water Harvesting चे माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत जिरवून भूजल पातळीत सुधारणा करता येईल . त्यादृष्टीने शिर्डी बसस्थानक परिसरातील व इमारतीचे छतावरील पावसाचे पाणी Rain Water Harvesting सिस्टीमद्वारे संकलीत करुन भूजल पुनभरण करता येईल. तसेच शिर्डी नगरपंचायत यांचेकडील वापर परवाना प्राप्त करणेसाठी रेन वॉटर सिस्टीम राबविणे बंधनकारक आहे.

शिर्डी बसस्थानक परिसरातील व इमारतीचे छतावरील पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी दोन ठिकाणी Rain Water Harvesting प्रकल्प राबविता येईल. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| Sr. No. | Description | Qty./ Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Rain water Harvesting Pits :-<br>Providing ISI standard R.C.C. pipes in 3.0 m length of N.P. II class and 900mm diameter as per detailed drawing and designs or as directed by Engineer –in- charge including excavation, drilling of bore upto 6" dia. 30mtr., casing pipe filling filter media filling ( Central & Local) G.I. wire mesh / jail, Heavy Duty RCC chamber covers, transport to department stores /site, loading, unloading and stacking etc. complete. | 02 Nos. | 30,000/- | 60,000/- |
| **Total -** | | | | 60,000/- |
| Add 5% contingencies | | | | 3,000/- |
| **Total Amount Rs.** | | | | **63,000/-** |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतकरीता फायर फायटींग यंत्रणा बसविणेकामी आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांचेकडून रक्कम रु.१२,८५,८२३/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक प्राप्त झालेले आहे. तसेच बसस्थानक येथे दोन ठिकाणी Rain Water Harvesting योजना राबविणेसाठी यापुर्वी साईआश्रम प्रकल्प येथे केलेले Rain Water Harvesting कामाचे मंजूर दरानुसार बसस्थानक येथे सदरहु कामी रक्कम रु.६३,०००/- मात्र खर्च येईल. जा.नं. ३६२१/२०१७ दि.०६/०१/२०१७ रोजीचे परिपत्रकानुसार प्रत्येक विभागाने टेंडर मध्ये नमूद करण्यात येणारी एस्टीमेट कॉस्ट ही मार्केट कॉस्टपेक्षा २० ते ३० टक्के नमूद करावी असे नमूद केले आहे. त्यानुसार अंदाज पत्रकीय रक्कमेतून २० टक्के कपात करुन फायर फायटींग यंत्रणा बसविणेकामी रु.१०,२८,६५८/- व Rain Water Harvesting कामी रक्कम रु.५०,४००/- मात्र याप्रमाणे एस्टीमेट कॉस्ट निविदेमध्ये नमूद करता येईल.

सदरहू खर्च शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकामाचा खर्च वर नमूद शासन मान्यता रक्कम रु.७,६५,५०,८९८/- मात्रचे मर्यादेत राहून खर्चात काही प्रमाणात बचत होईल असा अंदाज आहे. याप्रमाणे शिल्लक राहणा-या मंजूर रक्कमेतून उपरोक्त खर्च करता येईल.

**प्रस्तावः-** तरी शिर्डी बसस्थानक येथे अग्नीशमन संयंत्रणा बसविणेकामी येणारे अंदाजे रु.१०,२८,६५८/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई– निविदा मागवून करुन घेणेस तसेच बसस्थानक येथे दोन ठिकाणी Rain Water Harvesting योजना राबविणेसाठी रक्कम रु.५०,४००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने काटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेकामी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२** **सन २०१७ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट- कलम (१) अन्वये *"...भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे..." अशी* तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे "*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि.०८ जुलै २०१७ ते दि.१० जुलै २०१७ अखेर श्रींचा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. साईभक्तांचे पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून दि.०१/०७/२०१७ ते ३०/०९/२०१७ अखेर ९२ दिवस मंदिर परिसरात विविध ठिकाणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणेत येतात. सदर मंडपाचा वापर गुरुपौर्णिमा उत्सवात साईभक्तांसाठी होतो. पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे पावसापासून संरक्षण होणेकामी मंदिर परिसरात मंडप उभारणीकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**अ) पावसाळयाचे कालावधीत ताडपत्रीचे छत असलेले (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) कापडी मंडप व्यवस्था:-कालावधी दि.०१/०७/२०१७ दि.३०/०९/२०१७ अखेर एकूण ९२ दिवस.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | श्री गुरुस्थान मंदिर (निंबवृक्षाच्या) पश्चिम बाजूस, दक्षिणोत्तर असा | ४५'X३६' | १६२०.०० |
| २ | व्हि.आय.पी. दर्शन रांगेसाठी (शनि गेट) | ६५'X१५' | ९७५.०० |
| ३ | गेट नं.०३ समोर | ४५'X१८' | ८१०.०० |
| ४ | जुना पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांगेच्या पूर्व व पश्चिम प्रवेशद्वारासमोर | ३०'X७०'<br>४५'X१५' | २१००.००<br>६७५.०० |
| ५ | लेंडीबागेत दत्त मंदिर जवळ नंदादिप समोर | १०५'X३५' | ३६७५.०० |
| ६ | रथ पालखी रस्त्यावर रथपालखी गेट ते गुरुस्थान गेट पर्यंत. | १५०'X८' | १२००.०० |
| ७ | नगर मनमाड रस्ता पुर्व बाजू फुटपाथवर | ४००'X८' | ३२००.०० |
| ८ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजू फुटपाथवर | ३८०'X७' | २६६०.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **१६,९१५.००** |
| | | **अंदाजे रु.०.२५ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- (अ साठी) -** | **३,८९,०४५.००** |

**ब) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) -**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिरासमोरील सभाकुंडामध्ये (कनात व बिछायतीसह ) | ६१'X६१' | ३७२१.०० |
| २ | उदी वाटप कांऊटर समोर | ४५'X२०' | ९००.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ** | **४६२१.००** |
| | | **अंदाजे रु.०.३३ प्रति चौ.फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च- ( ब साठी) रुपये-** | **१,४०,२९४.००** |
| | | **पावसाळयासाठी करावयाच्या मंडप व्यवस्थेसाठी अपेक्षीत खर्च (अ+ब ) एकूण रु.** | **५,२९,३३९.००** |

वरील तक्यांत नमूद केलेप्रमाणे पावसाळयाचे कालावधीत श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.५,२९,३३९/- मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. जुने प्रसादालय येथे नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम प्रस्तावीत असल्याने, या भागातील जुन्या इमारती पाडावयाच्या असल्याने सदर ठिकाणी करणेत येणारी मंडप व्यवस्थेचा तसेच समाधी मंदिरातून बाहेर पडणा-या मार्गावर कायम स्वरुपी टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेत येत असल्याने सदर मंडपाचा समावेश प्रस्तावात करणेत आलेला नाही.

तरी वरीलप्रमाणे पावसाळयाचे कालावधीत मंडप व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.५,२९,३३९/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, सन २०१७ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.५,२९,३३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३** **सोनार समाजातील आद्य साईभक्त म्हाळसापती चिमणाजी नागरे (भगत) यांचे नाव शिर्डीतील एखाद्या भव्य वास्तूला देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-</u>**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम २(झ) अन्वये, सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्यप्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

**<u>प्रस्तावना:-</u>** उपरोक्त संदर्भीय पत्रांन्वये श्री. सुधाकर लाड, पत्रकार/इतिहास अभ्यासक, पनवेल, जि. रायगड यांनी संस्थानचे मा.अध्यक्ष सो. यांना अग्रेषीत केलेल्या विनंती पत्रात खालीलप्रमाणे नमूद केले आहे,

*" साईबाबा इ.स.१८५८ साली चांद पाटलाच्या बायकोच्या भावाच्या मुलीचे लग्नाच्या व-हाडाबरोबर शिरडीला आले. त्यानंतर साईबाबांनी इस.१९१८ साली समाधी घेईपर्यंत साईबाबांच्या सहवासात सुमारे सहा तपे राहिलेले एकमेव साईभक्त म्हाळसापती हे साईबाबांचे निकटवर्ती भक्त होते. म्हाळसापती साईभक्तांचे शिरोमणी होते. खंडोबाच्या मंदिराचे पुजारी म्हाळसापती यांनी फकीर वेशातील तरुणाला पाहून ' यावे साई' असे उद्गार काढून त्यांचे स्वागत केले होते. पुढे हेच नाव या फकीराला पडले. लोक त्यांना साईबाबा म्हणू लागले.*

*सोनार समाजातील म्हाळसापती हे अगदी सुरुवातीपासून साईबाबांचे 'आद्य' साईभक्त होते. असे असले तरी श्री.साईसच्चरितकार रघुनाथ गोविंद दाभोळकरांनी श्रीसाईसच्चरितात साईबाबांच्या या निष्ठावंत भक्ताची उपेक्षाच केली आहे. श्री साईसच्चरितात म्हाळसापती असा म्हाळसापतींचा एकेरी उल्लेख केलेला आहे. त्यांचे पूर्ण नांव देखील छापलेले नाही श्री साईसच्चरित अध्याय क्र.५, ८, ११, ३६, ३७, ४२, ४४ मध्ये म्हाळसापतींचा उल्लेख आलेला आहे. पण या उल्लेखात म्हाळसापतीचे पूर्ण नांव छापलेले नाही. माझ्या मते म्हाळसापतीला जेवढे महत्व द्यायला हवे होते तेवढे श्री साईसच्चरित्रकारांनी दिलेले नाही. असो!*

*सोनार समाजातील आद्य साईभक्त म्हाळसापती चिमणाजी नागरे (भगत) यांची ९४ वी पुण्यतीथी १२ सप्टेंबर, २०१६ रोजी झाली. त्यांच्या स्मृतींना चिरंतन करण्यासाठी आपण शिरडी संस्थानच्या एखाद्या भव्य वास्तूला, रस्त्याला 'आद्य' साईभक्त म्हाळसापती चिमणाजी नागरे (भगत) यांचे नांव द्यावे ही मी या पत्राद्वारे मागणी करीत आहे व आपणाला सुचवित आहे."*

संदर्भीय पत्रांसोबत श्री.सुधाकर लाड, पनवेल यांचेकडील वर नमूद प्रस्ताव हा श्री साईसच्चरीत ग्रंथातील साईभक्त म्हाळसापती यांचे उल्लेखाविषयी असून त्या अनुषंगाने संस्थानच्या एखाद्या भव्य वास्तुला, रस्त्याला त्यांचे नांव देणेबाबतची मागणी त्याद्वारे करण्यात आलेली आहे. तसेच साईभक्त म्हाळसापती चिमणाजी नागरे (भगत) यांचेवर लिहीलेला संशोधनात्मक लेख प्रसिध्दीसाठी संदर्भ क्र.१ चे पत्रासोबत जोडला होता. सदरहू संशोधनात्मक लेख प्रसिध्दीसाठी दि.१६/११/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये प्रकाशने विभागाकडे देण्यात आला आहे.

**<u>प्रस्ताव:-</u>** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे मंदिर परिसरातील बुटी वाडा (श्री साईबाबा समाधी मंदिर) साईभक्त श्रीमंत कै.श्री. बापूसाहेब बुटी, नागपूर यांनी, दिक्षित वाडा सॉलिसिटर कै.श्री.हरि

सिताराम दिक्षित यांनी, नवलकर वाडा (गुरुस्थान परिसर) कै.श्री. रामकृष्ण श्रीकृष्ण नवलकर यांनी तर प्रधान लेंडीबागेची जागा सॉलिसिटर कै.श्री. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान यांनी संस्थानला देणगी स्वरुपात दिलेल्या आहेत. तसेच या वास्तू व लेंडीबागेची जागा ही पूर्वीपासूनच बुटी वाडा, दिक्षित वाडा, नवलकर वाडा, प्रधान लेंडीबाग या प्रचलित नांवाने प्रसिध्द आहेत. तसेच त्यानंतर नव्याने बांधण्यात आलेल्या संस्थान मालकीच्या सर्व वास्तूंचे श्री साईबाबांच्या नावानेच नामकरण करण्यात आलेले आहे.

श्री.सुधाकर लाड, पनवेल यांचेकडील उपरोक्त नमूद प्रस्तावामध्ये

१) संस्थान मालकीच्या वास्तूस साईभक्त म्हाळसापतीचे नांव देण्याबाबत मागणी केलेली आहे. तथापी श्री साईबाबांचे समकालिन भक्तांचे वंशजही अशा प्रकारची मागणी करण्याची शक्यता आहे. त्याकरीता याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे.

२) शिर्डीतील एखाद्या रस्त्यास साईभक्त म्हाळसापतीचे नांव देण्याबाबत मागणी केलेली आहे. परंतू सदरहू विषय हा शिर्डी नगरपंचायत यांच्याअखत्यारीतील आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, म्हाळसापती चिमणाजी नागरे (भगत) हे साईबाबांचे सोनार समाजातील आद्य भक्त होते, परंतु त्यांचे नाव एखाद्या वास्तुला दिल्यास इतर भक्तांच्या वंशजांकडूनही अशी मागणी केली जाऊ शकते. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**विषय नं.४४** **माहे जानेवारी, २०१७ व फेब्रुवारी, २०१७ जमा-खर्च तक्त्यांची नोंद घेणे.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे जानेवारी २०१७ व फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

त्यास अनुसरून माहे जानेवारी २०१७ व फेब्रुवारी २०१७ या महिन्यांचा जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे –

| महिना | जमा | खर्च |
|---|---|---|
| जानेवारी २०१७ | ४७,७९,८५,४०३/- | १९,७९,००,५७०/- |
| फेब्रुवारी २०१७ | ३५,८५,२५,२२४/- | १७,३८,३०,३४९/- |

लेखाविषयक (Accounting) नोंदी घेण्याकरिता कॉग्नीझंट मार्फत ईआरपी संगणक प्रणाली विकासीकरण चालु असल्याने त्यामधून अदयाप जमा खर्च तक्ते/विवरणे मिळत नाही. त्यामुळे टॅली या संगणक प्रणालीध्ये लेखाविषयक नोंदी घेऊन जमा-खर्च तक्ते तयार करावे लागल्याने काहीसा विलंब होत आहे.

तरी माहे जानेवारी २०१७ व फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील मासिक जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.४००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी, २०१७ व फेब्रुवारी, २०१७ जमा-खर्च तक्त्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या. या जमा-खर्च तक्तयांचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४५** **आयकर कलम १९७ अंतर्गत ६.११% दराने मिळालेल्या मुळातून करकपात दाखल्याची नोंद घेऊन कार्यवाही करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्ताव-** आयकर कायदा १९६१ अन्वये कलम १९७ अंतर्गत संस्थानला आर्थिक वर्षात मिळणा-या गुंतवणूकीवरील व्याज, भाडे, ऑनलाईन दर्शनापोटी टाटा कम्युनिकेशन, असोसिएटेड ब्रॉडकास्टींग, नॅशनल इन्शुरंन्स कंपनीकडून राजीव गांधी योजनेअंतर्गत लाभार्थिंच्या बीलाची रक्कम, इ. मार्गाने मिळणा-या रकमेतून मुळातून करकपात (TDS) होऊ नये करीता दाखला प्राप्त होतो. आयकर कायद्यानुसार अशी रक्कम मिळतांना त्यातुन १०% टीडीएस वजावट होऊन रक्कम प्राप्त होते. तथापि, संस्थानला आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये रु.१८१ कोटी रकमेवर टीडीएस कपात होऊ नये असा Ref.No.197AAATS2581C/2016-17/1 dtd.17.05.2016

अन्वये दाखला प्राप्त झाला होता. हा दाखला आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला संभाव्य रक्कम गृहित धरुन प्राप्त होतो. प्रत्यक्षात आर्थिक वर्षाच्या शेवटी काही बॅकांमध्ये गुंतवणूक वाढली आहे तर काही बॅकामध्ये गुंतवणूक कमी झाली आहे कारण उच्चतम व्याजदर देणा-या राष्ट्रीयकृत बॅकांमध्ये गुंतवणूक करण्याची कार्यपध्दती आहे. अशा प्रकारे प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या दिवशी विजया बॅक, युको बॅक, देना बॅक, आंध्रा बॅक कार्पोरेशन बॅक, सेंडीकेट बॅक, पंजाब नॅशनल बॅक या राष्ट्रीयकृत बॅकांनी इतर राष्ट्रीयकृत बॅकांच्या तुलनेत जास्त व्याजदर दिल्याने या बॅकाकडे गुंतवणूकीची रक्कम वाढली आहे. या रकमेतून टीडीएस कपात हाऊ नये याकरीता नोव्हेंबर २०१६ मध्ये सुधारीत प्रस्ताव दाखल केला होता व दि.२४.३.२०१७ रोजी प्रत्यक्ष गुंतवणूकीचे विरवण सादर केले होते त्यामध्ये रु.३०.८० कोटी व्याज नमुद कले होते. तथापि, Ref.no.197/AAATS2581C/2016-17/2/ dtd. 31.03.2017 अन्वये आयकर विभागाने ६.११% दराने मुळातून करकपात करण्याचा दाखला दिला आहे. शुन्य टक्के दराऐवजी ६.११% दर देण्याची कारणे खालीलप्रमाणेः-

१. आयकर विभागाच्या Online Traces *(TDS Reconciliation Analysis and Correction Enabling System)* या संकेतस्थळावर संस्थानकडून रु.२,०४,२२,८८०/- इतका कर देय दिसत आहे. आयकर विभागाने मुळातून करकपात करण्याच्या तरतूदीस अनुसरुन अचूक कर वजावट केली आहे अथवा नाही हे समजण्याकरीता Traces वेबसाईट विकसीत केली आहे. यामध्ये कर वजावट केलेल्या सर्वांनी टीडीएस कर विवरण पत्र भरतांना सादर केलेली माहिती भरली जाते. यामध्ये करदात्यांचा PAN नसेल अथवा चुकीचा असेल तर कपात केलेल्या टीडीएस च्या दुप्पट रक्कम देय दिसते, त्यावर व्याज सुध्दा देय दिसते. तसेच काही करदात्यांचा कर कमी दराने वजावट झाला असल्यास ती रक्कम व त्यावरील व्याज देय दिसते. आयकर विभागाने अशा प्रकारे सर्व विवरण पत्रांची सर्व माहिती संकेतस्थळावर अपलोड केली तेव्हा माहिती उपलब्ध असतांनाही तीची लिंक बरोबर झाली नसल्यमे अनेकांच्या नांवे कर देय दिसत होता. त्यामध्ये आवश्यक पुर्तता केल्यानंतर अशा रकमा कमी झाल्या आहेत. आयकर विभागाने आर्थिक वर्ष २००७-०८ ते २०१४-१५ या कालावधीतील देय कर रु.९,११,५९,३००/- असल्याचे दि.९.६.२०१५ रोजी कळविले होते. कर सल्लागार यांचे सहाय्याने वेळोवेळी केलेल्या पुर्ततेअंती दि.२.५.२०१७ अखेर रु.२,०४,२२,८८०/- इतका कर देय दिसत आहे.

२. अशा प्रकारे मागील अर्थिक वर्षांत सुध्दा रक्कम देय दिसत असतांनाही व त्यामध्ये आवश्यक असणारी माहिती संकलित करुन देय कर कमी होत असल्याने आयकर विभागाने संस्थानला निरंक करकपात दर नमुद करुन कलम १९७ अंतर्गत दाखला दिलेला आहे. तथापि चालू आर्थिक वर्षात उप आयकर आयुक्त, चर्नी रोड कार्यालय यांनी सुरुवातीला निरंक दराने दिले होते. तथापि, सुधारित दाखला देतांना त्यांनी संस्थानच्या नावे दिसत असलेला देय कर गृहित धरुन ६.११% दराचा दाखला दिला आहे.

३. देय दिसत असलेल्या रु.२,०४,२२,८८०/- या मध्ये रु.१,३०,०७,००६/- इतकी रक्कम विदेशी कंपनी लेजर व्हीजन लि., हॉगकॉग यांना लेजर व्हीजन प्रोजेक्ट करीता दिलेल्या रकमेवर १०% ऐवजी PAN नसल्याने २०% दर गृहीत धरल्याने दिसत आहे. बाबत विदेशी कंपनीला PAN नसतो त्यामुळे केलेली मुळातून करकपात बरोबर असून देय रक्कम कमी करणेबाबत दि.१४.३.२०१७ रोजी आयकर विभागाला पत्र दिले आहे.

४. तसेच दरमहा बॅकेत भरण्यात येत असलेल्या कराची रक्कम बॅकेने चुकून संस्थानच्या TAN ऐवजी बॅकेच्या TAN नमूद करुन भरल्याने रु.१५,५६,९८५/- देय दिसत आहेत. बाबत बॅक ऑफ महाराष्ट्रा यांनी दि.१७.३.२०१७ रोजी ना हरकत दाखला दिला असून सदर पत्र आयकर विभागाला देय रक्कम कमी करण्याकरीता सादर केले आहे.

५. उर्वरीत रु.५८,५८,८८९/- इतका कर देय दिसत आहे. त्याची कारणे म्हणजे पुरवठादारांचे PAN मिळालेले नाहीत, काही पुरवठादरांचे PAN चुकीचे आहेत तर काही पुरवठादारांच्या बीलातून मुळातुन करकपात कमी झाल्याचे आयकर विभागाने Traces मध्ये नमुद केले आहे.

- पैकी रु.४,४०,३५१/-रक्कम पुरवठादारांच्या बीलातून कमी वजावट केलेली दिसते.
- उर्वरीत रु.५४,४५,५३८/- रक्कम देय दिसत आहे. कर सल्लागार म्हणून काम पाहत असलेले श्री.एस.जी.अंदानी, सी.ए.यांचेकडून याची विगतवारी मिळालेली नाही. त्याचे मार्फत त्याची पुर्तता चालू आहे. आर्थिक वर्ष सन २०१३-१४ पर्यंत ७०% करदात्यांचे पॅन नंबर असतील तरी TDS आयकर विवरणपत्र भरले जात होते त्यामुळे काही करदात्यांचे पॅन नंबर नव्हते. आवश्यकतेनुसार पॅन नंबर संकलीत करता येतील.

पुरवठादारांच्या बीलातुन कमी करकपात झाली असल्यास सध्या ज्या पुरवठादारांबरोबर व्यवहार चालू आहे त्यांचे बीलातुन वजावट करुन त्याचा दाखला त्यांना देता येईल.

**विभागाचा अभिप्रायः-** संस्थानचे नांवे दि.०२.०५.२०१७ अखेर Traces मध्ये देय दिसत असणा-या रु.२.०४ कोटी करापोटी उपरोक्त प्रमाणे कर सल्लागार यांचे सहाय्याने पुर्तता करुन देय दिसत असलेला कर कमी करता येईल. आयकर कलम १९७ अंतर्गत दि.३१.०३.२०१७ रोजी ६.११% दराने मुळातून कर कपात दाखला मिळाला आहे. होणारी मुळातुन करकपात हा खर्च नाही त्यामुळे राष्ट्रीयकृत बॅंकाकडून मिळणा-या रु.३०.८० कोटी व्याज रकमेतून ६.११% दराने रु.१.८८ कोटी TDS वजावट करुन व्याज घेता येईल. झालेली मुळातून करकपात संस्थानचे आर्थिक वर्ष २०१६-१७ चे करविवरण पत्र भरतांना त्यामध्ये Refund म्हणून दर्शविता येईल.

उपरोक्त विषय माहितीस्तव व अवलोकनार्थ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या प्रलंबीत आयकरापैकी लेझर व्हीजनच्या आयकराची रक्कम कमी करुन घेणेसाठी आयकर आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठपुरावा करणेत यावा व उर्वरित प्रलंबीत आयकरासंदर्भात संस्थान नियुक्त सनदी लेखापालामार्फत व्यक्ती किंवा ठेकेदार निहाय तपशील प्राप्त करुन, त्यांचेकडून वसुलीबाबत कारवाई सुरु करावी**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४६** **थॅलेसेमिया पेशंटसाठी रक्तपेढींनी मागणी केलेल्या आर्थिक मदतीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.डॉ.सुरेश हावरे सो.अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, यांचे अध्यक्षतेखाली रविवार दि. १२/०२/२०१७ रोजी रक्तदान चळवळ वाढीस लागणेसाठी चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे,अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे यासाठी पुढाकार घेऊन रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी, यासाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा, याकरीता जसे तिरुपती बालाजी संस्थानमध्ये ज्या प्रमाणात केशदान ही संकल्पना रुजवलेली आहे त्याच धर्तीवर शिरडीत रक्तदान ही संकल्पना रुजवावी, असे मा.अध्यक्ष साहेब यांनी सुचविले आहे.

त्यावेळी नामांकित १२ रक्तपेढयांचे प्रत्येकी दोन प्रतिनिधी इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.समाजात रक्तदानाचे महत्व रुजावे,अडीअडचणीच्या वेळी गरजु रुग्णांना रक्त उपलब्ध व्हावे, यासाठी पुढाकार घेऊन रक्तदान संकल्पना रुजविली जावी तसेच थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया यासारख्या रुग्णांना संस्थान मार्फत मदत व्हावी यासाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा, अशी मागणी सर्व रक्तपेढयांनी केली. या सर्व रक्तपेढया थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या दुर्धर आजारांनी पिडीत बालकांना मोफत रक्तपिशव्या देण्याचे सेवाभावी वृत्तीने काम करत असून संस्थान मार्फत निरंतर सहयोग/ आर्थिक सहकार्य मिळावे, असे खालील रक्तपेढींनी पत्रात म्हटले आहे.तसेच त्यांनी पत्रात नमूद केलेला मोफत देण्यात आलेल्या रक्तपिशव्या व त्यावरील खर्चाचा तपशील खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

| अ.नं | रक्तपेढीचे नाव | कालावधी आर्थिक वर्ष | मोफत देण्यात आलेल्या रक्त पिशव्या | संबंधित रक्तपेढीने खर्च केलेल्या रकमेचा तपशील (रुपये) |
|---|---|---|---|---|
| ०१ | जनकल्याण रक्तपेढी, अहमदनगर | २०१४ ते जाने.२०१७ अखेर | १८८१ | २५,३९,३५०/- |
| ०२ | दत्ताजी भाले रक्तपेढी, औरंगाबाद | २०१२ ते डिसें.२०१६अखेर | ३२७९ | ६५,०५,४४०/- |
| ०३ | डॉ.हेडगेवार रक्तपेढी, अकोला | २०१४ ते २०१७ | २२५१ | २४,७६,१००/- |
| ०४ | माधराव गोलवलकर स्वयंसेवी रक्तपेढी, जळगांव | २०१४ ते २०१७ | २४४ | ३,१८,०००/- |
| ०५ | डॉ.भालचंद्र ब्लड बॅंक,लातूर | २०१२ ते २०१७ | ५२०९ | ५०,५५,२५०/- |
| ०६ | जनकल्याण रक्तपेढी,पुणे | २०१२ ते जाने. २०१७ अखेर | ५७९८ | ७२,५५,६८०/- |
| ०७ | जनकल्याण ब्लड बॅंक, नंदुरबार | २०१२ ते २०१६ | ७६ | ७७,२००/- |
| ०८ | जनकल्याण ब्लड बॅंक,नाशिक | २०१४ ते जाने.१७ अखेर | १५९० | २३,०५,५००/- |
| ०९ | जनकल्याण रक्तपेढी, जालना | २०१४ ते जाने.१७ अखेर | २३८२ | २९,२८,३००/- |
| १० | डॉ.हेडगेवार रक्तपेढी, सोलापुर (ॲक्रिडिटेड रक्तपेढी) | २०१४ ते जाने.२०१७ अखेर | १६५० | १९,३०,५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | कै.वामनराव ओक रक्तपेढी, ठाणे | २०१३ ते २०१६ | १८६२ | १०,५७,०००/- |
| १२ | गोलवलकर गुरुजी ब्लड बॅंक, नांदेड | २०१४ ते २०१७ | ३५३ | पत्रात रकमेचा उल्लेख नाही. |
| | एकूण रक्कम - | | | ३,२४,४८,३२०/- |

**संस्थान मार्फत आर्थिक अनुदान देणेबाबत तरतुद-** अधिनियम तरतूद २१(२) (एक) राज्य शासनाचे पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था,सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय दवाखाना निराश्रित अथवा शारीरिकदृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करुन घेण्यासाठी अशी तरतूद आहे.

मात्र यामध्ये फक्त रुग्णालय किंवा दवाखाना यांचा उल्लेख आहे. रक्तपेढीबाबत स्पष्ट उल्लेख नाही.

**विभागाचा अभिप्राय:-**

१) रक्तपेढयांना किती आर्थिक अनुदानाची आवश्यकता आहे, याबाबत मागणी केलली नाही, फक्त खर्चाचा तपशील दिलेला आहे.

२) थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या आजारासाठी उपरोक्त १२ रक्तपेढयांनी पेशंटचा तपशील, त्यांना देण्यात येणा-या रक्तपिशव्यांचा तपशील यांचे अभिलेख कशाप्रकारे ठेवण्यात येतात व त्याचा अहवाल शासनाचे एखादे विभागाला पाठविला जातो काय याचा तपशील दिलेला नाही.

३) संबंधित रक्तपेढींनी पत्रात सहयोग/आर्थिक सहकार्य कशा स्वरुपात, किती याचा सविस्तर प्रस्ताव सादर केलेला नाही. फक्त मोफत दिलेल्या रक्तपिशव्यांचा खर्च दिलेला आहे, १२ पैकी ०१ रक्तपेढयांने खर्चाचा तपशीलही दिलेला नाही.

४) थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या आजारासाठी रक्तपिशव्या देणेसंदर्भात शासनाचे धोरण व शासन निर्णय, शासनाकडून आर्थिक अनुदान मिळते किंवा कसे याबाबत प्रस्तावात तपशील नाही.

५) प्रस्तावामध्ये रक्तपेढी ही नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी असलेबाबत नोंदणीची कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर केलेली नाही.

६) रक्तपेढयांना अशाप्रकारे आर्थिक मदत दिल्यानंतर तिचा विनीयोग योग्य प्रकारे होतो किंवा कसे यावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही.

७) थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या आजारासाठी रक्तपुरवठा करणा-या ब-याचशा रक्तपेढया राज्यात असू शकतील भविष्यात या सर्व रक्तपेढयाही अशा स्वरुपाची मागणी करण्याची शक्यता आहे.

उपरोक्त मुद्‌यांचा विचार आर्थिक अनुदान देतांना होणे गरजेचे आहे तरी प्रस्तावात नमूद १२ रक्तपेढयांना अनुदान देणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ व निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, थॅलॅसेमिया, हिमोफेलिया व सिकलसेल ॲनिमिया या आजाराच्या रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दराने रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तपेढयांना आर्थिक अनुदान देता येईल. मात्र सदर आर्थिक अनुदान देणेसाठी अभ्यासपुर्वक सविस्तर नियमावली तयार करणेत येऊन, शासनाच्या या संदर्भातील धोरणासहीत सदर विषय समितीसमोर सादर करणेत यावा. तसेच प्रस्तावित रक्तपेढया व इतर रक्तपेढयापेढयांकडूनही वैद्यकिय बाबींचा सविस्तर अहवालाची (जसे रक्तपिशव्यांचा खर्च, वाटप, दर, शासकीय अनुदान मिळते काय) मागणी करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ वैद्यकिय अधिक्षीका, साईनाथ रुग्णालय)

---

**विषय नं.४७** **योगीराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज संस्थान ट्रस्ट, यांना रु.१.२५ कोटी मात्र आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे समकालीन श्री गंगागिरीजी महाराज यांची समाधी श्रीरामपूर व वैजापूर तालुक्याच्या सरहद्दीवर सराला बेट येथे आहे. वारकरी सांप्रदयाचे श्रद्धास्थान असलेल्या या गावात भाविक येत असतात. मार्गशिर्ष वद्य १४ ला सद्गुरू गंगागिरी महाराज पुण्यतिथी व त्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दर वर्षी केले

जात आहे. त्या कार्यक्रमाचा लाखो भाविक लाभ घेतात. श्री गंगागिरी महाराजांचे शिष्यश्री नारायणगिरी यांचीही समाधी या ठिकाणी आहे.

सदगुरू श्री गंगागिरीजी महाराज संस्थान (ट्रस्ट) यांनी २०११ मध्ये श्री सद् गुरू गंगागिरी महाराज समाधी मंदिराचे काम हाती घेतलेले आहे. संस्थानकडे देणगी स्वरूपात व इतर स्वरुपात उत्पन्नाची बाब अत्यल्प आहे. लोकवर्गणीतूनच सदर मंदिराचे काम चालू आहे. योगिराज सद् गुरू गंगागिरीजी महाराज व श्री साईबाबांचा संबंध निकटचा आहे.

**गत व्यवस्थापन मंडळाचा निर्णय:-** दि. १९.११.२०११ रोजीचे मा. विश्वस्त मंडळाचे सभेत निर्णय क्रं. ८४५ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, सदगुरू गंगागिरी महाराज संस्थान सराला बेट, ता. श्रीरामपूर यांना मंदीर जिर्णोद्धारासाठी यावर सविस्तर चर्चा होऊन, सदगुरू श्री गंगागिरी महाराज संस्थान सराला बेट ता. श्रीरामपूर यांना मंदिर जिर्णोध्दारासाठी रुपये १.२५ कोटी आर्थिक मदत देणेस मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घ्यावी असे ठरले.

व्यवस्थापन मंडळाची मान्यतामिळाल्यानंतर, छाननी समिती मान्यता व नंतर महाराष्ट्र शासन यांची मान्यतेनुसार संस्थानच्या विहीत पद्धतीने संबंधीतांना अनुदान देण्याचा शिरस्ता आहे. श्री गंगागिरी महाराज यांच्या आर्थिक मदतीच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेत मान्यता मिळाली मात्र छाननी समितीचे मान्यता न मिळाल्याने संबंधीत प्रस्तावावर कार्यवाही होऊ शकली नाही.

**मा. छाननी समिती निर्णय:-** मा. छाननी समितीचे निर्णया नुसार संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणीसाठी नोंदणीकृत संस्थेकडून, शासनाकडून तसेच वैयक्तीक स्वरुपाचे अर्ज येत असतात सदर अर्जाबाबत दि. २८.०६.२००९ चे छाननी समितीत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. “संस्थानकडे आर्थिक अनुदान मागणीकामी पुष्कळ अर्ज आलेले आहेत/ येत असतात. असे येणारे अर्ज संस्थानकडे दाखल झालेल्या तारखेपासून फक्त एक वर्ष कालावधीपर्यंत ग्राहय धरण्यात यावेत. सदर कालावधीत अनुदान न मिळाल्यास एक वर्षाचा कालावधी संपलेनंतर सदरहू अर्ज निकाली काढण्यात यावेत, अशी शिफारस करण्यात आली”. असल्याने दि.२७.०१.२०१७ चे मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मान्यतेने गत व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिलेले, परंतु ते मुदत बाहय झाल्याने एकूण ३१ प्रस्तावांना नस्तीबंद करण्यास मान्यता दिलेली आहे.

**प्रस्तावित फेर मागणी:-** मात्र दि. १८ जानेवारी २०१७ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले सदगुरू योगिराज श्री गंगागिरीजी महाराज ट्रस्टसाठी संस्थानचे तत्कालीन विश्वस्तमंडळाने दि. १९.११.२०११ रोजीचे सभेत निर्णय क्रं. ८४५ अन्वये मंजूर केलेले १.२५ कोटी मात्र घोषीत केलेल्या आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

तसेच आपल्या कार्यकाळात सद् गुरू श्री गंगागीरी महाराज संस्थान (ट्रस्ट) सराला बेट या तीर्थ क्षेत्राचा विकास व्हावा या उद्देशाने गत व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिलेले रु. १.२५ कोटी ची आर्थिक मदत द्यावी अशी विनंती केलेली आहे.

**अर्थ साहाय्य करणेबाब संस्थान अधिनियमातील तरतुद:-**

**१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तीच्या अधीन राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्या वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्रायः-**

**अ)** दि. १९.११.२०११ रोजीचे मा. विश्वस्त मंडळाचे सभेत निर्णय क्रं. ८४५ नुसार रु. १.२५ कोटी मात्र सदगुरू गंगागिरी महाराज संस्थान सराला बेट, ता. श्रीरामपूर यांना मंदीर जिर्णोद्धारासाठी आर्थिक मदत देणेस मान्यता असावी.

**ब)** सन २०११ मध्ये मंदीराचे काम सुरू केलेले आहे. आतापर्यंत कामकाज पुर्ण झाले असल्याची शक्यता आहे. त्यामुळे मा. छाननी समितीचे दि. २८.०६.२००९ चे निर्देशानुसार सदरचा प्रस्ताव कालबाहय झाला असलेने त्यास मा. कार्यकारी अधिकारी यांचे दि. २७.०१.२०१७ चे टिपणीने नस्तीबंद करण्यास मान्यता मिळाली असून तो नस्तीबंद करण्यात आला आहे.

**क)** सन २०१७-१८ मध्ये आयोजित श्री साईबाबा महासमाधी शताब्दीच्या पुर्वतयारीकरिता एकत्रित कृती आराखडा तयार करण्यात येत असून, त्यासाठी संस्थानला ३०००/-कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे, या अनुषंगाने संस्थानकडे सध्या उपलब्ध असणा-या निधीचा आढावा घेऊन, सदर प्रयोजनाकरिता संस्थानने नियोजन करावे असे महाराष्ट्र शासनाचे पत्र प्राप्त झाले आहे.

**ड)** गत व्यवस्थापन मंडळाने मान्य केलेले असे एकूण ३१ प्रस्ताव आहेत, संबंधीतांना मदत दिल्यास सर्वजण मागणी करतील व मदत नाकारल्यास लेखी उत्तर देणे अवघड होईल. त्यामुळे सदरचा प्रस्ताव नस्तीबंद करण्यास मान्यता असावी.

**इ)** मा.छाननी समितीचे दि. २८.०६.२००९ चे निर्देशानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे अर्थ सहाय्य मिळविण्यासाठी पात्रतेच्या निकषानुसार न्यासाने ठरवून दिलेला नमुना व न्यासाने निश्चित केलेले सदस्य किंवा अधिकारी यांनी प्रस्तावीत प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देऊन अर्थसहाय्याच्या गरजेविषयी प्रत्यक्ष पहाणी करून सद्यस्थितीत किती आर्थिक मदतीची गरज आहे. याबाबत अहवाल दिल्यास संबंधीतांना मदत देता येईल असे वाटते.

उपरोक्त **अ, ब, क, ड, इ.** वर निर्णय होणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ फेरसादर.

**निर्णय क्र.४०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्रींचा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने करावयाच्या विकासकामांसाठी संस्थानलाच निधीची कमतरता असल्यामुळे, योगीराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज संस्थान ट्रस्ट, यांना मंदिर जिर्णोध्दारासाठी सध्या आर्थिक मदत देणे शक्य होणार नाही, याकरीता सदरहू विषय तुर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४८** **दि.०८/११/२०१६ ते दि.३०/१२/२०१६ या कालावधीतील जमा झालेल्या रुपये ५००/- व १०००/- च्या चलनी नोटा "पंतप्रधान गरीब कल्याण डिपॉझीट स्किम" मध्ये जमा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** उपायुक्त, आयकर कार्यालय, मुंबई यांचे No. DCIT(E)-2(1)/ Demonitization/ Explanation/2016-dtd17/03/2017 अन्वये दि.८/११/२०१६ मध्यरात्रीपासून रुपये ५०० व १०००/- च्या नोटा व्यवहारातून रद्द झालेबाबत व दि.३०/१२/२०१६ पर्यंत बॅकेत भरण्या व्यतिरिक्त कोणताही व्यवहार करु नये असे कळविण्यात आले होते. दि.३१/०३/२०१६ रोजी व दि.८/११/२०१६ रोजी शिल्लक असलेल्या रकमेची माहिती सादर करणेबाबतची माहिती सादर करणेबाबत कळविले होते त्यास अनुसरुन दि.२१/११/२०१६ रोजी महिती सादर करण्यात आली होती.

No.DCIT(E)-2(1)/ Demonitization/ Explanation/ 2016- dtd17/03/2017 अन्वये दि.८/११/२०१६ ते दि.३०/१२/२०१६ अखेर कालावधीतील जमा झालेल्या जुन्या, नव्या व इतर चलनी नोटांची माहिती मागीतली आहे. या कालावधीत जुन्या चलनी नोटा जमा झालेल्या असून पैकी काही नोटा बॅकेत भरणा करण्यात आल्या आहेत. तर दि.१/१/२०१७ पासून दक्षिणा पेटीत जमा झालेल्या नोटा बॅकेत जमा करण्यास निर्बंध घातल्याने स्ट्रॉग रुममध्ये साठविण्यात आल्या आहेत त्याची माहिती खालीलप्रमाणेः-

दिनांक ८/११/२०१६ ते ३०/१२/२०१६ कालावधीत जमा झालेल्या जुन्य चलनी नोटांचे विवरणः-

| अ.नं. | तपशील | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| १ | संस्थान दक्षिणा पेटी जमा झालेली रक्कम | ५,८१,२८,०००/- | वेळोवेळी बॅकेत जमा |
| २ | मुंबई कार्यालयात दक्षिणा पेटी जमा झालेली रक्कम | ४,०५,०००/- | वेळोवेळी बॅकेत जमा |
| ३ | श्री साईबाबा रुग्णालयात जमा झालेली रक्कम | ६०,८७,५००/- | वेळोवेळी बॅकेत जमा |
| | एकूण | ६,४६,२०,५००/- | |

स्ट्रॉग रुमध्ये असलेल्या नोटांचा तपशीलः-

| अ.नं. | तपशील | रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| १ | संस्थान दक्षिणा पेटी जमा झालेली रक्कम | ६५,८२,५००/- | शिल्लक |

सदर माहिती पडताळणी करुन फेरसादर करणेबाबत त्यांनी सूचविले आहे.

तसेच No.DCIT(Exem)-2(1)/133(6)/2016-17 dt.24.03.2017 अन्वये मा.उपायुक्त, आयकर विभाग, मंबई यांनी दि८/११/२०१६ ते ३०/१२/२०१६ या कालावधीत जमा झालेल्या व बॅंकेत भरणा केलेली रक्कम अवैध आहे सदर रक्कम आपण **"प्रधानमंत्री गरीब कल्यान योजना २०१६"** मध्ये जमा करणेबाबत सल्ला दिला आहे. दि.८/११/२०१६ मध्यरात्रीपासून ते ३०/१२/२०१६ अखेर कालावधीत रुपये ६,४६,२०,५००/- इतकी रक्कम जमा झाली असून बॅंकेत भरणा करण्यात आली आहे. व दि.१/१/२०१७ पासून आजअखेर जुन्या रु.५००/- व १०००/- ची रु.६५,८२,५०० रक्कम स्ट्रॉंगरुमध्ये जमा आहे.

1. शासनाच्या घोषणेनुसार शासकीय रुग्णालयांकरीता दि.३०/१२/२०१६ अखेर जुन्या नोटा स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली होती. संस्थानचे रुग्णालय महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली असल्याने या कालावधीत संस्थानच्या रुग्णालयांमध्ये ६०८७५००/- रक्कम ग्राहय धरणे आवश्यक आहे.
2. शासनाच्या परिपत्रकानुसार दि.८/११/२०१६ ते ३०/१२/२०१६ अखेर कोणत्याही काऊंटरवर जुन्या नोटा स्वीकारण्यात आलेल्या नाहीत. कोणताही व्यवहार संस्थानमार्फत करण्यात आलेला नाही.
3. शासनाच्या परिपत्रकानुसार जुन्या चलनी नोटांचा व्यवहार न करता दि.३०/१२/२०१६ पर्यंत बॅंकेत भरणा करण्याची मुदत देण्यात आली होती. या कालावधीत दक्षिणा पेटीमध्ये जमा झालेली रु.५,८५,३३,०००/- रक्कम बॅंकेत जमा करण्यात आली आहे.
4. दि.१/१/२०१७ पासून जुन्या चलनी नोटा बॅंकेत स्वीकरण्याची मुदत संपल्याने दक्षिणा पेटीत आज अखेर प्राप्त झालेल्या रु.६५,८२,५००/- रक्कम बॅंकेत स्वीकारण्यात येत नाही. बाबत रिझर्व्ह बॅंकेकडे वारंवार विचारणा करण्यात येत असून अद्याप स्वीकारण्यात आलेल्या नाहीत.

अशा प्रकारे प्रत्यक्ष् स्थिती असून सदर रक्कम मोठया प्रमाणावर असल्याने बाबत योग्य तो निर्णय होणेस्तव सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रधानमंत्री गरीब कल्याण डिपॉझीट योजना ही अघोषित संपत्ती किंवा काळा पैसा जाहिर करण्यासाठीची आहे व संस्थानकडे असलेली रक्कम ही साईभक्तांन्नी दानपेटीमध्ये दान म्हणून टाकलेली रक्कम आहे. ही रक्कम अघोषित किंवा काळा पैसा म्हणता येणार नाही. त्यामुळे दि.०८/११/२०१६ ते दि.३०/१२/२०१६ या कालावधीतील जमा झालेल्या रुपये ५००/- व १०००/- च्या चलनी नोटा "पंतप्रधान गरीब कल्याण डिपॉझीट स्किम" मध्ये जमा करणे योग्य होणार नाही. परंतु दि.३१ डिसेंबर, २०१६ नंतर जमा झालेल्या दानपेटीमध्ये जमा झालेल्या व होत असलेल्या रुपये ५००/- व १०००/- च्या चलनी नोटांची विल्हेवाट कशी लावावी, याबाबत वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून मार्गदर्शन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४९** **संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावांमध्ये ५०० मायक्रॉन एचडीपीई जी.ओ. मेंब्रन शिट टाकणे कामाचे ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक याचे अंतीम देयक अदा करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे अशी तरतुद आहे".

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) चा खंड (ग) अन्वये, " भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे".

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-** दि. ०९/०३/२०१७ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं. १३ निर्णय क्रं. २०५ अन्वये संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावांमध्ये ५०० मायक्रॉन एचडीपीई जी.ओ. मेंब्रेन शिट टाकणेचे कामाचे ठेकेदार आर.के.सावंत ,नाशिक यांचेकडून पुर्ण करण्यात आलेल्या कामास विनादंड मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

**प्रस्तावना:** मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांना जा.क्रं.एसएसएसटी/पा.पु./ ४३५२/२०१५, दि.०४/११/२०१५ अन्वये एकूण रक्कम रु.३,५१,८६,८९६/- मात्र रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला होता. सदर कामास ठेकेदार यांनी दि.१७/१२/२०१५ पासून सुरुवात केलेली होती. कार्यादेशानुसार सदर कामाची मुदत ०५ महिन्याची होती व त्यानुसार सदरहू काम दि.१६/०५/२०१६ रोजी

पुर्ण होणे अपेक्षित होते तथापी खालील नमूद अडचणी व आलेले गोदावरी पाण्याचे आवर्तनाचे पाणी काम बंद ठेऊन साठवण तलावांमध्ये साठविण्यात आल्याने सदरहू कामास ५० दिवस विलंब झालेला आहे.

साठवण तलाव येथील तीन तलावांपेकी उत्तर बाजुकडिल साठवण तलाव क्रं.०१ चे काम पहिल्या टप्प्यात हाती घेण्यात आले होते. मा.तहसिलदार, राहाता यांनी दि.१९/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये संस्थान साठवण तलावात दि.२४/०१/२०१६ रोजी गोदावरी उजवा कॅनॉलचे पाणी संस्थानच्या तलावात पुरविण्यात येणार असल्याने हे पाणी साठविणे अत्यंत महत्वाचे आहे. यानंतरचे रोटेशन हे साधारण ९० दिवसांनी येणार असे कळविले. याकरीता दि.२२/०१/२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संस्थान प्रशासकीय अधिकारी, उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), उप अभियंता (बांधकाम), पाणी पुरवठा विभाग प्रमुख व ठेकेदार प्रतिनिधी यांचे समवेत तातडीने बैठक बोलविण्यात आलेली होती.

या बैठकीत कामाच्या प्रगतीबाबत चर्चा करण्यात आली असता साठवण तलाव क्रं.०१ चे सुरु असलेले काम दि.२५/०१/२०१६ अखेर पूर्ण करणे शक्य नसल्याने साठवण तलावाचे तळामध्ये ठेकेदार यांनी लेव्हलींग व रोलींगचे काम पूर्ण करुन घ्यावे व दि.२३/०१/२०१६ रोजी नंतर काम बंद ठेऊन साठवण तलावांमध्ये पाणी भरणेस सुरवात करण्यात यावी तसेच या तलावातील पाणी संपल्यानंतर तळाचे Geomembrane Sheet टाकणे, त्यावर आर. सी. सी बिम व माती टाकण्याचे उर्वरीत कामे हाती घेण्यात यावी असे ठरले. त्यानुसार ठरलेप्रमाणे दि.२३/०१/२०१६ रोजी रात्री ९.०० वाजता संस्थानचे साठवण तलाव क्रं.०१ मध्ये पाणी सोडण्यात आले.

भविष्यातील पाणी टंचाईची भीषणता विचारात घेता संस्थानमार्फत ठरलेप्रमाणे दि.२३/०१/२०१६ रोजी काम बंद ठेऊन साठवण तलावांमध्ये पाणी साठवून घेण्यात आले. त्यावेळी जर गोदावरी कालव्यांस आलेल्या आर्वतनाचे पाणी साठवण तलावामध्ये साठविले गेले नसते तर संस्थानला भीषण पाणी टंचाईस सामोरे जावे लागले असते व त्यामुळे साईभक्तांची फार मोठया प्रमाणात गैरसोय झाली असती व संस्थानला टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करावा लागला असता व त्यावर मोठया प्रमाणात अतिरीक्त खर्च झाला असता.

याबाबत दि.०२/०४/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं.१२ संस्थान परिसरास भाडोत्री टॅंकरव्दारे पाणीपुरवठा करुन घेणे व येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावात साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी साठवण तलावात माहे जानेवारी २०१६ चे आवर्तनाव्दारे आलेले पाणी साठविण्यात येवून Geomembrane Sheet टाकणेचे काम तात्पुरते बंद ठेवणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे माहीती अवलोकनार्थ नमुद करण्यात आलेली होती.

सदर साठवण तलावाचे कामाकरीता आवश्यक Geomembrane Sheet, स्टील व इतर आवश्यक मटेरीयल ठेकेदार यांनी साईटवर आणुन ठेवलेले होते. तथापी त्यांचे काम बंद ठेऊन सदर तीनही साठवण तलावात गोदावरी कालव्यास आलेल्या आर्वतनाचे पाणी साठविण्यात आले.

सदर काम दि.१६/०३/२०१६ अखेरपर्यंत बंद होते. तदनंतर साठवण तलाव क्रं.०१ चे पाण्याचा वापर करून घेउन, सदर तलावाचे कामास दि.१७/०३/२०१६ पासून सुरूवात करणेत आली व दि.०८/०४/२०१६ रोजी तलाव क्रं.०१ चे काम पूर्ण करणेत आले.

दुस-या वेळी दि.०८/०४/२०१६ रोजी आलेल्या आर्वतनामध्ये साठवण तलाव क्रं. ०१ व ०२ मध्ये गोदावरी कालव्यास आलेल्या आर्वतनाचे पाणी साठविण्यात आले व साठवण तलाव क्रं.०३ रिकामा ठेवून तो ठेकेदार यांना कामास उपलब्ध करून देण्यात आला. त्यावेळी देखील आलेल्या आर्वतनामध्ये पाणी टंचाईची भीषणता विचारात घेता संस्थानमार्फत ०३ पैकी उर्वरीत ०२ साठवण तलावांमध्ये (साठवण तलाव क्रं.०१ व ०२) पाणी साठविण्यात आले. ठेकेदार यांना साठवण तलाव क्रं.०२ कामास उपलब्ध करून देण्यात आलेला नव्हता, त्यामुळे सदर तलावाचे काम दि.१९/०५/२०१६ अखेरपर्यंत बंद होते. सदर तलाव क्रं.०२ चे कामास दि.२०/०५/२०१६ पासून सुरूवात करणेत आली व त्यानुसार तलाव क्रं.०२ व ०३ ची सर्व कामे दि.०५/०७/२०१६ अखेर पूर्ण करणेत आली आहेत.

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, पाणी टंचाईची भीषणता विचारात घेता संस्थानमार्फत वेळोवेळी ठेकेदार आर. के. सावंत, नाशिक यांचे चालू असलेले काम बंद ठेवून गोदावरी कालव्यांस आलेल्या आर्वतनाचे पाणी संस्थान साठवण तलावांमध्ये साठविण्यात आलेले आहे. त्यामुळे याकामी झालेला ५० दिवसांचा विलंब हा भीषण पाणीटंचाईमुळे झालेला असून वेळोवेळी ठेकेदार यांचे काम बंद करुन गोदावरी कालव्यास आलेल्या आर्वतनाचे पाणी साठवण तलावांमध्ये साठविल्यामुळे तसेच ठेकेदार यांना पुढील कामांकरीता वाव नसल्याने झालेला आहे.

**प्रस्ताव:-** ठेकेदार यांनी दि.१०/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये, कामास झालेल्या विलंबाकरीता

वरिलप्रमाणे कारणे नमूद करून दि.०५/०७/२०१६ अखेरपर्यंत विना दंड करता मुदतवाढीची तसेच अंतिम बील मिळणेची मागणी केली आहे.

सदर मुदतवाढीचा प्रस्ताव दि. ०९/०३/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. ठेकेदार आर.के.सावंत ,नाशिक यांचे अंतिम बीलाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावांमध्ये ५०० मायक्रॉन एचडीपीई जी.ओ. मेंब्रेने शिट टाकणे. |
| ठेकेदाराचे नांव | आर.के.सावंत नाशिक |
| मंजुर निविदा रक्कम रुपये | ३,५१,८६,८९६/- |
| मंजुर आराखडा व प्रत्यक्ष आराखडयात काही बदल आहे काय | नाही. |
| मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | दि. १६/०४/२०१५ निर्णय क्रं. ११४<br>दि. १५/१२/२०१५ निर्णय क्रं. ६०२ |
| अंतिम बीलाची रक्कम | २,४४,६०,३६४/- |
| आजपर्यंत झालेले पेमेंट रुपये | २,१५,३७,१९५/- |
| मंजुर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च रुपये | १,०७,२६,५३२/- कमी |
| निविदा टक्केवारी (+) (-) | ६.५६ % |
| कमी अथ्वा जास्त झालेल्या खर्चाची टक्केवारी | ३०.४८४ % कमी |
| कामपूर्ण करण्याची मुदत | ०५ महिने (१७/१२/२०१५ ते दि. १६/०५/२०१६ अखेर) दि. ०५/०७/२०१७ रोजी सर्व कामेपूर्ण |

**अभिप्राय/मत:-** ठेकेदार यांनी कार्यादेशाप्रमाणे, निविदेतील स्पेशिफीकेशनप्रमाणे संस्थानचे कनकुरी साठवण तलावामध्ये ५०० मायक्रॉन जी.ओ.मेंब्रेन शिट टाकणेचे काम पुर्ण केले आहे. निविदेतील गाळ काढणे, शिटचे खाली व वरील भागात माती भरणे, जी.ओ.मेंब्रेन शिट, आर.सी.सी..बीम, स्टील, डीवॉटरींग इ.चे कामांमध्ये बचत झाल्याने खर्चात बचत झालेली आहे. मा.मुख्य लेखाधिकारी यांनी पी.एफ व लेबर लायसन्स पुर्तता करणेबाबत सुचना केल्या आहेत. ठेकेदार यांचेकडून अंतिम बील आदा करणेपूर्वी सदर पूर्तता करुन घेणेत येत आहे. तरी ठेकेदार आर.के.सांवत, नाशिक यांचे अंतिम बील रक्कम रु.२,४४,६०,३६४/- मात्र मंजुर होणेस तसेच त्यापोटी उर्वरीत रक्कम रु.२९,२३,१६९/-अदा करणेस मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे कनकुरी येथील साठवण तलावांमध्ये ५०० मायक्रॉन एचडीपीई जी.ओ. मेंब्रन शिट टाकणे कामाचे ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक याचे रु.२९,२३,१६९/- मात्र अंतीम देयक अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.५०** **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी मागील वर्षी केलेल्या कामाचा अहवाल.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

**प्रस्ताव -** मालमत्ता विभागाकडील कं.सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी मागील वर्षी केलेल्या कामाचा अहवाल अवलोकनार्थ सादर

**प्रस्तावना–** संस्थानकडे चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादर करण्यात आला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व दि.१९/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

मालमत्ता विभागाकडील कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्द्तीने मासिक एकत्रित मानधनावर प्रथम वर्षी दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे व

तद्नंतर पुढील मुदतवाढीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/११/२०१६ रोजीचे सभेपूढे प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग यांचे अभिप्रायाचा विचार करता श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांच्या नेमणूकीची मुदत संपुष्टात येत असलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मासिक रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली. परंतु तत्पूर्वी श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,कंत्राटी सल्लागार,मालमत्ता विभाग यांनी मागील वर्षी केलेल्या कामाचा अहवाल सभेसमोर सादर करणेत यावा,असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, (सेवानिवृत्त नायब तहसिलदार),कंत्राटी सल्लागार, मालमत्ता विभाग यांनी मागील वर्षी केलेल्या कामाचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

१) संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी खरेदी करणेसाठी प्राप्त झालेले प्रस्तावांची छाननी करुन खरेदी करणेकामीची कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

२) खरेदी केलेल्या जमीनींची शासकीय मोजणी करुन घेवून महसुल दप्तरी रेकॉर्ड ऑफ राईटला नोंदी करुन घेतल्या आहेत.

३) संस्थान मालमत्तेबाबतचे स्थानिक शासकीय कर भरणेकामीची प्रकरणे तपासून घेतली. त्यात निमगाव-को-हाळे ग्रामपंचायतीकडील संस्थान मालकीच्या अकृषिक बखळ जागेवर (ग्रामपंचायत मिळकत नं.१४०५) ग्रामपंचायतने सन २०१३-१४ व सन २०१४-१५ साठी कर आकारणी रक्कम रु.२५,५६,०००/- केलेली आहे. सदर ग्रामपंचायत कराची आकारणी व त्यापुढील आकारणी रद्द करणेकामीचे प्रकरण तयार करुन सादर केले आहे.

४) मौजे घारी,ता.कोपरगाव येथील संस्थान मिळकतीच्या भूसंपादनाची नुकसान भरपाईची रक्कम रु.२,८४,७६५/- इतकी सन २००४ पासून शासनाकडे प्रलंबित आहे. ती संस्थानला मिळणेकामी प्रकरण करुन पाठपुरावा केलेला आहे.

५) मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्याबाबतचे प्रकरणी व त्याचे मुद्रांक शुल्क प्रकरणी कामकाज केले.

६) संस्थान मालकीच्या भाडेकराराने दिलेल्या मिळकतींचे करारनामे करणेकामी मार्गदर्शन केले आहे.

७) मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील संस्थानसाठी प्रलंबित असलेल्या भूसंपादन प्रकरणे तातडीने निर्गत करणेकामी समन्वय साधून पाठपुरावा केला आहे.

८) संस्थानच्या मिळकती संबंधातील विविध न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये मार्गदर्शन केले.

९) संस्थान मालमत्तेची देखभाल करणे,वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे व त्याबाबत असलेल्या अडचणींबाबत मार्गदर्शन केले.

१०) मालमत्ता विभागाचे दैनंदिन कामकाजात मार्गदर्शन केले.

श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे,(सेवानिवृत्त नायब तहसिलदार),कं.सल्लागार,मालमत्ता विभाग यांनी मागील वर्षी उपरोक्तप्रमाणे कामकाज केलेले आहे.

उपरोक्त अहवाल अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.४०६** **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांनी मागील वर्षी केलेल्या कामाच्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.५१** **महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या ग्रामीण कारागीरांच्या उत्पादनांना श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी परिसरात विक्री केंद्राकरीता जागा मिळणेबाबत, श्री.विशाल चोरडिया, सभापती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचेकडील पत्र.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व

मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता,भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**प्रस्ताव -** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या ग्रामीण कारागीरांच्या उत्पादनांना श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डीच्या आवाराच्या परिसरात विक्री केंद्राकरीता जागा मिळणेबाबत..

**प्रस्तावना -** महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत ग्रामीण कारागीर उद्योजकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने विविध योजना अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येते. मंडळाने अर्थसहाय्य देण्यात आलेल्या पारंपारीक कारागीर,बलुतेदार यांनी उत्पादने उदा-अगरबत्ती,पूजेचे साहीतय,मिठाई,पापड लोणची, खादी कपडे इ.अशा अनेक उत्पादनांचा समावेश आहे. मंडळामार्फत अर्थसहाय्य देण्यात येणारे कारागीर प्रामुख्याने २० हजारपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या खेडयात उत्पादन करतात. ही ग्रामोद्योगी उत्पादने कोणतीही मोठी यंत्रसामुग्री न वापरता पारंपारीक पध्दतीने मानवी सहभागातून उत्पादने केली जातात. या उत्पादनांना शहरामध्ये मोठया प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होत नाही. प्रसिध्दी,अल्प भांडवली गुंतवणूकीमुळे मोठया ब्रॅडच्या स्पर्धेत उभी राहू शकत नाही.शिर्डी हे साईबाबांच्या स्पर्शाने पावन झालेले तीर्थक्षेत्र आहे. येथे सर्व धर्माचे भाविक जगभरातून येत असतात. अशा पावन प्रसिध्द ठिकाणी मंडळाच्या कारागीरांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना विक्री केंद्राकरीता जागा उपलब्ध करुन दिल्यास खेडयातील सर्व धर्म पंथातील ग्रामोद्योगी पारंपारीक कारागीरांना उत्पादीत केलेल्या मालास मोठी बाजारपेठ मिळून प्रसिध्दी मिळणार आहे. यामुळे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेस चालना मिळणार आहे. तरी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट आवारात विक्री केंद्राकरीता जागा उपलब्ध करुन द्यावी,असेबाबत श्री.विशाल चोरडिया,सभापती,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांनी विषयांकित पत्राद्वारे विनंती केलेली आहे

**विभागाचा अभिप्राय–** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाने त्यांचेकडील दि.२१/०४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये साईबाबा भक्तनिवासस्थान येथे एकूण ३३ गाळे असून सदरचे सर्व गाळे संस्थानचे विविध विभागांसाठी वापरासाठी दिलेले असलेचे कळविलेले आहे. या व्यतिरिक्त संस्थान मालकीचे अन्यत्र गाळे उक्त केंद्रास वापरण्यास देण्यासाठी उपलब्ध नाहीत. याशिवाय यापूर्वी महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या.(महाटेक्स) मुंबई यांनी त्यांचे विक्री केंद्रासाठी संस्थानकडे जागा मागणी केलेली होती. त्याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला असता त्यावर निर्णय क्रं.८३६ अन्वये महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्या.(महाटेक्स) मुंबई यांना त्यांच्या संस्थेच्या दुकानासाठी संस्थानची जागा उपलब्ध करुन दिल्यास इतरही संस्था जागेची मागणी करतील. म्हणून उपरोक्त प्रस्ताव अमान्य करण्यात आला असलेचा निर्णय करणेत आलेला आहे. अशा परिस्थितीत उक्त संस्थेस संस्थान परिसरात त्यांचे विक्री केंद्रासाठी जागा उपलब्ध करुन देणे उचित होणार नाही.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरामध्ये एखाद्या संस्थेस/ मंडळास जागा दिल्यास इतर संस्थाही जागेची मागणी करतील, परंतु महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ खेडयापाडयातील पारंपारीक कारागीरांना उद्योगांसाठी आर्थिक सहाय्य करते व ही उत्पादने मोठया ब्रॅण्डच्या स्पर्धेत उभी राहू शकत नाही, या बाबींचा विचार करता, संस्थान निवासस्थान परिसरामध्ये, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळास ग्रामीण कारागीरांची उत्पादनांची विक्री करणेसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.५२** **२.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेबाबत चर्चा करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव :-** अपारंपारिक ऊर्जेअंतर्गत श्री साईबाबा संस्थानने मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांचेमार्फत भोयरे पठार (सुपा) याठिकाणी २.५ मेगावॅट पवनचक्की प्रकल्प उभारुन दिनांक १४ ऑगस्ट २००७ रोजी दुपारी १६.०० वाजता प्रकल्प चालू करुन कार्यान्वित केलेला आहे. सदर प्रकल्प उभारणीच्या कामास एकुण रु. १५,३९,६४,८००/- इतका खर्च आलेला आहे. प्रकल्प चालू झाल्यानंतर (दि.१४-०८-२००७ पासून) वीज उत्पादनाच्या उत्पन्नाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कालावधी | दर वर्षी मिळालेली रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१) | दि. १४-०८-२००७ ते दि.३१-०३-२००८ | रु. ०,६८,०४,६००/- |
| ०२) | दि. ०१-०४-२००८ ते दि.३१-०३-२००९ | रु. १,८४,६६,५०८/- |
| ०३) | दि. ०१-०४-२००९ ते दि.३१-०३-२०१० | रु. १,८१,४३,०६७/- |
| ०४) | दि. ०१-०४-२०१० ते दि.३१-०३-२०११ | रु. १,७०,०६,१६९/- |
| ०५) | दि. ०१-०४-२०११ ते दि.३१-०३-२०१२ | रु. १,९४,४९,०७७/- |
| ०६) | दि. ०१-०४-२०१२ ते दि.३१-०३-२०१३ | रु. २,०५,२७,३७२/- |
| ०७) | दि. ०१-०४-२०१३ ते दि.३१-०३-२०१४ | रु. २,१८,०५,३१५/- |
| ०८) | दि. ०१-०४-२०१४ ते दि.३१-०३-२०१५ | रु. २,००,१४,४९१/- |
| ०९) | दि. ०१-०४-२०१५ ते दि.३१-०३-२०१६ | रु. २,०१,१२,०३०/- |
| १०) | दि. ०१-०४-२०१६ ते दि.३१-०३-२०१७ | रु. २,२१,०९,७८२/- |
| **पवनचक्की प्रकल्पातून आतापर्यंत झालेले एकुण उत्पन्न रक्कम रुपये :-** | | रु. १८,४४,३८,४११/- |

**उपरोक्त तक्त्यानुसार ९ वर्ष ८ महिने या कालावधीत पवनचक्की प्रकल्पातून आतापर्यंत रक्कम रुपये १८,४४,३८,४११/- इतके उत्पन्न झालेले आहे.** संस्थानचे पवनचक्की प्रकल्पाव्दारे निर्माण झालेली वीज महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला **सध्या प्रति युनिट ४ रुपये ८५ पैसे** या दराने विक्री केली जाते. सदरील वीज विक्रीचे दर हे महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग यांचेमार्फत ठरविले जातात.

पवनचक्की प्रकल्पातून संस्थानला एका वर्षामध्ये सरासरी **१,८८,२०,२४६/-** रुपये इतके वार्षिक उत्पन्न मिळते. सुरुवातीस ऑगस्ट-२००७ ते जुलै २००८ एक वर्ष मे.सुझलॉन एनर्जी लि., यांनी फ्री सर्व्हिस दिलेली होती. त्यानंतर ऑगस्ट-२००८ ते मार्च-२०१२ या कालावधीत तसेच त्यानंतर एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१७ या कालावधीसाठी मे.सुझलॉन एनर्जी लि., यांना कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले होते. या कालावधीत त्यांनी समाधानकारक रित्या सर्व्हिस दिलेली आहे. ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टपोटी आलेला मागील कालावधीतील टॅक्ससहित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कालावधी | दर वर्षी आदा केलेली (**टॅक्ससहित**) रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१) | ऑगस्ट-२००७ ते जुलै-२००८ | फ्री |
| ०२) | ऑगस्ट-२००८ ते मार्च २००९ (८ महिने) | रु. ०,१६,१५,१०४/- |
| ०३) | एप्रिल-२००९ ते मार्च-२०१० | रु. ०,२६,०१,६११/- |
| ०४) | एप्रिल-२०१० ते मार्च-२०११ | रु. ०,२७,३१,७०५/- |
| ०५) | एप्रिल-२०११ ते मार्च-२०१२ | रु. ०,२८,६८,३२५/- |
| ०६) | एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१३ | रु. ०,३०,३२,२३८/- |
| ०७) | एप्रिल-२०१३ ते मार्च-२०१४ | रु. ०,३१,६४,०४८/- |
| ०८) | एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१५ | रु. ०,३३,२२,२५१/- |
| ०९) | एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ | रु. ०,३४,८८,३६२/- |
| १०) | एप्रिल-२०१६ ते मार्च-२०१७ | रु. ०,३७,१८,३३५/- |
| **सी.ए.एम.सी.पोटी आतापर्यंत मे.सुझलॉन यांना आदा केलेली टॅक्ससहित रक्कम रु. :-** | | **रु. ०२,६५,४१,९७९/-** |

मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांना माहे एप्रिल-२०१२ ते मार्च-२०१७ या ०५ वर्ष कालावधीकरीता ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मा.त्रिसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०२-२०१३ चे सभेतील विषय क्र.६८ निर्णय क्र.१८८ नुसार मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांचेशी दि०१-०४-२०१२ ते दि.३१-०३-२०१७ या ०५ वर्ष कालावधतील ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा करारनामा करणेस व प्रस्तावात नमूद केलेली दरवर्षी होणारी उपरोक्त तक्त्यातील रक्कम + टॅक्सेस त्या-त्या संबंधित आर्थिक वर्षात मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांना आदा

करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांचेशी दि०१.०४.२०१२ ते दि.३१.०३.२०१७ या ०५ वर्ष कालावधीतील ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टकामी करारनामा करण्यात आलेला होता. मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांनी गेल्या १० वर्षात समाधानकारकरित्या सर्व्हीस दिलेली आहे.

तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे समोरC.A.NO.9219 OF 2014 IN PIL NO.18 OF 2011 दि.२६-०९-२०१४ अन्वये झालेल्या सुनावणीत "वार्षिक मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्श टाईप सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधित मशिनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हीस डिलरला पुर्वीच्या अटी व शर्तीवर देण्यात यावे" असा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे.

**मागणी :-** आता मे.सुझलॉन एनर्जी लि.,पुणे यांनी आतामाहे एप्रिल-२०१७ ते मार्च २०२२ या पुढील ०५ वर्ष कालावधीकरीता ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर खालीलप्रमाणे कळविलेले आहे. या दरामध्ये टॅक्सेचा समावेश केलेला नाही. ( टॅक्सेसची रक्कम अतिरिक्त आदा करावी लागणार आहे.)

| Sr.No. | O & M Charges for the period | Rate per WTG per Annum (Rappes) (टॅक्स विरहित रक्कम) | Total [Rate per WTG* No of WTGs] (टॅक्स विरहित रक्कम) | Due Date |
|---|---|---|---|---|
| १ | १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ | १७,४७,०९०/- | ३४,९४,१८०/- | १ एप्रिल-२०१७ |
| २ | १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ | १८,७८,१२२/- | ३७,५६,२४४/- | १ एप्रिल-२०१८ |
| ३ | १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० | २०,१८,९८१/- | ४०,३७,९६२/- | १ एप्रिल-२०१९ |
| ४ | १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ | २१,७०,४०४/- | ४३,४०,८०८/- | १ एप्रिल-२०२० |
| ५ | १ एप्रिल २०२१ ते ३१ मार्च २०२२ | २३,३३,१८४/- | ४६,६६,३६८/- | १ एप्रिल-२०२१ |

यापुर्वी गेली १० वर्षाकरीता असलेल्या CAMC च्या दरामध्ये प्रती वर्षी ५ % Escalation (वाढ) धरुन मे.सुझलॉन यांनी दर दिलेले होते. आता पुढील पाच वर्षाकरीता त्यांनी प्रविवर्ष ७.५% Escalation (वाढ) दर नमुद केलेले आहेत. याकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२८-०४-२०१७ चे सभेत हा विषय सादर करण्यात आला होता. परंतु याविषयावर चर्चा झाली नाही. त्यानंतर संस्थान जाक्र.एसएसएसटी / विद्युत / ६५५ / २०१७ दि.०६ मे, २०१७ अन्वये मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना पत्र पाठवून आता आपण माहे एप्रिल-२०१७ ते मार्च-२०२२ या पुढील ०५ वर्ष कालावधीकरीता ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे प्रतिवर्ष दरातील ७.५ **%** Escalation **(**वाढ**)** रद्द होणेस व तसे संस्थानला उलट टपाली त्वरीत कळविणेबाबत कळविण्यात आले होते. या पत्रास अनुसरुन त्यांनी दि.०६-०५-२०१७ रोजी ई-मेल पाठवून मे.सुझलॉन यांनी कळविलेली वाढ (Escalation) ७.५ **%** योग्य असून याबाबत आम्ही मा.व्यवस्थापन समितीसमोर चर्चा करणेस तयार असल्याचे मे.सुझलॉन यांचे प्रतिनिधींनी लेखी कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** (०१). मे.सुझलॉन एनर्जी लि., पुणे या कंपनीचे नावात बदल झालेला असल्याने त्यांनी पत्रात नमूद केल्यानुसार मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे या नविन नावाने नोंद घेऊन माहे एप्रिल- २०१७ ते मार्च- २०२२ या पुढील ०५ वर्ष कालावधीकरीता ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे नांवे देणेस तसेच**(०२).**ऑपरेशन-मेन्टेनन्स कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टची दरवर्षी होणारी रक्कम + टॅक्सेस त्या-त्या संबंधित आर्थिक वर्षात मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांना आदा करणेस व **(०३).** पुढील पाच वर्षासाठी मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचेशी CAMC चा करारनामा करणेकामी मान्यता घेणेसाठी तसेच (०४). दरातील ७.५ % Escalation (वाढी) बाबत त्यांचे प्रतिनिधींशी चर्चा करून निर्णय होणेस विंनती.

**निर्णय क्र.४०८** **२.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट देणेसाठीच्या दरांवर चर्चा करणेसाठी मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे यांचे प्रतिनिधी आजचे सभेत उपस्थित होते. समितीने त्यांचेबरोबर CAMC चे पुढील ०५ वर्षाच्या दरांबाबत चर्चा केली. त्यांनी मागणी केलेले दर सदरहू पवनचक्कीच्या उत्पन्नातून मिळणाऱ्या रकमेच्या २५% आहेत. समितीने त्यांना पवनचक्कीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या १०% मात्र दरांमध्ये CAMC करावी, असे सांगितले असता, त्यांचे प्रतिनिधींनी वरीष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बोलणी करुन कळवितो, असे सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मे.सुझलॉन ग्लोबल सर्व्हिसेस लिमिटेड, पुणे हे पवनचक्कीमार्फत मिळणाऱ्या उत्पन्नाच्या १०% दरावर तयार असतील तरच त्यांना २.५ मेगावॅट पवनचक्की यंत्रणेचे कॉम्प्रसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रक्ट पुढील ०५ वर्ष कालावधीसाठी देणेत यावे, अन्यथा याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.५३** **लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलर करीता वार्षिक इंधन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) २१ (१) चा (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन.

२) २१ (१) चा (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावीक –** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात सन-२००० पासुन लॉण्ड्री युनिट कार्यान्वित करण्यात आलेले आहे. सदर युनिटमध्ये साईप्रसाद निवासस्थान, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, मंदिर, वाहन विभाग, शैक्षणिक संकुले इ. विभागाकडील बेडशिट, उशिकव्हर, चादर, गादीकव्हर, पडदे, रग, बसेसचे शिटकव्हर, आदी कपडे धुवून इस्त्री केली जातात.

लॉण्ड्रीचे कामकाज गरजेनुसार दोन शिफ्टमध्ये करण्यात येते. त्याद्वारे प्रतिदिवशी (दोन शिफ्ट असल्यास) साधारणपणे १५०० ते १६०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात. धुण्यासाठी येणा-या कपडयांमध्ये प्रामुख्याने नमुद निवासस्थान विभागाकडील व्हि.आय.पी. खोल्यांचे धुतलेले टॉवेल सुकविण्यासाठी तसेच पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी बॉयलरद्वारे स्टीम देवून कपडे सुकविले जातात, त्याचप्रमाणे धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडर मशिनचा दैनंदिन वापर केला जातो. याकरीता कॅलेंडर मशिनला स्टीम दयावी लागते. मशिनमध्ये धुवून पिळलेले बेडशिट, उशिकव्हर घातल्यावर सुकून इस्त्री होऊन बाहेर पडतात. या दोन्ही मशिनसाठी २०० किलो क्षमतेचा स्टिम बॉयलर कार्यान्वित आहे.

संस्थानचे वाहन विभागामार्फत इंधन खरेदीचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन दि.१९/०५/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे, यामध्ये संस्थानचे विविध विभागांकरीता लागणारे सर्व प्रकारचे इंधन खरेदीकामी मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरी शिव, शिर्डी यांचे प्रचलीत इंधन दरामध्येरु.०.५० पैसे मात्र सवलत व मागणीतील अटी/शर्तीनुसार बीलास ३० दिवसाचे क्रेडीट हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, पुरावठा आदेश देण्यात यावा असे नमुद असल्याने जा.नं.एसएसएस/वाहन/१२९७/२०१६ दि.१६/०६/२०१६ अन्वये वाहन विभागाने पुरवठा आदेश पारीत केला आहे. तरी सदरकामी येणा-या अंदाजे खर्चास दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये लॉण्ड्रीकरीता माहे- जुलै -२०१६ ते माहे – जुन २०१७ करीता वार्षिक इंधन खरेदी करणेस व याकामी येणा-या रुपये ४,४०,०००/- (अक्षरीरुपये चार लाख चाळीस हजार) खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

लॉण्ड्रीतील स्टिम बॉयलरकरीता दररोज सरासरी २० लिटर डिझेल X ३० दिवस = ६०० लिटर X १२ महिन्याकरीता = ७२०० लिटर लागते, एका वर्षाकरीता स्टिम बॉयलर व कॅलेंडर मशिनकरीता ०५ लिटर ऑईल व सर्व मशिनरी करीता ०३ किलो ग्रीस लागते.

**मागणी-** माहे- जुलै २०१७ ते जुन -२०१८ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७२०० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी व कॅलेंडर मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरीसाठी ०३ किलो ग्रीसची आवश्यकता भासणार आहे.

वरील इंधन खरेदीकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च (संभाव्य वाढ विचारात घेवून) अपेक्षित आहे .

७२०० लिटर डिझेल X ६४ अंदाजे दर रुपये प्रती लिटर = ४,६०,८००/-
०५ लिटर ऑईल X २८० अंदाजे दर रुपये प्रती लिटर = १,४००/-
०३ किलो ग्रीस X ३३० अंदाजे दर रुपये प्रती किलो = ९९०/-

**एकूण रुपये - <u>४,६३,१९०/-</u>**
**पुर्णांकित रुपये - ४,६५,०००/-**
**(अंदाजे पुर्णांकित रुपये चार लाख पासष्टहजार मात्र)**

वाहन विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांना लागणारे सर्व प्रकारचे इंधन खरेदीकामी नविन दरपत्रके मागविणेची कार्यवाही सुरु आहे. दरपत्रके मंजुरीनंतर नविन न्युनतम दरधारक यांचे पेट्रोल पंपावरुन

आवश्यक इंधन खरेदी करता येईल तो पर्यंन्त संदर्भ क्र.०१ चे मंजुर ठरावान्वये मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरी शिव, शिर्डी या पेट्रोल पंपावरुन आवश्यक इंधन खरेदी करणेस मान्यता असावी हि विनंती.

**संस्थान अधिनियम यानुसार छाननी करुन अनुमान–** नमुद अधिनियमातील तरतुदी नुसार व संमत मा.व्यवस्थापन समितीचे मंजुर ठरावानुसार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागात असणा-या लॉण्ड्रीतील मशिनरी करीता इंधन खरेदी करता येईल.

**विभागाचा अभिप्राय–** माहे- जुलै २०१७ ते माहे- जुन २०१८ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ७२०० लिटर डिझेल स्टिम बॉयलरसाठी, कॅलेंडर मशिनसाठी ०५ लिटर ऑईल व लॉण्ड्रीतील सर्व मशिनरींसाठी ०३ किलो ग्रीसची आवश्यकता असून त्याकामी येणा-या अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

**विषय नं.५४** **साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतींमध्ये निवास करणाऱ्या साईभक्तांना सोलर सिस्टीमद्वारे गरमपाणी पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) २१ चा १ चा (क) –मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन.

२) (ग)- भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात पार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) (त्र)- भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव-** संदर्भ- दि.०८/१०/२०१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं.५६ व निर्णय क्र.७५६

**प्रस्ताविक-** साईबाबा संस्थान अधिनस्त साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये (५००खोल्या ) व दुरवरुन येणा-या साईभक्तांची राहण्याची सोय केलेली आहे.सदर इमारतीमध्ये एकूण ०५ विंग असून ४९५ खोल्या मधून अंदाजे २००० साईभक्तांची निवासाची सोय केली जाते.साईभक्तांना स्नाना करीता गरम पाण्याची सोय व्हावी,यासाठी दि.१३/१२/२००१ व नंतर दि.०१/०३/२००४ साली इमारतीचे छतावर सोलर वॉटर हिटींग सिस्टीम उभारली आहे त्यासाठी संस्थानने ३८,६०,०००/- (अक्षरी रु.अडवतीस लाख , साठ हजार, मात्र) इतका खर्च केला आहे. सोलर वॉटर हिटींग सिस्टीमव्दारे ०५ विंगसाठी ५४,००० लिटर पाणी गरम होण्याची क्षमता असुन सदर पाणी ४५०० लिटर क्षमतेच्या १२ टाक्यामध्ये साठविण्याची व्यवस्था केली आहे.

दि.२९-३०/०५/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत विषय नं.५६ व निर्णय क्र.२६४ अन्वये ०५ विंग मधील प्रत्येक स्टोअरमध्ये गरमपाणी नळाचे कनेक्शन सुरु करुन साईभक्तांना त्यांना दिलेल्या खोल्यांपर्यंत गरम पाणी प्रति व्यक्ती प्रती बादली रु.०३/- प्रमाणे आकारणी करुन पुरविले जाते. सदरहु प्रती बादली रु.०३/- पैकी अर्धी रक्कम रु.०१.५०/- प्रमाणे वाहतुक खर्चापोटी मेहनतांना रक्कम साई संस्थान एम्प्लॉलाईज क्रे.को, सोसायटी, शिर्डी यांना अदा केली जाते.

दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेमधील विषय नं.५६ व निर्णय क्र.७५६ नुसार सदर काम दि.०६/१०/२०१३ पासून पुढील ०५ वर्षासाठी दि.०५/१०/२०१८ पर्यंत देण्यात आले आहे. गरम पाणी वितरणापोटी रु.०१.५०/- प्रति बादली प्रमाणे प्रती महिना अंदाजे एक ते दिड लाख रुपये संस्थान पतपेढीस अदा करण्यात येतात.

**विभागाची मागणी-** नुतनीकरणाचे कामाचे वेळी प्रत्येक खोली मध्ये २४ तास गरम पाणी साई भक्तांना उपलब्ध होईल यासाठी पाणीपुरवठा विभागामार्फत प्रत्येक खोलीमधील स्नानगृहात गरम पाण्याचा पुरवठा होण्यासाठी स्वतंत्र पाईपलाईनची व्यवस्था करता येईल, त्यांनतर खोलीवर बादलीव्दारा गरम पाण्याचा पुरवठा करावा लागणार नाही.

**छाननी करुन अनुमान-** यामुळे साईभक्तांची गरम पाण्याची होणारी व्यवस्था याचा विचार करता, सदर कार्य करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** संस्थान कर्मचारी सोसायटी ऐवजी जर आपल्या कर्मचा-यांमार्फत साईभक्तांना गरम पाणी पुरविल्यास,

१) कर्मचा-यांमार्फत साईभक्तांना गरम पाणी त्यांना दिलेल्या खोल्या पर्यंत पुरवावे लागेल.

२) लॉकर हॉलचे ठिकाणी साईभक्तांना मोफत गरम पाणी पुरवण्यासाठी नळाचे स्वतंत्र कनेक्शन पाणीपुरवठा विभागामार्फत दयावे लागेल.

३) साईभक्तांकडून सेवाआकारापोटी गरमपाण्यासाठी आकारण्यात येणारी प्रती व्यक्ती, प्रती बादली रु.०३/-प्रमाणे जे देणगी मुल्य आकारले जाते ते रद्द करावे लागेल,कारण सदरची गरम पाणी व्यवस्था पुर्णपणे मोफत असेल. त्यासाठी प्रचलित संगणकिय कार्यप्रणाली मध्ये आवश्यक ते बदल करावे लागतील.

४) कर्मचारी सोसायटीला पत्र देऊन त्यांनी स्थापीत केलेला बॉयलर व वितरण व्यवस्था बंद करावी लागेल.

५) २४ तास गरम पाणी पुरवठा करण्यासाठी सध्याचे सोलर यंत्रणेमध्ये मॅकेनिकल विभागामार्फत आणखी वाढ करुन गरम पाणी साठवण क्षमता वाढवावी लागेल. सदरचे काम संस्थानचे मेकॅनिक विभागामार्फत असल्याने त्यांना सदर बाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा लागेल.

६) नुतनीकरणाचे कामाचे वेळी प्रत्येक खोलीमध्ये गरम पाणी पुरविण्यासाठी स्वतंत्र पाईप लाईन टाकण्याचे प्रावधान ठेवणेबाबत संबंधीत बांधकाम व पाणीपुरवठा विभागास अवगत करावे लागेल

७) प्रस्तुतकामी दि.०८/१०/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील पाच वर्ष कालावधीचा गरमपाणी वाटपाबाबतचा निर्णय क्र.७५६ निरस्त करावा लागेल.

उपरोक्त बाबीचे मान्यतेसाठी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतींमध्ये निवास करणाऱ्या साईभक्तांना सोलर सिस्टीमद्वारे स्वतंत्र नळकनेक्शनने गरमपाणी पुरविणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, यापुर्वी साईबाबा भक्तनिवास इमारतीचे नुतणीकरण व दुरुस्ती करणेस मान्यता देण्यात आलेली आहे, सदरहू कामाचाही त्यामध्ये समावेश करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

**विषय नं.५५** **जादा वैद्यकिय बीलाचा परतावा अदा करणेस मंजरी मिळणे.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१२/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.२०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री.अशोक नामदेव झुंगे<br>विभाग-भांडार विभाग<br>हुद्दा- अधिक्षक | स्वतः व मुलां करीता | Epilepsy | डॉ.टिंगरे | साईबाबा हॉस्पिटल | ६३५५.०० | ६३५५.०० | |
| २ | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- परिचारीका | आई/ वडिल | Diabetes & Arthritis | डॉ.काळे व डॉ.इंगळे | साईबाबा हॉस्पिटल | ४७०७.०० | ४७०७.०० | |
| ३ | श्री.दिपक सुर्यकांत लोखंडे<br>विभाग-लेखाशाखा हॉस्पिटल<br>हुद्दा- लिपीक टंकलेखक | आई | Diabetes & Blood Presure | डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ३११४.०० | ३११४.०० | |
| | | | | | **एकूण** | **१४१७६.००** | **१४१७६.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| ४ | श्री.जगन्नाथ देवराम डांगे<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा- डायलेसीस तंत्रज्ञ | स्वतः | Ca | डॉ.जोशी | टाटा मेमोरीयल हॉस्पिटल,मुंबई | ३०४७.०० | ३०४७.०० | अ.नं.४ ते ०९ करीता सदरचे |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री.परसराम सोमाजी भालेराव<br>विभाग-सरंक्षण<br>हुद्दा-पहारेकरी | पत्नी | Dengue N S 1 Reactive | डॉ.काटे | रुबी हॉल क्लिनीक,पुणे | ५०६०५.०० | ४९८२२.०० | उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पाठविणेत आले आहे. |
| ६ | श्री.बाळासाहेब बन्शी डांगे<br>विभाग-साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा- ओटी असिस्टट | स्वंतः | Ca | डॉ.रामनाईक | दिनानाथ मंगेशकर रुबी हॉल क्लिनीक,पुणे | १३१०७७.०० | १२२०७१.०० | |
| ७ | श्री.गोरक्षनाथ जगन्नाथ वाणी<br>विभाग-साईबाबाभक्तनिवास<br>हुद्दा-लिपीक | पत्नी | Ca | डॉ.राम नाईक | आनंद रुषीजी, हॉस्पिटल, अहमदनगर | १४७३०.०० | १४६५०.०० | |
| ८ | श्रीमती सुनंदा तात्यासो बावके<br>विभाग-बगीचा<br>हुद्दा – मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.राम नाईक | प्रवरा रुरल हॉस्पिटल,लोणी | ६८२५.०० | ६२५५.०० | |
| ९ | श्री.योगेश त्रिंबक साळवी<br>विभाग-लेखाशाखा<br>हुद्दा-मदतनीस | स्वंतः | Ca | डॉ.खांदे | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक | १२९७४५.०० | १२९७४५.०० | |
| | | | | | **एकुण** | **३३६०२९.००** | **३२५५९०.००** | |
| | **क-संस्थानच्या मान्य यादीत पाठविले होते परंतु उपचार न झाल्याने निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जावुन उपचार घेतले.** | | | | | | | |
| १० | श्री.कुलभैया शेषराव राधाकृष्ण<br>विभाग-साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा-लॅब टेक्नीशियन | वडिल | Ca | डॉ.जाधवर | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक | ३१०५३.०० | २३४५०.०० | |
| | | | | | एकुण | ३१०५३.०० | २३४५०.०० | |
| | | | | | **अ + ब+क एकूण** | **३८१२५८.००** | **३६३२१६.००** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.३६३२१६.०० इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५६** **संस्थान कर्मचारी उपचारार्थ श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक व डॉ.हेगडेवार रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयांचा संस्थानच्या मान्य यादीतील रुग्णालयात समावेश करणे.**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचारी उपचारार्थ एकुण २४ रुग्णालया व्यतिरिक्त आणखी दि.०३-०९-२०१६ रोजीच्या मिटींगमध्ये तीन नविन हॉस्पिटलचा समावेश करणेत आलेला आहे.

१) श्री गणपती नेत्रालय,जालना

२) तुलसी आय हॉसिप्टल,नाशिक

३) क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नाशिक

वरील हॉस्पिटलला मान्यता देण्यात आलेली आहे.तसेच सदर मिटींग दरम्यान १) श्री गुरुजी रुग्णालय,नाशिक २) डॉ.हेगडेवार रुग्णालय,औरंगाबाद या धर्मदाय रुग्णालयांचाही संस्थानचे मान्य यादीमध्ये समावेश करणेत यावा अशा सुचना देण्यात केल्या होत्या.

तथापी श्री गुरुजी रुग्णालय,नाशिक यांच्या हॉस्पिटलचा अहवाल मागविला असता सदर हॉस्पिटल पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट असुन एकुण ४५ खाटांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय असनु उत्तर महाराष्ट्रात धर्मदाय रुग्णालय म्हणुन ओळखले जाते.तसेच सदर रुग्णालयात कॅन्सर, युरॉलॉजी, लॅप्रोस्कोपी, प्लास्टीक सर्जरी, पॅडीयाट्रीक, जनरल मेडिसीन, डायलेसीस युनिट, इ.एन.टी.पॅथोलॉजी, ऑक्युपेशनल थेरपी, स्पिच थेरपी,आयुर्वेद, नेत्ररोग,स्त्री रोग,त्वचारोग, रेडिएशन केमोथेरपी, इत्यादीसाठी ना नफा ना तोटा या तत्वाद्वारे उपचार केले जाते.अदयावत उपकरणे, माफक व किमान दरात उपचार राजीव गांधी जीवनदायी योजना सर्व नामांकित विमा कंपनी सोबत करार उपरोक्त सेवा सुविधांचा लाभ गरजु रुग्णांना आपल्या संदर्भीत रुग्णालयात रेफरल हॉस्पिटल लिस्ट समाविष्ट करावे अशी त्यांनीही विनंती केलेली आहे.

तसेच डॉ. हेडगेवार रुग्णालय,औरंगाबाद यांचाही रुग्णालयात समावेश करणेकामी त्यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. डॉ.हेडगेवार हॉस्पिटल,औरंगाबाद ३०० खाटांचे सुपर स्पेशालीटी मराठवाडयात नामांकित हॉस्पिटल म्हणुन ओळखले जाते.तेथील अदयावत उपकरणे, प्रशिक्षीत कर्मचारी,माफक व किमान दरात वैद्यकिय सुविधा सर्व नामांकित इश्युरन्स कंपनीसोबत करार,राजीव गांधी जीवनदायी योजना, तसेच सर्व प्रकारचे उपचार एकाच ठिकाणी उपचाराकरीता प्रसिध्द आहे त्याचा लाभ घेता येईल.

तरी उपरोक्तप्रमाणे १) श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक, २) डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद यांचा प्राप्त अहवालानुसार रुग्णालये समाविष्ट करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** संस्थान कर्मचारी उपचारार्थ बाहेरील (रेफर सेंटर) श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयात उपचार होत नसल्यास संस्थान मान्य यादीत एकुण २७ रुग्णालये असुन या व्यतिरिक्त १) श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक २) डॉ.हेगडेवार रुग्णालय,औरंगाबाद या नव्याने दोन हॉस्पिटलचा समावेश करण्यात यावा असे ठरले. दोन्ही हॉस्पिटलचा अहवाल प्राप्त झाला असुन सदरील रुग्णालये चॅरीटेबल असुन कमी खर्चीक व चांगल्या प्रकारची रुग्ण सेवा मिळेल तरी संस्थान मान्य यादीत समावेश करणेकरीता वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचारी उपचारार्थ श्री गुरुजी रुग्णालय, नाशिक व डॉ.हेगडेवार रुग्णालय, औरंगाबाद या रुग्णालयांचा संस्थानच्या मान्य यादीतील रुग्णालयांमध्ये समावेश करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५७** **श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका श्री साईबाबा हॉस्पिटल, यांनी कामावर असताना खालीलप्रमाणे गैरशिस्त वर्तन केलेले असल्यामुळे जा.नं.एसएसएस/वशी७ए/७१४८/२०१६ दि. ३१.०३.२०१६ अन्वये त्यांचेवर आरोपपत्र ठेवण्यात आलेले आहे. जा.नं.एसएसएस/वशी७ए/७१४९/२०१६ दि. ३१.०३.२०१६ अन्वये सदरच्या आरोपपत्रांचे खाते चौकशीकामी ॲड. बी.वाय.काळवाघे, कोपरगाव यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. ॲड. काळवाघे यांनी नियमाप्रमाणे खाते चौकशी पूर्ण करुन दि १७.०१.२०१७ रोजीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे.

**अ) गैरशिस्त वर्तनाचा तपशिल -**

श्रीमती निता अनिल खैरनार, ह्या दि.०५.०९.२००८ पासून परिचारिका, या पदावर श्री साईबाबा हॉस्पिटलकडे कार्यरत आहेत. त्या दि. १६.०८.२०१० ते दि. ०२.१०.२०१० या कालावधीत विनापरवानगी गैरहजर होत्या. त्याबद्दल त्यांना यापूर्वी सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्या दि. २७.१२.२०१० ते दि. ०९.०२.२०११ असे एकूण ४५ दिवस, गर्भपात कारणासाठीच्या रजेवर होत्या. सदरची रजा उपभोगल्यानंतर त्यांनी दि. १०.०२.२०११ रोजी कामावर हजर होणे आवश्यक होते. परंतू त्या दि. १०.०२.२०११ पासून सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावर गैरहजर आहेत. त्यामुळे रुग्णालयाचे दैनंदिन कामकाजात अडचणी येतात. तसेच रुग्ण सेवेवर विपरीत परिणाम होतो. याबद्दल जा.नं.एसएसएस/वशी-७बी/६९९६/२०११ दि. २५.०२.२०११ अन्वये रजिष्टर ए.डी. पोस्टाद्वारे पत्र पाठवून त्यांना कळविण्यात आले आहे की, सात दिवसांच्या आत विनापरवानगी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे. सदरची नोटीस

त्याना दि. २८.०२.२०११ रोजी प्राप्त झालेली आहे. परंतू श्रीमती खैरनार, यांनी गैरहजेरीबाबतलेखी खुलासा सादर केलेला नाही तसेच त्या कामावर हजर झालेल्यानाहीत. त्याबद्दल पुन्हा त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-७बी/७५२८/२०११ दि. २३.०३.२०११ अन्वये रजिष्टर ए.डी.पोष्टाद्वारे पत्र पाठवून कळविण्यात आले आहे की, दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे अन्यथा संस्थान सेवेत स्वारस्य नाही, असे समजून तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र त्यांना दि. २६.०३.२०११ रोजी प्राप्त झालेले आहे. त्यानंतर जा.नं. एसएसएस/वशी-७बी/२५७/२०११ दि. १८.०४.२०११ अन्वये रजिष्टर ए.डी. पोष्टाद्वारे पत्र पाठवून कळविण्यात आले आहे की, अंतिम संधी म्हणून तुम्ही, सदरचे पत्र मिळताच दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हास, संस्थान सेवेत स्वारस्य नाही, असे समजून तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. परंतू श्रीमती खैरनार, अद्यापपर्यंत कामावर हजर झालेल्या नाहीत. तसेच त्यांनी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर केलेला नाही.

अशा प्रकारे संपूर्ण प्रामाणिकपणा कायम राखेल, सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल, संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही या नियमांचे त्यांनी उल्लंघन केलेले आहे. श्रीमती खैरनार, यांची कृत्ये गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचा-यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ नुसार गंभीर गैरशिस्त वर्तने ठरतात.

**आ)** गैरवर्तनाचे स्वरुप –

श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, यांनी श्री साईबाबा हॉस्पिटल, येथे परिचारीका म्हणून कामास असताना खालीलप्रमाणे गंभीर गैरशिस्त वर्तन केलेले आहे.

| **अ.नं.** | **गैरशिस्त वर्तनाचा तपशील** | **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३** |
|---|---|---|
| ०१. | प्रामाणिकपणा, सेवेशी एकनिष्ठता कायम राखण्याचे संस्थानाच्या कर्मचा-यांचे कर्तव्य –<br>१) संस्थानच्या प्रत्येक कर्मचारी नेहमीच –<br>i) संपूर्ण प्रामाणिकपणा कायम राखेल;<br>ii) सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल; आणि<br>iii) संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही. | कलम ३ (१) |

त्यांनी उपरोक्त तरतुदींचे उल्लंघन करुन, गैरशिस्त वर्तन केलेले आहे.

**इ)** **<u>खाते चौकशी निष्कर्ष अहवाल –</u>**

श्रीमती निता अनिल खैरनार, यांचे उपरोक्त गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांचेवर जा.नं.एसएसएस/ वशी७ए/७१४८/ २०१६ दि. ३१.०३.२०१६ अन्वये, ठेवण्यात आलेल्या आरोपपत्राची खाते चौकशी ॲड. बी.वाय.काळवाघे, कोपरगावं, खाते चौकशी अधिकारी, यांनी पूर्ण करुन दि. १७.०१.२०१७ रोजीचा निष्कर्ष अहवाल संस्थानला सादर केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे निष्कर्ष काढल्याचे नमुद केले आहे.

१) श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल ह्या दोषी आहेत.
२) श्रीमती खैरनार, यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम २०१३ चे कलम नं. ०३ (१) या कायदेशिर तरतुदीचा भंग केला असल्याने दोषी आहेत.

अशाप्रकारे संपूर्ण प्रामाणिकपणा कायम राखेल, सेवेशी एकनिष्ठता कायम राखेल, संस्थानच्या कर्मचा-याला साजेसे नसणारे कृत्य करणार नाही अशी श्रीमती खैरनार, यांची गैरकृत्ये खाते चौकशीत सिद्ध झालेली आहेत.

**ई)** **<u>श्रीमती निता अनिल खैरनार, यांची वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे –</u>**

**१.** नाव – श्रीमती निता अनिल खैरनार,
**२.** हुद्दा – परिचारीका,
**३.** विभाग – श्री साईबाबा हॉस्पिटल,
**४.** जन्म तारीख – १०.०९.१९८६,
**५.** नेमणूक तारीख – ०५.०९.२००८,
**६.** संस्थानमध्ये झालेली सेवा – ०८ वर्ष, ०४ महिने, १२ दिवस

७. वेतनश्रेणी – ९३००-३४८००, ग्रेड पे ४२००

८. सध्याचे वेतन रु. बेसिक ९,७१०/-

उ) **<u>शिक्षेची तरतुद –</u>**

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचा-यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये

**किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय, किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसुल करणे

(४) वेतनवाढी रोखून धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानच्या कर्मचा-याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे, सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानच्या कर्मचा-याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो, तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानच्या कर्मचा-यांची समयश्रेणीतील वेतनश्रेणी, पद किंवा सेवेत ज्या स्थानातून किंवा सेवाजेष्ठतेतून घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होईल यासंबंधी पुढील निर्देश दिले जातील किंवा नाही.

**मोठ्या दंडात्मक कारवाया अंतर्गत**

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त संस्थानच्या कर्मचा-याने कोणत्याही व्यक्तीकडून आर्थिक लाभ स्वीकार केल्याचा आरोप सिद्ध झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतुद आहे.

वरील शिक्षेपैकी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपील) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ (८) नुसार श्रीमती खैरनार, यांना शासन करावयाचे असल्यास प्रथम त्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर सादर करावा लागेल. त्यास मान्यता मिळालेनंतर श्रीमती खैरनार, यांचेवर अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावून निष्कर्ष अहवालाबाबत त्यांचे म्हणणे मागवावे लागेल. त्यानंतर मा. न्यायालयासमोर कॅव्हेट अर्ज दाखल करावा लागेल.

तरी, श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी केलेल्या गैरशिस्त वर्तनाबाबत द्यावयाच्या शिक्षेस निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना गैरशिस्त वर्तनाबाबत वेळोवेळी शिक्षा करुनही, त्यांचे वर्तनामध्ये फरक पडत नाही, यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नसल्याचे दिसून येते. तसेच त्यांच्या खातेचौकशीमध्येही त्या दोषी आढळून आलेल्या आहेत. त्यामुळे श्रीमती निता अनिल खैरनार, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ मधील प्रकरण ३ विनियम ५ (८) मधील मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत संस्थान सेवेतून काढून टाकणेत यावे असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.५८** **M/s Austin Health Care, Pune यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाबाबत.**

**प्रस्ताव-** M/s. Austin Health Care, Pune यांना काही Tablet / Injection चा देखील पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यातील काही इंजेक्शनची वापर करणा-या डॉक्टरांनी तक्रार केलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Medicine | Make | Batch No. | Expiry |
|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Amikacin 500mg | Jackson | I-9138 | May-17 |
| 2 | Inj. Cefotaxim 1 gm | Jackson | I-9066 | May-17 |
| 3 | Inj. Climox | Jackson | I-11425 | Apr-18 |
| 4 | Inj. Emset | Jackson | I-10-201 | Dec-15 |
| 5 | Inj. Frusemide | Jackson | I-8707 | Mar-17 |
| 6 | Inj. Mikanol | Jackson | I-9138 | May-17 |
| 7 | Inj. Myopyrolate | Jackson | I-9814 | Aug-17 |
| 8 | Inj. Odensetron | Jackson | I-10-201 | Oct-17 |
| 9 | Inj. Tramajack | Jackson | 10707 | Jan-18 |
| 10 | Inj. Vomijack | Jackson | I-11473 | Apr-18 |
| 11 | Inj. Augmentin 1.2gm | Jackson | | |
| 12 | Inj. Cefurox S | Jackson | | |
| 13 | Inj. Dobutamin | Jackson | | |
| 14 | Inj. Fortum 1gm | Jackson | | |
| 15 | Inj. Gly Pro N | Jackson | | |
| 16 | Inj. Magnes 1.5gm | Jackson | | |
| 17 | Inj. Merovent 1gm | Jackson | | |
| 18 | Inj. Neostigmin | Jackson | | |
| 19 | Inj. Supacef | Jackson | | |
| 20 | Inj. Vancomycin 1gm | Jackson | | |
| 21 | Tab.Cefox-O 200 | Jackson | T-10933 | Jan-18 |
| 22 | Tab.Calcium Vit D | Jackson | T-10718 | Dec-17 |
| 23 | Tab. Lemon | Jackson | T-15J014 | Sep-17 |

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक विभागात दैनंदिन ह्दयाच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. सदर ऑपरेशन हे कमीत कमी चार तास चालते. कार्डीयाक ऑपरेशन झाल्यानंतर पेशंटला कार्डीयाक रिकव्ह्री विभागात ठेवले जाते, अशा वेळेस पेशंटची जखम लवकर भरण्यासाठी Antibiotic वापरावे लागतात. आपल्याकडे Jackson कंपनीचे इंजेक्शन असल्यामुळे ते पेशंटला वापरले असता पेशंट Recover होण्यासाठी Jackson कंपनीच्या इंजेक्शनचा उपयोग होत नाही व पेशंटला फार मोठया प्रमाणात Infection वाढत जाते. त्यामुळे पेशंटच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. पेशंटचे Infection जर जास्त प्रमाणात वाढले तर त्यांना पुन्हा ऑपरेट करावे लागते त्यामुळे पेशंटचे शारीरीक हाल फार मोठया प्रमाणात होतात व त्यांचे ICU मधील अस्तित्व वाढत जाते.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल सर्जन डॉ.राम नाईक यांना Jackson कंपनीचे इंजेक्शनचा वापर समाधानकारक वाटत नाही. त्यामुळे ते सर्व रुग्णांना व संस्थान कर्मचा-यांना बाहेरुन इंजेक्शन लिहून देतात.

संस्थान कायम कर्मचा-यांना ॲडमीट झाल्यावर हॉस्पिटलमधील इंजेक्शन वापरत नसल्यामुळे त्यांना पण बाहेरून इंजेक्शन आणण्यास सांगितले जाते. त्यानंतर कायम कर्मचारी बाहेरील औषधांचे बिल मेडीकल स्टोअर विभागाकडे परतावा मिळणेकामी सादर करतात. परंतु सदर मटेरीयल स्टोअरमध्ये उपलब्ध असल्यामुळे कर्मचा-यांना संबंधित बिलाचा परतावा मिळत नाही, त्यामुळे संस्थान कर्मचा-यांची नाराजी होते.

तसेच M/s. Austin Health Care, Pune यांना काही आयटम हे Non Moving / Expire असल्यामुळे परत घेऊन जाण्यास सांगितले असता ते घेऊन जाण्यास तयार नसतात, संस्थान नियमानुसार पुरवठाधारकास तीन ते सहा महिन्यांपुर्वी कळविले असेल तर ते मटेरीयल घेऊन जाणे बंधनकारक असते.

M/s. Austin Health Care, Pune यांना श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. करीता Boyles Ventilator खरेदीकामी इकडील पत्र क्र.६१५ दि.२४/०६/२०१६ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला असून पुरवठा आदेश दिल्यानंतर M/s. Austin Health Care, Pune यांना दि.११/०७/२०१६, दि.०५/०८/२०१६ व दि.०९/०३/२०१७ रोजीचे ई-मेल अन्वये मशिन पाठविणेबाबत स्मरणपत्र देण्यात आलेले आहे, तसेच त्यांचे

प्रतिनिधी यांना तोंडी सांगण्यात आलेले आहे. परंतु ते सदर मशिन पुरवठा करण्यास तयार नाहीत. M/s.Austin Health Care, Pune यांनी पत्रान्वये कळविले आहे की, आमच्याकडून Online Commercial निविदा भरताना एक चुक झाल्यामुळे आमचे दर कमी आले परंतु Online मध्ये जे दर दिलेले असतात त्यावर आपण पुरवठाधारकाला पुरवठा आदेश देत असतो. M/s.Austin Health Care, Pune यांनी Boyles Ventilator चा पुरवठा न केल्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयातील Ortho O.T. मध्ये फार मोठया प्रमाणात अडचणी निर्माण होत आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक व न्युरो ऑपरेशन थिएटर विभागात शस्त्रक्रियेसाठी लागणारे Implant खरेदीकामी M/s.Austin Health Care, Pune यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे, पुरवठा आदेशातील मटेरीयल ते मागणीप्रमाणे पुरवठा करतात, परंतु शस्त्रक्रिया करतेवेळी पुरवठाधारकाचा प्रतिनिधी उपस्थित ठेवावा लागतो, परंतु M/s.Austin Health Care, Pune हे त्यांचेकडील प्रतिनिधी शस्त्रक्रियेचे वेळेस उपस्थित ठेवण्यास नकार देत आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयात वापरण्यात आलेल्या औषधांच्या तक्रारीबाबत M/s. Austin Health Care, Pune यांना ई-मेल व्दारे कळविले होते, त्यानुसार त्यांचे प्रतिनिधी श्री साईनाथ रुग्णालयात गेले असता त्यांना डॉ.राम नाईक सर ऑपरेशनमध्ये असल्यामुळे भेटू शकलेनाही त्याबाबत त्यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे तोंडी स्वरुपात तक्रार केली होती. त्यानंतर त्यांनी पत्राव्दारे इंजेक्शनचा वापरणा-या डॉक्टरांचे Qualification, Name, Phone Number, Address देण्यात यावेत अशी मागणी केली होती. म्हणजेच M/s. Austin Health Care, Pune यांना आपल्याकडे काम करणा-या डॉक्टरांच्या Qualification वर संशय असल्याचे निदर्शनास येते.

डॉ. राम नाईक सर हे आपल्या हॉस्पिटलमध्ये मोफत रुग्णांची सेवा करत आहेत व ते अत्यंत अनुभवी व हुशार डॉक्टर असल्यामुळे त्यांची तक्रार विचारात घ्यावी लागणार आहे.

M/s. Austin Health Care, Pune हे संस्थानच्या निविदा, करारनामा व समितीने बनविलेल्या नियम व अटींचा वेळोवेळी भंग करतात व त्यात त्यांच्या सोयीच्या नियमाप्रमाणे संस्थानने काम करावे अशी अपेक्षा धरतात की ज्यामुळे संस्थानच्या दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होतात हे त्यांनी वेळोवेळी दिलेल्या पत्राप्रमाणे सिध्द होते व सर्व आपणास माहितीस्तव सादर करीत आहोत.

**०१)** दि.२३/०७/२०१५ च्या पत्रातील त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांचे म्हणणे असे आहे की, आम्ही निविदेमध्ये Brand Name ने Product भरलेले असून Mfg. कंपन्या कधीकधी जनरीक नावाने Product Mfg. करतात अशा वेळी त्यांनी भरलेल्या Brand ने Product संस्थानला देणे त्यांना शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना Brand / Generic नावाने Product पुरवठा करण्याची परवानगी दयावी.

परंतु संस्थानच्या निविदा व करारनाम्यानुसार निविदेमध्ये ज्या Brand ने Product भरलेले आहे, त्या निविदेच्या कालावधीत त्याच नावाने मटेरीयल पुरवठा करावे लागते, जर दुस-या नावाने Product घेतले तर बिल वित्त विभागाकडून अदा करण्यात अडचणी येतात आणि यासारख्या गोष्टीमुळे याआधी औषध भांडार विभागातील तीन कर्मचारी निलंबित करण्यात आलेले आहेत.

**०२) M/s. Austin Health Care, Pune यांच्या दि.१९/०८/२०१५ रोजीच्या पत्रातील मागण्या-** सदरहू पत्रानुसार त्यांचे असे म्हणणे आहे की, संस्थानला पुरवठा करावे लागणारे Product वर MRP टाकावी लागते व इतर हॉस्पिटल करीता Without MRP ने पुरवठा करतात. त्यानुसार Mfg.कंपनीला MRP टाकण्यास नविन स्ट्रीप तयार कराव्या लागतात. त्यामुळे Mfg.कंपनीला Product तयार करण्यास जास्त वेळ लागतो व त्यामुळे पुरवठा उशिराने केला जातो. त्यामुळे Without MRP ने पुरवठा करण्यास परवानगी मिळावी.

संस्थानला सन २०१५-१६ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि१३/०३/२०१५ रोजीचे आदेशान्वये निविदाधारकांकडून निविदा मागवितांना प्रत्येक आयटमची MRP मागवून त्यानंतर खरेदीची कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे M/s. Austin Health Care, Pune यांची उपरोक्त मागणी पुर्णपणे चुकीची आहे व इतर कुठल्याही पुरवठाधारकाने अशा प्रकारची मागणी केलेली नाही व सदर गोष्टीमुळे काही गैरप्रकार होत असल्याचा संशय टाळता येणार नाही.

**०३) M/s. Austin Health Care, Pune यांचे दि.२७/०८/२०१५ रोजीचे पत्र-** सदर पत्रात त्यांनी Product वरील MRP व For Hospital Supply काढून टाकण्यास परवानगी मागितली आहे. त्यांच्या

म्हणण्यानुसार ते २५ ठिकाणी मटेरीयलचा पुरवठा करतात तेथे Product वरील MRP व For Hospital Supply असे लिहिण्याची गरज नसते, असे ते सांगतात.

परंतु आपणास मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे आदेशाप्रमाणे तसे करणे शक्य नाही. तसेच त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी एकदा पुरवठा केल्यावर त्यांना लगेच संस्थानने पुन्हा रिपीट पुरवठा आदेश दयावा असे म्हटले असून सदरच्या काळात संस्थानने Stock Maintain करावा असे त्यांनी सांगितले आहे.

परंतु आपणास Product चे Consumption बघून त्यानुसार ऑर्डर दयावी लागते जेणेकरुन Product मुदतबाहय अथवा Dump होणार नाही याची दक्षता घ्यावी लागते.

तसेच आपणास एकदा पुरवठाधारकास वार्षिक पुरवठा आदेश दिल्यानंतर वर्षभर त्याच पुरवठाधारकाकडून औषधे प्राप्त करावी लागतात. त्यानुसार M/s. Austin Health Care, Pune यांची सदर मागणी नियमबाहय आहे असे दिसून येते व त्यामुळे त्यांना दिलेल्या औषधांचा जो तुटवडा (Shortage) निर्माण होतो त्यास तेच जबाबदार आहेत असे निदर्शनास येते.

तसेच उपरोक्त MRP व For Hospital Supply बाबत त्यांनी वरिष्ठांबरोबर चर्चा होऊन पुन्हा दि.२८/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये पत्र पाठवून तीच मागणी केलेली आहे.

**०४) M/s. Austin Health Care, Pune यांचे दि.०९/०५/२०१६ रोजीचे पत्र-** सदर पत्रात M/s. Austin Health Care, Pune यांनी त्यांच्या ज्या कंपनीच्या औषधांबाबत Result न मिळाल्यामुळे संस्थानच्या डॉक्टरांनी तक्रार केलेली आहे. त्याच्यावर त्यांनी त्यांना काहीही अधिकार नसताना तक्रार करणारे डॉक्टरांचे नाव, शिक्षण, मोबाईल नंबर, ई-मेल इत्यादीची मागणी केलेली असून कोणत्या पेशंटला त्यांनी सदर औषध Prescription वर Prescribe केले त्याची प्रत, पेशंटचे नाव, त्यांची Medical History इत्यादीची मागणी केलेली असून सदर मागणी ही संस्थानच्या निविदा / करारनामा व समितीने ठरवून दिलेल्या नियमांच्या विरोधात असल्याचे दिसून येत असून ते संस्थानला त्यांच्य नियमाप्रमाणे वागण्यास भाग पाडत असल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त त्यांचे वागणे इतर कुठल्याही पुरवठाधारकांकडून घडत नसल्याचे देखील दिसून येत आहे.

**०५) M/s. Austin Health Care, Pune यांचे दि.०३/०२/२०१६ रोजीचे पत्र-** ज्यावेळेस M/s. Austin Health Care, Pune यांचेकडे मटेरीयल उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी पुरवठा केला नाही तर संस्थान नियमाप्रमाणे अशा वेळेस सदर मटेरीयल दुस-या पुरवठा धारकांकडून खरेदी करण्यात येते व याकामी येणारा जास्तीचा खर्च M/s. Austin Health Care, Pune यांचे बिलातून वसुल केला जातो. M/s. Austin Health Care, Pune यांना संस्थानच्या पुर्वीपासून कार्यरत असलेल्या पध्दतीनुसार कळवून देखील त्यांनी त्यांच्या स्वतःच्या Format मध्ये माहिती दयावी अशी मागणी केलेली आहे. जे पुरवठाधारक औषध वेळेवर पुरवठा करत नाहीत ते नजिकच्या पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यात येते व जास्तीची रक्कम ही त्या त्या पुरवठाधारकाकडून वसुल करण्यात येते.

**०६) M/s. Austin Health Care, Pune यांचे Material पुरवठयाबाबत-** M/s. Austin Health Care, Pune यांना पुरवठा आदेश दिल्यानंतर वारंवार असे दिसून येते की, त्यांना मालाचा पुरवठा करणेकामी कमीत कमी ३० दिवसांच्या पुढे वेळ लागतो, परंतु आपले निविदा / करारनाम्यामध्ये दिलेल्या अटी / शर्तीनुसार पहिल्या टप्प्यातील माल कमीत कमी ८ दिवसांच्या आत नंतरच्या लॉटमधील मालाचा ऑर्डरनुसार ३ आठवडयात पुरवठा करणे बंधनकारक आहे. M/s. Austin Health Care, Pune या एकमेव पुरवठाधारकाव्यतिरीक्त उर्वरीत सर्व पुरवठाधारक आपल्या दिलेल्या नियमांनुसार पुरवठा करत आहेत. परंतु यांचे मते यांना मालाचा पुरवठा आदेश दिल्यानंतर कमीत कमी ३० दिवस देण्यात यावे व तरीही पुरवठा करता न आल्यास अजुन ३० दिवस वाढवून देण्यात यावे असे त्यांनी वारंवार पत्र पाठवून संस्थानला त्यांचे पध्दतीने माल पाठविणेबाबत कळवितात तसेच वरिष्ठांना भेटून वारंवार तक्रारीचा पाढा वाचतात.

उपरोक्त सर्व पत्रानुसार M/s. Austin Health Care, Pune हे संस्थानला वारंवार तेच तेच पत्र पाठवून वेठीस धरुन दैनंदिन कामकाजात अडथळे आणत असल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी Austin Health Care, Pune यांना व तक्रार आलेल्या मटेरीयलची उत्पादक कंपनी Jackson यांना संस्थानच्या काळया यादीत टाकण्याच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या बाबींचा विचार करता, सदर उत्पादक कंपनी व पुरवठादार यांचेबाबत प्राप्त तक्रारी अतिशय गंभीर आहेत त्यांचेकडून गुणवत्तापुर्ण औषधांचा पुरवठा होत नसल्याने रुग्णसेवेमध्ये अडचणी निर्माण होत आहे. सबब तक्रार आलेल्या मटेरीयलचे**

**पुरवठाधारक Austin Health Care, Pune व उत्पादक कंपनी M/s Jackson Laboratories, Pune यांचा संस्थानचे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी प्रक्रीयेमधील काळया यादीत समावेश करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५९** **श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नवीन संगणकीय प्रणाली (HMIS, PACS, TELEMEDICINE) व त्यास सुसंगत लागणारे हार्डवेअर खरेदी करणेची प्रक्रिया व संपुर्ण प्रकल्प शासन नियुक्त अधिकृत कन्सल्टंन्सी कंपनीकडून होणेकामी त्यांना आमंत्रित करणे तसेच यापुर्वी प्रसिध्द केलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द केलेबाबतची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता सॉफ्टवेअर (HMIS, PACS, TELEMEDICINE) प्रणाली (पुढील 4 वर्षाकरीता AMC व FMS सहीत) खरेदी करणेकरीता, इकडील विभागाने सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. 25/02/2017 रोजीचे सभेपुढे प्रस्तावितकामी अंदाजे रक्कम रु 1,32,06,592/- (कर विरहीत) मात्रचे खर्चास, तसेच सदरची कार्यवाही संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रियेद्वारे होणेस मान्यता मिळणेकामी सादर केला असता, निर्णय क्र. 8 नुसार सदर प्रस्तावावर " सविस्तर चर्चा होऊन श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता नविन सॉफ्टवेअर (HMIS, PACS, TELEMEDICINE) प्रणाली संस्थानचे विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू प्रणाली खरेदी केल्यानंतर त्या सॉफ्टवेअरला सुसंगत असे हार्डवेअर साहित्य खरेदी करणेत यावे, असे ठरले. "

त्यानुसार, सदरची कार्यवाही ई-निविदा पद्धतीने होणेकामी दि. 23/03/2017 रोजीची ई-निविदा प्रसिद्ध करणेबाबतची मंजूर टिपणीन्वये दि. 21/04/2017 ते दि. 13/05/2017 रोजी पर्यंत जाहिरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. नियोजीत वेळापत्रकानुसार दि. 25/04/2017 रोजी Pre-bid मिटींग आयोजीत करणेत येऊन विविध कंपन्यांनी निविदेबाबत असलेल्या शंका/ Query लेखी, तोंडी व ई-मेलचे स्वरुपात इकडील विभागास सादर केल्या. सदर शंकांचे/ Query चे निरसण करणेकामी संस्थानचे Clarification तयार करून ई-टेंडरचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकामी दि. 26/04/2017 रोजी टिपणी मान्यतेस्त्व सादर केली असता, मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी सदर प्रकल्पासाठी तांत्रिक सल्लागार बाबत विचारणा केली असता, सदर प्रकल्पाची व्याप्ती मोठी असलेने तांत्रिक सल्लागार मिळणेबाबत इकडील विभागाने यापुर्वी मागणी केली होती, परंतु सदर मागणी नुसार तांत्रिक सल्लागार दिलेला नसलेबाबतची वस्तुस्थिती मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांना सांगीतली. त्याअनुषंगाने हॉस्पिटलचे संदर्भात शासकीय स्तरावर कार्यरत असलेले या क्षेत्रातील तांत्रिक सल्लागार यांची माहिती घेऊन त्यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेशी संपर्क साधावा असे मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांनी सुचविलेप्रमाणे इकडील विभागाने Director of Medical Education & Research, Mumbai. (DMER) या शासकीय संस्थेशी संपर्क केला असता, महाराष्ट्र शासनाच्या 19 शासकीय मेडीकल कॉलेजकरीता HMIS सुविधा कार्यान्वित करून घेणेकामी शासनाने नियुक्त केलेले तांत्रिक सल्लागार श्री. श्रीकांत कुलकर्णी यांचेशी संपर्क होऊन, त्यांना मार्गदर्शन मिळणेबाबत विनंती केली असता, त्यांनी संस्थानला मार्गदर्शन करणेस समर्थता दर्शवून, दि. 05/05/2017 रोजी संबंधीत तांत्रिक सल्लागार यांनी शिर्डी येथे समक्ष येऊन मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे उपस्थितीत त्यांचे कक्षात मा. उपकार्यकारी अधिकारी साहेब, मा. प्रशासकीय अधिकारी साहेब, मा.मुख्य् लेखाधिकारी साहेब, मा.वैद्यकीय संचालक साहेब यांचे समवेत सदर विषयाबाबत चर्चा करण्यात आली.

सदर चर्चेत हॉस्पिटलकरीता खरेदी करावयाच्या संगणकीय प्रणालीच्या प्रकल्पाची व्याप्ती मोठी असल्याने, तसेच सध्याचे Tender Document मध्ये बरेचशे Scope वाढविणे आवश्यक आहेत, तसेच प्री-बीड मिटींगमध्ये प्राप्त् झालेल्या विविध कंपन्यांच्या Query चा विचार करता व भविष्यातही सॉफ्टवेअर प्रणालीचे Implimentation, Operation, Maintenance इ. बाबतचे कामकाज व संगणकीय प्रणाली करीता आवश्य्क असणारे सुसंगत हार्डवेअर, नेटवर्क, प्रिंटर्स, डेटाबेस, संगणके व संगणकीय साहित्य् असे इ. खरेदी करणेची प्रक्रीया अधिकृत तांत्रिक सल्लागार यांचे मागदर्शनाखाली झालेस संस्थानच्या हिताचे दृष्टीने सोयीचे होईल, असे संबंधीत तांत्रिक सल्लागार यांनी मार्गदर्शन केले.

यावर, मा. कार्यकारी अधिकारी महोदया व उपस्थित सर्व मा. अधिकारी यांनी समर्थता दर्शवून सदर प्रसिद्ध करणेत आलेली ई-निविदा प्रक्रीया रद्द करण्यात यावी व तांत्रिक सल्लागार नेमणूक करणेबाबत सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे समोर सादर करणेत यावा, असे निर्देशीत केले. त्यानुसार प्रसिद्ध करण्यात आलेली ई-निविदा रद्द करणेबाबतची दि. 06/05/2017 रोजीची मंजूर टिपणीन्वये हॉस्पिटलचे HMIS, PACS,

TELEMEDICINE या संगणकीय प्रणाली खरेदी करणेकामी प्रसिद्ध केलेली ई-निविदा प्रक्रीया रद्द करणेत आलेली असून, त्याबाबतचे Notification ई-टेंडरच्या शासकीय संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेले आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र शासनाचे GAD-मातंस 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) Mantralaya, Mumbai- 400032 दि. 01/07/2014 रोजीचे अध्यादेशानुसार खालील कंन्सल्टंन्सी कंपन्यांची दि. 01/07/2014 ते दि. 30/06/2017 या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

1) M/s Accenture, 2) M/s Deloitte,
3) M/s Ernst & Young, 4) M/s KPMG,
5) M/s PwC

उपरोक्त नमुद महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार वरीलपैकी एका कंन्सल्टंन्सी कंपनीची नियुक्ती करून संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE संगणकीय प्रणाली व त्यास अनुषंगीक लागणारे संगणके, संगणकीय साहित्यांची खरेदी करणे व सदरची सर्व यंत्रणा कार्यान्वित करून घेणेची संपुर्ण प्रक्रीया त्यांचेमार्फत करता येईल.

**मागणी–** संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE या संगणकीय प्रणाली व त्यास अनुषंगीक लागणारे संगणके, संगणकीय साहित्यांची खरेदी करणे व सदरची सर्व यंत्रणा कार्यान्वित करून घेणेचे प्रक्रीयेमध्ये अधिक कार्यक्षमता आणण्यासाठी, सदरची कार्यवाही अधिकृत कंन्सल्टंन्सी एजन्सीचे मार्गदर्शनाखाली होणेकामी, उपरोक्त अध्यादेशात नमुद असलेल्या शासन नियुक्त सर्व कंन्सल्टंन्सी एजन्सींना मा. व्यवस्थापन समिती/ मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे समोर त्यांचे सादरीकरण सादर करणेकामी व त्यांचेकडून सदर कामाबाबतचे दर सिलबंद पाकिटात स्विकारणेकामी त्यांना शिर्डी येथे आमंत्रित करता येईल. तसेच प्रसिद्ध करण्यात आलेली ई-निविदा रद्द करणेबाबतची दि. 06/05/2017 रोजीची मंजूर टिपणीन्वये हॉस्पिटलचे HMIS, PACS, TELEMEDICINE संगणकीय प्रणाली खरेदी करणेकामी प्रसिद्ध केलेली ई-निविदा प्रक्रीया रद्द करणेत आलेली असून त्याची नोंद मा. व्यवस्थापन समितीमध्ये घेता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी, प्रस्तावीकेत नमुद केलेप्रमाणे संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE या संगणकीय प्रणाली खरेदी करणेकामी प्रसिद्ध केलेली ई-निविदा प्रक्रीया रद्द केलेबाबतची नोंद मा. व्यवस्थापन समितीमध्ये घेणेस व दोन्ही हॉस्पिटलकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE या संगणकीय प्रणाली व त्यास अनुषंगीक लागणारे संगणके, संगणकीय साहित्यांची खरेदी व सदरची सर्व यंत्रना कार्यान्वित करून घेणेचे प्रक्रीयेमध्ये अधिक कार्यक्षमता आणण्यासाठी सदरची कार्यवाही अधिकृत कंन्सल्टंन्सी एजन्सीचे मार्गदर्शनाखाली होणेस, महाराष्ट्र शासनाचे दि. 01/07/2014 रोजीचे अध्यादेशानुसार नियुक्त केलेल्या सर्व कंन्सल्टंन्सी एजन्सींना मा. व्यवस्थापन समिती/ मा. कार्यकारी अधिकारी महोदया यांचे समोर सादरीकरण सादर करणेकरीता त्यांना शिर्डी येथे आमंत्रित करणेस व त्यांचेकडून सदर कामाबाबतचे दर सिलबंद पाकिटात स्विकारणेस मान्यता मिळणेकामी, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.४१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता HMIS, PACS, TELEMEDICINE या संगणकीय प्रणाली खरेदी करणेकामी प्रसिद्ध केलेली ई-निविदा प्रक्रीया रद्द केलेबाबतची नोंद घेण्यात येऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहूकामी नवीन यंत्रणा कार्यान्वित करुन घेण्याचे प्रक्रीयेमध्ये अधिक कार्यक्षमता आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या कंन्सल्टंन्सी कंपन्यांकडून तात्काळ दरपत्रके मागविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६०** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ऑक्सीजन, नायट्रस व CO2 गॅस खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या सेंट्रल ऑक्सीजन व नायट्रस सिस्टम असून सदर सिस्टमचा ऑक्सीजन व नायट्रस व $CO_2$ गॅस हा सर्व वार्ड व ऑपरेशन थिएटर विभागात रुग्णांच्या आवश्यकतेनुसार वापरण्यात येत असतो. सदरचे दोन्ही सिस्टमकरीता लागणारा ऑक्सीजन व नायट्रस गॅस हा दि.०८/१२/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.९८८ अन्वये इकडील पत्र क्र.८७०४ दि.०६/०२/२०१३ अन्वये M/s. Balaji Trading, Sangamner यांचेकडून खरेदी करण्यात येत आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No. | Description | Packing | Rate per in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | ऑक्सीजन गॅस | प्रती क्यूबीक | २०.०० |
| 2 | नायट्रस गॅस | प्रती लिटर | ०.३० |

उपरोक्त दरानुसार सदरचा गॅस दोन्ही रुग्णालयात सन २०१३ पासून M/s. Balaji Trading, Sangamner यांचेकडून ऑक्सीजन गॅस व नायट्रस गॅस खरेदी केला जातो. त्यानुसार आजपर्यंत M/s. Balaji Trading, Sangamner यांचेकडून खरेदी करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ. नं. | वर्ष | ऑक्सीजन गॅस | झालेला खर्च रक्कम रु. | नायट्रस गॅस | झालेला खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१३-१४ | ३२४९४ | ७०८००९.०४ | ३३३७७०२ | १०७६९६०.६० |
| २ | २०१४-१५ | २०७६२ | ४१५२४०.०० | २१७६००० | ६५३५६५.०० |
| ३ | २०१५-१६ | २०२९३ | ४०५८६०.०० | १३९५५१० | ४१८६५३.०० |
| ४ | २०१६-१७ | २५५१५ | ५१०३०००.०० | १२१०७०२ | ३६३२१०.६० |
| | **एकूण** | **९९०६४** | **६६३२१०९.०४** | **८११९९१४** | **२५१२३८९.००** |
| **सरासरी प्रती वर्षे लागणारा गॅस** | | **२४७७५** | | **२०२९९७९** | |
| **५ वर्षाकरीता लागणारा गॅस** | | **१२३८७५** | | **१०१४९८९५** | |

सदर गॅस करीता असलेले दर हे सन २०१३ पासूनचे असल्यामुळे पुन्हा ई निविदा मागवून खरेदी करावयाचा आहे. सदर गॅस खरेदीकामी अंदाजे खर्चाकरीता M/s. Balaji Trading, Sangamner यांचेकडून दर मागविण्यात आलेले होते. त्यानूसार M/s. Balaji Trading, Sangamner यांनी त्यांचे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| अ. नं. | तपशील | पॅकींग | पुढील ५ वर्षाकरीता लागणारा अंदाजे गॅस | अंदाजे रक्कम रु. प्रती लिटर/ क्यूबीक | अंदाजे एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ऑक्सीजन गॅस | Per Cubic | १२३८७५ | २१.२००० | २६२६१५०.०० |
| 2 | नायट्रस गॅस | Per Liter | १०१४९८९५ | ०.३८१६ | ३८७३२००.०० |
| 3 | Co2 गॅस | Per Cubic | ६०० | २६.५००० | १५९००.०० |
| | | | | **Total Amt. in Rs.** | ६५१५२५०.०० |

उपरोक्त पाच वर्षे कालावधी करीता लागणारा ऑक्सीजन व नायट्रस गॅस खरेदीकामी अंदाजे पूर्णांकित रक्कम रू.६५,१५,२५०/- (अक्षरी रू. पासष्ठ लाख पंधरा हजार दोनशे पन्नास मात्र ) इतकी येते.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी..

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या सेंट्रल ऑक्सीजन व नायट्रस सिस्टम असून सदर सिस्टमचा ऑक्सीजन व नायट्रस व $CO_2$ गॅस हा सर्व वार्ड व ऑपरेशन थिएटर विभागात रुग्णांच्या आवश्यकतेनुसार वापरण्यात येत असतो. सदरचे दोन्ही सिस्टमकरीता लागणारा

ऑक्सीजन व नायट्रस गॅस करीता असलेले दर हे सन २०१३ पासूनचे असल्यामुळे पुन्हा पाच वर्षे कालावधीकरीता विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता पाच वर्षे कालावधी करीता लागणारा ऑक्सीजन व नायट्रस व $CO_2$ गॅस विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे पूर्णांकित रक्कम रू.६५,१५,२५०/- (अक्षरी रू. पासष्ठ लाख पंधरा हजार दोनशे पन्नास मात्र ) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता ०५ वर्षे कालावधीकरीता आवश्यक असणारा ऑक्सीजन, नायट्रस व CO2 गॅस खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६५,१५,२५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६१** **संस्थानचे रुग्णालयांकरीता प्रस्तावित असलेल्या नवीन संगणके, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहीत पध्दतीने खरेदी करणेची व अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत, सध्या कार्यान्वित असलेल्या जुन्या HMIS संगणकीय प्रणालीचे AMC चे कामकाज मे.सॉफ्टस्क्रिप्ट सिस्टीम ॲण्ड सर्व्हिसेस, मुंबई यांचेमार्फत करुन घेणे.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 31/08/2016 रोजीचे सभेत निर्णय क्र. 634 अन्वये पुढील निर्णय पारित झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा या दोन्ही हॉस्पिटल करीता नविन संगणक, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहित पध्दतीने अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे 4 महिने कालावधीसाठी, सध्या श्री साईबाबा हॉस्पिटल येथे कार्यान्वित असलेल्या संगणकीय प्रणालीचे मेंटनन्स M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचेकडून करून घेणेस व याकामी येणाऱ्या रु. 2,50,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना– श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये सन 2006 – 2007 मध्ये मे. सॉफस्क्रिप्ट् सिस्टीम ॲन्ड् सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडून संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदरची प्रणाली जूनी झाली असलेने त्यामध्ये दैनंदिन कामकाज करताना रुग्णालयाच्या विविध विभागांना बऱ्याच अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता नविन संगणकीय प्रणाली घेणेबाबतची कार्यवाही सुरु केलेली आहे.

परंतु, नविन संगणकीय प्रणाली घेणेबाबतची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत जूनी संगणकीय प्रणाली सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर संगणकीय प्रणालीमध्ये उद्भवत असलेल्या अडचणींचे निरसण करणेकामी मे. सॉफस्क्रिप्ट् सिस्टीम ॲन्ड् सर्व्हिसेस, मुंबई यांना उपरोक्त् निर्णयानुसार पुढील 6 महीने कालावधीकरीता AMC बाबतचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार संगणकीय प्रणालीमध्ये उद्भवत असलेल्या अडी-अडचणींचे निरसण कंपनीमार्फत करून घेण्यात येत आहे. तसेच सदर कंपनीचे कार्यादेशात नमुद असलेप्रमाणे AMC चा कालावधी पुर्ण झालेनंतर वित्त् विभागामार्फत रक्कम रु. 2,50,000/- मात्र त्यांना अदा करावे लागणार आहे.

परंतु, सदर कंपनीचा AMC चा 6 महिन्याचा कालावधी (त्यांना कार्यादेश दिलेपासून) दि. 09 मे, 2017 रोजी संपुष्ठात आलेला असून, नविन संगणकीय प्रणाली घेणेबाबतची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत, जूनी संगणकीय प्रणाली सुरु ठेवणे व त्यात येणाऱ्या अडी-अडचणी सोडविणे आवश्यक आहे. तसेच, इकडील विभागामार्फत सद्यस्थितीला यापुर्वी प्रसिद्ध केलेली नविन संगणकीय प्रणाली खरेदी करणेची ई-निविदा प्रक्रीया दि. 06/05/2017 रोजीचे मंजुर टिपणीन्वये रद्द करण्यात आलेली असून, सदरची निविदा प्रक्रीया व संपुर्ण प्रकल्प् शासन नियुक्त् तांत्रिक कन्सल्टंन्सी कंपनीमार्फत राबविणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेकामी इकडील विभागाने दि. 10/05/2017 रोजी टिपणी मान्यतेस्तव सादर केलेली आहे. तथापी नविन संगणके, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहित पध्दतीने खरेदी करणेची व अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत बराचसा कालावधी लागू शकतो.

त्याअनुषंगाने, इकडील विभागाने जून्या संगणकीय प्रणालीच्या AMC चा कालावधी संपृष्ठात आलेनंतरच्या कामकाजाबाबत मे. सॉफस्क्रिप्ट् सिस्टीम ॲन्ड् सर्व्हिसेस, मुंबई या कंपनीचे प्रतिनीधींशी चर्चा केली असता, त्यांनी सदर AMC चा कालावधी संपृष्ठात आलेनंतर देखील संस्थानला Support देणेबाबत समर्थता दर्शविलेली असून Support हा Onsite किंवा Online (Remotely) पद्धतीने देऊन, त्याकरीता लागणारे दर दि. 27/04/2017 रोजीचे ई-मेलद्वारे त्यांनी कळविलेले असून ते पुढीलप्रमाणे–

| Sr. No | Support details | Duration | Amount |
|---|---|---|---|
| 1 | On site visit of Consultant | Two Day Visit | Rs. 21000.00 per visit per consultant |
| 2 | On site visit of Consultant | One Day Visit | Rs. 11500.00 per visit per consultant |
| 3 | Online remote support during office hours up to 30 minutes session | Per session up to 30 minutes | Rs. 1000.00 per session |
| 4 | Online remote support during office hours above 30 minutes session | Per session above 30 minutes | Rs. 3500.00 per session |

Terms & Conditions- Above rates are not inclusive of taxes and duties. All taxes and duties as applicable will be charged extra.

Payment terms – 1) Sofscript will bill Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi on bi-monthly basis.

2) Shri Saibaba Sansthan Trust will make payments in 7 days from receipt of the invoice.

दि. 01/05/2017 रोजी इकडील विभागाने नविन संगणके, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहित पध्दतीने खरेदी करणेची व अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या जून्या संगणकीय प्रणालीचे AMC उपरोक्त नमुद दरांप्रमाणे सॉफ्टस्क्रिप्ट् कंपनीस देणेकामी मान्यता मिळणेस्त्व टिपणी सादर केली असता सदर टिपणीवर मा.व्यवस्थापन समितीची मंजूरी घ्यावी, असे निर्देशित करण्यात आलेले आहे.

मागणी – नविन संगणके, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहित पध्दतीने खरेदी करणेची व अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्या कार्यरत असलेल्या जून्या संगणकीय प्रणालीचे AMC बाबत मे. सॉफस्क्रिप्ट् सिस्टीम ॲन्ड् सर्व्हिसेस, मुंबई या कंपनीने कळविलेल्या उपरोक्त तक्त्यात नमुद असलेल्या दरांप्रमाणे Onsite किंवा Online (Remotely) पद्धतीने आवश्यक्तेप्रमाणे कंपनीचा Support घेऊन AMC चे कामकाज करणेस व त्यांचे प्राप्त् होणारे बील वित्त् विभागामार्फत अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत– यापुर्वी 6 महिन्याच्या कालावधीसाठी सदर कंपनीस AMC दिलेपासून साधारणत: 20 ते 22 वेळा त्यांचेकडून Online (Remotely) पद्धतीने Support घेण्यात येऊन व आवश्यक्तेनूसार कंपनीचे प्रतिनिधींनी समक्ष भेट देऊन, जून्या सॉफ्टवेअर मधील उद्भवलेल्या अडी-अडचणींचे निरसण केलेले आहे. त्यामुळे मागील AMC च्या 6 महिने कालावधीचा अभ्यास करता सदर कंपनीस ठोक रक्कम देणेऐवजी, रुग्णालये कामकाजाचे आवश्यक्तेप्रमाणे उपरोक्त् तक्त्यातील दराप्रमाणे दि. 10/05/2017 रोजी पासून नविन संगणके, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहित पध्दतीने खरेदी करणेची व अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत, संबंधीत कंपनीकडून Onsite किंवा Online (Remotely) पद्धतीने Support घेऊन AMC बाबतची कार्यवाही करता येईल.

तरी, उपरोक्त् सर्व बाबींचा विचार करता, संस्थानचे रुग्णालये विभाग हे संवेदनशील असलेने संस्थान रुग्णालये कामकाजाचे सोयीचे दृष्टीने दि. 10/05/2017 पासून नविन संगणके, संगणकीय साहित्य व संगणकीय प्रणाली विहित पध्दतीने खरेदी करणेची व अत्याधुनीक करणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत जून्या संगणकीय प्रणालीचे AMC बाबत उपरोक्त तक्त्यातील नमुद असलेल्या दरांप्रमाणे Onsite किंवा Online (Remotely) पद्धतीने, रुग्णालये कामकाजाचे आवश्यकतेप्रमाणे कंपनीचा Support घेऊन सॉफ्टवेअरचे AMC बाबतचे कामकाज मे. सॉफस्क्रिप्ट् सिस्टीम ॲन्ड् सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडून करुन घेणेस व त्यांचे नमुद दराप्रमाणे प्राप्त् होणारे बील वित्त् विभागामार्फत अदा करणेस, सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय होणेस्तव सादर

**निर्णय क्र.४१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६२** **साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP कार्यप्रणालीचे System Audit व Migration Audit M/s AAA Technologies Private Ltd, Mumbai यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.689 (24)

**प्रास्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.733 अन्वये M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचेमार्फत साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली कार्यप्रणालीचे System Audit व लेखाशाखा विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP कार्यप्रणालीचे Systems Audit व Migration Audit करणेस मान्यता देण्यात आली होती, त्यानुसार M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांना जा.नं. एसएसएसटी/ आयटी/ 4118/ 2016 दि. 09/11/2016 रोजीचे पत्राव्दारे सदरकामी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit तसेच लेखाशाखा विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP कार्यप्रणालीचे Systems Audit व Migration Audit M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचेमार्फत सुरु करण्यात आलेले आहे.

सदरकामी M/s. AAA यांनी साईटेक प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या करारनामा (Scop of work) व विविध कार्यप्रणालीसाठी तयार करण्यात आलेल्या BRD तसेच अनुषांगीक तांत्रिक दस्तऐवजांची पाहणी केलेली आहे. तसेच M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचे प्रतिनीधी यांनी शिरडी येथे येऊन साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व कार्यप्रणालीची प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. तसेच अनुषांगीक माहिती कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे, माहिती तंत्रज्ञान विभाग व संबधीत विभागाकडुन घेतलेली आहे.

M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांनी केलेल्या ऑडीटचा अहवाल आ.नं. 23206 दि.22/02/2017 रोजी इकडील विभागास प्राप्त झालेला आहे. प्राप्त झालेल्या अहवालमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत करावयाच्या कार्यवहीचा तपशिल कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना ई-मेलव्दारे देण्यात आलेला आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदरकामी केलेली कार्यवाही M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचेकडुन तपासुन घेऊन पुढील अहवाल सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** मा. व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यत आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit तसेच लेखाशाखा विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP कार्यप्रणालीचे Systems Audit व Migration Audit M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचेमार्फत प्राप्त झालेला अहवाल नोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यास मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :** मा. व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यत आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit तसेच लेखाशाखा विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP कार्यप्रणालीचे Systems Audit व Migration Audit M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचेमार्फत प्राप्त झालेला अहवाल नोंद घेणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यत आलेल्या कार्यप्रणालीचे System Audit तसेच लेखाशाखा विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या ERP कार्यप्रणालीचे Systems Audit व Migration Audit बाबत M/s. AAA Technologies Private Ltd., Mumbai यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

यानंतर वेळेअभावी सभेचे कामकाज तहकुब करण्यात आले व उर्वरित आयत्या विषयांवर उद्या दि.२४.०५.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता चर्चा करणेत येईल, असे मा.अध्यक्ष महोदय यांनी घोषित केले. त्यानुसार बुधवार दि.२४.०५.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता उर्वरित आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेसाठी शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले. या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य ०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०५. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

या सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.ॲड मोहन मोतीराम जयकर-सदस्य, मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले- सदस्य, मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग- सदस्य व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे- सदस्य यांनी दूरध्वनीद्वारे व डॉ.मनिषा कायंदे- सदस्या, मा.श्री.रविंद्र मिर्लेकर- सदस्य, मा.श्री.अमोल किर्तीकर- सदस्य यांनी उपरोक्तप्रमाणे कळविले होते. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर खालील आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दि.१२/०५/२०१७ रोजीचे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४१९** दिनांक १२.०५.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **सन २०१७-१८ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी दिलेले नमुने निवडणेबाबत.**

सन २०१७-१८ वर्षासाठी किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्यासाठी ग्रुप वाईज ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| ग्रुप | तपशील |
|---|---|
| A | कडधान्य, डाळी, किराणामाल |
| B | मसाले |
| C | ड्रायफ्रुट |
| D | वनस्पती तूप |
| E | पत्रावळ |
| F | चहा पावडर व कॉफी |
| G | गहू, तांदुळ, साखर व हरभराडाळ |
| H | खाद्यतेल |
| I | टोण्ड गाय दुध |
| J | लॅमिनेटेड पेपर पिशवी व प्लॅस्टिक पिशवी |
| K | पेपरकप |
| L | पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर |
| M | इतर वस्तु |

तसेच याकामी खालीलप्रमाणे कागदपत्रांबाबत निकष ठरवून निविदा मागविण्यात आली होती.

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ मार्केट यार्ड लायसन्स/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ उत्पादक संस्थेचा दाखला/ तत्सम परवाना (उदा. ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका)

२. सेन्ट्रल/ सेल्स टॅक्स नोंदणी दाखला/ व्हॅट टिन नंबर

३. माहे सप्टेंबर २०१६ अखेरचे व्हॅट/ सेल्स टॅक्स क्लीअरन्स प्रमाणपत्र
४. पॅनकार्ड
५. वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊटंट यांचे प्रमाणपत्र
६. सन २०१५-१६ चा फर्मचा ऑडिट रिपोर्ट (C.A. Certified)
७. अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना (FSSA परवाना आवश्यकतेनुसार)
८. आयएसआय परवाना (पॅकेज्ड ड्रिकिंग वॉटरसाठी)/ ॲगमार्क परवाना (खादयतेलासाठी)
९. बयाणा रक्कम डि.डि.
१०. निविदा किंमत डि.डि.

याकामी एकुण खालील नमुद ४९ निविदाधारकांनी विविध ग्रुपमध्ये निविदा सादर केल्या होत्या.

१. आकाश ट्रेडर्स, औरंगाबाद
२. गुप्ता एंटरप्रायजेस, पुणे
३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक
४. माऊली फुड प्रॉडक्ट, औरंगाबाद
५. पुखराज रामनिवास, जळगांव
६. रुपल सिंडीकेट्स, मुंबई
७. ओम साई आनंद ट्रेडर्स, पुणे
८. पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी
९. आर.मुथा राईस हाऊस, औरंगाबाद
१०. संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड
११. धनराज मोहनराज जैन, अकोला
१२. हिरालाल चुन्नीलाल ॲण्ड कंपनी, नांदेड
१३. कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड
१४. गीता ट्रेडींग कपंनी, सातारा
१५. साहिल ट्रेडींग कंपनी, नांदेड
१६. संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव
१७. रुपचंद भागचंद कासलीवाल, श्रीरामपूर
१८. पुष्कर फुड कॉर्पोरेशन, पुणे
१९. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक
२०. श्री गणेश ड्राय फ्रुट्स, पुणे
२१. धर्मपाल सत्यपाल लिमीटेड, भिवंडी
२२. लेक सिटी ड्राय फ्रुट्स प्रा.लि., पुणे
२३. इंडिया सेल्स कॉर्पोरेशन, पुणे
२४. संचेती फॅमिली फुड्स डंडिया प्रा.लि., पुणे
२५. बोला सुरेंद्र कामथ ॲण्ड सन्स, केंडीजे (कर्नाटक)
२६. खुशी एजन्सीज, नाशिक
२७. श्री प्रॉडक्ट्स, सिन्नर
२८. कुणाल टि सेंटर, शिर्डी
२९. मुरलीधर ॲण्ड कांतीलाल, कराड
३०. सुरेसा टी लिमीटेड, मुंबई
३१. व्ही.एम.डिस्ट्रिब्युटर्स, नाशिक
३२. संजय ट्रेडींग कंपनी, नाशिक
३३. सुरजमल जयनारायण, पिपरीया, हौशंगाबाद (म.प्र.)
३४. उषा ॲग्रोटेक, सुपा
३५. श्री सत्यसाई ऑईल इंडस्ट्रिज ॲण्ड रिफायनरी, नांदेड
३६. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पादक संघ मर्यादित, कोपरगांव

३७. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगांव
३८. प्रभात डेअरी लिमीटेड, रांजणखोल
३९. एअरो प्लास्ट लिमिटेड, बहादुरगड, हरियाणा
४०. हरिओम फ्लेक्झिपॅक इंडस्ट्रिज, कोल्हापुर
४१. नीट प्रिंट्स, अहमदनगर
४२. सुपर सील्स, नाशिक
४३. अल्फा कार्बनलेस पेपर्स मॅन्यु.कंपनी प्रा.लि., नवी मुंबई
४४. आर.एम.डेव्हलपर, पुणे
४५. श्री सुप्रिम सेल्स कॉर्पोरेशन, नाशिक
४६. सुयोग नेचर केअर, जयपुर
४७. साई ॲग्रो इंडस्ट्रि, टाकळी
४८. वीरसाई ॲग्रो इंडस्ट्रिज, शिर्डी
४९. साई बेव्हरेजेस, सुपा

सदर ई-निविदांतील तांत्रिक निविदा दि.१९.०४.२०१७ रोजी उघडण्यात येवुन वर नमुद निकषांद्वारे छाननी करण्यानत आली आहे. सदर निविदांची छाननी केल्यानंतर निविदाधारकांचे अपात्रतेची कारणे प्रामुख्याने खालीलप्रमाणे निदर्शनास आली आहेत.

१. काही कागदपत्रे Hard Copy मध्ये सादर करणे.
२. Vat Certificate न जोडणे
३. FDA लायसन्स Renewal साठी दिलेले आहे व त्याची पावती जोडली आहे.
४. Vat Clerance Certificate ऐवजी E-Return जोडणे
५. आर्थिक उलाढाल कमी असणे.
६. Vat Certificate नमूद कालावधीपेक्षा आलिकडच्या कालावधीसाठी जोडणे.
७. संपुर्ण Audit Report ऐवजी Balance Sheet, Profit and Loss Ac. प्रत जोडणे.
८. Audit Report Covering Page जोडणे.
९. FSSAI Certificate न जोडणे.
१०. निविदा फी व बयाणा रक्कम डि.डि न जोडणे.
११. Turnover Certificate न जोडणे.
१२. ISI Certificate न जोडणे.

सदर ४९ निविदांतील २८ निविदाधारक पुर्णत: अपात्र ठरले आहेत, तर ०८ निविदाधारक अंशत: अपात्र ठरले आहेत – अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे-सदर निविदांचा ग्रुपवाईज पात्र .

| ग्रुपचे नांव | तपशिल | आलेल्या निविदा | अपात्र निविदा | पात्र निविदा |
|---|---|---|---|---|
| A | कडधान्य, डाळी, किराणामाल | २० | १० | १० |
| B | मसाले | १८ | ०९ | ०९ |
| C | ड्रायफ्रुट्स | ११ | ०८ | ०३ |
| D | वनस्पती तुप | ०५ | ०२ | ०३ |
| E | पत्रावळ व द्रोण | ०४ | ०३ | ०१ |
| F | चहा पावडर व कॉफी | ११ | ०९ | ०२ |
| G,G1,G2,G3 | गहु, तांदुळ, साखर व हरभराडाळ | २० | १४ | ०६ |
| H,H1,H2,H3 | खाद्यतेल | ०५ | ०४ | ०१ |
| I,I1,I2,I3 | टोण्ड गाय दुध | ०४ | ०२ | ०२ |
| J | लॅमिनेटेड पेपर पिशवी व प्लॅस्टिक पिशवी | ०४ | ०२ | ०२ |
| K | पेपरकप | ०६ | ०२ | ०४ |
| L | पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर | ०५ | ०२ | ०३ |

तसेच बिस्किटांसाठीचे निविदांची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे -

| तपशिल | आलेल्या निविदा | अपात्र निविदा | पात्र निविदा |
| --- | --- | --- | --- |
| बिस्किटे | ०४ | ०३ | ०१ |

तरी पात्र निविदाधारकांचे नमुने निवडणेसाठी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेत सादर.

**सन २०१७-१८ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेसाठी तांत्रिक निविदेमध्ये पात्र असलेल्या पुरवठाधारकांचे नमुने निवडणेकामी महात्मा कृषी विद्यापीठ, राहुरी येथील डॉ.व्ही.पी.कड व डॉ.आर.एस. गायकवाड हे तज्ञ तसेच श्री साईप्रसादालय विभागामधील प्रत्यक्षात काम करत असलेले आचारी श्री.दिलीप सांबारे व श्री.प्रल्हाद कर्डीले यांना तज्ञ म्हणून खरेदी समिती समोर बोलविणेत आले होते. या तज्ञांच्या निवड समितीने उपरोक्त पुरवठाधारकांकडून नमुन्यांचीनिवड केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये पात्र असणाऱ्या पुरवठाधारकांचे तज्ञांनी तीन किंवा तीनपेक्षा जास्त नमुने निवडलेले आहेत, असा किराणा माल खरेदी करणेकामीच्या वाणिज्यीक निविदा पुढील खरेदी समितीसमोर उघडणे याव्यात व ज्या किराणा मालासाठी तीनपेक्षा कमी नमुन्यांची निवड करणेत आलेली आहे, असा किराणा माल खरेदीकामी फेर ई-निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदरहू ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन, संबंधीतांनानवीन पुरवठा आदेश देईपर्यंत, प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागासाठी आवश्यक असलेला किराणा माल व इतर अनुषंगिकसाहित्य मागील मंजुर दराने संबंधीतांकडूनखरेदी करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०२ **श्री साई समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने करावयाच्या विद्युत रोषणाईसाठी प्रात्यक्षिक स्वरुपात मे.साई आर्टस अॅण्ड लाईटस, मुंबई यांना डेमो (Presentation) करणेसाठी परवानगी देणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्रींचे समाधीस १८ आक्टोबर-२०१८ रोजी १०० वर्षे पुर्ण होत असल्याने दि.१७ आक्टोबर-२०१७ ते १८ ऑक्टोबर-२०१८ या कालावधीत संस्थानमार्फत "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव" साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत संपूर्ण वर्षभर संपुर्ण मंदिर परिसरात वेगवेगळया अत्याधुनिक लाईटसव्दारे विद्युत रोषणाई करणेकामी दि.०४-०२-२०१७ रोजी मा.विश्वस्त-श्री.जयकर साहेब यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे मा.विश्वस्तांनी सुचना केलेल्या आहेत असे संदर्भिय पत्र क्र.०१ अन्वये मा.प्रशासकीय अधिकारी यांनी विद्युत विभागास कळविले होते.

सदर विषयास अनुसरुन दि.०३-०४-२०१७ रोजी व्दारकामाई मंडळाचे सदस्य यांनी माविश्वस्त-श्री.जयकर साहेब यांचेशी केलेल्या चर्चेत "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव" चे निमित्ताने करावयाच्या विद्युत रोषणाईसाठी प्रात्यक्षिक स्वरुपात मंदिर व मंदिर परिसरातील गेटवर कशा प्रकारची विद्युत रोषणाई असावी याचा डेमो (Presentation) सादर करण्यात यावा असे ठरले. याविषया संबंधी विद्युत विभागामार्फत दि.११-०३-२०१७ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. या टिपणीवर Presentation बाबत आदेश झाल्यानुसार Presentaion बाबत श्री व्दारकामाई मंडळ यांचेशी याबाबत चर्चा केली.

त्यानुसार श्री व्दारकामाई मंडळामार्फत श्री पुण्यतिथी उत्सवामध्ये व श्री रामनवमी उत्सवामध्ये तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध कार्यक्रमांमध्ये (सप्तरंग इ.) विद्युत रोषणाई करणारे मे.साई आर्टस ॲण्ड लाईटस, मुंबई हे स्वत:चे वाहनाव्दारे मुंबई येथून पुढील महिन्यात (मे) मा.व्यवस्थापन समिती ठरवतील त्या सात दिवसाच्या कालावधीकरीता (मा.व्यवस्थापन समितीचे सभेची तारीख धरुन) त्यांचे स्वत:चे सर्व लाईटस, उपकरणे आणून ते मंदिर व मंदिर परीसरातील गेट याठिकाणी वापरुन प्रत्यक्ष डेमो विनामुल्य करणार आहे. हा डेमो (Presentation) मा.अध्यक्ष तसेच सर्व विश्वस्त यांना पाहता येईल व यामध्ये काही सुधारणा करावयाच्या

असल्यास त्याबद्दल मार्गदर्शन/ आदेश मिळू शकतील. तसेच मे.साई आर्टस ॲण्ड लाईटस, मुंबई यांचे कलाकार शिर्डी येथे डेमो साठी आल्यानंतर त्यांची निवासाची/ भोजनाची व्यवस्था विनामुल्य करावी लागणार आहे.

तसेच जा.नं.एसएसएस/ काअ– स्वीय/ ५६४/ २०१७ दि.२४-०४-२०१७ चे परिपत्रकातील अ.क्र.१५ अन्वये दि.१२-०४-२०१७ रोजी झालेल्या सभेत मा.कार्यकारी अधिकारी महोदया यांनी मंदिर व मंदिर परिसरातील सर्व गेट लक्षात येतील असे लाईट इफेक्टस देणेबाबत नावाजलेल्या कंपन्यांकडून देखाव्याचे व्हिडीओज संकलित करुन, त्यातून सर्व श्रेष्ठ देखाव्याचे सर्व गेटवर श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१७ पर्यंत लाईट इफेक्टस दिसणेबाबतची संपूर्ण कार्यवाही तात्काळ पुर्ण करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहे.

**मागणी:-** मे.साई आर्टस ॲण्ड लाईटस, मुंबई यांनी दाखविलेल्या डेमोनंतर (Presentation नंतर) तसेच डेमोमध्ये (Presentation मध्ये) मा.विश्वस्तांनी सुचविलेल्या बदलानूसार करावयाच्या विद्युत रोषणाईसाठी किती मटेरीयल लागेल याचा रिपोर्ट तयार करुन त्यानुसार ई-निविदा व्दारे मटेरीयल खरेदी करता येईल. त्यासाठी मे.साई आर्टस ॲण्ड लाईटस, मुंबई यांना "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव" चे निमित्ताने करावयाच्या विद्युत रोषणाईसाठी प्रात्यक्षिक स्वरुपात मंदिर व मंदिर परिसरातील गेटवर विद्युत रोषणाईचा डेमो (Presentation) विनामुल्य सादर करणेसाठी कळवावे लागणार आहे. तसेच त्यासाठीचे त्यांचे कलाकार शिर्डी येथे डेमो (Presentation) साठी आल्यानंतर त्यांची निवासाची/ भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** मे.साई आर्टस ॲण्ड लाईटस, मुंबई यांना "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव" चे निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरातील गेटवर विद्युत रोषणाईचा डेमो (Presentation) सादर करणेस परवानगी मिळणेस तसेच त्यांचे कलाकार शिर्डी येथे डेमो (Presentation) साठी आल्यानंतर त्यांची निवासाची / भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेस मान्यता मिळणेस विंनती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, "श्री साई समाधी शताब्दी महोत्सव" निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरातील महाद्वारांवर करण्यात येणाऱ्या विद्युत रोषणाईचा डेमो (Presentation) सादर करणेस व त्यांचे कलाकार शिर्डी येथे डेमो (Presentation) साठी आल्यानंतर त्यांची निवासाची/ भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०३ **सन- २०१७ मधील उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता जुना पिंपळवाडी रस्त्यावर मंडप व्यवस्था करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम -(१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा - अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

मधील पोट कलम २१ कलम तसेच अधिनियमाच्या(१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे "*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

१. मा. व्यधवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.२३४ (०६.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५३ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"..श्रींचे समाधी मंदिरामध्ये दर्शनाकरीता जाणेसाठी जुना पिंपळवाडी रस्याचांवर संस्थानची दर्शन रांग असून, साईभक्तं रस्त्यावरुन अनवाणी पायाने चालतात. परंतु सध्याचे उन्हाळ्याचे दिवसामध्ये साईभक्तांना या रस्यावर उन्हाचा त्रास होत आहे. याकरीता साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेकरीता या रस्यावर तात्पुरते स्वरुपात विहीत पध्दातीने मंडप टाकणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यसता देण्यात आली."*

**प्रस्तावना:-** उपरोक्त निर्णयानुसार सन २०१७ मधिल उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी जुने पिंपळवाडी रस्यावर गेट नं. १ ते गेट नं.२ पर्यंत ७००X१८ साईजचा एकुण १२६०० चौ. फुट मंडप एम. एस. पाईप कैचीचा दि.०७/०५/२०१७ ते दि.१५/०६/२०१७ अखेर ४० दिवस उभारणी करुन घेणेकामी अशा प्रकारचे मंडपाचे काम करणारे एकुण १२ ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेत आले असून, खालीलप्रमाणे प्राप्त झालेले

सहा सिलबंद कोटेशन दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आले असून, त्यांचे दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | कामाचा तपशिल | न्यु बालाजी मंडप, निमोण | न्यु साईकृपा डेकोरेटर्स, बेलापूर | न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी | शिवेश्वर मंडप ॲण्ड डेकोरेटर्स, औरंगाबाद | मळगंगा मंडप डेकोरेटर्स ॲण्ड सप्लायर्स, बेगमपूरा, औरंगाबाद | मनिष मंडप डेकोरेटर्स ॲण्ड सप्लायर्स, औरंगाबाद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम रु. | | | | | |
| १ | जुना पिंपळवाडी रस्यावाड वर एम. एस. पाईप व कैचीचा ताडपत्री मंडप उभारणे. १२६०० चौ. फुट | २७७२००/- | २९२३२०/- | २६२०८०/- | ४०३२००/- | ३०२४००/- | ४५३६००/- |

**प्रस्ताव:** तरी उन्हाळ्याचे कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी जुना पिंपळवाडी रोडवर गेट नं.०१ ते दर्शन रांगगेट क्र.०२ पर्यंत मंडप उभारणी करुन घेणेसाठी ठेकेदार न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी यांचे निम्नतम दरानुसार येणारे रु.२,६२,०८०/- मात्रचे खर्चास तसेच न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी यांना कार्यादेश देणेकरीता मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सदरील विषय मा.उपसमितीचे सभेचे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उन्हाळ्याचे कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी जुन्या पिंपळवाडी रस्त्यावर गेट नं.०१ ते दर्शन रांग गेट क्र.०२ पर्यंत मंडप उभारणी करणेकामी न्यु जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी यांचे रु.२,६२,०८०/- मात्र प्राप्त झालेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, साईभक्तांचे उन्हापासून संरक्षण होणेकामी निम्नतम दरधारकाकडून तातडीने मंडपाची उभारणी करुन घेण्यात आलेली आहे. त्यानुसार निम्नतम दरधारकास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**तसेच या जुन्या पिंपळवाडी रस्त्यावरील चारचाकी वाहनांची रहदारी बंद करणेबाबत, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमख)

---

०४ **संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

अधिनियम 2004 मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-

14(2) (ग) समितीच्या अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्य याबाबत असून त्या प्रमाणे "नाशवंत वस्तुंची लिलावाद्वारे किंवा अन्य प्रकारे, विल्हेवाट लावण्याचे आणि त्यांचे उत्पन्न विश्वस्त व्यवस्थेच्या निधीमध्ये जमा करणे." अशी तरतूद प्रस्तूत कलमा मध्ये नमुद केलेली आहे.

**प्रस्तावीक-** बगीचा विभागामार्फत संस्थान परिसरामध्ये तसेच साठवण तलावाचे चारही बाजुने व पश्चिमेला आंबा-नारळ बागेत, धर्मशाळा परिसर, साईनगर, नविन भक्त निवास परिसर, शैक्षणिक संकुल परिसरात नारळ झाडे लावण्यात आलेली असुन सदर झाडांना फळे येण्यास सुरवात झालेली आहे.

दि.09/03/2017 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.176 अन्वये, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची उच्चतम दराने विक्री करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी,शासन,निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे.

**मागणी-** त्यानुसार संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामी जनसंपर्क विभागास पत्रव्यवहार करुन वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन परिसरातील हातविक्री करणारे व्यापारी किंवा अन्य व्यापाऱ्यांकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. प्राप्त झालेली दरपत्रके दि.06/05/2017 रोजीच्या मा. खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आले असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं | दरपत्रक सादरकर्त्याचे नाव | दर (प्रति नग शहाळे फळ) |
|---|---|---|
| **01** | **श्री विजय अंबादास वाणी** | **रु.11.50/-** |
| 02 | श्री विशाल सुधाकर शिंदे | रु.10.50/- |

| | | |
|---|---|---|
| 03 | श्री सुनील पंडीतराव जाधव | रु.8.50/- |

विभागाचा अभिप्राय-

तरी संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामी उघडण्यात आलेल्या दरपत्रका मध्ये अ.नं.01 चे श्री विजय अंबादास वाणी, नांदुर्खी यांचे दर प्रति नग रु.11.50/- मात्र सर्वात उच्चतम प्राप्त झालेला आहे. त्यामुळे श्री. विजय अंबादास वाणी, नांदुर्खी यांना उप समिती समोर चर्चेसाठी उपस्थित राहणेबाबत कळविता येईल. व त्यानंतर श्री विजय अंबादास वाणी यांना कार्यादेश देऊन त्यांना संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेस मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामीचे उच्चतम दरधारक श्री. विजय अंबादास वाणी, नांदुर्खी हे आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, त्यांनी उपरोक्त दिलेले दर अंतीम समजणेत यावे, अशी विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील नारळ (शहाळे) फळांची विक्री करणेकामी श्री. विजय अंबादास वाणी, नांदुर्खी यांचे प्रती नग रु११.५० मात्र उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**०५ नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

अधिनियम2004मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-

14 (2) (घ) मधील भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे अशी तरतुद आहे.

**प्रस्तावीक-** शिर्डी शहरातील वाहतुक व्यवस्थित होणेकरीता या महामार्गावर रोड दुभाजक तयार करण्यात आलेला आहे. रोड दुभाजकामध्ये संस्थान मार्फत वेळो -वेळी झाडे, रोपे लावुन दुभाजकाचे सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. मागील वर्षी उन्हाळयात दुष्काळजन्य परिस्थीतीमुळे नगर -मनमाड रोड दुभाजकातील झाडांना पाणी कमी मिळाल्याने तसेच गर्दीच्या काळात श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांची संख्या वाढली असता साईभक्त रोड दुभाजकामधुन ये -जा करतात परिणामी दुभाजकात लावण्यात आलेली झाडे खराब झालेली आहे.

दि.25/02/2017 रोजीच्या मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.127 अन्वये, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.1,80,000/- (एक लाख ऐंशी हजार) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे.

**संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी, शासन, निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान-**सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे.

**मागणी -**त्यानुसार नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेकामी जा.नं.एसएसएस/ वशी-बगीचा/ 6456/2017 दि.25/03/2017 अन्वये पत्रव्यवहार करुन विविध नर्सरींकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. दरपत्रके सादर करावयाची मुदत दि.08/04/2017 अखेर संपलेली असुन सदर मुदतीत एकुण 05 दरपत्रके प्राप्त झालेली आहे. प्राप्त झालेली दरपत्रके दि.06/05/2017 रोजीच्या मा. खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आले असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं | दरपत्रक सादरकर्त्याचे नाव | दर (प्रति रोप नग) |
|---|---|---|
| 01 | मनिषा नर्सरी, नाशिक | रु. 95/- |
| 02 | माऊली नर्सरी, अस्तगांव | रु. 43/- |
| **03** | **डायमंड नर्सरी ॲण्ड गार्डनर, पुणे** | **रु. 30/-** |
| 04 | कोतवाल ग्रीन्स, पुणे | रु. 40/- |
| 05 | लिना नर्सरी, पुणे | रु. 42/- |

**विभागाचा अभिप्राय-** तरी नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेकामी उघडण्यात आलेल्या दरपत्रका मध्ये अ.नं.03 चे डायमंड नर्सरी ॲण्ड गार्डनर, पुणे यांचे दर प्रति रोप नग रु.30/- (तिस) मात्र सर्वात न्युनत्तम प्राप्त झालेला आहे. त्यामुळे डायमंड नर्सरी ॲण्ड गार्डनर, पुणे यांना उप समिती समोर चर्चेसाठी उपस्थित राहणेबाबत कळविता येईल. व त्यानंतर त्यांना कार्यादेश देऊन त्यांचेकडुन नगरमनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेकामी बोगन वेलची रोपे खरेदी करणेस मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**नगर-मनमाड रोड दुभाजकात बोगन वेलची झाडे लावणेकामीचे निम्नतम दरधारक डायमंड नर्सरी ॲण्ड गार्डनर, पुणे यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी प्रती नग रु.२५/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नगर-मनमाड रोड दुभाजकात लावणेसाठी बोगन वेलची झाडे खरेदी करणेकामी डायमंड नर्सरी ॲण्ड गार्डनर, पुणे यांचे प्रती नग रु.२५/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच त्यांचेकडून चांगल्या दर्जाची व ३ फुटापेक्षा जास्त उंचीची झाडे खरेदी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**तसेच वन महोत्सवाच्या निमित्ताने दि.०१ जुलै रोजी सदरहू वृक्षारोपन करणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

०६ **कुंडयातील रोपे खरेदी करणेबाबतचा तुलनात्मक तक्ता.**

अधिनियम 2004 मधील तरतूद व्यवस्थापन समितीचा-

17 (2) (ट) मधील विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्टे व प्रयोजने पार पाडणे अशी तरतुद आहे.

प्रस्तावीक- बगीचा विभागा मार्फत संस्थान परिसरात शोभेची रोपे/ झाडे लावून परिसर सुशोभित करण्यात आलेला आहे. तसेच विभागामार्फत संस्थान परीसरात, ऑफीस तसेच वेळोवळी कार्यक्रमासाठी व उत्सवा निमीत्ताने शोभेच्या कुंडया ठेवल्या जातात.

दि.25/02/2017 रोजीच्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.129 अन्वये, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कुंड्यामधील 13 प्रकारची रोपे खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.1,50,000/- (एक लाख पन्नास हजार) मात्र खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

संस्थान अधिनियम ठराव/या नुसार छाननी, शासन, निर्देश, तांत्रिक कायदेशिर तसेच अर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान- सदरचा विषय हा आर्थीक स्वरुपाचा आहे.

मागणी- त्यानुसार कुंड्यातील रोपे खरेदी करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-बगीचा/6413/2017 दि.22/03/2017 अन्वये पत्रव्यवहार करुन विविध नर्सरींकडुन दरपत्रके मागविण्यात आलेली होती. दरपत्रके सादर करावयाची मुदत दि.08/04/2017 अखेर संपलेली असुन सदर मुदतीत एकुण 05 दरपत्रके प्राप्त झालेली आहे. प्राप्त झालेली दरपत्रके दि.06/05/2017 रोजीच्या मा. खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | दरपत्रक सादरकर्त्याचे नाव | एकुण दर |
|---|---|---|
| 01 | मनिषा नर्सरी, नाशिक | रु. 1,50,900/- |
| 02 | माऊली नर्सरी, अस्तगांव | रु. 1,98,875/- |
| 03 | डायमंड नर्सरी ॲण्ड गार्डनर, पुणे | रु. 2,32,000/- |
| 04 | कोतवाल ग्रीन्स, पुणे | रु. 1,50,050/- |
| **05** | **लिना नर्सरी, पुणे** | **रु. 1,45,050/-** |

**विभागाचा अभिप्राय-** तरी कुंड्यातील रोपे खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या दरपत्रकामध्ये अ.नं.05 चे लिना नर्सरी, पुणे यांचे एकुण दर रु.1,45,050 (एक लाख पंचेचाळीस हजार पन्नास) मात्र सर्वात न्युनत्तम प्राप्त झालेला आहे. त्यामुळे लिना नर्सरी, पुणे यांना उप समिती समोर चर्चेसाठी उपस्थित राहणेबाबत कळविता येईल. व त्यानंतर त्यांना कार्यादेश देऊन त्यांचेकडुन कुंड्यातील रोपे खरेदी करणेस मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**कुंडयातील रोपे खरेदी करणेकामीचे निम्नतम दरधारक लिना नर्सरी, पुणे यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस अमर्थतता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात शोभेची रोपे/ झाडे लावून परिसर सुशोभित करणेसाठी कुंडयातील रोपे खरेदी करणेकामी लिना नर्सरी, पुणे यांचे एकत्रित रु.१,४५,०५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**०७ मंदिर व मंदिर परिसर, द्वारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

मंदिर व परिसर, व्दारावती तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान येथे श्री साईभक्तांच्या सोयीकरीता खालीलप्रमाणे ए.सी. व फ्रिज यंत्रणा कार्यरत आहेत:

| अ.नं. | ठिकाण | यंत्रणेचा तशील | संख्या |
|---|---|---|---|
| १. | मंदिर व परिसर | ए.सी. – १ टन | २५ |
| | | ए.सी. – १.५ टन | ४३ |
| | | ए.सी. – २ टन | ६९ |
| | | ए.सी. – ५ टन | ३ |
| | | कुलर आणि फ्रिज | १६ |
| २. | व्दारावती इमारत | ए.सी. – १ टन | ४१ |
| | | ए.सी. – १.५ टन | १४ |
| | | ए.सी. – २ टन | २५ |
| ३. | साईबाबा भक्तनिवास व परिसर | ए.सी. – १ व १.५ टन | २६ |
| | | ए.सी. – २ टन | ९ |
| | | कुलर आणि फ्रिज | ७ |
| ४. | साई प्रसादालय व्ही.आय.पी. भोजन हॉल | ए.सी. – १, १.५ टन व २ टन | १५ |
| | | डिप फ्रिज | १० |
| | | कोल्ड स्टोरेज – ५ टन | १ |
| | | कोल्ड स्टोरेज – ३ टन | १ |
| | | **एकूण :** | **३०५** |

उपरोक्त यंत्रणेचा CAMC करीता मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१९(४) अन्वये मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०२/२०१६ ते ३१/०१/२०१७ या एक वर्षाचे कालावधीकरीता रुपये ६,८९,९८०/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला होता. सदर कालावधी दिनांक ३१/०१/२०१७ रोजी संपत असल्याने पुढील एक वर्षाचे कालावधीकरीता CAMC देणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७ अन्वये येणा-या रुपये ५,९६,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक २२/०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक ३१/०३/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार/ कंत्राटदार यांच्या तांत्रिक ई-निविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Work, Mumbai | 3. | Cool Breeze, Pune |
| 2. | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | | |

वरील प्राप्त ३ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ११/०४/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यातील VAT, TIN, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील ३ तांत्रिक निविदा पात्र झाल्या आहेत. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक ०६/०५/२०१७ रोजीचे मा खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत:

| Sr. No. | Description | **Kailas Refrigeration Works, Mumbai** | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | Cool Breeze, Pune |
|---|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Annual Maintenance Contract of Central AHU with Condensing Units & Other Air Conditioing Units Installed in Temple Campus, & Dwaravati, Saibaba Bhaktaniwassthan. | **Rs. 6,55,015/-** | Rs. 8,35,567/- | Rs. 8,76,700/- |

उपरोक्त तक्त्यानुसार मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रुपये ६,५५,०१५/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी मदिर व परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी निम्नतम दरधारक मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा.उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**मदिर व मंदिर परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण एसी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामीचे निम्नतम दरधारक मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या एकत्रित दरामध्ये रु.५०१५/- मात्र सुट देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मदिर व मंदिर परिसर, व्दारावती आणि साईबाबा भक्तनिवासस्थान येथील संपूर्ण एसी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे एकत्रित रु.६,५०,०००/- मात्र अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०१८ या कालावधीकरीता कार्यादेश आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०८ **श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन शिएटर्स व आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल ए.सी. प्लांटच्या एकूण १३ यंत्रणा तसेच स्पिलट टाईप ए.सी. एकूण ७१ नग, मॉरच्युरी २ नग, मेडीसीन कोल्ड स्टोअर १ नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण २६ नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्प्लिट टाईप ए.सी. एकूण ३८ नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण २४ नग कार्यान्वित आहे.

सदर यंत्रणेचे CAMC करीता मागील वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१९(५) अन्वये मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना दिनांक ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ या कालावधीकरीता रुपये १२,१५,२००/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आलेला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०३/२०१७ रोजी संपत असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५९ अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे दिनांक १/४/२०१७ ते ३१/३/२०१८ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी येणा-या रुपये ११,०८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. त्याचप्रमाणे मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नगर येथील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक २२/०३/२०१७ रोजी सकाळी

११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक ३१/०३/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार/ कंत्राटदार यांच्या तांत्रिक ईनिविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Work, Mumbai | 3. | Cool Breeze, Pune |
| 2. | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | | |

वरील प्राप्त ३ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ११/०४/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यातील VAT, TIN, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील ३ तांत्रिक निविदा पात्र झाल्या आहेत. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक ०६/०५/२०१७ रोजीचे मा खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या असून, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत :

| Sr. No. | Description | **Kailas Refrigeration Work, Mumbai** | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | Cool Breeze, Pune |
|---|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Annual Maintenance Contract of Central AHU with Condensing Units & Other Air Conditioing Units Installed in Shri Saibaba Hospital & Shri Sainath Hospital. | **10,76,500/-** | 14,99,999/- | 14,72,000/- |

उपरोक्त तक्त्यानुसार मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रुपये १०,७६,५००/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी निम्नतम दरधारक मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेशी चर्चा / वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी मा. उप-समितीचे सभेपुढे सादर.

**श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी राबविणेत आलेल्या निविदाप्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील ए.सी. यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रु.१०,७६,५००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०१८ या कालावधीकरीता कार्यादेश आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**०९ श्री साई प्रसादालायातील वायुवीजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

श्री साई प्रसादालय येथील मुख्य किचन, बुंदी किचन, लाडू किचन, पुरी किचन तसेच चपाती किचन येथील कर्मचाऱ्यांना उन्हाळयात त्याठिकाणी काम करणे सुसह्य व्हावे म्हणून तापमान सुस्थितीत ठेवणेसाठी बाहेरुन गार हवेचा झोत सोडून तापमान नियंत्रणात ठेवणे तसेच हवेतील आर्द्रता नियंत्रणात ठेवणे जेणेकरुन त्या-त्या किचनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ नये. शिवाय किचनमधील जळालेले तेलाचे बाष्प आणि इतर घाण एक्झॉस्टव्दारे बाहेर जावी याकरीता ८ नग डक्टेबल वायुविजन यंत्रणा व १० नग सेंट्रीफ्युगल डक्टेबल एक्झॉस्ट यंत्रणा डिसेंबर, २००८ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त यंत्रणेचे CAMC करीता मागील वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/१२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६१९(५) अन्वये मे. श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे यांना दिनांक ०१/०२/२०१६ ते ३१/०१/२०१७ या कालावधीकरीता रुपये ५,८८,९८८/- मात्रचे रकमेस कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१/०१/२०१७ रोजी संपत असल्याने, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७ अन्वये श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे दिनांक १/२/२०१७ ते ३१/१/२०१८ या एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता येणा-या रुपये ५,३२,३०४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

वरील मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक २२/०३/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक ३१/०३/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार/ कंत्राटदार यांच्या तांत्रिक ई-निविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झालेल्या आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | Kailas Refrigeration Work, Mumbai | 3. | Cool Breeze, Pune |
| 2. | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | | |

वरील प्राप्त ३ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ११/०४/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्यातील VAT, TIN, PAN, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील ३ तांत्रिक निविदा पात्र झाल्या आहेत. या पात्र झालेल्या निविदाधारकांच्या ई-निविदांचे आर्थिक (Financial) बीड दिनांक ०६/०५/२०१७ रोजीचे मा खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आल्या, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत:

| Sr. No. | Description | **Kailas Refrigeration Work, Mumbai** | Shree Venkateshwara Trunkey Project Soluation Pvt. Ltd., Pune | Cool Breeze, Pune |
|---|---|---|---|---|
| 1. | Comprehensive Annual Maintenance Contract of Air Ventilation System & Exhaust System Installed in Sai Prasadalaya | **4,89,500/-** | 6,99,999/- | 7,28,250/- |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील तक्त्यानुसार मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रुपये ४,८९,५००/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता निम्नतम दरधारक मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी राबविणेत आलेल्या निविदाप्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील वायुवीजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे.कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे रु.४,८९,५००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०१८ या कालावधीकरीता कार्यादेश आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**१० श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६ अन्वये श्री साई प्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेकामी येणा-या रुपये २१,२०,५५४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा (दुसरे वेळेस) जाहीरात अपलोड करण्यात आली होती. त्याचप्रमाणे मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नगर येथील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेत आलेली होती. यामध्ये ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडकरीता दिनांक १२/०४/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आली होती. तसेच ई-निविदा डाऊनलोड करुन, सोबत आवश्यक ते कागदपत्रे स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रिक कागदपत्रांच्या मुळ प्रती दिनांक २२/०४/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शिर्डी कार्यालयात दाखल करण्याची अंतिम मुदत ई-निविदेत देण्यात आली होती.

उपरोक्त मुदतीत खालील पुरवठादार यांच्या तांत्रिक ईनिविदाच्या हार्ड कॉफी बंद पाकीटामध्ये संस्थानकडे प्राप्त झाल्या आहेत:

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | ARS Glasstech Pvt. Ltd., Vododara | 3. | K Energy, Jodhpur |
| 2. | Vcare Global, Vodadara | | |

वरील प्राप्त ३ ई-निविदेतील तांत्रिक निविदा (Technical Bid) दिनांक ०६/०५/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेमध्ये उघडणेत आलेले आहेत. त्यातील कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या पुरवठा आदेशासह कामांची यादी, कंपनीचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट, टेंडर फी व ई.एम.डी. रकमेचा डी.डी., MNRE चॅनल पार्टनर, मिरर स्पेसीफिकेशन इत्यादी बाबी तपासल्या असून, त्यात वरील तीनही तांत्रिक निविदा पात्र झाल्याने, त्यांचे आर्थिक (Financial) बीड त्याच सभेत (दिनांक ०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीत) उघडणेत आले, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत:

1) **ARS Glasstech Pvt. Ltd., Vododara**

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per Dish) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Removal of exiting mirrors & supply of 3 mm solar reflective mirrors with installation & commissioning of solar project. | 43 | 50,000/- | 21,50,000/- |
| 2. | Colouring of the system using special paints (Dish Structure) | 73 | 2,100/- | 1,53,300/- |
| | | | **Total Rs :** | **23,03,300/-** |

2) K. Energy, Jodhpur

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per Dish) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Removal of exiting mirrors & supply of 3 mm solar reflective mirrors with installation & commissioning of solar project. | 43 | 52,000/- | 22,36,000/- |
| 2. | Colouring of the system using special paints (Dish Structure) | 73 | 3,700/- | 2,70,100/- |
| | | | **Total Rs :** | **25,06,100/-** |

3) Vcare Global, Vodadara

| Sr. No. | Description | Qty | Rate (Per Dish) Rs. | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Removal of exiting mirrors & supply of 3 mm solar reflective mirrors with installation & commissioning of solar project. | 43 | 51,000/- | 21,93,000/- |
| 2. | Colouring of the system using special paints (Dish Structure) | 73 | 3,500/- | 2,55,500/- |
| | | | **Total Rs :** | **24,48,500/-** |

उपरोक्त आर्थिक (Financial) बीडमधील अ.नं. १ M/s. ARS Glasstech Pvt. Ltd., Vododara यांचे ४३ नग सोलर डिशकरीत नविन मिरर टाकणे व ७३ नग डिश स्ट्रक्चरला कलरींग करणे या कामांकरीता एकत्रित रक्कम रुपये २३,०३,३००/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी श्री साई प्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेकामी निम्नतम दरधारक M/s. ARS Glasstech Pvt. Ltd., Vodadara यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साई प्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेकामी राबविणेत आलेल्या निविदाप्रक्रियेमधील निम्नतम दरधारक M/s. ARS Glasstech Pvt. Ltd., Vodadara यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे मिरर (आरशे) बदलविणेकामी M/s. ARS Glasstech Pvt. Ltd., Vodadara यांचे रु.२३,०३,३००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

११ **शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे जनरेटर शेडचे केबल ट्रेंचरवर बसविणेकरीता एम.एस. ब्रेकर प्लेट खरेदीकामी उघडण्यात आलेल्या कोटेशनबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २४६ अन्वये शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे जनरेटर शेडचे केबल ट्रेंचरवर बसविणेकरीता एम.एस. चेकर प्लेट खरेदीकामी येणा-या रुपये १,२८,९१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/१७४/२०१७ दिनांक १०/०४/२०१७ अन्वये १० फॅब्रिकेशन मटेरिअल पुरवठादार यांना दर देणेबाबत कळविण्यात आले होते. या पत्रात दरपत्रके पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक २६/०४/२०१७ देण्यात आली होती. या मुदतीत खालील पुरवठादार यांचे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मे. युनियन ट्रेडींग कंपनी | २. | मे. शितल सेल्सव |
| ३. | मे. भनसाळी मोटर्स | ४. | मे. एक्सेसल ट्रेडींग कंपनी |
| ५. | मे. विजसन इंजिनिअर्स प्रा. लि. | | |

उपरोक्त प्राप्त झालेले ५ कोटेशन दिनांक ०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत:

| अ.नं. | पुरवठादारांचे नांव | मटेरिअल तपशील | दर प्रती नग रुपये | मागणी नग | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. युनियन ट्रेडींग कंपनी | M.S. Chequered Plate– 8'x4'x6' mm | ९,१००/- | १५ | १,३६,५००/- |
| २. | मे. शितल सेल्से | | ८,४२७/- | | १,२६,४०५/- |
| **३.** | मे. भनसाळी मोटर्स | | **८,१७.६०** | | **१,२२,५८९/-** |
| ४. | मे. एक्सील ट्रेडींग कंपनी | | ८,५३२/- | | १,२७,९८०/- |
| ५. | मे. विजसन इंजिनिअर्स प्रा. लि. | | ८,२५०/- | | १,२३,७५०/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे. भनसाळी मोटर्स, साकुरी यांचे प्रती नग रुपये ८,१७२.६० दरानुसार १५ नग चेकर प्लेटकरीता एकूण रुपये १,२२,५८९/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे जनरेटर शेडचे केबल ट्रेंचरवर बसविणेकरीता एम.एस. चेकर प्लेट खरेदीकामी निम्नतम दरधारक मे.भनसाळी मोटर्स, साकुरी यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे जनरेटर शेडचे केबल ट्रेंचरवर बसविणेकामीचे निम्नतम दरधारक मे.भनसाळी मोटर्स, साकुरी यांचे प्रतिनिधींना आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी बोलविणेत आले होते, परंतु सभेसमोर ते अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी कोटेशनमध्ये दिलेले एकत्रित रु.१,२२,५८९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**१२ लाडू किचनकरीता कुकींग रेंज (गॅस शेगडया) खरेदी करणेकामी उघडण्यात आलेल्या कोटेशनबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २०१ अन्वये लाडू किचनकरीता कुकींग रेंज (गॅस शेगडया) खरेदी करणेकामी येणा-या रुपये २,६०,८८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेनुसार जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/२२१/२०१७ दिनांक १२/०४/२०१७ अन्वये ९ पुरवठादार यांना दर देणेबाबत कळविण्यात आले होते. या पत्रात दरपत्रके पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक २६/०४/२०१७ देण्यात आली होती. या मुदतीत खालील पुरवठादार यांचेकडून दरपत्रके प्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव | अ.नं. | ईनिविदाधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | मे. एस.एस. इक्युपमेंट | २. | मे. समर्थ इंजिनिअर्स ॲण्डी कंन्स्ल्टंट, पुणे |
| ३. | मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज | | |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ३ कोटेशन दिनांक ०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले, त्यात खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत :

| अ.नं. | पुरवठादारांचे नांव | मटेरिअल तपशील | दर प्रती नग रुपये | मागणी नग | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे. एस.एस. इक्युपमेंट | 304 SS Heavy Huty Cooking Range, Size – 1050 x 1050 mm. Height 300 mm | ५१,६५०/- | १० | ५,१६,५००/- |
| २. | मे. समर्थ इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सल्टंट | | ३०,९६०/- | | ३,०९,६००/- |
| **३.** | मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज | | २१,६९५/- | | २,१६,९५०/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे.राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे एकूण १० नग कुकींग रेंजकरीता रुपये २,१६,९५०/- मात्रचे दर निम्नतम आहेत.

तरी लाडू किचनकरीता १० नग कुकींग रेंज (गॅस शेगडया) खरेदी करणेकामी निम्नतम दरधारक मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचेशी चर्चा/ वाटाघाटी करुन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव मा.उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**लाडू किचनकरीता १० नग कुकींग रेंज (गॅस शेगडया) खरेदी करणेकामी निम्नतम दरधारक मे.राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, परंतु त्यांनी लेखी पत्राद्वारे कळविले की, आपल्या सभेसमोर दरांविषयी चर्चा करणेसाठी उपस्थित राहु शकत नाही, कोटेशनमध्ये दिलेले दर अंतीम समजणेत यावे, ही विनंती.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू किचनकरीता १० नग कुकींग रेंज (गॅस शेगडया) खरेदी करणेकामी मे.राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर यांचे एकत्रित रु.२,१६,९५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठाआदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**१३ श्री साई प्रसादालयातील स्टे.स्टील ताटे बफींग करणेबाबत.**

**प्रास्तविक**:- मा.व्यवस्थापन समिती दि.०७/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४६२ नूसार, श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनाची स्टे.स्टील ताटे बफींग करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार जा.नं.एसएसएस/वशि/ प्रसादा/३८१/२०१७ दि.२०/०४/२०१७ चे पत्राद्वारे ताटे बफींग करणा-या ०६ एजन्सीकडून दि.०१/०५/२०१७ अखेरपर्यंत दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यापैकी विहीत वेळेत खालील ०३ एजन्सींनी दरपत्रके सादर केलेली आहे.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| १. | पवन इंडस्ट्रीज, कोपरगांव |
| २. | अंबिका बफींग वर्क्स , श्रीरामपूर |
| ३. | भारती इंडस्ट्रीज,पुणे |

वरील पुरवठादाराचे मुदतीत प्राप्त झालेले ०३ बंद कोटेशन दिनांक ०६/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यात खालीलप्रमाणे दर देण्यात आलेले आहे.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | दर प्रती नगास रुपये |
|---|---|---|
| **१.** | **पवन इंडस्ट्रीज (इलेक्ट्रोप्लेटींग वर्क्स), कोपरगांव** | **३२/-** |
| २. | अंबिका बफींग वर्क्स , श्रीरामपूर | ३७/- |
| ३. | भारती इंडस्ट्रीज,पुणे | ५५/- |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्तविकमधील तुलनात्मक तक्त्यानूसार श्री साई प्रसादालयातील प्रसादभोजनाची ताटे बफींग करणेकामी पवन इंडस्ट्रीज, (इलेक्ट्रोप्लेटींग वर्क्स), कोपरगांव यांचे दर प्रती नगास रु.३२/- (सर्व करांसहीत) निम्नतम आलेले आहेत.

तरी श्री साई प्रसादालयातील स्टे.स्टील ताटे बफींग करणेकामी निम्नतम दरधारक पवन इंडस्ट्रीज, (इलेक्ट्रोप्लेटींग वर्क्स), कोपरगांव यांना कार्यादेश देणेकामी पुढील कार्यवाहीसाठी सदरचा प्रस्ताव मा. उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**श्री साई प्रसादालयातील स्टे.स्टील ताटे बफींग करणेकामीचे निम्नतम दरधारक पवन इंडस्ट्रीज, (इलेक्ट्रोप्लेटींग वर्क्स), कोपरगांव यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील स्टे.स्टील ताटे बफींग करणेकामी पवन इंडस्ट्रीज, (इलेक्ट्रोप्लेटींग वर्क्स), कोपरगांव यांचे प्रती नग रु.३२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच ताटे बफींग करण्याचा व्यावसायिक अभ्यासक्रम आहे का व तो श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र येथे सुरु करणे शक्य होईल का, याची चौकशी करणेत येऊन, व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**१४ मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थान दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| 01 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 1 | राज्या शासनाच्या कोणत्या ही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्त गणांना आवश्यंक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| 02 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 2(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| 03 | 17 | समितीची कर्तव्ये व अधिकार | 6 | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.09/03/2017 रोजीचे सभेत निर्णय क्रं.218 पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. विधी व न्यासय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.संकीर्ण 2014/प्र.क्र.32/का.16, दि. मार्च, 2017 रोजीचे आदेशान्वये श्रीमती रुबल प्रखेर-अग्रवाल, भा.प्र.से. यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती झालेली असून, श्रीमती रुबल प्रखेर-अग्रवाल, भा.प्र.से. यांनी आज दि.09/03/2017 रोजी संस्थानचा कार्यभार स्विकारलेला आहे. आजचे सभेत व्यवस्थापन समितीने त्यांचे स्वागत केले. तसेच कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येणा-या निवासस्थानाचे रंगकाम व इतर आवश्यक दुरुस्ती करणेत यावी, असे ठरले. याकामी विहीत पध्दतीने कोटेशनची मागणी करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यतता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** संस्थानचे सर्व्हे नं.107,108 पैकी मधील जागेत मा.कार्यकारी अधिकारी यांचे निवासाकरीता सन 1999 मध्ये निवासस्थानाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदरहू निवासस्थानाची पाहणी केली असता, त्या मधील पाईपलाईन, नळ, संडास भांडे व इतर तत्सम प्लंबींग साहित्य बदली करणे गरजेचे असल्याचे आढळून आले. याकामी आवश्यक साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्या साठी येणारे अंदाजे रु.87,807/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले होते.

मा.व्यपवस्थापन समितीचे दि.09/03/2017 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.218 नुसार याकामी दरपत्रके (कोटेशन) मागविणेस दि.20/03/2017 रोजीचे टिपणीन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. याकामी खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली होती.

| अ.नं. | नांव | प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक |
|---|---|---|
| 01 | हरि ओम बिल्डिंग मटेरियल, राहाता. | 0779, दि.10/04/2017. |
| 02 | संतराज ट्रेडर्स, राहाता. | 0780, दि.10/04/2017. |
| 03 | यशोदा ट्रेडर्स, साकुरी (राहाता) | 0781, दि.10/04/2017. |

**प्रस्ताव:-** सदरहू कामी प्राप्त 03 दरपत्रके (कोटेशन) दिनांक 06/05/2017 रोजीचे मा.स्थानिक खरेदी समिती सभेत उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं.नं. | साहित्याचा तपशिल/ कंपनी/ मागणी | हरि ओम बिल्डिंग मटेरियल, राहाता 01 | | संतराज ट्रेडर्स, राहाता. 02 | | **यशोदा ट्रेडर्स, साकुरी (राहाता) 03** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रती नग किंमत | एकुण किंमत | प्रती नग किंमत | एकुण किंमत | प्रती नग किंमत | एकुण किंमत |
| 01 | बीब कॉक-1/2"(नं.F330041), | 670.00 | 670.00 | 680.00 | 680.00 | 670.00 | 670.00 |
| 02 | हिंदवेअर,1 नग | 920.00 | 920.00 | 925.00 | 925.00 | 920.00 | 920.00 |
| 03 | लॉग बॉडी बीब कॉक-1/2"(नं.F330011), हिंदवेअर, 1 नग | 2850.00 | 5700.00 | 2800.00 | 5600.00 | 2750.00 | 5500.00 |
| 04 | पिलर कॉक (नं.F450002),हिंदवेअर,2 नग | 3150.00 | 3150.00 | 3000.00 | 3000.00 | 2960.00 | 2960.00 |
| 05 | पिलर कॉक (नं.F460002),हिंदवेअर, 1 नग | 1430.00 | 4290.00 | 1400.00 | 4200.00 | 1360.00 | 4080.00 |
| 06 | बॉटल ट्रॅप (नं.F850004),हिंदवेअर, 3 नग | 7900.00 | 7900.00 | 7850.00 | 7850.00 | 7790.00 | 7790.00 |
| 07 | शॉवर-1/2" (नं.F160062),हिंदवेअर, 1 नग | 1250.00 | 2500.00 | 1200.00 | 2400.00 | 1160.00 | 2320.00 |
| 08 | शॉवर-1/2" (नं.F160032),हिंदवेअर, 2 नग | 1410.00 | 1410.00 | 1400.00 | 1400.00 | 1340.00 | 1340.00 |
| 09 | शॉवर आर्म (नं.F160024), | 570.00 | 1140.00 | 550.00 | 1100.00 | 530.00 | 1060.00 |
| 10 | हिंदवेअर, 1 नग | 2300.00 | 2300.00 | 2275.00 | 2275.00 | 2250.00 | 2250.00 |
| 11 | शॉवर आर्म (नं.F330028), | 4350.00 | 4350.00 | 4250.00 | 4250.00 | 4220.00 | 4220.00 |
| 12 | हिंदवेअर, 2 नग | 1160.00 | 2320.00 | 1150.00 | 2300.00 | 1130.00 | 2260.00 |
| 13 | हॅन्डे शॉवर (नं.F160031),हिंदवेअर, 1 नग | 650.00 | 3900.00 | 630.00 | 3780.00 | 620.00 | 3720.00 |
| 14 | वॉल मिक्सगर (नं.F390022), | 430.00 | 1290.00 | 420.00 | 1260.00 | 415.00 | 1245.00 |
| 15 | हिंदवेअर, 1 नग | 470.00 | 1410.00 | 450.00 | 1350.00 | 425.00 | 1275.00 |
| 16 | ॲन्गेल कॉक-1/2" (नं.F390005), हिंदवेअर, 2 नग | 140.00 | 560.00 | 130.00 | 520.00 | 125.00 | 500.00 |
| 17 | ॲन्गेल कॉक-1/2" (नं.F330043), हिंदवेअर, 6 नग | 20.00 | 200.00 | 20.00 | 200.00 | 20.00 | 200.00 |
| 18 | वेस्टे कपलींग-1.1/4" (नं.508582),हिंदवेअर, 3 नग | 6700.00 | 20100.00 | 6580.00 | 19740.00 | 6380.00 | 19140.00 |
| 19 | जेट स्प्रे -1/2" (नं.508882), हिंदवेअर, 3 नग | 5100.00 | 15300.00 | 5050.00 | 15150.00 | 4940.00 | 14820.00 |
| 20 | फ्लोर ट्रॅप पी.व्ही1.सी.6",हिंदवेअर, 4 नग | 150.00 | 900.00 | 140.00 | 840.00 | 135.00 | 810.00 |
| 21 | टेपलॉन टेप, 10 नग | 225.00 | 225.00 | 200.00 | 200.00 | 190.00 | 190.00 |
| 22 | वॉल हॅन्गिग कमोड संडास भांडे, (नं.20061), हिंदवेअर, 3 नग | 80.00 | 160.00 | 70.00 | 140.00 | 65.00 | 130.00 |
| 23 | वॉश बेसीन टेबल टॉप (नं.91041),हिंदवेअर, 3 नग | 65.00 | 650.0 | 55.00 | 550.00 | 50.00 | 500.00 |
| 24 | कोल्डं वॉटर इनलेट पाईप- 2 फुटी, 6 नग | 150.00 | 300.00 | 120.00 | 240.00 | 110.00 | 220.00 |
| 25 | यु.पी.व्हीप.सी.युनियन-2", आशिर्वाद, 1 नग | 550.00 | 1100.00 | 500.00 | 1000.00 | 480.00 | 960.00 |
| 26 | यु.पी.व्हीप.सी.टाकी नेपल-2", | 175.00 | 700.00 | 175.00 | 700.00 | 170.00 | 680.00 |
| 27 | आशिर्वाद, 2 नग | 430.00 | 430.00 | 390.00 | 390.00 | 380.00 | 380.00 |
| 28 | यु.पी.व्हीन.सी.एलबो-1.1/2", | 50.00 | 750.00 | 45.00 | 675.00 | 40.00 | 600.00 |
| 29 | आशिर्वाद, 10 नग | 80.00 | 160.00 | 70.00 | 140.00 | 60.00 | 120.00 |
| 30 | यु.पी.व्ही .सी.युनियन-1.1/2", | 120.00 | 360.00 | 100.00 | 300.00 | 90.00 | 270.00 |
| 31 | आशिर्वाद, 2 नग | 135.00 | 135.00 | 135.00 | 135.00 | 130.00 | 130.00 |
| 32 | नॉन रिर्टन व्हॉल्व् 1" ब्रास, | 1690.00 | 1690.00 | 1680.00 | 1680.00 | 1660.00 | 1660.00 |
| 33 | आ.एस.आय., 2 नग | 1000.00 | 2000.00 | 950.00 | 1900.00 | 920.00 | 1840.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 34 | UPVC सोल्युशन (118 ml pack), | 840.00 | 2520.00 | 830.00 | 2490.00 | 810.00 | 2430.00 |
| | **एकुण रक्कम-** | 91490.00 | | 89360.00 | | **87190.00** | |

वरील तक्यात नमुद केलेनुसार, तुलनात्मक दृष्ट्या कोटेशनधारक नं.03 यशोदा ट्रेडर्स, साकुरी (राहाता) यांचे एकत्रित रु.87,190/- मात्र निम्नतम दर आहेत.

तरी मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थान दुरूस्तीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेकरीता योग्य तो निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमिती सभेत निर्णयार्थ सादर.

**मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थान दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेकामीचे निम्नतम दरधारक यशोदा ट्रेडर्स, साकुरी (राहाता) यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अधिकारी निवासस्थान दुरुस्तीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी यशोदा ट्रेडर्स, साकुरी (राहाता) यांचे एकत्रित रु.८७,१९०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा देण्यात यावा. तसेच याठिकाणचे वापरण्यायोग्य असलेले जुने साहित्य इतरत्र वापरणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**१५ संस्थान वाहनांसाठी विद्युत जनीत्र तसेच इतर विभागांना लागणारे इंधन खरेदी कामी निम्नतम पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील तरतुद:-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहुन संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, भक्तगणांना आवश्यकत्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करणेसाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील,"असे नमुद केलेले आहे.

**प्रस्तवना:-** दि.१९/०५/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३०७ (१२) नुसार व इकडीलजा.नं.एसएसएस/ वाहन/१२९७/२०१६ दि.१६/०६/२०१६ ने मा.आमदार श्री. राधाकृष्ण विखे-पाटील सहकारी ट्रक वाहतुक संस्था लि., साकुरीशिव, शिर्डी यांना पुरवठा आदेश देण्यात असुन त्यानुसार त्यांचेकडून दि.१६/०६/२०१६ पासुन आजतागायत संस्थानचे विविध विभागां करीता लागणारेइंधन खरेदी करण्यात येत आहे.

दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१२५ अन्वये,संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री, फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामी स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी शिर्डी पासुन ०५ कि.मी अंतरातील पेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे बाबत सुधारीत दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयानुसार, इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/१६६/२०१७ दि.०८/०४/२०१७ रोजीचे पत्राने,संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री,फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामीशिर्डी पासुन ०५ कि.मी अंतरापर्यंतचेपेट्रोलपंपधारकांकडून नव्याने प्रचलित इंधन दरात प्रति लिटर सुट व इंधन बिलास एक महिना क्रेडीट मिळणे कामी ०९ पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. पैकी ०५ पेट्रोलपंपधारकांकडून दरपत्रके प्राप्त झालेली असुन सदर दरपत्रके दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे सादर करण्यात आली होती. सदर दरपत्रकामध्ये देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकांचेनांव | वाहन विभाग तेपेट्रोलपंप अंतर (जाणे व येणे) | दरपत्रकात दिलेली सुट | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मा.आ. श्री राधाकृष्ण विखे पा.सह. ट्रक्स वाहतुक संस्था लि., प्रवरानगर, साकुरीपंप | ६ कि.मी. | ०.६० पैसे प्रति लिटर **H-2** | १ महिना क्रेडीट |
| ०२ | साई समर्थ, नगर-मनमाड रोड, शिर्डी | १.८ कि.मी. | ---- | १५ दिवस क्रेडीट |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | साईकृष्ण पेट्रोलियम, पिंपळवाडीरोड, शिर्डी | ५.८ कि.मी. | ०.२० पैसे प्रति लिटर<br>H-3 | १५ दिवस क्रेडीट |
| ०४ | साई समर्थ पेट्रोलियम,नगर-मनमाडरोड, निमगांव | १० कि.मी. | ०.६० पैसे प्रति लिटर<br>**H-2** | ---- |
| ०५ | श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर | १३ कि.मी. | ०.७५ पैसे प्रति लिटर<br>**H-1** | ---- |

उपरोक्त पैकी H-1 (अ.नं.०५) व H-2 (अ.नं.०१ व ०४) अशा एकुण ०३ पुरवठादारांना मा. स्थानिक उपसमिती समोर चर्चेसाठी बोलाविणे बाबत शिफारस खरेदी समितीने केलेली आहे.

**मागणीः-** तरी संस्थान वाहने, विद्युत जनीत्रे, लॉन्ड्री, फॉगिंग मशिन व इतर कामाकरीता लागणारे इंधन (डिझेल व पेट्रोल) खरेदी कामी उपरोक्त पैकी H-1 (अ.नं.०५) व H-2 (अ.नं.०१ व ०४) अशा एकुण ०३ पुरवठादारांना मा. स्थानिक उपसमिती समोर चर्चेसाठी बोलावुन, चर्चेअंती निर्णय घेवुन मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेसाठी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असणारे इंधन खरेदी करणेसाठी ज्या पेट्रोलपंपधारकांनी दर दिलेले आहेत, त्यांचे पेट्रोलपंपावर वाहन जाणे-येणेसाठी किती खर्च येईल, त्यासह सभेसमोर सादर करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**१६ नवीन कार्यालयीन Toyota कंपनीचे Innova Crysta व Corolla (Altis) (डिझेल) या मॉडेलची वाहन खरेदी करणेकामी निम्नतम पुरवठाधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-** कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्याप्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

मा.व्यवस्थापन समितीचा ठरावः- दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीची मान्यता.

**प्रस्तावनाः-** जुन्या ०६ वाहनांचे जाहीर लिलावाने विक्री करणे करीता प्रस्ताव शासन मान्यतेस पाठविण्यात आलेला असुन त्यावर कार्यवाही चालु आहे. कार्यालयीन कामकाजात अडचणी येवु नये या करीता प्रस्तावित वाहनाचे लिलावाचे अगोदर तातडीने ०२ नवीन वाहने खरेदी करणे आवश्यक असलेने याकामी सदरचा विषय दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

संस्थान कार्यालयीन कामाकरीता Toyota कंपनीचे InnovaCrystaवCorolla (Altis) या मॉडेलची प्रत्येकी एक वाहन अशी दोन वाहने खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली होती.

उपरोक्त निर्णयानुसार, इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/५९४/२०१७ दि.०२/०५/२०१७ रोजीचे पत्रान्वये, Toyota कंपनीचे InnovaCrysta व Corolla (Altis) या मॉडेलची प्रत्येकी एक वाहन अशी दोन वाहने खरेदी कामी टोयोटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेली ०४ पुरवठाधारकांची दरपत्रके दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आलेली असुन सदर दरपत्रकात देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**अ) ToyotaInnovaCrysta 2.4ZX MT करीता देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता**

| तपशिल | पुरवठादारांची नांवे | | | |
|---|---|---|---|---|
| | वाय.एम. मोटर्स प्रा.लि., भोसरी, पुणे | शरयु ॲटोलिंक प्रा.लि., औरंगाबाद | राजपाल अभिकरण रतलाम प्रा.लि., रतलाम | वासन टोयोटा (वासन ब्रदर्स प्रा.लि.) नाशिक |
| **ToyotaInnovaCrysta 2.4ZX MT(Insurance, CRTM, TCS सह)** | 21,04,018.00 | 21,18,625.00 | **20,99,200.00** (Matting & Mud Flap Free) | 21,02,659.00 |
| शेरा | L3 | L4 | **L1** | L2 |

**ब) ToyotaCorolla (Altis)1.4 DGL करीता देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता**

| तपशिल | पुरवठादारांची नांवे | | | |
|---|---|---|---|---|
| | वाय.एम. मोटर्स प्रा.लि., भोसरी, पुणे | शरयु ॲटोलिंक प्रा.लि., औरंगाबाद | राजपाल अभिकरण रतलाम प्रा.लि., रतलाम | वासन टोयोटा (वासन ब्रदर्स प्रा.लि.) नाशिक |
| **Toyota Corolla (Altis) 1.4 DGL (Insurance, CRTM, TCS सह)** | 20,11,858.00 | 20,09,732.00 | **19,78,080.00** (Matting & Mud Flap Free) | 20,10,533.00 |
| शेरा | L4 | L2 | **L1** | L3 |

**विभागाचा अभिप्राय:-** उपरोक्त अ व ब तुलनात्मक तक्त्याचा विचारकरता, खरेदी समितीने निम्नतम दरधारक राजपाल अभिकरण रतलाम प्रा.लि., रतलाम यांनी Toyota Innova Crysta 2.4ZX MT या वाहन करीता देऊ केलेले दर रु.२०,९९,२००/- (Insurance, CRTM, TCS सह) व ToyotaCorolla (Altis) 1.4 DGL या वाहनाकरीता देऊ केलेले दर रु.१९,७८,०८०/- (Insurance, CRTM, TCSसह) स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणे बाबतची शिफारस करण्यात आलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांकःभांखस-२०१४/ प्र.क्र.८२ भाग III/ उद्योग-४ दिनांक १/१२/२०१६ सुधारित नियमपुस्तिके मध्ये ३.२.३. मध्ये,"कोणत्याही वाहनाचे दरकरार DGS&D कडे उपलब्ध असतीलच असे नाही. त्यामुळे, मोटार वाहने (कार) खरेदी ही वाहन उत्पादक/ वितरक यांच्या दरपत्रकामार्फत देखील करता येईल. तथापि, मोटार वाहन (कार) खरेदी रु. एककोटीपेक्षा जास्त असल्यास, ती ई-निविदा प्रक्रियेमार्फतच करण्यात यावी.

**मागणी:-** तरी संस्थान कार्यालयीन कामाकरीता दोन वाहने खरेदी कामी निम्नतम दरधारक राजपाल अभिकरण रतलाम प्रा.लि., रतलाम यांनी Toyota Innova Crysta 2.4ZX MT या वाहन करीता देऊ केलेले दर रु.२०,९९,२००/- (Insurance, CRTM, TCS सह) व ToyotaCorolla (Altis) 1.4 DGL या वाहनाकरीता देऊ केलेले दर रु.१९,७८,०८०/- (Insurance, CRTM, TCS सह) स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणे कामी मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेसाठी निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कार्यालयीन कामाकरीता दोन वाहने खरेदीकामीचे निम्नतम दरधारक राजपाल अभिकरण रतलाम प्रा.लि., रतलाम यांनी Toyota Innova Crysta 2.4ZX MT या वाहन करीता देऊ केलेले दर रु.२०,९९,२००/- (Insurance, CRTM, TCS सह) व ToyotaCorolla (Altis) 1.4 DGL या वाहनाकरीता देऊ केलेले दर रु.१९,७८,०८०/- (Insurance, CRTM, TCS सह) स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

१७ **प्रशिक्षणार्थी खर्चाने खरेदी करावयाच्या सेप्टी शुजचे Commercil Bid तुलनात्मक तक्त्याबाबत.**

**सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम १७ (२ढ) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०४/२०१६ चे सभेतील निर्णय क्र.२२७

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने आवश्यक असलेले सेफटी शुज पार्ट -B खरेदी करणेकामी वरील संदर्भ क्र. १ अन्वये मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेत आलेली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.२ चे टिपणीने निविदाधारकांकडून फेर ईटेंडर द्वारे दि.२०/०१/२०१७ ते २७/०१/२०१७ या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन निविदांची मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार दि.२७/०१/२०१७ रोजी सायं.५.३० वा.पर्यंत सेप्टी शुज

पार्ट– B करीता ०५ निविदा प्राप्त झाल्याचा ईडीपी विभागाने ई– निविदा Website द्वारे प्राप्त अहवाल दिला होता.त्यानुसार मुदतीअंती ई– निविदेतील Technical Bid दि.१७/०१/२०१७ रोजी स.११.०० वा मा.स्थानिक उपसमितीचे सदस्यांसमक्ष प्राप्त झालेले निविदाधारकांची Technical Bid सिलबंद पाकिटे उघडण्यात आली होती. प्राप्त झालेले ०४ ई-निविदांपैकी ०१ निविदाधारकाने आवश्यक कागदपत्रांपैकी व्हॅट टिन नंबरची प्रत पाठविलेली नसल्याने त्यांची तांत्रिक निवीदा अपात्र ठरविण्यात आली होती. उर्वरित ०३ निविदाधारकांचे Commercial Bid (ई-निवीदा) वाणीज्यीक दि.०६/०५/२०१७ चे मा.खरेदी समितीच्या सभेमध्ये समक्ष उघडण्यात आलेले आहे. त्याबाबत तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | युनियन ट्रेडींग नाशिक | संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित,मुबंई | आर.के.झेड. प्लास्टो , बहमदनगर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Safety Shies:-<br>Upper Leather:- Buff Satic Lather<br>Lining :-Cabrilla lining<br>Eyelets :-Aluminium<br>Collar:-Padded<br>Toe:-ISI Steel Toe<br>Sole:-IU by DIP | 267 Pair | **Rate- 715/- Amount 190905/-** | Rate- 783/- Amount 209061/- | Rate- 720/- Amount 192240/- | Rate- 715/- Amount 190905.00 |
| | | | | | | 190905.00 |

वरील तिन निविदाधारकांपैकी मे.युनियन ट्रेडींग,नाशिक यांचे प्रति नग ( पेअर ) दर हे न्यूनतम आहेत. मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांचे दर न्यूनतम असल्याने त्यांना प्रशिक्षणार्थी खर्चाने प्रशिक्षणार्थ्यांकरीता सेप्टी शुजचा पुरवठा आदेश द्यावा लागेल. सदरील Commercial Bid चा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सोबत जोडलेला आहे.

प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने खरेदी करावयाचे सेप्टी शुज २६७ पेअर करीता मा. व्यवस्थापन समितीची रक्कम रु.१,८६,९००/- इतक्या खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. सध्या प्रशिक्षण घेत असलेले अंतिम वर्षातील प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण ३१ जुलै २०१७ रोजी संपणार आहे. त्यांचा प्रशिक्षणाचा मोठा कालावधी संपल्याने त्यांच्यासाठीचे सेप्टी शुज पेअर खरेदी न करता दोन वर्षे अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी सेप्टी शुज खरेदी करता येतील. यामुळे उपरोक्त प्रस्तावीत शुज पेअरची संख्या कमी होईल, तसेच मुळ मंजूरीच्या अधिन राहुन त्याप्रमाणे संबधीतांना आवश्यक्कतेप्रमाणे सेप्टी शुज पुरविणेबाबत पुरवठा आदेश देता येईल.

**मागणी:-** दि.०६/०५/२०१७ रोजी मा.खरेदी समितीच्या सभेमध्ये उघडलेले सेप्टी शुजचे Commercial Bid चा तुलनात्मक तक्त्यातील न्यूनतम दर असलेले मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांना प्रस्ताविकात नमुद केल्याप्रमाणे प्रशिक्षणार्थ्याकरीता सेप्टी शुज पुरविणेकामी पुरवठा आदेश देता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी खर्चाने प्रशिक्षणार्थ्यांकरीता खरेदी करवयाचे सेप्टी शुजचा Commercial Bid चा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे. त्यातील न्यूनतम दरधारक मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांना मा.स्थानिक उपसमितीपुढे समक्ष बोलावुन त्यांचेशी चर्चा करुन, त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी खर्चाने प्रशिक्षणार्थ्यांकरीता सेप्टी शुज खरेदी करणेकामीचे निम्नतम दरधारक मे.युनियन ट्रेडींग, नाशिक यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील एका वर्षाच्या ट्रेडसाठी असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचे वर्ष संपुष्टात येत असलेने त्यांचेसाठी सेप्टीशुज खरेदी न करता, त्यांचे पैसे परत करणेत यावेत. फक्त द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांकरीता मे.युनियन ट्रेडींग, नाशिक**

**यांचेकडून प्रती नग रु.७१५/- मात्र या निम्नतम दराने सेप्टी शुज खरेदी करणेकामी त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, आय.टी.आय.)

---

१८ **श्री साईनाथ रुग्णालयातील ENT Ophthalmic Theatre मध्ये Epoxy Flooring चे काम करणेकामी कार्यादेश देणेबाबत.**

श्री साईनाथ रूग्णालयात शस्त्रक्रिया विभागात रूग्णांचे ऑपरेशन चालू असताना रक्ताचे डाग पडतात व ते डाग सुकल्यानंतर लवकर निघत नाही त्यामुळे जंतु संसर्ग होण्याची शक्यता असते. Epoxy Flooring केल्यामुळे ते डाग लवकर निघतात. परंतु सदर विभागातील Epoxy Flooring हे खराब झालेले आहे.

दि.१९/०९/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत विषय न.१८ निर्णय क्र. ६५५ अन्वये श्री साईनाथ रूग्णालयातील ENT Ophthalmic Theatre मध्ये Epoxy Flooring चे काम करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू. १,१२,२४१.००/- मात्र खर्चास मान्यता मिळाली होती

त्यानुसार इकडील पत्र क्र.१६४९ दि.२१/१०/२०१६ अन्वये एकूण १२ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि१९/११/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. परंतु एकही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. २२६४ दि.०३/०१/२०१७ अन्वये एकूण २४ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि२०/०१/२०१७ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून ०४ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr.No. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| १ | M/s. Sagar Kame, Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१८/०१/२०१७ (सामान्य प्रशासन विभाग) |
| २ | M/s Wel-Know Works, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०१ /२०१७ |
| ३ | M/s. Wadkar & Company, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०१/२०१७ |
| ४ | M/s. Trust me Solution, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.१७/०१/२०१७ |

अ.न. १ ते ३ यांना कोटेशन पत्र पाठविलेले नसतानाही त्यांनी कोटेशन दिलेले आहे तरी सर्व कोटेशन विचारात घ्यावे जेणेकरून तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| S. N. | Name of Supplier | Rate per in Rs. |
|---|---|---|
| १ | M/s. Sagar Kame, Pune | 114087.30 |
| २ | M/s Wel-Know Works, Nashik | 110654.00 |
| ३ | M/s. Wadkar & Company, Nashik | 114282.00 |
| ४ | M/s. Trust me Solution, Nashik | 81360.00 |

सदर तुलनात्मक तक्त्यातील दरानूसार M/s.Trust me Solution, Nashik यांचे दर निम्नतम आहेत. सदर निम्नतम दरानूसार M/s.Trust me Solution, Nashik यांना कार्यादेश जात आहे.

तरी M/s.Trust me Solution, Nashik यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना कार्यादेश देण्याची शिफारस मा व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**श्री साईनाथ रुग्णालयातील ENT Ophthalmic Theatre मध्ये Epoxy Flooring चे काम करुन घेणेकामीचे निम्नतम दरधारक M/s.Trust me Solution, Nashik यांना उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते, परंतु उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी ते अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील ENT Ophthalmic Theatre मध्ये Epoxy Flooring चे काम करुन घेणेकामी M/s.Trust me Solution, Nashik यांचे एकत्रित रु.८१,३६०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१९ **श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU या विभागाकरीता 10 KVA UPS खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा रूग्णालयातील ICCU या विभागात एक 10 KVA UPS उपलब्ध असून तो सन २००६ मध्ये रक्कम रू.८३,९८०/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेला आहे. रूग्णांवर उपचार चालू असताना विद्युत पुरवठा अचानक बंद झाला तर मशिनरी बंद पडू नये म्हणून केला जातो. परंतु लाईट गेल्यावर सदर UPS Back up देत नाही त्यामुळे त्यांनी नवीन10 KVA UPS ची मागणी केली आहे.

दि.३१/११/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा रूग्णालयातील ICCU या विभागात ०१ नग नवीन 10 KVA UPS विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रू.९०,०००/- मात्र खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र.२५३३ दि. ०४/०२/२०१७ अन्वये एकूण १९ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि२२/०२/२०१७ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, त्यास अनुसरून ०७ सिलबंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| S. N. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| १ | M/s. Akshay Battrise, Ahamednagar | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/०२/२०१७ |
| २ | M/s. Godbole Laboratory, Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग) दि.२०/०२/२०१७ |
| ३ | M/s. Tejas Electronics, Ahmednagar | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/०२/२०१७ |
| ४ | M/s. Compuciti, Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग दि.२०/०२/२०१७ |
| ५ | M/s.Kunhar Peripherals Pvt.Ltd., Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग) दि.२२/०२/२०१७ |
| ६ | M/s. Micronics Systems & Services, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/०२/२०१७ |
| ७ | M/s. Gurukrupa Enterprises, Thane | सिलबंद कोटेशन प्राप्त (सामान्य प्रशासन विभाग) दि.११/०२/२०१७ |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०७ सिलबंद कोटेशन दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr.No. | Name of Supplier | Rate per in Rs. |
|---|---|---|
| १ | M/s. Akshay Battrise, Ahamednagar | ११८०००.०० |
| २ | M/s. Godbole Laboratory, Pune | सदर कोटेशन आपल्या मागणी प्रमाणे नाही. |
| ३ | M/s. Tejas Electronics, Ahmednagar | ११४०००.०० |
| ४ | M/s. Compuciti, Pune | १३८५५४.०० |
| ५ | M/s.Kunhar Peripherals Pvt.Ltd., Pune | २०५०००.०० |
| ६ | M/s. Micronics Systems & Services, Nashik | २४०५००.०० |
| ७ | M/s. Gurukrupa Enterprises, Thane | २५३५००.०० |

सदर तुलनात्मक तक्त्यातील दरानूसार M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांचे दर निम्नतम आहेत. सदर खरेदीकामी रक्कम रु.९०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून सदरहू खरेदीकामी रक्कम रु.२४,०००/- इतका जास्तीचा खर्च येणार आहे. (पुरवठा आदेशाची रक्कम रु. ११४०००.०० – प्रस्तावित अंदाजे रक्कम रु.९०,०००.०० = जास्तीचा खर्च रु.२४०००.००) सदर निम्नतम दरानूसार M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांना पुरवठा आदेश जात आहे.

तरी M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्याची तसेच सदरखरेदीकामी येणा-या रक्कम रु.१,१४,०००/- चे खर्चास मान्यता घेणेकामीची शिफारस मा व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU या विभागाकरीता 10 KVA UPS खरेदीकामीचे निम्नतम दरधारक M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांना उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते, परंतु उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी ते अनुपस्थित होते**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU या विभागाकरीता 10 KVA UPS खरेदीकामी M/s. Tejas Electronics, Ahmednagar यांचे एकत्रित रु.१,१४,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२० **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड / विभागांनी विविध प्रकारच्या हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचरची मागणी केलेली आहे. ब-याच वार्ड / विभागातील फर्निचर हे वापरुन खराब झालेले आहे, तर काही विभाग हे नव्याने चालू झालेले आहेत. विविध वॉर्ड / विभागांनी मागणी केलेल्या फर्निचरचा तपशिल तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे. उपरोक्त फर्निचर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५,५५,२००/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार दोनशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.५,५५,२००/- (अक्षरी रुपये पाच लाख पंचावन्न हजार दोनशे मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यास निर्णय क्र.५०५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.२४/११/२०१६ ते दि.०९/१२/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१२/१२/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ऑनलाईन एक ई-निविदा प्राप्त झालेली होती.

तथापि "शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.३० ऑक्टोबर २०१५ – प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ" अन्वये जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी सदर ई-निविदेस दि.१०/१२/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१६/१२/२०१६ पर्यंत प्रथम एक आठवडयाची मुदतवाढ देण्यात आलेली होती, त्यास अनसुरुन ऑनलाईन सहा ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Healthcare, Pune | 13/12/2016 |
| 2 | M/s. Shree Enterprises, Shrirampur | 17/12/2016 |
| 3 | M/s. Shree Furniture, Shrirampur | 17/12/2016 |
| 4 | M/s. Shree Impex, Shrirampur | 17/12/2016 |
| 5 | M/s.Arihant Engineering Works, Aurangabad | 17/12/2016 |
| 6 | M/s. Tara Medicals, Mumbai | 16/12/2016 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.२०/०३/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात

आलेला आहे. वरील प्राप्त निविदांपैकी M/s. Shree Enterprises, Shrirampur यांच्या दोन सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत, परंतु प्रत्यक्षात एक निविदा ही M/s. Shree Furniture, Shrirampur यांची आहे.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ०६ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे संबंधित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून तुलनात्मक दरांचे तक्त्यातील प्रत्येक आयटमकरीता प्राप्त निम्नत्तम दरानुसार ४ निविदाधारकांना रक्कम रु.२,९५,०७०/- इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश जात असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | No.of Items | Purchase Order Amt. as per Lowest Rate |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Austin Healthcare, Pune | 01 Item | 17850.00 |
| 2 | M/s. Shree Impex, Shrirampur | 03 Items | 204000.00 |
| 3 | M/s. Arihant Engineering Works, Aurangabad | 04 Items | 47300.00 |
| 4 | M/s. Tara Medicals, Mumbai | 01 Item | 25920.00 |
| | **Total Amt.in Rs.** | | **295070.00** |

तरी वरीलप्रमाणे पुरवठा आदेश जात असलेल्या निविदाधारकांबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच याकामी येणा-या रक्कम रु.२,९५,०७०/- (अक्षरी रु.दोन लाख पंच्यान्नव हजार सत्तर मात्र) चे खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेकामीचे निम्नतम दर प्राप्त झालेल्या निविदाधारकांना उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते, परंतु उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी ते अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल व कार्यालयीन फर्निचर खरेदी करणेकामी प्रस्तवात नमुद केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२१ **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागात वेगवेगळ्या शस्त्रक्रिया करताना रेडीएशन पासून संरक्षण होणेकामी Lead Appron, Gown व Thyriod Sheild वापरतात. श्री साईनाथ रुग्णालयाचे जनरल ओ.टी. विभागात ३ नग Lead Gown असून ते वापरुन खराब झालेले आहे. त्यामुळे जनरल ओ.टी. विभागाने दि.१३/१०/२०१४ रोजीचे मागणी पत्रान्वये Lead Gown व Thyriod Sheild ची मागणी केलेली आहे. तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात सध्या ४ नग असून ते वापरुन खराब झालेले आहे. तसेच सदरची संख्या देखील कमी पडत आहे. त्यामुळे त्यांनी दिनांक १९/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली आहे. सदरहू Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.३,०३,४५०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१८/०२/२०१५ रोजीच्या मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.३०(२७) अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागाकरिता Lead Appron, Gown व Thyriod Sheild विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.३,०३,४५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

वरील ठरावानुसार सदरचे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा विक्रीची मुदत दि.१५/०६/२०१५ ते ३०/०६/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०२/०७/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या होत्या-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Nature's Global Service,New Delhi | 29/06/2015 |
| 2 | M/s. Austin Healthcare, Pune | 03/07/2015 |
| 3 | M/s. Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai | 04/07/2015 |

उपरोक्त पैकी अ.नं. २ व ३ यांच्या निविदा मुदतीनंतर प्राप्त झालेल्या होत्या, परंतु तुलनात्मक दृष्टया त्याचा फायदा होऊ शकेल. त्यामुळे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा दि०३/०८/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आल्या होत्या. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यांच्या कमर्शियल निविदा उघडण्यात आलेल्या नव्हत्या कारण रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने दि.१९/०९/२०१५ रोजी Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकणार नाही असे दि.१०/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सदर Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी दि.०३/११/२०१५ रोजीचे मंजूर टिप्णीन्वये दुस-यांदा फेर ई – निविदा मागविण्यास मान्यता घेऊन सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात दैनिक दबंग दुनिया– मुंबई, पुण्यनगरी– नाशिक, सामना- पुणे, सामना – औरंगाबाद, संध्यानंद – मुंबई या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०५ पुरवठाधारक यांना ई - मेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि. १२/०१/२०१६ ते २७/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ३०/०१/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Healthcare, Pune | 29/01/2016 |

उपरोक्तप्रमाणे खरेदीस एकच निविदा प्राप्त झालेली होती, तसेच खरेदीकामी तुलनात्मक दर मिळणेचे दृष्टीने कमीत कमी ३ निविदांची आवश्यकता असते. त्यामुळे दि.०९/०२/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये उपरोक्त Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी तिस-यांदा फेर ई - निविदा मागविण्यास मान्यता घेऊन वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली आहे. निविदा विक्रीची मुदत दि.११/०७/२०१६ ते २५/०७/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२८/०७/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन सदरचे खरेदीकामी ३ तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Anaecon India Healthcare Pvt.Ltd., New Delhi | 27/07/2016 |
| 2 | M/s. Vidhi Sales, Dhule | 22/07/2016 |
| 3 | M/s. Austin Health Care, Pune | 27/07/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१७/०२/२०१७ रोजीचे मा.उपसमितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे, तसेच प्राप्त निविदाधारकांना संबंधित विभागांना Demo देणेबाबत ई-मेल व्दारे कळविण्यात आलेले आहे.

तसेच उपरोक्त खरेदीकामी प्राप्त ०३ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे संबंधित निविदाधारकांचे समक्ष उघडण्यात आलेल्या असून प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Vidhi Sales, Dhule यांचे तीन आयटमकरीता निम्नत्तम दर प्राप्त झालेले आहे, तर एका आयटमकरीता M/s. Austin Health Care, Pune यांचे रु.९५००/- हे दर निम्नत्तम येत आहे, परंतु सदरहू एक आयटमकरीता M/s. Vidhi Sales, Dhule यांनी रु.१०,४३१/- इतके दर दिले होते, त्यामुळे यांना प्राप्त निम्नत्तम दराने पुरवठा करणार का? याबाबत दुरध्वनीवरुन विचारणा केली असता त्यांनी सदरहू आयटमकरीता रु.९४००/- इतके दर देऊ केलेले आहे. त्यामुळे M/s.Vidhi Sales, Dhule यांचे निम्नत्तम दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.३,६५,९९०/- इतका खर्च येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr. No. | Description of Items | Demand Qty. | M/s. Austin Health Care, Pune | | M/s. Vidhi Sales, Dhule | | M/s. Anaecon India Healthcare Pvt.Ltd., New Delhi | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate per in Rs. | Total Amt.in Rs. | Rate per in Rs. | Total Amt.in Rs. | Rate per in Rs. | Total Amt.in Rs. |
| 1 | Double Sided Apron (.5/0.25 mmpb) Regular Size– 100 x 60cm. (Ligh Weight) | 10 | 20220.00 | 202200.00 | **16992.00** | **169920.00** | 58065.00 | 580650.00 |
| 2 | Vest (Standard 0.50/0.25mmpb) Regular Size – 55 x 75cm. (Ligh Weight) | 10 | 10750.00 | 107500.00 | **8352.00** | **83520.00** | 30975.00 | 309750.00 |
| 3 | Skirt (Standard 0.50/0.25mmpb) Regular Size – 183 x 53cm. (Ligh Weight) | 10 | 9500.00 | 95000.00 | **9400.00** | **94000.00** | 34650.00 | 346500.00 |
| 4 | Thyroid Shield (0.50mmpb) Universal (Ligh Weight) Qty in pairs | 10 | 4650.00 | 46500.00 | **1855.00** | **18550.00** | 8085.00 | 80850.00 |
| | | | Total - | 451200.00 | **Total -** | **365990.00** | Total - | 1317750.00 |

वरीलप्रमाणे निम्नत्तम दरानुसार उपरोक्त खरेदीकामी रु.६२,५४०/- (पुरवठा आदेश रक्कम रु.३६५९००.०० – प्रस्तावित अंदाजे रक्कम रु.३०३४५०.००) इतका जास्तीचा खर्च येईल.

तरी M/s. Vidhi Sales, Dhule यांचेबरोबर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रु.३,६५,९९०/- (अक्षरी रु.तीन लाख पासष्ट हजार नऊशे नव्वद मात्र) चे खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी निम्नतम दर प्राप्त झालेल्या निविदाधारकांना उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते, परंतु उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी ते अनुपस्थित होते.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभाग व श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Lead Appron, Gown व Thyriod Sheild खरेदीकामी M/s. Vidhi Sales, Dhule यांचे एकत्रित रु.३,६५,९९०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२२ **सन २०१७-१८ करीता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, मुर्ती व अष्टगंध खरेदीकामी निम्नतम दर स्विकारणेत येऊन पुरवठा आदेश देणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०२.२०१७चे सभेतील निर्णय क्र.२४ नुसार माहे-एप्रिल-२०१७ ते माहे मार्च-२०१८ अखेर या आर्थिक वर्षामध्ये फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मार्बल मुर्ती, अष्टगंध याची जाहिरात देऊन निविदा मागवुन खरेदी करणेसाठी व त्याचे खर्चास मान्यता घेण्यात आली असून मंदिर विभागाची दि.२०मार्च २०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बंद

पाकिटात निविदा (दरपत्रके) मागविणेत आलेल्या आहेत. निविदा सादर करणेसाठी जाहिरातीमध्ये दि.२४.०४.२०१७ अशी अंतिम तारीख नमुद करणेत आलेली होती. त्यानुसार खालील प्रमाणे निविदा (दरपत्रके) प्राप्त झालेल्या आहे.

**अ) फुटाणे प्रसाद कोटेशन-**

| अ.क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मेसर्स.गंगवाल ए.एस.& कं., शिर्डी | १५२५/दि.१९.०४.२०१७ |
| ०२ | श्री दिपक अशोक झाल्टे, शिर्डी | १८६७/दि.२२.०४.२०१७ |
| ०३ | मेसर्स.रत्नदीप फुल भांडर, शिर्डी | २००८/दि.२४.०४.२०१७ |
| ०४ | श्री ईश्वर आधार साटोटे, कोपरगांव | २००९/दि.२४.०४.२०१७ |

**ब) विडयाची पानांचे कोटेसन –**

| अ.क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री साईनाथ वामन पवार, शिर्डी | १८७३/दि.२४.०४.२०१७ |
| ०२ | श्री दिपक देवराम आहेर, शिर्डी | १८७४/दि.२४.०४.२०१७ |
| ०३ | श्री किरण पुंजा मोरे. शिर्डी | १८७५/दि.२४.०४.२०१७ |
| ०४ | श्री संजय नामदेव अडांगळे, निमगांव | १८७६/दि.२४.०४.२०१७ |

**क) पावडर मार्बल मुर्तीचे कोटेशन-**

| अ.क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मेसर्स.विरेश जैस्वाल, शिर्डी | १८६९/दि.२४.०४.२०१७ |
| ०२ | साई चावडी स्टोअर्स, शिर्डी | १८७०/दि.२४.०४.२०१७ |
| ०३ | साई कृष्णा आर्ट्स, शिर्डी | १८७१/दि.२४.०४.२०१७ |
| ०४ | साई माऊली मार्बल, रुई(शिर्डी) | २००५/दि.२४.०४.२०१७ |

**ड) अष्टगंध पावडर-**

| अ.क्र. | निविदाधारकाची नावे व पत्ता | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| ०१ | मेसर्स.गंगवाल ए.एस.& कं., शिर्डी | १५२६/दि.१९.०४.२०१७ |
| ०२ | पालखी ट्रेडर्स, शिर्डी | १८६८/दि.२४.०४.२०१७ |
| ०३ | मेसर्स.विरेश जैस्वाल, शिर्डी | १८७२/दि.२४.०४.२०१७ |
| ०४ | पालखी ट्रेडर्स, शिर्डी | २००६/दि.२४.०४.२०१७ |

उपरोक्तप्रमाणे फुटाणे प्रसाद ०४ कोटेशन्स, विडयाच्या पानांचे ०४ कोटेशन्स, पावडर मार्बल मुर्तीचे ०४ कोटेशन्स व अष्टगंध पावडर करीता ०४ कोटेशन्स दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा.खरेदी समिती सभेमध्ये उघडणेत आल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

**०१. श्रींची मुर्तीचे खरेदी तुलनात्मक तक्ता**

| अ.क्र | पुरवठाधारकांचे नांव | वार्षिक मागणी | **०३ नंबर मुर्ती (७.५ इंच) दर** | एकूण | वार्षिक मागणी | **०४ नंबर मुर्ती (९ इंच) दर** | एकूण | वार्षिक मागणी | **०५ नंबर मुर्ती (१३.५ इंच) दर** | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मेसर्स.विरेश जैस्वाल, शिर्डी | २०० | **९०.००** | **१८०००.००** | २०० | **१४०.००** | **२८०००.००** | १५० | **४३०.००** | **६४५००.००** |
| ०२ | साई चावडी स्टोअर्स, शिर्डी | २०० | १२०.०० | २४०००.०० | २०० | २१०.०० | ४२०००.०० | १५० | ५५०.०० | ८२५००.०० |
| ०३ | साई कृष्णा आर्ट्स, शिर्डी | २०० | १४०.०० | २८०००.०० | २०० | २४०.०० | ४८०००.०० | १५० | ५९०.०० | ८८५००.०० |
| ०४ | साई माऊली मार्बल, रुई (शिर्डी) | २०० | १३०.०० | २६०००.०० | २०० | २२५.०० | ४५०००.०० | १५० | ६००.०० | ९००००.०० |

**०२) फुटाणेप्रसाद खरेदी तुलनात्मक तक्ता**

| अ.क्र | पुरवठाधारकांची नांवे पत्ता | वार्षिक मागणी | दर प्रति नग | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे | |
| ०१ | मेसर्स.गंगवाल ए.एस.& कं., शिर्डी | ४५० किलो | ७० | ०० | ३१५००.०० |
| ०२ | श्री दिपक अशोक झाल्टे, शिर्डी | ४५० किलो | **२५** | **००** | **११२५०.००** |
| ०३ | मेसर्स.रत्नदीप फुल भांडर, शिर्डी | ४५० किलो | १४० | ०० | ६३०००.०० |
| ०४ | श्री ईश्वर आधार साटोटे, कोपरगांव | ४५० किलो | ३० | ०० | १३५००.०० |

**०३) विड्याची पाने खरेदी तुलनात्मक तक्ता.**

| अ.क्र | पुरवठाधारकांची नांवे पत्ता | वार्षिक मागणी | दर प्रति नग | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे | |
| ०१ | श्री साईनाथ वामन पवार, शिर्डी | ३००००० (आवश्यकतेप्रमाणे ) | ०० | ९० | २७००००.०० |
| ०२ | श्री दिपक देवराम आहेर, शिर्डी | ३००००० (आवश्यकतेप्रमाणे ) | **००** | **७५** | **२२५०००.००** |
| ०३ | श्री किरण पुंजा मोरे. शिर्डी | ३००००० (आवश्यकतेप्रमाणे ) | ०० | ८५ | २५५०००.०० |
| ०४ | श्री संजय नामदेव अडांगळे, निमगांव | ३००००० (आवश्यकतेप्रमाणे ) | ०० | ९० | २७००००.०० |

**०४) अष्टगंध पावडर खरेदी तुलनात्मक तक्ता**

| अ.क्र | पुरवठाधारकांची नांवे पत्ता | वार्षिक मागणी | दर प्र.कि. भवानी आंबादास | | एकूण | दर प्र.कि. भवानी शंकर | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रुपये | पैसे | | रुपये | पैसे | |
| ०१ | मेसर्स.गंगवाल ए.एस.& कं., शिर्डी | ४०० किलो (आवश्यकतेप्रमाणे) | -- | -- | ०० | **१६०** | **००** | **६४०००.००** |
| ०२ | मे.साईपालखी ट्रेडर्स, शिर्डी | ४०० किलो (आवश्यकतेप्रमाणे) | १५० | ०० | ६००००.०० | १८० | ०० | ७२०००.०० |
| ०३ | मेसर्स.विरेश जैस्वाल, शिर्डी | ४०० किलो (आवश्यकतेप्रमाणे) | १६० | ०० | ६४०००.०० | १९० | ०० | ७६०००.०० |
| ०४ | मे.पालखी ट्रेडर्स, शिर्डी | ४०० किलो (आवश्यकतेप्रमाणे) | १५० | ०० | ६००००.०० | १७० | ०० | ६८०००.०० |

उपरोक्त प्रमाणे–

**अ.क्र.०१-** श्रींची मुर्ती खरेदीकरीता मे.विरेश जैस्वाल, शिर्डी यांचे ०३-नंबर मुर्तीचे दर रु.९०/, ०४-नंबर मुर्तीचे दर रु.१४०/ व ०५-नंबर मुर्तीचे दर रु.४३०/ सर्वात कमी (न्युनतम) दर आहे.

**अ.क्र.०२-** फुटाणे प्रसाद खरेदीकरीता श्री दिपक अशोक झाल्टे, शिर्डी यांचे रु.२५/- प्र.किलो सर्वात कमी (न्युनतम) दर आहे.

**अ.क्र.०३-** विडयाची पाने खरेदीकरीता श्री दिपक देवराम आहेर,शिर्डी यांचे रु.०.७५/- प्र.नग सर्वात कमी (न्युनतम) दर आहे.

**अ.क्र.०४-** अष्टगंध पावरड खरेदीकरीता भवानी आंबादास ॲण्ड सन्स यांचे दर निम्नतम आहे. परंतू भवानी आंबादास ॲण्ड सन्स अष्टगंध हा लालसर (भगवा) दिसतो. भवानी शंकर ॲण्ड सन्स यांचा अष्टगंध हा सध्या वापरत असलेला चांगल्याप्रतीचा पिवळा अष्टगंध आहे. तरी सध्या वापरत असलेला भवानी शंकर ॲण्ड सन्स अ.क्र.०१ मेसर्स गंगवाल ए.एस. &कं., शिर्डी यांचे न्युनतम दर रु.१६०/- मात्र दराने स्विकारणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्तप्रमाणे पावडर मूर्ती, फुटाणे प्रसाद, विड्याची पाने व अष्टगंध भवानी शंकर ॲण्ड सन्स अ.क्र.०१ मेसर्स गंगवाल ए.एस. & कं., शिर्डी यांचे प्राप्त निम्नतम दर स्विकारणेत येऊन व पुरवठा आदेश देणे तसेच याकामी येणारे खरेदी खर्चाकरीता मा.व्यवस्थापन समितीस शिफारस करणेकामी प्रस्ताव मा.उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**सन २०१७-१८ करीता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, मुर्ती व अष्टगंध खरेदीकामी निम्नतम दर प्राप्त झालेल्या कोटेशनधारकांना आजचे उपसमिती सभेसमोर बोलविणेत आले होते, उपसमितीने त्यांचेबरोबर दरांबाबत चर्चा केली असता, श्रींची मुर्ती खरेदी करणेकामीचे निम्नतम दरधारक मेसर्स. विरेश जैस्वाल, शिर्डी यांनी कोटेशनमध्ये दिलेले दर अंतीम समजणेत यावे, अशी विनंती केली. फुटाणेप्रसाद खरेदीकामीचे निम्नतम दरधारक श्री.दिपक अशोक झाल्टे, शिर्डी यांनी प्रती किलो रु.५/- मात्र दर कमी केले. विड्याची पाने खरेदीकामीचे निम्नतम दरधारक श्री दिपक देवराम आहेर, शिर्डी यांनी प्रती नग ५ पैसे दर कमी केले. तसेच अष्टगंध खरेदीकामीचे मेसर्स.गंगवाल ए.एस.& कं., शिर्डी यांनी प्रती किलो रु.५/- मात्र दर कमी केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ करीता श्रींची मुर्ती खरेदी करणेकामी मेसर्स. विरेश जैस्वाल, शिर्डी यांचे कोटेशनमधील मुळ दर, फुटाणेप्रसाद खरेदी करणेकामी श्री.दिपक अशोक झाल्टे, शिर्डी यांचे प्रती किलो रु.२०/- मात्र अंतीम दर व विड्याची पाने खरेदीकामी श्री.दिपक देवराम आहेर, शिर्डी यांचे प्रती नग रु.०.७० मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच भवानी शंकर अष्टगंध (पिवळा) खरेदी करणेकामी मेसर्स.गंगवाल ए.एस. & कं., शिर्डी यांचे प्रती किलो रु.१५५/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

२३ **मंदिर विभागाकडील पुजारी कर्मचारी यांचे ड्रेस कोड निश्चित करणेबाबत.**

बुधवार, दि.१५/०२/२०१७ रोजी दुपारी ०३.३० वाजता लेंडीबागेतील सभागृहात प्र.मा.कार्यकारी अधिकारी डॉ.संदीप आहेर यांच्या अध्यक्षतेखाली व ISO सल्लागार श्री.केशुमुर्ती यांनी संस्थानच्या वेगवेगळया विभागात आय.एस.ओ. मानांकन प्राप्त करणेकामी कामकाजाचा आढावा घेणेत आला आहे. त्यावेळी जा.नं.एसएसएस/ वशी-का.अ.स्वीय/ ४०९५/ २०१७, दि.१८.०२.२०१७ चे आदेशान्वये मंदिर विभागासंबंधी खालीलप्रमाणे सूचना करण्यात आल्या आहेत-

१) साई मंदिरामध्ये नियुक्त पुजारी कर्मचा-यांना ड्रेस कोड तयार करणे.

२) साई मंदिरामधील नियुक्त असलेल्या पुजारी कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी केलेली असावी.

**प्रस्ताव:-** त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०३.२०१७ चे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.२०६ नुसार श्रींचे समाधी चौथ-यावर काम करणा-या कर्मचा-यांसाठी प्रस्तावात नमुद केलेली नियमावली लागू करणेस मान्यता देण्यात आली. तसेच मंदिर विभागाकडील पुजारी कर्मचारी यांचे ड्रेस कोड निश्चित करणेकामी स्थानिक उपसमिती सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा. तसेच, साईभक्तांशी संपर्क येत असलेल्या विभागांमधील सर्व कर्मचा-यांची दर ६ महिन्यांनी वैद्यकीय तपासणी करुन घेण्यात यावी. याची सुरुवात मंदिर विभागापासून करणेत यावी, असे ठरले आहे.

त्यानुसार मंदिर विभागाकडील पुजारी कर्मचारी यांचे ड्रेस कोड निश्चित करणेकामी मा.स्थानिक उपसमितीची मान्यता मिळणेस विनंती आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सध्या समाधी चौथ-यावरील कायम व कंत्राटी कर्मचारी हे एकाच लाल रंगाचे सोवळे वापरतात. त्याऐवजी चौथ-यावरील कायम पुजारी/सहाय्यक पुजारी यांना लाल रंगाचे सुती सोवळे, उपरणे व कंत्राटी कर्मचारी पिवळे रंगाचे सुती सोवळे, उपरणे वापरण्यात यावे. तसेच कायम व कंत्राटी चोपदार/ मदतनीस यांना गुडघ्यापर्यंत लाल झगा व पांढरा पायजामा असा पोशाख असावा. तसेच श्रीगुरुस्थान, श्रीद्वारकामाई, श्रीचावडी, श्रीमारुती मंदिर, श्रीशनि-गणपती-महादेव मंदिर, श्रीदत्त मंदिर, म्युझियम हॉल, इ. मंदिरातील पुजारी/सहा.पुजारी/चोपदार/मदतनीस यांनी पिवळे सोहळे, उपरणे परिधान करावे. असे नमूद आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार मंदिर विभागाकडील पुजारी यांना ड्रेस कोड निश्चित करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागातील पुजारी/ कर्मचारी यांचेसाठी पुढीलप्रमाणे गणवेश निश्चित करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**समाधी मंदिरामध्ये चौथऱ्यावर काम करणाऱ्या कायम पुजारी/ सहाय्यक पुजारी यांना व कंत्राटी कर्मचाऱ्यांना लाल रंगाचे सुती सोवळे, उपरणे राहील. चौथऱ्या व्यतिरिक्त समाधी मंदिराममध्ये काम करणाऱ्या कायम व कंत्राटी चोपदार/ मदतनीस यांना पगडी, गुडघ्यापर्यंत लाल झगा व पांढरा पायजामा.**

**तसेच श्रीगुरुस्थान, श्रीद्वारकामाई, श्रीचावडी, श्रीमारुती मंदिर, श्रीशनि-गणपती-महादेव मंदिर, श्रीदत्त मंदिर, म्युझियम हॉल, इ. मंदिरातील पुजारी/ सहा.पुजारी/ चोपदार/ मदतनीस यांना पिवळे सोहळे, उपरणे व कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुर्वीप्रमाणेच लाल रंगाचा नेहरु शर्ट, पांढऱ्या रंगाचा पायजामा, असा गणवेश देण्यात यावा.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

२४ **दि.१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित करावयाच्या साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या अनुषंगानेचॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांनी सादर केलेला प्रकल्प अहवाल व करारनाम्याच्या मसुद्याबाबत.**

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचा प्रचार व प्रसार करणेसाठी नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय साई मॅरेथॉन स्पर्धा आयोजीत करणेसाठी दि.०९/०३/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितचे सभेपूढे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.२१२ नुसार "..शताब्दी वर्षाचे प्रसार व प्रचाराचे दृष्टीकोनातून शताब्दी वर्षात नगराध्यक्षा शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचे प्रस्तावास अनुसरून दि.१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करणेस व त्यासाठी संस्थानचा पाठिंबा असणेस मान्यता देण्यात आली. या स्पर्धेसाठी संस्थानकडून कोणतीही आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावयाची नसून सदर स्पर्धेच्या आयोजनाचा सर्व खर्च पुणे येथील चॅम्प एन्डयुरन्स पुणे ही संस्था करणार आहे. सदर स्पर्धेचे नियोजनासाठी चॅम्प एन्डयुरन्स पुणे, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व संस्थानची स्थानिक उपसमिती यांची साई मॅरेथॉन समिती स्थापन करण्यात यावी. या समितीने वेळोवेळी बैठका घेऊन स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी नियोजन करावे." असे ठरले.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी स्पर्धेचे नियोजनासाठी व आयोजकांशी चर्चा करणेसाठी साई मॅरेथॉन समिती असावी. तसेच या समितीच्या बैठका संस्थानचे स्थानिक उपसमितीच्या सभेच्या वेळी आयोजित करून साई मॅरेथॉन स्पर्धा यशस्वीतेसाठी नियोजन करणेत यावे, असे निर्देश दिले होते.

त्यानुसार साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या नियोजनाचे दृष्टीकोनातून आयोजकांशी चर्चा करणेसाठी शुक्रवार, दि.२४/०३/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थानचे साईनिवास अतिथीगृहात साई मॅरेथॉन समिती यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत मा.श्री. अभय शेळके पा. नगरसेवक व चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांचे प्रतिनिधी यांनी आंतरराष्ट्रीय साई मॅरेथॉन स्पर्धेबाबत माहिती देऊन, श्री साईबाबा संस्थानला आंतरराष्ट्रीय साईमॅरेथॉन स्पर्धेचा आर्थिक भार वजा जाता पालकत्व घेण्याबाबत विंनती केली. त्यानंतर झालेल्या चर्चेस अनुसरून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

१) साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचा आर्थिक भार वजा जाता पालकत्व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे असेल.

२) साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेकरीता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचा लोगो वापरण्यास हरकत नाही.

३) साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेचा सविस्तर प्रस्ताव (Detailed Project Report) व करारनाम्याचा मसुदा आयोजकांनी संस्थानकडे सादर करावा.

४) श्री साईबाबा संस्थान हे धर्मादाय संस्थान आहे. त्यामुळे साई मॅरेथॉन स्पर्धेच्या जाहीरातीसाठी धुम्रपान व मद्य उत्पादक कंपन्यांचे प्रायोजक असू नयेत.

५) साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या दृष्टीकोनातून आयोजकामार्फत नॅशनल असोसिएशन यांचेसह पोलीस विभाग, शासकीय विभाग यांच्या आवश्यक त्या सर्व परवानग्या घेण्यात याव्यात. तसेच स्पर्धेची सर्व आंकाऊट डिटेल ठेवण्यात यावेत.

६) आयोजकामार्फत साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या प्रसिध्दीसह श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचा प्रचार व प्रसार करण्यात यावा.

७) स्पर्धेच्या अटी व शर्ती जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेमार्फत तपासून घेण्यात याव्यात.

८) स्पर्धेनंतर संपूर्ण मार्गाची स्वच्छता करण्याची जबाबदारी शिर्डी नगरपंचायत व चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांची असेल.

९) स्पर्धेच्या निमित्ताने मंदिर परिसरात रजिस्ट्रेशन काऊंटर सुरू करणे तसेच मॅरेथॉन स्पर्धेसाठी आयोजकांनी तयार केलेली वेबसाईट व संस्थान वेबसाईट लिंक करणेस हरकत नाही.

उपरोक्त निर्णयाचे अनुषंगाने चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांनी त्यांचा प्रकल्प अहवाल हा छापील लेटर हेडवर दिलेला नूसन, त्यावर कोण्त्याही पदाधिकारी यांची स्वाक्षरी नाही.

तसेच चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांचेमार्फत सादर करण्यात आलेला करारनामा श्री. उदय जोशी, जिल्हा क्रीडा अधिकारी अहमदनगर यांच्याकडे दि.२४/०३/२०१७ रोजीचे साई मॅरेथॉन उपसमितीचे सभेत ठरलेप्रमाणे तपासणी करणेकामी पाठविणेत आला होता. जिल्हा क्रीडा अधिकारी अहमदनगर, यांनी तो तपासून सदरहू करारनाम्यामध्ये खालील बाबींचा समावेश करणेत यावा, असे सुचविलेले आहे.

1. पार्टी क्र.१ चे संपूर्ण नांव, पत्ता, त्यांचे पदाधिकारी/अधिकारी यांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांकासह असावेत.
2. पार्टी क्र.१ मार्फत श्री.साईबाबा संस्थान शिर्डी यांच्याकडे सुरक्षा ठेव (दोन्ही पक्षाच्या समन्वयाने) ठेवणे आवश्यक आहे, असे प्रस्तावित आहे.
3. पार्टी क्र.१ यांनी स्पर्धा समाप्तीनंतर आवश्यक ते सर्व खर्चाच्या हिशेबांचे सनदी लेखापरीक्षकांमार्फत परीक्षण करुन, त्याचा अहवाल संस्थानास सादर करणे आवश्यक राहील.
4. स्पर्धा कालावधी व करारनामा कालावधीत या संदर्भात होणा-या कोणत्याही जीतीत व वित्त हानीची जबाबदारी संस्थान स्वीकारत नाही.
5. संस्थानने दिलेल्या परवानगीनुसार या स्पर्धेशी संबंधित कोणत्याही बाबीबाबत संस्थानच्या नांवाचा गैरवापर करण्यात येऊ नये, या नांवाचा वापर करुन कोणत्याही प्रकारे त्याद्वारे लाभ मिळविण्याबाबत प्रयत्न करण्यात येऊ नये, अशा बाबी निदर्शनास आल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
6. करारनाम्यातील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचे संपूर्ण अधिकार संस्थानला राहतील.
7. श्री.साईबाबा समाधी शताब्दी सोहळ्यानिमित्त वापरण्यात येणा-या लोगोचा कोणत्याही प्रकारे अनादर होईल, असे वर्तन करण्यात येऊ नये.
8. पार्टी नं.१ या कालावधीत नियुक्त करणारे अधिकारी/कर्मचारी यांचा संस्थानशी कोणताही संबंध असणार नही, हे सर्व पार्टी क्र.१ चे अधिकारी कर्मचारी असतील व या अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन/ मानधनावरील होणारा सर्व खर्च पार्टी क्र.१ यांनी करावयाचा आहे.
9. साई इंटरनॅशनल मॅरेथॉन, शिर्डी हा पूर्णतः चॅम्प एड्युरन्स यांनी विकसित केलेला त्यांच्या मालकीचा ब्रॅण्ड, प्रकार असला तरी, पार्टी क्र.२ साई इंटरनॅशनल मॅरेथॉन, शिर्डी या नांवाने ही स्पर्धा स्वतः अथवा इतर संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्याचे अधिकार राखून ठेवीत आहे. त्यामुळे पार्टी क्र.१ च्या मालकीचा ब्रॅण्ड हा या करारनाम्याच्या कालावधीपुरताच राहील.
10. पार्टी क्र.१ यांनी स्पर्धेसाठी असणा-या राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय संघटनांच्या परवानग्या मिळविणे आवश्यक आहे, अशी परवानगी असल्यासच संस्थानमार्फत पालकत्व स्वीकारण्यात येईल.
11. स्पर्धेसंबंधी उद्‌भवणा-या सर्व तांत्रिक व कायदेशीर बाबींची जबाबदारी पार्टी क्र.१ ची राहील, या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार संस्थान स्वीकारणार नाही.
12. स्पर्धा मार्गावर आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा पार्टी क्र.१ यांनी स्पर्धेच्या निकषानुसार पुरवावयाच्या आहेत.
13. या स्पर्धेच्या माध्यमातून पार्टी क्र.१ यांनी कोणत्याही प्रकारचे राजकीय व्यासपीठ निर्माण करण्यात येऊ नये, तसेच या स्पर्धेच्या माध्यमातून अथवा जाहिरातीच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे सामाजिक भावना भडकविणारे संदेश देण्यात येऊ नयेत.
14. कोणत्याही कारणास्तव स्पर्धा रद्द झाली किंवा करावी लागल्यास, स्पर्धकांचे शुल्क परतावा करण्याची संपूर्ण जबाबदारी पार्टी क्र.१ यांची राहील.
15. संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणा-या सुविधा ह्या संस्थानच्या विहीत नियमावलीच्या व शुल्काच्या आधारे उपलब्ध करुन देण्यात येतील.

16. सदर स्पर्धा / प्रकल्प कोणत्याही प्रकारच्य आर्थिक जडजोखमीत गुंतविता येणार नाही, तसेच पार्टी क्र.१ यांनी केलेल्या कोणत्याही आर्थिक स्वरुपाच्या व्यवहारास संस्थान जबाबदार राहणार नाही.

तसेच वरीलप्रमाणे बाबीं व आवश्यक असणा-या इतर बाबीं संस्थानमार्फत विहीत करुन, तसेच या संदर्भात जेष्ठ विधिज्ञांचा सल्ला घेऊन करारनामा अंतिम करण्यात यावा, असेही नमूद केलेले आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने सदर स्पर्धेचे नियोजनासाठी स्थानिक उपसमितीचे यांचे सभेपूढे प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**आजचे उपसमिती सभेसमोर चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते, त्यांनी साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या नियोजनासाठी त्यांनी आत्तापर्यंत केलेल्या व यापुढे करावयाच्या कामांची माहिती उपसमितीस दिली. उपसमितीने त्यांनी सादर केलेला प्रकल्प अहवाल व करारनाम्याच्या मसुद्याबाबत चर्चा केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१५ ऑक्टोबर, २०१७ रोजी शिर्डी येथे आयोजित करावयाच्या साई आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेच्या अनुषंगाने चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांचेबरोबर करावयाच्या करारनाम्यामध्ये मा.जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी सुचविलेल्या बाबींचा समावेश करणेत येऊन, सदरहू करारनाम्याचा मसुदा संस्थानचे विधी विभागाने अंतीम करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**त्याचेबरोबर उपसमितीने चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांना खालीलप्रमाणे सुचना केल्या.**

**इंटरनेट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे या कार्यक्रमाची जाहिरात करणेत यावी. तसेच वेगवेगळया शहरांमध्ये प्रेस कॉन्फरन्स आयोजित करण्यात यावी व याबाबतची माहिती संस्थानला देत जावी. समाज विघातक जाहिरातींचा समावेश प्रायोजक म्हणून करणेत येऊ नये.**

**तसेच चॅम्प एन्डयुरन्स, पुणे यांना नाव नोंदणीसाठी स्टॉल लावणेकामी संस्थान परिसरामध्ये (१६ गुंठे, प्रसादालय, निवासस्थाने परिसर) जागेची पहाणी करुन, तसा प्रस्ताव कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर करावा व या स्पर्धेसाठी येणाऱ्या स्पर्धकांना संस्थानच्या खोल्या सशुल्क राखीव ठेवावयाच्या असल्यास निर्धारित वेळेपुर्वी माहिती तंत्रज्ञान विभागास कळविणेत यावे.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

२५ **श्रीसाईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम- २००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या. खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तमालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१. दि.०७/०२/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेसाठी निर्णय क्र.१११ अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींचे नूतनीकरण करणेसाठी Granite Stone 3cm thk. sagaralli grey Antique Finish (Flammed and Brushed) व Granite Stone 2cm thk. leather finish याचा वापर करण्यात यावा. याकामी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास व वर्तमानपत्रात आणि संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.

तसेच, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी परवानगी मिळणेबाबत, मा. मुंबई उच्ची न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत त्वरीत अर्ज सादर करणेत येऊन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."

२. दि.३०/०३/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.२६५ अन्वये, "श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरिंग नूतनीकरणाचे कामाकरिता आर्किटेक्ट म्हमणून शुभंकर एन्टरप्रायजेस, पुणे यांची नेमणूक करणेत यावी तसेच, सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्टट सेवा पुरविणेकामी त्याना प्रकल्प अंदाजपत्रकाचे २% फी + सर्व्हिस टॅक्स देणेत यावा, असे ठरले".

३. दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.६४२ अन्वये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील ५३५४ चौ.मी. जागेमधील फ्लोरींगचे नुतनीकरण करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु अशीही चर्चा करणेत आली की, समाधी मंदिराच्या वास्तुपेक्षा फ्लोरींग उठावदार व आकर्षक नसावे, याकरीता फ्लोरींगचा रंग फिका ठेवण्याततत यावा तसेच कमी नक्षीकाम असावे, त्यासाठी मंदिर परिसरामध्ये करावयाच्या फ्लोरींगसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लाअगाराचा अभिप्राय घेण्यात यावा व नमुनादाखल ४X४ स्केस. फुट जागेत वेगवेगळ्या प्रकारचे/ नक्षीचे फ्लोरींग करणेत येऊन, त्याची चाचणी घेण्यात यावी. त्यानंतर जो नमुना पसंत पडेल त्यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्या, असे ठरले."

४. दि.२२/१२/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र. ९०५ अन्वाये, "यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृहासमोर तयार केलेल्या ०४ प्रकारच्या फ्लोअरींगच्या नमुन्यांनी समितीने पाहणी केली व सदरहू पाहणीअंती मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे कामासाठी प्रामुख्याने ग्रेनाईटचा वापर करणेत यावा. उन्हाळयात उष्णतेने साईभक्तांच्या तळपायांना त्रास होऊ नये, याकरीता फ्लोअरींगमध्ये काही भागात व्हाईट इंजि. आर्टीफीशियल टाईल्सचे पाथवे करणेत यावे, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच सदरहू फ्लोअरींग नुतणीकरण करणेचे काम रात्रीच्या वेळेसच जास्त करणेत यावे, अशा सुचना दिल्या."

**प्रस्तावना**: संस्थानतर्फे श्री साईबाबा मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्पाचे बांधकाम यापुर्वी सन १९९९ मध्ये पूर्ण करणेत आले आहे. त्यावेळी मंदिर परिसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये ब्लॅक कडप्पा व रेड आग्रा स्टोनमध्ये डिझाईन तयार करण्यात आलेली आहे. सदर फ्लोअरींगचे काम पूर्ण होऊन आता आठरा वर्षापेक्षाही अधिक कालावधी झालेला आहे. काळाचे ओघात फ्लोअरिंग ब-याच ठिकाणी खराब झाली आहे. त्यास ब-याच ठिकाणी तडे गेलेले आहेत. त्यामुळे सदर फ्लोअरिंगचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्याची फ्लोअरींग काढून त्याठिकाणी ग्रेनाईट+ व्हाईट इंजि. आर्टिफिशियल टाईल्स फ्लोरींगसाठी एकूण रक्कम रु.१.१४२ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची वाढीव अंतिम मूदत दि.०५/०४/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीत खालील ०३ ई-निविदा अपलोड झालेल्या आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव | आवक क्र. | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | सी-४ इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., नाशिक | २४१६३ | ०७/०३/२०१७ |
| ०२ | आर.के. सावंत, नाशिक | ०४१२ | ०५/०४/२०१७ |
| ०३ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव | २४३११ | ०९/०३/२०१७ |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.११/०४/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त तीनही ठेकेदार पात्र झाले आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | सी-४ इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., नाशिक |
| ०२ | आर.के. सावंत, नाशिक |
| ०३ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव |

उपरोक्त ०३ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा लिफाफा क्र. ०२ (वाणिज्यीक निविदा) दि.०६/०५/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, तयांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | सी-४ इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., नाशिक | १,४१,०२,३६३/- | - |
| ०२ | आर.के. सावंत, नाशिक | **७४,८२,०००/-** | **निम्नतम** |
| ०३ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव | १,९४,०४,१८०.५० | - |

उपरोक्त तपशिलानुसार ०३ निविदाधारकांपैकी ठेकेदार ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निर्णयार्थ सादर.

**श्रीसाईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदाप्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आर.के. सावंत, नाशिक यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते, त्यांनी उपसमिती सभेसमोर फ्लोरींगकामी वापरण्यात येणाऱ्या ग्रेनाईटचे नमुने दाखविले, त्यानंतर उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेकामी आर.के. सावंत, नाशिक यांचे एकत्रित रु.७४,८२,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२६ **कार्यालयीन वापरासाठी 01 नग लॅपटॉप 01 नग आय पॅड व 02 नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीकामी प्राप्त निविदांमधील निम्नत्तम पुरवठाधारकास चर्चेसाठी बोलावणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:-** कलम १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्धकरुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२९४

**प्रास्ताविक:-** सद्यस्थितीत इकडील विभागाकडे उपलब्ध नसलेले व कार्यालयीन कामासाठी आवश्यक असलेले ०१ नग लॅपटॉप, ०१ नग आय पॅड व ०२ नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये२,३८,२९०/-+ टॅक्सचेखर्चास मान्यता घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. सदरचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन,निर्णय क्र.२९४ ने कार्यालयीन वापरासाठी ०१ नग लॅपटॉप, ०१ नग आय पॅड व ०२ नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये २,३८,२९०/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

सबब, मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरील साहित्य संस्थानचे विहित पध्दतीने खरेदी करणेसाठी, या क्षेत्रातील विविध पुरवठाधारकांकडून ई-मेलद्वारे दरपत्रके मागविणेकामी, दि.०७.०५.२०१७ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार ०४ बंद पाकिटातील निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | ग्लोबल कॉम्प्युटर्स, शिर्डी | सा.प्र.वि.आ.नं.३४५८ | १०.०५.२०१७ |
| ०२ | साई सेवा सर्विसेस, शिर्डी | सा.प्र.वि.आ.नं.३४५९ | १०.०५.२०१७ |
| ०३ | आर.डी.डेटा सिस्टीम्स, नाशिक | सा.प्र.वि.आ.नं.३४६० | १०.०५.२०१७ |
| ०४ | साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी | सा.प्र.वि.आ.नं.३४७२ | १०.०५.२०१७ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा मा.खरेदी समितीचे दि.११.०५.२०१७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| Sr. no. | Description | Qty | Global Computers, Shirdi | SaiSeva Services, Shirdi | R.D.Data Systems, Nashik | Sainath Computers, Shirdi |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate per nos. in Rs. | | | |
| 01 | **Laptop** -HP Spectra 13 V123TUI 7th Gen Intel core i5 (3.1 Ghz 3Mb Cache 2 cores. RAM 8 GB LPDDR3 HDD 256 GB PCIe® NVMe™ M.2 SSD, Intel HD graphics 620, 33.78 cms(13.3) screen Full HD Windows 10 Pro | 01 | 1,18,000/- | **1,11,000/-** | 1,18,000/- | 1,25,000/- |
| 02 | **i Pad**-Apple iPad pro 12.9 inch, 128 GB Wifi + Cellular, 12.9-inch (diagonal) LED-backlit Multi-Touch display, 2732-by-2048 resolution at 264 pixels per inch (ppi), Color Gold with leather cover. | 01 | 93,900/- | 88,750/- | 90,500/- | 1,24,000/- |
| 03 | **LaserJetWi-Fi Printer** HP CP1025nw Color | 02 | 23,750/- | 24,200/- | 23,200/- | **21,750/-** |

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता,०१ नग लॅपटॉप खरेदीसाठी रक्कम रुपये १,११,०००/- मात्र व ०१ नग आय पॅड खरेदीसाठी रक्कम रुपये ८८,७५०/- मात्र मे.साईसेवा सर्व्हिसेस, शिर्डी यांचे निम्नत्तम दर आलेले आहेत. तसेच ०२ नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीसाठी रक्कम रुपये ४३,५००/- मात्र मे.साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांचे निम्नत्तम दर आलेले आहेत. सदर साहित्य खरेदीकामी निम्नत्तम पुरवठाधारक मे.साईसेवा सर्व्हिसेस, शिर्डी व मे.साईनाथ कॉम्प्युटर्स,शिर्डी यांना मा.उपसमितीचे सभेसमोर बोलवून त्यांनी देऊ केलेल्या रक्कमेबाबत चर्चा करता येईल.

**मागणी:-** प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यालयीन कामासाठी आवश्यक असलेले ०१ नग लॅपटॉप, ०१ नग आय पॅड व ०२ नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा दि.११.०५.२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत. लॅपटॉप व आयपॅड खरेदीसाठी मे.साईसेवा सर्व्हिसेस, शिर्डी यांना तसेच कलर लेझरप्रिंटर(Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीसाठी मे.साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांना अंतिम चर्चेसाठी माउपसमितीचे सभेसमोर बोलावणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** आर्थिक, प्रशासकीय व तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** कार्यालयीन कामासाठी आवश्यक असलेले ०१ नग लॅपटॉप, ०१ नग आय पॅड व ०२ नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा दि.११.०५.२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या आहेत. लॅपटॉप व आयपॅड खरेदीसाठी मे.साईसेवा सर्व्हिसेस, शिर्डी यांना तसेच कलर लेझरप्रिंटर(Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीसाठी मे.साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांना अंतिम चर्चेसाठी मा.उपसमितीचे सभेसमोर बोलावणेच्या मान्यतेस्तव सदरचा प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेसमोर सविनय सादर.

**कार्यालयीन वापरासाठी ०१ नग लॅपटॉप, ०१ नग आय पॅड व ०२ नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीकामी प्राप्त झालेल्या निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. उपसमितीने दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा केली असता, त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्यालयीन वापरासाठी ०१ नग लॅपटॉप, ०१ नग आय पॅड खरेदीकामी मे.साईसेवा सर्व्हिसेस, शिर्डी यांचे व ०२ नग कलर लेझरप्रिंटर (Wi-Fi तंत्रज्ञानासह) खरेदीकामी मे.साईनाथ कॉम्प्युटर्स, शिर्डी यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधारेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

२७ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील डिफीब्रीलेटरचे Internal Paddles खरेदी करणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल करीता पुरवठा आदेश क्र. 8373/2005 दि. 08/08/2005 अन्वये कार्डीयाक ऑपरेशन थिएटर करीता एक Heart start XL डिफीब्रीलेटर एकुण रु. 2,83,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर डिफीब्रीलेटरचे Internal Paddles खराब झालेले आहेत. सदर Internal Paddles खरेदी करणेकामी सदर प्रस्तावावर मा. व्य. समितीच्या दि. 25/02/2017 चे सभेतील विषय क्र. 102 व निर्णय क्र. 102 अन्वये सविस्तर चर्चा होउन, सदर Internal Paddles विविध अधिकृत पुरवठा धारकांकडुन कोटेशन मागणी करुन खरेदी करणेस आणि त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. 64,283/- चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील पुरवठा धारकांकाना SSH/SSBH/WS/BME/2919/2017 दि. १३/०३/२०१७ अन्वये पत्र पाठवुन कोटेशनची मागणी करण्यात आली होती.

1) M/s. Medical Engineering Company, Aurangabad
2) M/s. Biosonic Medical Equipments, Nashik
3) M/s. Micronics Instrument Compnay, Nashik
4) M/s. Cyronics Instrument Pvt. Ltd., Pune
5) M/s. Care Mediequip, Mumbai

वरीलपैकी दि. 31/03/2017 अखेरीस खालीलप्रमाणे पुरवठाधारकांकडुन कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

1) M/s. Micronics Instrument Compnay, Nashik
2) M/s. Care Mediequip, Mumbai
3) M/s. Medical Engineering Company, Aurangabad (सामान्य प्रशासन विभागकडुन उघडुन प्राप्त)

त्यानुसार प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन उघडणेस मंजुर टिपणी दि. १३/०४/२०१७ अन्वये मान्यता घेणेत आली असुन सदर कोटेशन दि. ०६/०५/२०१७ रोजी मा. खरेदी समिती सभेसमोर समक्ष उघडणेत आले असुन पुरवठाधारकांनी दिलला दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Item Description | Qty. | Name of Company | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | M/s. Medical Engineering Company, A.bad | | M/s. Care Mediequip, Mumbai | | M/s. Micronics Instrument Compnay, Nashik | |
| | | | Rate Per (Incl. of all Tax) | Total Rs. | Rate Per (Incl. of all Tax) | Total Rs. | Rate Per (Incl. of all Tax) | Total Rs. |
| 1 | Switched Internal Paddle of Difibrilator 6.0cm | 01 | 56750 | 56750 | **47250** | 47250 | 55615 | 55615 |
| **Total Rs. Incl. all Taxes** | | | 56750 | | **47250** | | 55615 | |

तरी निम्नतम दर धारक M/s. Care Mediequip, Mumbai यांचे बरोबर चर्चा विनिमय करून त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या रक्कम रू. 47,250/- (अक्षरी रू. सत्तेचाळीस हजार दोनशे पन्नास मात्र) चे खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा. व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागातील डिफीब्रीलेटरचे Internal Paddles खरेदी करणेकामीचे निम्नतम दरधारक M/s. Care Mediequip, Mumbai यांना आजचे उपसमिती सभेसमोर दरांबाबत चर्चा करणेसाठी बोलविणेत आले होते, परंतु सभेसमोर ते अनुपस्थितअसल्यामुळे त्यांनी कोटेशनमध्ये दिलेले एकत्रित रु.४७,२५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२८ **जनरल ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्सचे दुरुस्तीबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद :-**1) पृ. क्र. 355, समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये 14 (2) ख
2) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार 17 (2) झ
3) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग 21 (1) क (2) (ग)

**प्रस्ताविक:** श्री साईनाथ रूग्णालयाकरीता सन 1999 यावर्षी मे.कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे भारतातील तेव्हांचे अधिकृत विक्रेते मे. चिमको इंटरनॅशनल, मुंबई यांचेकडून झेनॉन नोवा लाईट सोर्स एकुण रू. 1,05,435.26/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर लाईटसोर्स नियमीत वापरात असुन सध्या लाईटसोर्सची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जात आहे. परंतु दुरुस्ती करीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट पुरवठाधारक कंपनीकडुन बदलुन घेतले जातात.

सध्या जनरल ओ.टी. विभागातील लाईटसोर्स व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र दि. 27/03/2017 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर लाईटसोर्सची तपासणी केली असता सदर बल्ब खराब झाले असल्यामुळे बदलणेची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर लाईटसोर्स जनरल ओ.टी. विभागात नियमीत वापरात असल्याने दुरूस्त करणे आवश्यक आहे.

**मागणी:-** लाईटसोर्सचे पुरवठाधारक मे.कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांचेकडे बल्ब करीता विचारणा केली असता कंपनीने त्यांचे पत्र क्र. 27980, दि. 29/03/2017 अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| Sr.No. | Art. no | Description | Qty | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | 20131520 | Xenon Nova Light Source 175 W | 01 | 46,000.00 |
| | | | + CST @ 5 % | 2,300.00 |
| | | | Labour Amount | 1375.00 |
| | | | Service Tax On Labour @ 15% | 206.00 |
| | | | **Total Amount (Incl.all taxes) in Rs.** | **49,881.00** |

वरीलप्रमाणे लाईटसोर्स करीता बल्ब खरेदी करणेकामी सर्व करांसहीत एकुण रू. 49,881/- (अक्षरी रू. एकोणपन्नास हजार आठशे ऐक्याऐंशी मात्र) इतका इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** वरील संस्थान अधिनियमानुसार दुरूस्ती व देखभाल करता येईल. सदर दुरूस्ती करीता रु.25000/- पेक्षा अधिक खर्च येणार असल्यामुळे मा. व्यवस्थापन समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सदर लाईटसोर्स जनरल ओ.टी. विभागात नियमीत वापरात असल्याने तातडीने दुरूस्त करणे आवश्यक आहे. तसेच जनरल ऑपरेशन विभागात दररोज विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया होत असतात. त्यामुळे लाईटसोर्सचा बल्ब बदलणे आवश्यक आहे. सदर बल्ब Monopoly Item नसुन अशा प्रकारचा बल्ब विविध पुरवठाधारक कंपन्याकडुन कोटेशन मागणी करुन निम्नतम दराने खरेदी करणेस हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी जनरल ओ.टी. विभागातील लाईटसोर्सचा बल्ब विविध पुरवठाधारक कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून निम्नतम दराने खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रू.49,881/- चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जनरल ऑपरेशन थिएटरमधील लाईट सोर्सचा बल्ब खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.४९,८८१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **कार्यकारी संपादक व प्रसिध्दी अधिकारी हे पद सरळ सेवेने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेत सदस्यांच्याण सूचनांवरुन साईलीला अंक वेळेवर प्रसिध्द् होणेकामी संपादक नेमणूकीची कार्यवाही सुरू करणेचा निर्णय घेण्यारत आलेला आहे .

त्यास अनुसरून संस्थानचे मुंबई कार्यालयाने उपरोक्त संदर्भ क्र.०३ चे पत्रान्वये संस्थासनचे मा.अध्यक्ष महोदय यांचे सुचनेनुसार साईलीला मासिकाबरोबरच "साईसेवा" नावाने आणखी एक द्वैमासिक सुरू करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सध्यान साईलीला (इंग्रजी व मराठी) या द्वैमासिकाचे संपादकीय सर्व कामकाज सहाय्यक संपादक, श्री.एस.डी.राणे हे पाहत आहेत. नव्याबने "साईसेवा" द्वैमासिक सुरू करणेसाठी मंजुर आकृतीबंधातील रिक्त कार्यकारी संपादक हे पद भरणे आवश्यक आहे. कार्यकारी संपादक या पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक आहे.

अहंकाररहित आध्यात्मिक वृत्ती, कल्पक कलादृष्टी, किमान पदवीधर, मराठी-हिंदी-इंग्रजी भाषा अवगत, संगणक इंटरनेटचे ज्ञान, सामाजिक कार्याची आवड, आध्यात्मिक क्षेत्रात विशेषतः साईजीवन, शिकवण तत्वज्ञानावर आधारीत नियतकालिकांच्या लेखन-संपादन-मुद्रितशोधन-मुद्रण-प्रकाशनाचा २५ वर्षाचा अनुभव, संबंधीतांकडून काम करून घेण्याचे कौशल्य याप्रमाणे पदभरतीची कार्यवाही आस्थापना विभागामार्फत करणेबाबत कळविले आहे.

तसेच मा.अध्यक्ष महोदय यांनी दुरध्वनीद्वारे जनसंपर्क कार्यालयाकडील रिक्त असलेले प्रसिद्ध अधिकारी हे पद सरळसेवेने भरणेबाबत कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

मंजुर आकृतीबंध व प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमानुसार कार्यकारी संपादक व प्रसिद्धी अधिकारी पदाची माहिती खालीलप्रमाणे –

| अ.नं. | पदनाम व मंजुर वेतनश्रेणी | पदसंख्या | प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| ०१ | Executive Editor<br>कार्यकारी संपादक<br>९३००४४००ग्रेड पे + ३४८००- | ०१ | 1) Age not more than 35 years.<br>2) Graduate from any Government recognized University with Diploma in Journalism,<br>3) MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course.<br>4) Command on Marathi, Hindi & English Languages with knowledge of printing profession,<br>5) Prefrence to the candidate having information about the Saibaba's life, teachings and philosophy<br>6) Five years working experience of writing and editing in well known newspapers, magazine. |
| ०२. | Publicity Officer<br>प्रसिद्धी अधिकारी<br>९३०० ग्रेड पे + ३४८००-४२०० | ०१ | 1) Age not more than 33 years.<br>2) Graduate from any Government recognized University.<br>3) Degree/ Diploma in Journalism.<br>4) MS-CIT or Government prescribed equivalent computer operating course.<br>5) Experience minimum 5 years in same professional. |

वरीलप्रमाणे कार्यकारी संपादक व प्रसिद्धी अधिकारी या पदासाठी मंजुर वेतनश्रेणी व प्रस्ताटवीत सेवाप्रवेश नियमात नमुद केलेली शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन हे पदे मंजुर वेतनश्रेणीत होणा-या प्रथम वेतनाप्रमाणे एकत्रित मासिक वेतनानुसार ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने भरणेकामी विविध वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिद्ध करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईलिला व श्री साईसेवा द्वैमासिकांसाठी संपादक मंडळ नेमणेबाबतची कार्यवाही चालू असल्यामुळे प्रस्तावित पदांपैकी कार्यकारी संपादक हे पद न भरता फक्त प्रसिध्दी अधिकारी हे पद प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे एकत्रित मासिक वेतनानुसार ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने भरणेत यावे. तसेच कुशल, अनुभवी प्रसिध्दी अधिकारी मिळणेसाठी या पदाच्या पात्रतेमधील वयाची अट शिथील करणेत यावी व उमेदवार पदवीधारक असावा आणि मराठी, हिंदी, इंग्रजी टायपींग असावी, या अटीचा समावेश करणेत यावा.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईबाबांच्या पादुका बाहेरगावी दर्शन सोहळ्यासाठी नेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतूद-**

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रीसाईबाबा संस्थानकडे श्रींच्या मुळ पादुका आहेत . पालखी व रथ मिरवणूकीचे वेळी श्रींच्या पादुका साईभक्तांचे दर्शनाकरीता धुपारतीनंतर श्रींचे समाधी चौथ-यावर ठेवण्यात येतात. तसेच रात्रौ पालखीनंतर पुन्हा समाधी मंदिरातील शोरुममध्ये ठेवण्यात येतात. श्रींच्या पादुकांचे संरक्षण व संवर्धन करणे ही अत्यंत महत्वाची बाब आहे. श्रीसाईबाबांच्या मुळ पादुका यापुर्वी फक्त मुंबई येथे एक वेळेस संस्थानचे कार्यक्रमासाठी कडक बंदोबस्तामध्ये नेण्यात आल्या होत्या. त्याव्यतिरीक्त व त्यानंतर श्रींच्या मुळ पादुका या कोणत्याही ठिकाणी नेण्यात आलेल्या नाहीत. श्रींचे वस्तुसंग्रहालयातही श्रींच्या पादुकांचे दोन जोड आहेत. तसेच यापुर्वी संस्थानमार्फत चावडी शताब्दी वर्षामध्ये विविध ठिकाणी झालेल्या कार्यक्रमाकरीता श्रींचे समाधीचे पादुकांचे ठिकाणी पुर्वी असलेल्या व सध्या वापरात नसलेल्या चांदीच्या पादुकांनाकार्यक्रमासाठी बाहेरगावी नेऊन संस्थानमार्फत कार्यक्रम करण्यात आलेला आहे.

**प्रस्ताव-** मा.आमदार श्री.नरेंद्र एल. मेहता, मिरा-भाईंदर, ठाणे यांनी आपले दि.११/०५/२०१७ रोजीचे अर्जामध्ये असे नमूद केले आहे की,श्री साईबाबा यांचे भक्त संपुर्ण देशाभरात आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये पण मोठयाप्रमाणात साई भक्त आहे व तसेच मिरा भाईंदर मधून साईभक्त साईबाबांच्या दर्शनाकरीता पाय यात्रा करुन शिर्डी पर्यंत येत आहे. परंतू मिरा भाईंदर शहरातील स्थानिक नागरिकांची अशी इच्छा आहे की, साईबाबांची पवित्र पादुका मिरा भाईंदर शहरात शनिवार, २७/०५/२०१७ ते रविवार २८/०५/२०१७ किंवा बुधवार, ०७/०६/२०१७ ते गुरुवार, ०८/०६/२०१७ अशी दोन दिवस दर्शनाकरीता व पुजेकरीता उपलब्ध करावी अशी त्यांनी विनंती केली आहे

**त्यानुसार यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८ एप्रिल,२०१७ निर्णय क्र.३३२ अन्व्ये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार व्हावा, याकरीता प्रस्तावात मागणी केलेल्या श्री.गणेश अरुण डोईफोडे, सचिव, साईसेवा प्रतिष्ठाण, काष्टी, ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर यांना दि.०७/०५/२०१७ रोजी व श्री अमित व्यास, विश्वस्त, स्वयंभु श्री सिध्देश्वर महादेव मंदिर, मुंबई यांना दि०१ जुन ते ०४ जुन, २०१७ या कालावधीमध्ये दर्शन सोहळयासाठी श्रींच्या चांदीच्या पादुका उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदरहू पादुका दर्शन सोहळयासाठी संस्थान वाहन व कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात यावेत, तसेच याकामी येणारा सर्व खर्च संबंधीतांकडून घेण्यात यावा व पादुका दर्शन सोहळयाच्या ठिकाणी संस्थानची देणगी पेटी/ देणगी पावती पुस्तक ठेवण्यात यावे, असे ठरले.**

**विभागाचे मत/ अभिप्राय-** उपरोक्त मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८ एप्रिल, २०१७ निर्णय क्र.३३२ नुसार दर्शन सोहळयासाठी श्रींच्या चांदीच्या पादुका उपलब्ध करुन देता येतील. परंतू श्रीसाईबाबा संस्थानकडे असलेल्या श्रींच्या पादुका वरील नमूद केलेल्या कार्यक्रमाकरीता देणेकामी खालीलप्रमाणे बाबींचा विचार व्हावा ही विनंती -

१) मा.व्यवस्थापन समिती सदस्य, मा.कार्यकारी अधिकारी महोदया, उपकार्यकारी अधिकारी यांना पादुकांचे ठिकाणी जाणे व परत येणेसाठी संस्थान वाहन उपलब्ध करुन देणे.

२) संस्थानमार्फत पादुका नेऊन त्याठिकाणी संस्थानचा कार्यक्रम करता येईल . परंतु,त्याकामी संस्थानचा कार्यक्रमाचे नियोजन करावे लागेल, तसेच संस्थानचे जबाबदार एक प्रशासकीय अधिकारी,मंदिर विभाग, संरक्षण विभाग, लेखाशाखा विभाग, वाहन विभागाकडील कर्मचारी यांचेकरीता संस्थान वाहनाने ने-आण करुन कार्यक्रम करता येईल, असे नम्र मत आहे.

३) मा.आमदार श्री.नरेंद्र एल. मेहता, मिरा-भाईंदर, ठाणे यांनी साईबाबांची पवित्र पादुका मिरा-भाईंदर शहरात शनिवार, २७/०५/२०१७ ते रविवार २८/०५/२०१७ किंवा बुधवार, ०७/०६/२०१७ ते गुरुवार, ०८/०६/२०१७ अशी दोन दिवस दर्शनाकरीता व पुजेकरीता उपलब्ध करुन देणेची मागणी केली आहे. परंतू श्री अमित व्यास, विश्वस्त, स्वयंभु श्री सिध्देश्वर महादेव मंदिर, मुंबई यांना दि०१ जुन ते ०४ जुन, २०१७ या कालावधीमध्ये दर्शन सोहळयासाठी श्रींच्या चांदीच्या पादुका उपलब्ध करुन देणेत येणार आहे.त्यानुसार मिरा-भाईंदर, ठाणे यांना स्वयंभु श्री सिध्देश्वर महादेव मंदिर, मुंबई यांचे कार्यक्रमाअगोदर दि.२९ व ३०/०५/२०१७ किंवा कार्यक्रमानंतर दि०५ व ०६/०६/२०१७ रोजी श्रींच्या पादुका उपलब्ध करुन देता येईल असे मत आहे.

तरी साईबाबांची पवित्र पादुका मिरा भाईंदर येथे दर्शन सोहळयासाठी नेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२१ यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसाद होणेकामी श्रींच्या पादुका दि.०१ जुन ते ०४ जुन, २०१७ या कालावधीमध्ये स्वयंभु श्री सिध्देश्वर महादेव मंदिर, मुंबई येथे पादुका दर्शन सोहळयासाठी उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळालेली आहे त्यानुसार मा.आमदार श्री.नरेंद्र एल. मेहता, मिरा-भाईंदर, ठाणे यांचे मागणीनुसार त्यांनाही, येणारा सर्व खर्च संबंधीतांनी करावा व पादुका दर्शन सोहळयाच्या ठिकाणी दानपेटी आणि देणगी पुस्तक फक्त संस्थानचे राहील, या अटीवर श्रींच्या चांदीच्या पादुका मिरा- भाईंदर शहरामध्ये दि.०५ जुन व दि.०६ जुन रोजी पादुका दर्शन सोहळयासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त श्री साईबाबांची प्रतिमा असलेले टपाल तिकीट प्रकाशित करणे.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७(२) (ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य चालवील व त्याचा विस्तार करील.

२. अधिनियमाचे कलम १७ (२) (ड) अन्वये, श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल.

३. अधिनियमाचे कलम २१(ड) अन्वये, श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०४/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र. ३५७ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देशभरात व जगभरात श्रींचे कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीकोनातून खास बाब म्हणून श्री साईबाबांचे प्रतिमा असलेले टपाल तिकीट काढणेबाबत केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करणेत यावा."

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्यानुषंगाने संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईलयाकरीता संस्थानमार्फत संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे तयारी करणेचे नियोजन आहे.याचाच एक भाग म्हणून मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा समाधी शतक महोत्सवी वर्षाचे अनुषंगाने देशभरात व जगभरात श्रींचे कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीकोनातून खास बाब म्हणून श्री साईबाबांचे प्रतिमा असलेले टपाल तिकीट काढणेबाबत केंद्र शासनाच्या संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन टपाल तिकीट प्रकाशनासंबंधी शासनाचे संबंधीत विभागास पुर्तता करुन द्यावयाचा टपाल तिकीट प्रकाशन फॉर्म/त्याबाबतचे नियम व अटी आणि मार्गदर्शक तत्वे सोबत जोडले असून सदर फॉर्ममधिल खाली नमूद केलेल्या अ.नं. ०९ व १० मधिल बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

**अ.नं. ०९- Enclosures needed-**

a) Written brief (700-1000 words) :– Annex ‘A’
b) Source of data and authentication from published Govt. Sources:- Annex ‘B’
c) Visuals, Photos, drawings etc. :- Annex ‘C’
d) Soft copy of all the above (CD/DVD) :- Annex‘D’

**अ.नं. १०-In the event of the proposal being approved, what will be the requirement from the proponent:-**

(As per Rules for Issue of Commemorative Postage Stamps’ Proponents for the stamps relating to institutions /events /large organizations or proponetns belonging to institutions /organisations/trusts etc. requesting for a stamp on personalities are required to make a mandatory purchase of a minimum number of 1 lakh stamps. In case of global institution with its headquarters outside India, purchase of stamps and requisite philatelic ancillaries worth of 25 Lakhs will be mandatory.)

a) *Stamps -
b) First Day cover (blank)@ 5/- -
c) First Day Cover Cancelled (11+face value of Stamp (s)
d) Brochure@ 5/- -
e) **Presentation pack @ 100/- -
f) Blow –up @ 4000/- (30”x 40”) - @ 3000/- (20”x24”)
g) Stamps Album (Deluxe) @ 300/-
TOTAL =

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शतक महोत्सवी वर्षाचे अनुषंगानेएक वैशिष्टयपूर्ण बाब म्हणून तसेच या निमित्ताने देशभरात व जगभरात श्रींचे कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीकोनातून

१) श्री साईबाबांचे प्रतिमा असलेले टपाल तिकीट प्रकाशित करणेसाठी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय घेणे.
२) शासनाच्या नियमाप्रमाणे कमीतकमी १ लाख तिकीटे छपाई करणे आवश्यक असल्याने छपाईसाठी एकूण टपाल तिकीटाची संख्या निश्चित करणे.
३) प्रस्तावात नमूद सर्व बाबींसाठी येणा-या अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता.

तरी सदरचे प्रस्तावावर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**सोबत** १) टपाल तिकीट प्रकाशन फॉर्म.
२) नियम व अटी आणि मार्गदर्शक तत्वे.
३) प्रस्तावनेत अ.नं. १० मध्ये नमूद केलेले नमूने.

**निर्णय क्र.४२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षासाठी निश्चित करण्यात आलेल्या लोगोची प्रतिमा असलेली १० लाख टपाल तिकीटांची छपाई करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू तिकीटे छपाई करणेकामी किती खर्च येईल व एकदा छपाई केल्यानंतर पुन्हा छपाई करता येईल का, याची माहिती संबंधीत विभागाकडून प्राप्त करुन घेण्यात यावी, असे ठरले व त्याबाबत रितसर आवश्यक पुर्तता करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **श्री साईबाबा संस्थान मधील कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन वाढी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान अकुशल कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी, यांचे दि.१५.०२.२०१७, रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले होते. सदर पत्रात त्यांनी त्यात, कामावरुन कमी केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेणे, कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कायम करणे, व कंत्राटी कर्मचा-यांना शासन परिपत्रक व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निकालाप्रमाणे समान कामासाठी समान वेतन देणे. दि.२४.०२.२०१७ रोजी पर्यंत कंत्राटी कर्मचा-यांच्या वरील मागण्या मान्य न झाल्यास नाईलाजास्तव संस्थानचे सर्व २६०२ कंत्राटी कर्मचारी

शनिवार दि.२५.०२.२०१७ रोजी पासून कामबंद आंदोलन करणार असले बाबत कळविलेलेने, अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतनावर २५%, ३०%, ४०% पगार वाढ देणे बाबतचा व येणारे अतिरीक्त खर्चाचा प्रस्ताव दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

**त्यावर दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.१४१ पुढील प्रमाणे-** कर्मचाऱ्यांना कायद्यानुसार कामबंद आंदोलन करता येत नाही.त्यांच्या मागण्या त्यांनी संबंधीत कंत्राटदारास कळवायला हव्या आहेत. यापुर्वी कंत्राटी कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणे, समान काम समान वेतन देणे, त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा देणे या बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले असून त्याचाही पाठपुरावा चालू आहे. संस्थानचा प्रशासनावरील खर्च सुमारे ४५% पर्यंत होत आहे व कंत्राटी कामगारांना सध्या देत असलेल्या वेतनाव्यतिरिक्त प्रती व्यक्ती जवळपास २८% (सेवाकर १५% व पी.एफ.१३.३६%) रक्कम संस्थानला अदा करावी लागत आहे.

सदरहू कंत्राटी कर्मचारी शासनाचे किमान वेतनदरावर सुमारे १५ ते १६ वर्षापासुन कंत्राटदारामार्फत संस्थानमध्ये काम करत आहेत व वयोमर्यादा ओलांडल्यामुळे त्यांनी इतरत्र सेवेची संधी गमावलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता सहानुभूतीच्या दृष्टीने संस्थानमध्ये आजअखेर कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.०१ एप्रिल, २०१७ पासून त्यांच्या प्रती दिन वेतनावर ४०% वाढ देण्यात यावी, तसेच संबंधीत कंत्राटदारामार्फत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचा रु.१० लाख पर्यंतचा अपघात विमा उतरविणेत यावा, असा धोरणात्मक निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

कामगार कायद्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना फक्तकिमान वेतन देणे बंधनकारक आहे. महागाई निर्देशंकानुसार त्यामध्ये वेळोवेळी शासनाकडून जी वाढ मंजूर करणेत येते ती कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येते. किमान वेतन निश्चित करताना शासनाकडून चालू महागाई व इतर अनुषंगिक घटक यांचा विचार करुन किमान वेतन निश्चित केले जाते. त्यामुळे किमान वेतनापेक्षा जास्त वेतनवाढ देणे बंधनकारक नाही. मात्र सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून वरीलप्रमाणे ४०% वेतनवाढ भविष्यात कोणतीही वेतनवाढ न मागण्याच्या अटीवर मंजुर करणेत आली. परंतु सदरहू वेतनवाढ देणेपुर्वी कंत्राटदारामार्फत या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेकडून संस्थान विरोधात यापुढे आंदोलन करणार नाही, असे हमीपत्र लिहून घेण्यात यावे व या कंत्राटी कर्मचाऱ्यांची दरवर्षी गैरहजेरी तपासणेत यावी. यामध्ये आठवडा सुट्टया वगळता, आजारीपण/ सबळ कारणाशिवाय १०% पेक्षा जास्त दिवस गैरहजर असेल, किंवा जे कर्मचारी वारंवार गैरहजर रहात असतील, अशा कंत्राटी कर्मचाऱ्यांना संबंधीत कंत्राटदाराने तात्काळ कामावरुन कमी करावे. या बाबीचा समावेश नवीन कंत्राटदार नेमताना त्यांच्या बरोबरच्या करारनाम्यात करणेत यावा.तसेच कंत्राटदारामार्फत नवीन रुजू झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना रुजू दिनांकाच्या एक वर्षानंतर, त्यांची हजेरी व काम समाधानकारक असेल तरच वेतनवाढ देण्यात यावी. या कंत्राटी कर्मऱ्यांच्या कामाचे सर्वंकष मुल्यमापन दरवर्षी ०१ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान करणेत यावे व त्यांचे तांत्रिकज्ञान, कामाचा दर्जा, गुणवत्ता, उपस्थिती इ. मुद्यांच्या आधारे, अ, ब, क, ड असे वर्गीकरण करुन त्याचा अहवाल ३० एप्रिल पर्यंत संस्थानला सादर करावा. या मुल्यमापन अहवालाच्या आधारे दरवर्षी कोणत्या कर्मचाऱ्यांना वेतनवाढ सुरु ठेवायची याचा निर्णय संस्थानमार्फत घेतला जाईल. यासाठी संबंधीत कंत्राटदाराने त्रयस्थ यंत्रणेची नेमणूक करावी व आवश्यकतेनुसार विभागप्रमुख/ प्रशासकीय अधिकारी यांची मदत घ्यावी.मनुष्यबळ व्यवस्थापन अहवालानुसार संस्थान विभागांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त मनुष्यबळ असल्याचे निदर्शनास आले आहे. याकरीता यापुढे अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येऊ नये. तसेच, संस्थानमध्ये कार्यरत असलेले कायम कर्मचारी व कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेले कुशल/ अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनावरील होणाऱ्या खर्चाबाबतचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना अवलोकनार्थ पाठविणेत यावा बाबत निर्णय झालेला असल्याने, इकडिल जा.नं.एसएसएस/ वशी७ए/ ४५५५/ २०१७ दि.२९.०३.२०१७ अन्वये संबंधित कंत्राटी कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, पुणे व मे. मॉडर्न व्ही आर सिक्युरीटी फोर्स,पुणे यांना आपले एजन्सीमार्फत काम करीत असलेल्या अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांच्या संघटनेकडून उपरोक्त निर्णयानुसार येथून पुढे संस्थान विरोधात आंदोलन करणार नाही अशा आशयाचे हमीपत्र त्वरीत लिहून घेवून इकडील कार्यालयास सादर करणेत यावे, तसेच उपरोक्त मा.व्यवस्थापन समिती सभेचे निर्णयानुसार त्वरीत कार्यवाही करावी अन्यथा करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग केले बाबत आपणावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल बाबत कळविणेत आलेले होते.

तथापि संबंधित दोन्ही ठेकेदार यांनी कंत्राटी कर्मचारी यांचे संघटनेकडून येथून पुढे संस्थान विरोधात आंदोलन करणार नाही अशा आशायाचे हमीपत्र इकडील कार्यालयास सादर केलेले नसल्याने, कंत्राटी कर्मचा-यांना दि०१.०४.२०१७ पासून वेतनवाढ देता आली नाही.

तरी, कंत्राटी कर्मचारी संघटनेकडून वरील आशयाचे हमीपत्र लिहून घेणे कायदेशिर /योग्य ठरेल काय ? तसेच सदर हमीपत्र लिहून घेतल्याने कत्रांटी कर्मचा-यांच्या घटनात्मक हक्काबाबत काही कायदेशिर प्रश्न उपस्थित होतील काय? तसेच संघटनेकडून कशा पध्दतीचे हमीपत्र लिहून घ्यावयाचे याबाबत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.श्री अशोकराव पाटील, अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/वशी७ए/६११/२०१७ दि.०४.०५.२०१७ अन्वये कायदेशीर सल्ला मिळणेबाबत कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार, त्यांनी दि.१७.०५.२०१७ रोजी त्यांचे ओपिनियन इकडिल कार्यालयास सादर केलेले असुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

**Ref.:- Your letter dated 4.5.2017 seeking my opinion regarding undertaking (Hamipatra) from contract labour.**

**Respected Sir / Madam,**

I have gone thorugh the contents of your letter seeking my advice as to whether we can insist an undertaking from contract labour fou not resorting to any Andolan as a condition precedent to give 40% wage rise to them. In this respect,U would like to submit fillowing points for your kind consideration-

**1)**The Contract Labor (Rehulation & Abolition) Act, enacted by the Central Government is duly regulating the service conditions of an employees appointed by the independent contractors. The said enactment also provides for abolition of contract system. As per the provisions of said Act the establishments are required to be registered to be registered under the said Act and concerned independent contractors/agencies are required to hold licences. These two requirements to undertake the work in contract basis are mandatory as per law. According to me,our Sansthan has complid with both these condions.

**2)**When, admittedly the contractor use to supply manpower to our trust meaning thereby there is no employer-employee relationship berween the trust and the concerned contract labourer. The Hon'ble Supreme Court has taken a view consistently that,the Labour court cannot exercise the jurisdiction when relationship between the parties is disputed. It is also clarified by the Hon'ble Supreme Court that, unless there is a direct relationship of employer-employee between the parties, the Court should not entertain such complaints.This view was taken by the Hon'ble Supreme Court while deciding the landmark judgment i.e. cipla Ltd. somewhere in the year 2001 and since then the said view is consistently followed in galaxy of several judgments pronounced lateron. In this case, Hon'ble Supreme Court has further clarified that, though the employees having disputed relationship did not approach to the Court under MRTU & PULP Act, 1971 still they can raise the industrial dispute under section 2(k) of the Industrial Disputes Act,1947 and can claim regularization / permanency provided they succeed to prove the contract berween trust and concerned contractor is sham and bogus.

**3)** Our trust is paying them minimum wagas as per prevailing rate notified by Govt.of Maharashtra in our zone and now the trust has resolved to give 40% wags rise to them. It is pertinent to note that,the minimum rates of wages are fixed by the Govt.of Maharashtra and special allowances are revised at the regular interval of six months. The primary responsibility to pay the minimum wages lies upon only on respective contractors and in case the concerned contractors commits a default then it is required to be compensated by the principal employer. Therefore, the establishments are supposed to take

care that the minimum wages are paid to the employees of the independent contractor. On and above the minimum wages,it is always a choice of the concerned contractor to give wags rise to his employees and law does not prohibit for the same. But the important fact is that, the trust cannot directly give wage rise to the employees recruited by the independent contractor, otherwise it would establish a fact of direct control and supervision of the trust on the employees of independent contractor and in future they may raise the industrial dispute for claiming absorption / permanency. In my opinion, whatever increase in wages is dicided by the trust it should be directly with the concerned contractors though it is for the welfare of workmen of the concern contractors.

**4)** As regards equal wages for equal work the Hon'ble Supreme Court has recently pronounced a landmark judgment i.e. State of Punjab v/s Jagjitsing reported in 2016 III CLR page no.1011. However, in the said judgment the supreme Court has categotically made an observation that, equal pay must depend upon nature of wark done and not on mere volume of work. It is further laid down that in order to claim parity in wages, two pasts should of equal sensitivity and qualitatively similar. It is also laid down by the Hon'ble Supreme Court that, " there should be total ideatity between post held and post claimed" In short, there are various parameters according to me are laid down by the Hon'ble Supreme Court. However, if the identity of nature of work performed by the contract labour is at par with the work performed by our regular permanent employees in the same cadre and it is equal in all respect then possibility of raising the dispute for claiming wages at par with permanent employees in the same cadre be ruled out.

**5)** The trust is intending to seek an undertaking from the concerned employees stating that,they should not resort to demonstration / dharne andolan etc.and they will not break the industrial peace. In this context again I would like to reirerate my earlier view that, asking for such undertaking again would indicate our control and supervision because it is the important test to adjudicate the disputed relationship of employer-employee. Even otherwise peaceful demonstration is always a constitutionl right of a workman in general and asking such undertaking directly from the concernrd contract labour is not advisable. However, concerned contractor being the employer of those employees may obtain such type of undertaking. Other factors such as absenteeism/ huge absenteeism/ indiscipline by the employees of the contractor is always a matter of serious concern and in such situation our trust is supposed to put restrictions on the concerned contractors by making agreements with them and stipulating the conditions to maintain insustrial peace. In short, the appointing as well as terminating authority for the concerned contract labour is the independent contractor, therefore, it is his jurisdiction to take the appropriate decision/ disciplinary action against his employees. Any direct concern with the contract labour may be in the form of seeking undertaking from them, as well as giving annual increments/ wage rise to them may perhaps help them to raise the industrial dispute in future.

**6)**Therefore, in my humble opinion the trust can take an undertaking from the concerned contractors for and on behalf of his labour but the trust should not insist such undertaking from the concern labour.

उपरोक्त, नमुद प्रमाणे ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी त्यांचे ओपिनियन दिलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.०२.२०१७ निर्णय क्र.१४१ नुसार संबंधित ठेकेदारामार्फत कंत्राटी कर्मचा-यांच्या संघटनेने हमीपत्र लिहुन दिलेले नाही. त्यामुळे त्यांना दि.०१.०४.२०१७ पासुन किमान वेतनावर ४०% वेतनवाढ लागु केलेली नाही.

तथापी, आता, अॅड. श्री अशोकराव पाटील, अहमदनगर, यांचा कायदेशीर सल्ला प्राप्त झाला असुन, त्यात त्यांनी संस्थान थेट कंत्राटी कर्मचा-यांकडुन हमीपत्र लिहुन घेऊ शकत नाही, कर्मचा-यांच्या वतीने संबंधित ठेकेदाराकडुन हमीपत्र लिहुन घेता येईल, असे कायदेशीर मत दिलेले आहे.

तरी, संबंधित ठेकेदाराकडुन त्यांच्या कर्मचा-यांच्या वतीने हमीपत्र घेऊन ठेकेदारामार्फत कार्यरत असलेल्या अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२५.०२.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१४१ नुसार दि.०१.०४.२०१७ पासुन कंत्राटी कर्मचा-यांच्या प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी असे मत आहे. तरी, सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमध्ये कार्यरत असणाऱ्या कुशल, अकुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांचा थेट संस्थानशी संबंध येत नाही याकरीता मा.व्यवस्थापन दि.२५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४१ मध्ये ठरलेनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेनी त्यांच्या ठेकेदारास लेखी हमीपत्र द्यावे व त्यानंतर संस्थान कायदेशीर सल्लागार अॅडअशोकराव पाटील, अहमदनगर यांच्या अभिप्रायाप्रमाणे संबंधीत ठेकेदाराकडून कर्मचाऱ्यांच्या वतीने हमीपत्र घेण्यात येऊन, कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि०१ एप्रिल, २०१७ पासुन प्रतिदिन वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात यावी.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **संस्थानचे विविध विभागामध्ये ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने कुशल, अकुशल व तांत्रिक पदे भरती करणेकामी कार्यपध्दती निश्चीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन-२००९ मध्ये शासनाकडून श्री साईबाबा संस्थानचा कर्मचारी आकृतीबंध मंजूर करण्यात आलेला आहे. त्या नंतर व्दारावती, प्रसादालय (नविन), श्री साई आश्रम भक्त निवासस्थान १ व २ या विभागांची निर्मिती ही आकृतीबंधाच्या मंजूरी नंतर झालेली असल्याने, आकृतीबंधात सदर ठिकाणी कर्मचारी मंजूर नसलेने संबधित विभागांचे कामकाजाकरीता आऊटसोर्स पध्दतीने कंत्राटी कर्मचारी नेमण्यात येतात.

श्री साईबाबा संस्थानचे, श्री साई प्रसादालय, श्री साई आश्रम भक्तनिवास, श्री आश्रम नं.१ व २, व्दारावती भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल, प्रसादालय, लाडूनिर्मिती, विक्री व बुंदी वाटप,या विभागांमध्ये हाऊस किपींग,मेटनन्स, लेबर इ. कामे विविध ठेकेदारांमार्फतआऊटसोर्स पध्दतीने चालत आहेत,तसेच,दर्शन रांगेत साई भक्तांना गंध लावणे, दर्शन रांगेत साई भक्तांना पाणी, चहा, बिस्किट व बुंदी प्रसाद वाटप, चप्पल स्टॅड, क्लोक रुम,या सर्व विभागांमध्ये ठेकेदारामार्फत आऊट सोर्स पध्दतीने कुशल, अकुशल, तांत्रीक असे आज अखेर एकुण १५३२ कर्मचारी नेमण्यात आलेले आहेत.

संस्थानच्या ब-याच विभागांमध्ये कर्मचा-यांची कमतरता आहे, विशेषतः श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटल मध्येवॉर्ड बॉय, आया, स्टाफ नर्स, निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ.) व सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांची नेहमीच कमतरता असते, तसेच, माहे ऑक्टोबर २०१७ पासून श्री साई समाधी शताब्दी महोत्सव सुरु होणार असल्याने, मा.व्यवस्थापन समीतीचे निर्णय व धोरणानुसार वेगवेगळी कामे व प्रकल्प सुरु होणे अपेक्षित आहे, त्यामुळे, जादा अकुशल, कुशल व तांत्रिक कर्मचा-यांची गरज भासण्याची शक्यता आहे.

तरी संस्थानचे विविध विभागांमध्ये गरजेनुसार आवश्यक तितके अकुशल, कुशल व तांत्रिक पदे ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने भरती करणेकामी खालील बाबींस प्राधान्य देण्यात येऊन कार्यपध्दती निश्चित करण्यात यावी.

तसेच कुशल व तांत्रीक पदांसाठी पात्र उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेनुसार संबधित ठेकेदाराने लेखी व तोंडी परीक्षा घेऊन १. शैक्षणिक पात्रता २. प्रत्यक्ष कामाचा अनुभव ३. इतर शैक्षणिक पात्रता व उच्च गुणवत्ता धारक उमेदवारांस प्रथम प्राधान्य देण्यात येवून पात्र उमेदवारांना ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने भरती करण्याबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागामध्ये ठेकेदारामार्फत आऊटसोर्स पध्दतीने कुशल,अकुशल व तांत्रिक पदे भरती करणेकामी प्रथमत: कामाच्या स्वरुपाची शैक्षणिक, शारिरिक पात्रता, अनुभव या सर्व बाबींचा विचार करुन नियमावली तयार करणेत यावी व ती पुढील सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर ११ महिने कालावधीसाठी ०६ कनिष्ठ अभियंत्यांची नेमणूक करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियम कलम १३(४) अन्वये, समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिकाऱ्यांव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

२) अधिनियम कलम १७(१) (झ) अन्वये, सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

३) अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

(झ) अन्वये विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे.

(ञ) भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

**प्रस्तावना:-** श्री क्षेत्र शिडी, राहाता, जि. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीला सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असून श्री साईबाबा संस्थानमार्फत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथीचे मुख्य दिवशी सुमारे २० लक्ष व महोत्सवाचे इतर दिवशी असे एकुण सुमारे ४० लक्ष भक्त येतील व वर्षभरात इतर उत्सवांना सुमारे २० ते २५ लक्ष साईभक्त साईबाबांचे दर्शनार्थ भेट देतील असा अंदाज आहे. त्यासाठी शिर्डी शहर व परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये मोठया प्रमाणावर सुधारणा करणे व नविन प्रकल्प हाती घेण्यात येत आहेत.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाकरिता संस्थान व इतर शासकिय विभागांच्या विकासकामांच्या प्रस्तावांचा एकत्रित प्रारुप कृती आराखडा केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कृती आराखडा समितीची बैठक दि.३१ मार्च, २०१७ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. त्यावेळी रु.३०२३.१७ कोटीच्या कृती आराखडयास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) नियोजित दर्शन रांग प्रकल्प उभारणे.
२) साईसृष्टी प्लॅनेटेरीअम व व्हॅक्स म्युझियम (Sai Knowledge) प्रकल्प.
३) श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क अंतर्गत लेजर शो आणि सिव्हील वर्क करणे.
४) नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे
५) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प.
६) स्वागत कमानी उभारणे.
७) भक्तनिवास इमारतींच्या खोल्यांचे नुतनीकरण करणे.
८) शिर्डी शहरातील रस्ते विकसीत करणे.
९) श्री समाधी मंदिर परिसरातील फ्लोरींगचे नुतनीकरण करणे.
१०) शताब्दी वर्ष कालावधीमध्ये साईभक्तांचे अतिरिक्त सोयी-सुविधांकरीता वाहनतळे निर्माण करणे, तात्पुरत्या स्वरुपाचे मंडपव्यवस्था, शेडस् उभारणे, अतिरिक्त स्वच्छतागृहे उभारणे, माहिती व सुविधा केंद्र उभारणे इत्यादी कामे करणे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात करावयाच्या विकासकामांची मोजमापे घेणे, अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पांचे आराखडे तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे, कामावर देखरेख करणे, गुणनियंत्रण ठेवणेकरीता चालू असलेल्या बांधकामांचे साहित्य, नमुने संकलित करुन प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणे, बीले तयार करणे इत्यादी कामांसाठी बांधकाम विभागाकडे असलेले मनुष्यबळ (अभियंता) अपुरे पडत असल्याने ०६ कनिष्ठ अभियंत्यांची कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर नेमणूक करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई दि.०७/०८/२००९ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील बांधकाम विभागातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासन मान्य आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र.३ मध्ये "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट-शर्त अ.नं.८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमूद आहे.

संस्थान मंजूर आकृतीबंधामध्ये बांधकाम विभागासाठी कनिष्ठ अभियंत्यांची १३ पदे मंजूर आहेत. एकूण मंजुर १३ पदांपैकी १० स्थायी पदे व ३ कंत्राटी पदे मंजूर आहेत. त्यापैकी सध्या ०४ कनिष्ठ अभियंते स्थायी स्वरुपात कार्यरत असून ०९ कनिष्ठ अभियंत्यांची पदे रिक्त आहेत. सध्या कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर ०६ कनिष्ठ अभियंत्यांची ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करता येईल. सदर कालावधीत त्यांना स्थायी स्वरुपात काम करणा-या कर्मचा-यांच्या सुरुवातीचे एकूण वेतनाइतके मासिक एकत्रित मानधन रु.३१,५५२/- खालील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे देता येईल.

| | |
|---|---|
| बेसिक | रु.९,३००/- |
| ग्रेड पे | रु.४,३००/- |
| डीए १३२% (माहे जुलै २०१७) | रु.१७,९५२/- |
| **एकुण वेतन** | **रु.३१,५५२/-** |

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या विविध विकासकामांसाठी तात्पुरते स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ०६ कनिष्ठ अभियंत्यांची प्रत्येकी रु.२०,०००/- मात्र एकत्रित मानधनावर नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली. मात्र या अभियंत्यांनाकमीत-कमी ०५ वर्षाचा अनुभव असावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री साईबाबांच्या जीवनावर टी.व्हि. मालिका तयार करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१) अधिनियमाचे कलम १७(२)(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य चालवील व त्याचा विस्तार करील.

२) अधिनियमाचे कलम १७(२)(ड) अन्वये, श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजीत करील किंवा हाती घेईल.

३) अधिनियमाचे कलम २१(ड) अन्वये, श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना:-** श्री क्षेत्र शिडी, राहाता, जि. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीला सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असून श्री साईबाबा संस्थानमार्फत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या शताब्दी वर्षात श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत टी.व्ही.सिरीयल विविध चॅनेलवर प्रसारीत झाल्यास शताब्दी महोत्सवासह बाबांच्या लिलांचा व शिकवणूकीचा प्रचार व प्रसार करणे उचित ठरेल.

श्री.नितीन देसाई यांनी मा.कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषीत केलेल्या दि.०२/०२/२०१७ रोजीचे पत्रामध्ये, "श्री साईबाबांच्या जीवनावर करावयाची १०८ भागांची मालिका मराठी, हिंदी तसेच इतर भाषेत करण्याची अंदाजे लागत पुढीलप्रमाणे आहे.

१) मराठी भाषेतील अंदाजे लागत रु.४,००,०००/- ते रु.६,००,०००/- लाख पर भाग

२) हिंदी भाषेतील अंदाजे लागत रु.१४,००,०००/- ते रु.१६,००,०००/- लाख पर भाग

३) इतर भाषेतील डबिंग व सबटायटलिंगची अंदाजे लागत रु१,५०,०००/- ते रु.२,००,०००/- पर भाग

वरील मालिका श्री साईबाबांचा प्रचार व महती संपूर्ण जगभरामध्ये पसरविण्यासाठी उपयोगी ठरेल. या मालिकेचा उद्देश श्रीसाईबाबांची शिक्षा, त्यांचे ज्ञान व विचारसरणी आणि सेवाभाव संपूर्ण विश्वात पोहचविणे आहे.

तसेच मालिका संपूर्ण तयार झाल्यानंतर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारीत होऊन त्यातून अंदाजे लागतीच्या १०% ते २०% जास्त उत्पन्न मिळेल. तसेच त्या मालिकेचे डिव्हीडीतूनही उत्पन्न मिळेल.

आम्ही वर नमूद श्री साईबाबांच्या जीवनावर महत्वाकांक्षी मालिकेची पूर्ण तयारी झाली आहे. यासंबंधी आम्हाला तातडीने कळवावे." असे नमूद केलेले आहे.

श्री साईबाबांच्या जीवनावर टी.व्ही. मालिका तयार करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती विचाराधीन असल्याने याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१ खालीलप्रमाणे झालेला आहे.

*"नामांकित कला, नेपथ्यकार श्री.नितीन देसाई यांनी बाबांच्या जीवनावर आधारित साईसेवा नामक मालिका तयार केलेली आहे. त्यांचेशी संपर्क साधून या मालिकेला श्री साईबाबा संस्थानचे नांव लावता येईल का, याचाही प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा."*

**प्रस्ताव:-** सन २०१८ मध्ये श्री साईबाबांच्या समाधीस १०० वर्ष पूर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत टी.व्ही. सिरीयल विविध चॅनेलवर प्रसारीत झाल्यास शताब्दी महोत्सवासह बाबांच्या लिलांचा, शिकवणूकीचा प्रचार व प्रसार होईल.

श्री.नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन प्रा.लि., मुंबई यांनी श्रीसाईबाबांच्या जीवनावर १०८ भागांची मालिका मराठी, हिंदी, तसेच इतर भाषेत करावयाची ठरल्यास त्यासाठी मराठी भाषेसाठी अंदाजित रक्कम रू.५ कोटी ४० लाख मात्र, हिंदी भाषेसाठी रक्कम रू.१६ कोटी २० लाख व इतर प्रत्येक भाषेतील डबिंग व सबटायटलींगसाठी रक्कम रू.२ कोटी १६ लाख खर्च लागणार आहे असे कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१ नुसार श्री.नितीन देसाई यांनी तयार केलेल्या मालिकेला श्री साईबाबा संस्थानचे नांव द्यावयाचे झाल्यास, मालिका निर्मितीचा खर्च मोठा आहे. सदरहू खर्च ते स्वतः करणार आहेत किंवा कसे याबाबत त्यांनी स्पष्ट असे कळविलेले नाही करीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाप्रमाणे सदरहू मालिकेस संस्थानचे नाव लावणेबाबत म्हणजेच संस्थान मार्फत प्रसारीत करणे अथवा मालिकेचे सर्व हक्क संस्थानकडे असावेत याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा व धोरणात्मक निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर टी. व्हि. मालिका तयार करणेसाठी भरपुर साईभक्त निर्माते, दिग्दर्शक उत्सुक आहेत, त्यांना संस्थानचे संकेस्थळावर व वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे आवाहन करणेत यावे. या मालिकांना साईबाबा संस्थानचे नाव देणेस परवानगी देण्यात यावी व तसा संबंधीतांबरोबर करारनामा करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं. ८०व ८५ मधिल साईप्रसादालय इमारत बांधकाम नियमानुकूल करणेसाठी तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन प्रस्ताव दाखल करणेविषयी तहसिलदार, राहाता यांचे विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** उपरोक्त विषयासंदर्भात खालील तरतूदी अधिनियमातील कलम २१ मध्ये नमूद आहेत.

*"विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वारण्यात अथवा खर्च करण्यात येईलः..*

*छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा कोणत्याही प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान.*

*ज) त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये विश्वस्त व्यवस्थेकडून देय्य असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान."*

**प्रस्तावना:-** वरील विषयाबाबत मा. तहसिलदार, राहाता यांचेकडून खालिल विनंतीपत्र प्राप्तझालेली असून ती सोबत अवलोकनार्थ जोडली आहेत.

| अ.नं. | संदर्भ क्रमांक | विषय | तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/८३५/२०१६ दि.१५/१०/२०१६ (आवक क्र.१३४७८, दि.१९/१०/२०१६) | विना परवाना/ बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांच्या मालकीचे बांधकामे नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती |
| ०२ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/तडजोड/६५/२०१६ दि.१५/११/२०१६ (आवक क्र.१५६७१, दि.१५/११/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | कायदेशिर तरतुदींच्या अनुशंगाने स्टाप कॉर्टर व साई प्रसादालय या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती. |
| ०३ | राहाता तहसिल कार्यालय यांचे क्र.कावि.जमिन/तडजोड /६५/२०१६ दि.२१/१२/२०१६ (आवक क्र.१८४९८, दि.२१/१२/२०१६) | विना परवाना बांधकाम / बांधकाम आराखडया व्यतिरिक्त करण्यात आलेली बांधकामे नियमानुकूल करणेबाबत. | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे गट नं. ८० व ८५ मधिल बांधकामाचे मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- आहे. सदर मुल्यांकनाच्या १०% इतकी रक्कम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणे आवश्यक असून त्याकरीता रक्कम रु.१,२१,१३,३००/- शासकीय खजान्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल होणेस विनंती. |

वर नमूद पत्रांद्वारे तहसिलदार, राहाता यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २००४ ( सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३) अन्वये मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता येथिल संस्थान मालकीच्या गट नं. १६९ मधिल स्टाफ क्वार्टर्स तसेच गट नं.८० व ८५ मधिल साई प्रसादालय या इमारतींच्या बांधकामासाठी ग्रामपंचायत निमगांव यांनी दिलेली परवानगी वैध नाही असे कळविले आहे.

सदरहू पत्रातील अंतिम परिच्छेदात खालीलप्रमाणे विनंती नमूद आहे.

**वरील अ. नं. २ चे पत्रः-**

*"प्रादेशिक योजनेचा मसूदा तयार किंवा मान्य करण्यात आलेल्या क्षेत्रांमध्ये नियोजन प्राधिका-याच्या परवानगीशिवाय कोणतेही विकासाचे काम अनुज्ञेय नाही. अहमदनगर जिल्हयासाठी दि. १४/०७/२००५ रोजी प्रादेशिक विकास योजना लागू झालेली आहे. सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये नियोजन प्राधिकारी हे मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर असल्याने नियमानुसार बांधकाम परवानगी घेणे आवश्यक होते.*

*याबाबत मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग यांचेकडील १०/११/१९९७ रोजीच्या आदेशातील मार्गदर्शक सुचनांनुसार बांधकाम नियमानुकूल करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांचेकडे प्रस्ताव दाखल करणे आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम ५२ ,५३ अन्वये आवश्यक परवानगीशिवाय करण्यात आलेले बांधकाम शास्तिस पात्र असल्याने कायदेशीर तरतुदींच्या अनुशंगाने स्टाफ कॉर्टर व साई प्रसादालय या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करणेकामीचे प्रस्ताव तात्काळ दाखल करणेबाबत संबंधितांना आदेश होणेस विनंती आहे."*

**वरील अ. नं. ३ चे पत्रः-**

*" मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता येथिल गट नं. ८० व ८५ मधिल आपल्या मालकीच्या बांधकामांची तपासणी करुन मुल्यांकन कळविणेकामी संदर्भ क्र. ३ अन्वये उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग राहाता यांना कळविले असता त्यांचेकडील संदर्भ क्र.४ चा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाप्रमाणे गट नं. ८० व ८५ मधिल बांधकामाचे मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- आहे. सदर मुल्यांकनाच्या १०% इतकी रक्कम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन इमारतींचे बांधकाम नियमानुकूल करणे आवश्यक आहे. तरी रक्कम रु.१,२१,१३,३००/- शासकीय खजान्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल होणेस विनंती.*

*सार्वजनिक बांधकाम विभागाकडील संदर्भ क्र.४ चा मुल्यांकन अहवाल तसेच मा. सहाय्यक संचालक, नगररचना अहमदनगर यांचेकडील संदर्भ क्र.५ अन्वयेचा अहवाल सोबत जोडून सादर करत आहे."*

तहसिलदार, राहाता यांचे वर नमूद विनंतीचे अनुषंगाने सादर करणेत येते की, श्री साई प्रसादालय इमारतीचा सर्व साधारण तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| इमारतीचे नांवः- | श्री साई प्रसादालय. |
| इमारतीचे स्थळः- | मौजे निमगांव – को-हाळे, ता. राहाता गट नं.८०/१ पै. गट नं.८५ पै. |
| भूखंडाचे क्षेत्रः- | २ हे. ८५ आर. |
| बांधकाम क्षेत्रः- | तळमजला - ११६७९.८४ चौ. मी. |
| पहिला मजला – | ५०४२.७२ चौ. मी. |
| एकूण – | १६७२२.५६ चौ. मी. |
| बांधकाम पूर्णत्वाचा दिनांकः- | १५/०८/२००७. |

सदर इमारतीचे बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-बांधकाम/ १३३८४/ २००५, दि.१८/११/२००५ चे पत्राद्वारे मा. सरपंच, ग्रामपंचायत, मौजे निमगांव- को-हाळे यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन, ग्रामसेवक व सरपंच, ग्रामपंचायत, निमगांव- को-हाळे यांचेकडील जा.नं.४७/०६, दि.२४/०२/२००६ अन्वये बांधकाम परवाना प्राप्त झालेला आहे.

सदर इमारतीचे वापर परवान्यासाठी संस्थानकडील जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/१३९५२/२००७, दि.३०/०८/२००७ चे पत्राद्वारे मा.सरपंच/ ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, निमगांव – को-हाळे यांचेकडे अर्ज करणेत आला होता. त्यास अनुसरुन ग्रामपंचायत कार्यालय, निमगांव – को-हाळे यांचेकडील जा.नं.२१/०७, दि.०५/०९/२००७ अन्वये वापर परवाना प्राप्त झाला आहे.

सदरहू इमारत बांधकामासाठी संस्थानने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, नाशिक यांनी रक्कम रु.१४,७०,१३,८५२/- मात्र इतक्या रकमेकरीता तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

श्री साई प्रसादालयात या इमारतीचा उदघाटन समारंभ मा. श्रीमती प्रतिभा देवीसिंग पाटील, महामहिम राष्ट्रपती, भारतीय गणराज्य यांचे शुभहस्ते मंगळवार दि.२७ नोव्हेंबर, २००७ रोजी संपन्न झालेला आहे.

**प्रस्तावः-** तरी मौजे निमगांव – को-हाळे गट नं.८० व ८५ मधिल संस्थानचे श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकामाकरीता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, राहाता यांनी केलेले मुल्यांकन रु.१२,११,३३,०००/- च्या १०% रक्कम रु.१,२१,१३,३००/- मात्र तडजोड शुल्क ( कंम्पाऊंडीग चार्जेस) शासकीय खजिन्यात भरणा करुन नियमानुकूल प्रस्ताव दाखल करणेबाबत तहसिलदार, राहाता यांनी विनंती केलेली आहे.

सदरहू प्रस्तावार श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त गठीत कृती आराखडा समीतीची मा. मुख्यमंत्री, देवेंद्रजी फडणवीस यांचे अध्यक्षतेखाली द्वीतीय बैठक दि.३१/०३/२०१७ रोजी झाली. सदरहू बैठकीचे इतिवृत्तानुसार *"मौजे निमगांव को-हाळे, ता. राहाता येथील संस्थान मालकीच्या गट नं.८०, ८५, १७२ आणि १६९ मधील श्री साई प्रसादालय, साई आश्रम ०२, स्टाफ क्वार्टर या इमारतीचे बांधकाम नियमानुकूल करण्यासाठी संस्थानने प्रथमतः तडजोड शुल्क भरावे. तदनंतर तडजोड शुल्क परत मिळविण्याकरीता संस्थानने विभागीय आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर करावा व त्या प्रस्तावावर यथोचित कार्यवाही करण्यात यावी,"* असा निर्णय झाला आहे.

तरी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव-को-हाळे, ता.राहाता येथिल गट नं. ८०व ८५ मधिल साईप्रसादालय इमारत बांधकाम नियमानुकूल करणेसाठीच्या तडजोड शुल्काची फेरतपासणी करणेबाबत महसुल विभागस कळविणेत यावे व दरम्यानचे कालावधीमध्ये समिति सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी सदरहू शुल्क कमी करणेसाठी शासन स्तरावर प्रयत्न करावेत. यानंतर येणारे अंतीम तडजोड शुल्क (कंपाऊंडींग चार्जेस) भरुन बांधकाम नियमीत करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे तर्फे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि.०८ जुलै, २०१७ ते सोमवार दि.१० जुलै, २०१७ अखेर श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसरात, ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त करावयाची व्यवस्था:- (कालावधी दि.०८/०७/२०१७ ते दि.१०/०७/२०१७ अखेर ०३ दिवस)

**०१. ताडपत्रीचे छत असलेले कापडी (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | श्रींचे चावडीसमोरील जागेत १८' उंचीचा | ५०X३० | १५००.०० |
| २ | शनिमंदिर, महादेव मंदिर व गणेश मंदिरासमोर | ६०X४० | २४००.०० |
| ३ | द्वारकामाई ते रथ पालखी गेट पर्यंत | १६०X१७ | २७२०.०० |
| ४ | समाधी मंदिर गेट नं.३ ते मारुती मंदिरापर्यंत १५' उंचीचा | ५०X२० | १०००.०० |
| ५ | श्री मारुती मंदिर ते शामसुंदर हॉलपर्यंत दक्षिणोत्तर १५' उंचीचा | ६०X२५ | १५००.०० |
| ६ | गेट नं.४ करीता बाहेरील बाजूस | ५५X२५ | १३७५.०० |
| ७ | पोलीस स्टेशन जवळ पालखी स्वागता करीता कनात व बिछायतीसह | १५X१५ | २२५.०० |
| ८ | पालखी स्वागता करीता नगरपंचायत समोर कनात व बिछायतीसह. | १५X१५ | २२५.०० |
| ९ | पालखी स्वागताकरीता तसेच माहीती केंद्रासाठी स्वागत कक्ष येथे माहीती केंद्रासाठी कनात व बिछायतीसह. | १५X१५ | २२५.०० |
| १० | साई धर्मशाळा येथे पालखी ठेवण्यासाठी. | ९०X६०<br>९०X४० | ५४००.००<br>३६००.०० |
| **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ-** | | | २०,१७० |
| **अंदाजे रु.२.३५ प्रति चौ. फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च (१ साठी) रुपये -** | | | **१,४२,१९८.५०** |

**०२) ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप ( एम.एस. पाईप व कैच्याचे स्ट्रक्चर असलेले)**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिर उत्तर बाजूस, चावडी गेट ते नगरद्वार गेटपर्यंत १८' उंचीचा. | २८४ X १९ | ५३९६.०० |
| २ | साई कॉम्प्लेक्स समोर पिंपळवाडी रस्त्यांवर दर्शन रांगेसाठी. | ३००X१८ | ५४००.०० |
| | | **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ-** | **१०,७९६.००** |
| **अंदाजे रु.३.२० प्रति चौ. फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षित खर्च- (२ साठी) रुपये -** | | | **१,०३,६४१.६०** |

**०३) पालखीतील पदयात्री साईभक्तांचे निवासासाठी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, कनात व बिछायतीसह (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले)**

**कालावधी:** दि.०८/०७/२०१७ ते दि.१०/०७/२०१७ अखेर ०३ दिवस)

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण व तपशिल | मंडपाची साईज | चौरस फुट |
|---|---|---|---|
| १ | शिंगवे नाईक येथे | ४०X६० | २४००.०० |
| २ | गुहा, ता. राहुरी येथे | ४०X६० | २४००.०० |
| ३ | निर्मळपिंप्री, ता. राहाता येथे | ४०X६० | २४००.०० |
| **मंडपाचे एकूण क्षेत्रफळ -** | | | **७२००.००** |
| **अंदाजे रु.५.५० प्रति चौ. फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च (०३ साठी ) रुपये** | | | **१,१८,८००.००** |

०४) **बॅरिकेडींग: कालावधी**: दि.०८/०७/२०१७ ते दि.१०/०७/२०१७ अखेर ०३ दिवस.

| अ.नं. | कामाचे ठिकाण व तपशिल | परिमाण /एकक | र. फुट |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साई प्रसादालय येथे साईभक्तांचे रेलींग व्यवस्थेसाठी व इतर आवश्यक ठिकाणी लोखंडी पाईप व गोल्टेचे ४' उंचीचे बॅरेकेडींग करणे. | -- | ९०० रनिंग फुट |
| **एकूण र. फुट -** | | | **९००.०० र. फुट** |
| **अंदाजे रु.१६.५० प्रति र. फुट प्रमाणे येणारा एकूण अंदाजे अपेक्षीत खर्च (०४ साठी ) रुपये -** | | | ४४,५५०.०० |
| श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ साठी करावयाच्या मंडप व्यवस्थेकरीता अपेक्षीत एकूण अंदाजे खर्च रु. | | | **४,०९,१९०.००** |

वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त श्री साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.४,०९,१९०/ - मात्र अंदाजे खर्च अपेक्षीत आहे. जुने प्रसादालय येथे नवीन दर्शन रांग इमारतीचे बांधकाम प्रस्तावीत असल्याने, या भागातील जुन्या इमारती पाडावयाच्या असल्याने व मंदिर परिसर पूर्व बाजूकडील मोकळया जागेत टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणेकामी कार्यवाही सुरु असल्याने सदरहू ठिकाणी करणेत येणारी मंडप व्यवस्थेचा तसेच मंदिर परिसरात दैनंदिन कार्यक्रमासाठी कायम स्वरुपी स्टेज तयार करणेत आले असल्याने, स्टेजच्या खर्चाचा समावेश प्रस्तावात करणेत आलेला नाही.

तरी वरीलप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणारे एकूण रक्कम रु.४,०९,१९०/- मात्रचे खर्चास तसेच याकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई - निविदा मागविणेस मान्यता मिळणे विनंती.

**निर्णय क्र.४२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१७ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच मंडपाची वारंवार आवश्यकता भासते याकरीता संस्थानला आवश्यक असेल त्या-त्या ठिकाणी फोल्डींग मंडप खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **दि.न्यू.इंडिया ॲश्युरन्स कं.लि.श्रीरामपूर यांना संस्थासनचे १०६ वाहनांचा वार्षीक विमा नुतनीकरण करणे I.R.D.A. च्या नियमानुसार थर्ड पार्टी इन्शुरन्स मध्ये वाढ झाल्याने वाढीव रक्कीम अदा होणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-१७ (२)(झ) -** मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील असे नमुद आहे.

**प्रस्तावना:-** दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीत सभेतील निर्णयानुसार दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर एक वर्ष कालावधी करीता वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा विमा नुतनीकरण करणे कामी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडूनच मागविण्यात आलेली दरपत्रके दि.०६.०३.२०१७ रोजी मा.उपसमितीचे सभेत समक्ष उघडण्यात आलेली होती. यावेळी दरपत्रकांत देवु केलेला दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | विमा कंपनीचे नांव | दरपत्रकातील देवु केलेले मुळ दर |
|---|---|---|
| १. | नेशनल इन्श्युरन्स कं.लि. कोपरगांव | १७,७५,०००/- |
| २. | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. तत्पर सेवा कार्यालय शिर्डी | १८,१९,३०४/- |

| | | |
|---|---|---|
| ३. | दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर | **१६,४५,३६६/-** |
| ४. | दि.ओरिएन्टल इंश्योरेंस कंपनी लि.कोपरगांव | १६,५५,२४३/- |
| ५. | युनाइटेड इंडिया इन्शुरेन्स कंपनी लि. शाखा कार्यालय राहुरी | १६,८७,०१९/- |

दि.०६.०३.२०१७ रोजी मा.उपसमितीचे सभेत " वाहन विभागाकडील १०६ वाहनांचा वार्षीक विमा नुतनीकरण करणे कामी दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर यांचे रु.१६,४५,३६६/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले होते." दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर यांचे प्रतिनीधी बरोबर उप समितीने दर कमी करणे बाबत चर्चा केली असता, त्यांना दर कमी करण्याचे अधिकार त्यांचे स्तरावर नाहीत, मी कंपनीशी बोलुन कळवितो, असे उपसमितीसमोर तोंडी सांगीतले.

यावर सविस्तर चर्चा होऊन वाहन विभागाकडील १०६ वाहनांच्या वार्षीक विम्याचे नुतनीकरण करणे कामी दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर यांचेकडुन लेखी स्वरुपात अंतीम दर द्यावेत व त्यानुसार कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

दि.०६.०३.२०१७ रोजीची उपसमितीची शिफारस दि.२७.०३.२०१७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्य करण्यात आलेली आहे.

यानुसार दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर यांनी दि.२४.०३.२०१७ रोजी दिलेले व आवक नं. २५५१५ दि.२४.०३.२०१७ अन्वये दि.२५.०३.२०१७ रोजी वाहन विभागाकडील प्राप्त झालेले पत्रात त्यांनी " वाहन विमा नुतनीकरण करणे या विषयानुरुप आपले पत्रानुसार व आपले कडील पॉलिसी कॉफी नुसार दरपत्रक रु.१६,२५,०००/- इतके कमीत कमी करुन देत आहे.आय.आर.डी.ए.च्या नियमानुसार दि.०१.०४.२०१७ पासुन थर्ड पार्टी विमा वाढल्यास वाढीव रक्कम दयावी लागेल. " असे नमुद केले आहे.

त्यानुसार वाहन विभागाकडील दि.२७.०३.२०१७ रोजीची टिपणी नुसार संस्थानचे १०६ वाहनांचा दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ अखेर कालावधीत विमा नुतनीकरण करणे कामी जा.नं.एसएसएस/वशी वाहन/ ६५०८/२०१७ दि.२९/०३/२०१७ अन्वये स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी शाखेचा चेक नं.६१५२७९ व ६१५२८० दि.२८/०३/२०१७ व्दारे अनुक्रमे रक्कम रु.८,००,०००/-व रु. ८,२५,०००/- असे एकुण रक्कम रु.१६,२५,०००/- मात्र देण्यात आली होती.

त्यानुसार वाहन विभागाकडील दि.२७.०३.२०१७ रोजीची टिपणी नुसार संस्थानचे १०६ वाहनांचा दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ अखेर कालावधीत विमा नुतनीकरण करणे कामी जा.नं.एसएसएस/वशी वाहन/ ६५०८/२०१७ दि.२९/०३/२०१७ अन्वये स्टेट बॅंक ऑफ इंडिया, शिर्डी शाखेचा चेक नं.६१५२७९ व ६१५२८० दि.२८/०३/२०१७ व्दारे अनुक्रमे रक्कम रु.८,००,०००/-व रु. ८,२५,०००/- असे एकुण रक्कम रु.१६,२५,०००/- मात्र देण्यात आली होती.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स् कंपनी लि.श्रीरामपुर यांनी दिलेल्या मुळ दरपत्रकांत In case of change in service tax & motor vehicle tariff will be applicable accordingly असे नमुद केलेले आहे.

दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स् कंपनी लि.श्रीरामपुर यांचेकडील दि.०६.०४.२०१७ रोजीचे प्राप्त पत्रात आय.आर.डी.ए. च्या Insurance regulatory and development authority of india यांचेकडील IRDA/ NL/ NTFN/MOTP/068/03/2017 DETE 28TH MARCH-2017 चे पत्रानुसार दि.०१.०४.२०१७ पासुन वाहनांचे थर्ड पार्टी इन्शुरन्स रकमेमध्ये वाढ झाल्याने संस्थानच्या १०६ वाहनांचे दि. ०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ या कालावधीतील विमा हप्ता रकमेत रु.४,१५,३०६/- मात्र वाढ झाले बाबत कळविले होते. संस्थान वाहनांचे वाढीव रकमेबाबत वाहन निहाय यादी या सोबत सादर केलेली आहे.

यानंतर त्यांनी दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स् कंपनी लि.श्रीरामपुर यांचेकडील दि.२४.०४.२०१७ रोजीचे पत्रात आय.आर.डी.ए. च्या Insurance regulatory and development authority of india यांचेकडील IRDA/ NL/ NTFN/MOTP/ 089/04/ 2017 DETE 17 TH April -2017 चे पत्रानुसार वाहनाचे थर्ड पार्टी इन्शुरन्स रकमेत पुन्हा कपात झालेने याकामी पुर्वी कळविलेल्या वाढीव रक्कम रु.४,१५,३०६/- ऐवजी आता रु.३,९९,२८२/- मात्र मागणी केलेली आहे.

**मागणीः-** संस्थानचे १०६ वाहनांचा विमा नुतनीकरण कालावधी दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ असलेने दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर यांचे दि.२४.०४.२०१७ रोजीचे सुधारित

पत्रानुसार दि.०१.०४.२०१७ पासुन थर्ड पार्टी इन्शुरन्स रकमेत रु.३,९९,२८२/- इतकी वाढ झाल्याने व आता पुर्वी दिलेली रक्कम रु. १६,२५,०००/- अशी एकुण रक्कम रु.२०,२४,२८२/- इतका सुधारित विमा हप्ता रक्कम लागणार आहे. त्यामुळे आता रु.३,९९,२८२/- मात्र वाढीव विमा हप्ता रक्कम चेक व्दारे अदा करावी लागेल.

तरी दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि.श्रीरामपुर यांना संस्थानचे १०६ वाहनांचे दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ अखेर विमा नुतनीकरण करणे कामी एकुण रक्कम रु.२०,२४,२८२/- मधुन पुर्वी दिलेली रक्कम रु. १६,२५,०००/- वजा जाता शिल्लक रक्कम रु. ३,९९,२८२/- अदा करणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आय.आर.डी.ए.च्या नियमानुसार दि.०१.०४.२०१७ पासुन थर्ड पार्टी विम्याच्या रकमेमध्ये वाढ झालेली असल्यामुळे दि.न्यु.इंडिया अॅश्युरन्स कं.लि., श्रीरामपुर यांना संस्थानचे १०६ वाहनांचे दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०३.२०१८ अखेर विमा नुतनीकरण करणेकामी वाढीव रु.३,९९,२८२/- मात्र रक्कम अदा करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या श्री साईभक्तांसाठी हॅालोग्राफीक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साई महिमा या शिर्षकावर आधारीत कार्यक्रम श्री साईआश्रम भक्त निवासस्थान येथील अॅम्पीथिएटर येथे दाखविणे कामी Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai यांचे प्रस्तावावर निणेय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियम २००४ मधिल कलम क्र.१७- (३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडुन, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देता येणार नाही किंवा गहाण टाकता येणार नाही, विकता येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही.

**प्रास्ताविक:-** उपरोक्त संदर्भिय प्रस्तावात नमुद केलेनुसार, श्रींचे दर्शनासाठी शिर्डीमध्ये दररोज लाखो श्री साईभक्त दर्शनासाठी येत असतात. श्री साईबाबांचे श्रध्दा-सबुरी या शिकवणुकीस अनुसरुन श्री साईबाबांवर अपरंपार श्रध्दा असलेले श्री साईभक्तांना साईचरित्रा मधील काही प्रसंगांचा सजीव अनुभव देण्याचा, तसेच अनुभवांतर्गत भाविकांना एका खास हॅालमध्ये हॅालोग्राफिक तंत्रज्ञानांच्या माध्यमातुन साईमहिमा हा २० मिनिटांचा कार्यक्रम दाखविणेचा तसेच सदर कार्यक्रमात श्री साईभक्तांना आलेले काही अनुभव, श्री साईबाबांच्या दर्शनाचे प्रत्यक्ष अनुभुती, श्री साईबाबा व त्यांचे चमत्कारासंबधीत दृश्य साक्षात घडत आहेत अशा प्रकारचे हॅालोग्राफिक तंत्रज्ञान हे अत्यंत आधुनिक तंत्रज्ञान असुन भारतात अशा स्वरुपात कुठल्याही मंदिर संस्थानासाठी पहिल्यांदाच वापरण्यात जाईल, ज्याव्दारे भाविकांना एक उत्कट आणि अविस्मरणिय अनुभव देण्यात येईल, असे साई महिमा एक सजीव अनुभव या शिर्षकाखाली दिलेल्या Immersity InfoTech Pvt. Ltd., Mumbai यांनी त्यांचे प्रस्तावात नमुद केलेले आहे.

तसेच Immersity InfoTech Pvt.Ltd.,Mumbai या कंपनीचे संचालक श्री.नितीन कुलकर्णी यांनी श्री साईआश्रम भक्तनिवासस्थान या ठिकाणी प्रत्यरक्ष पाहणी केली असता, तेथील मोकळया जागेत उभारण्यारत आलेले Amphitheater च्या जागेत ते BOT या तत्वावर उपरोक्त नमुद केलेल्या तंत्रज्ञानाच्याल आधारे सदर प्रकल्पा राबविण्यास तयार असल्याचे त्यांनी कळविले असून, सदर कामी त्यांनी संस्थानकडुन परवानगी मिळणेबाबत दि.१०/०५/२०१७ रोजीचे पत्राव्दारे मागणी केलेली आहे. त्यानुसार त्यांचे प्राप्त पत्रावरील निर्देशानुसार सदर प्रस्तावव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत.

**सदरहु प्रस्तावाचे अवलोकन करता, खालील मुद्दे विचारात घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे.**

(१) सदर प्रकल्प राबविणेपुर्वी सदर प्रकल्पाशी निगडीत असलेले संस्थानचे संबधीत विभाग **उदा.** विद्युत विभाग, बांधकाम विभाग, विधी विभाग,मेकॅनिकल विभाग, सीसीटीव्ही कंट्रोल सेल, फायर अॅण्ड सेफ्टी, संरक्षण विभाग, पाणी पुरवठा विभाग,मालमत्ता विभाग, लेखाशाखा विभाग, साईआश्रम भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुल इत्यादी विभागांचा लेखी अभिप्राय घेणे अत्यंत गरजेचे व अत्यावश्यक आहे.

(२) सदर प्रकल्प Immersity InfoTech Pvt.Ltd,Mumbai ही कंपनी BOT या तत्वावर राबविणार असल्याचे त्यांचे पत्रात नमुद असून सदर प्रकल्पास प्रथमतः महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभाग,

फायर डिपार्टमेंट, MSEB, व इतर आवश्यक त्या शासकीय विभागांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

(३) सदर प्रकल्प हा Unique Project असल्याचे Immersity InfoTech Pvt.Ltd., Mumbai या कंपनीने नमुद केले असले तरी कायदेशीर रित्या सदर कामी स्पर्धात्मक निविदा मागविणे योग्य राहिल.

(४) संबधीत कंपनी कार्यक्रमाकरीता येणा-या प्रती व्यक्तीस रु.१५०/-+टॅक्स (if applicable) तिकीट दर आकारणार आहे. तसेच कंपनीने We may need a Booking centre at the entrance of Sai Ashram facing the main road to avoid unnecessary congestion inside the complex. So only people with valid tickets will be allowed to enter the complex असे कळविले आहे.

(५) सदर प्रस्तावात कंपनीने नमुद केलेनुसार २० मिनिटाचे कार्यक्रमाकरीता त्यांनी कळविलेली प्रती व्यक्ती रक्कम ही कोणत्या आधारावर निश्चित केली आहे, याचा बोध होत नाही.

(६) श्री साई आश्रम भक्तनिवास येथील Amphitheater ची जागा त्यांनी No Deposit Basis वरती मागीतलेली आहे. परंतु, सदरची जागा ही No Deposit Basis वरती दिल्यास सदर कंपनीवर कुठलीही बांधीलकी राहणार नाही.

(७) श्री साई आश्रम भक्तनिवास येथील Amphitheater जागेची सध्याची किंमत व सदर कंपनीने संदर्भ क्र.२ चे ई-मेलमध्ये We are ready to take up the Amphitheatre on an Yearly rent of Rs.1,80,000/- per annum नमुद केलेनुसार सदर कामी मालमत्ता, लेखाशाखा व विधी विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

(८) तसेच सदर कंपनीने Amphitheater to be made available on conduction basis for 30 years, असे नमुद केले आहे. सदर कालावधी बाबत विधी विभाग, मालमत्ता विभाग, लेखाशाखा विभाग यांचा अभिप्राय घेणे तसेच महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे परवानगी घेणे आवश्यक आहे .

(९) संबधीत कंपनीने सदर प्रकल्पासाठी संस्थानने एकुण ५०० किलोवॅट विद्युत पुरवठा On Metered Basis पुरविणे बाबत नमुद केले असून , सदर प्रकल्पास कंपनी कुठलेही Deposit देणार नसल्याने सदरकामी तसेच मागणी केलेल्या ५०० किलोवॅट विद्युत पुरवठयाबाबत विद्युत विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे .

(१०) सदर प्रकल्पास दैनंदिन वापराकरीता किती पाणी लागेल, याबाबत कंपनीस विचारणा केली असता कंपनीने We will be reverting back to you by a separate communication. Can you enlighten us with the existing water connection facility available असे संदर्भ क्रमांक २ चे ई-मेलव्दारे कळविले असल्याने सदर कामी पाणीपुरवठा विभागाचा अभिप्राय घेणे अवश्यक आहे.

(११) सदर कंपनीस सदर ठिकाणी होणा-या दैनंदिन कार्यक्रमाचे वेळापत्रकाबाबत विचारणा केली असता, त्यांनी The same will be reverted back via a separate communication असे संदर्भ क्रमांक २ चे ई-मेलव्दारे कळविले आहे. त्यामुळे दिवसभरात कंपनीस मिळणारे एकुण उत्पन्न व त्या मोबदल्यात संस्थानला देय होणारी रकमेबाबत बोध होत नसल्याने सदर कामी लेखाशाखा विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

(१२) सदर कार्यक्रमाकरीता येणारे प्रेक्षक व श्री साईआश्रम भक्तनिवास येथील वास्तव्यास येणा-या श्री साईभक्तांची सुरक्षा बाबतचे नियोजनाचा प्रस्तावात बोध होत नाही. याबाबत संरक्षण विभागाचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

(१३) संस्थानच्या साईसृष्टी प्रकल्पातही अशा प्रकारचा प्रकल्प आहे किंवा नाही याबाबत बांधकाम विभागाकडुन लिखीत अभिप्राय घेऊन तदनंतर Immersity InfoTech Pvt.,Ltd.,Mumbai यांचे प्राप्त प्रस्तावावर तसेच उपरोक्त नमुद सर्व संबधीत विभागांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाही करणे उचीत ठरेल, असे वाटते.

**मागणी:-** उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या सविस्तर मुद्देनिहाय विवेचनानुसार Immersity InfoTech Pvt. Ltd., Mumbai या कंपनीने सदरहु प्रकल्प BOT तत्वावर हॅालोग्राफिक तंत्रज्ञानाच्या आधारावर राबविणेकामी श्री साईआश्रम भक्तनिवास येथील Amphitheater च्या जागेवर सुरु करणेकामी परवानगी मागीतली आहे. तरी, Immersity InfoTech Pvt.,Ltd.,Mumbai यांचे प्राप्त प्रस्तावावर तसेच उपरोक्त नमुद मुद्यांवर निर्णय होऊन

सदरकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यता घेणेकामी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यता घेणेकामी सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थामन अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश,तांत्रिक, कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान:-** शासन निर्देश/अधिनियम, तांत्रिक, आर्थिक, कायदेशीर व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय:-** Immersity InfoTech Pvt. Ltd., Mumbai या कंपनीने सदरहु प्रकल्प BOT तत्वावर हॉलोग्राफिक तंत्रज्ञानाच्या आधारावर राबविणेकामी प्रकल्प श्री साईआश्रम भक्तनिवास येथील Amphitheater च्या जागेवर सुरु करणेकामी त्यांनी परवानगी मागीतली आहे. त्यानुसार उपरोक्त प्रस्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेल्या मुद्यांवर निर्णय होऊन सदरकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यता घेणेकामी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांसाठी BOT तत्वावर हॉलोग्राफीक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून साई महिमा या शिर्षकावर आधारीत कार्यक्रम दाखविणेकामी Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai यांना साईआश्रम भक्तनिवास येथील Amphitheater ची जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. परंतु Amphitheater व तेथील मोकळया जागेचा याकामासाठी वापर करता येईल का याची त्यांना विचारणा करण्यात यावी व तदनंतर याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी व शासन मान्यता मिळाल्यानंतर Immersity Info Tech Pvt.Ltd., Mumbai यांचेबरोबर रितसर करारनामा करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच याठिकाणी साईभक्तांकडून आकारावयाचे शुल्क अत्यल्प ठेवण्यात यावे, जेणेकरुन जास्ती-जास्त साईभक्त या कार्यक्रमाचा लाभ घेऊ शकतील, अशा सुचना केल्या.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलीफोन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **दुरदर्शन वाहिनीवरुन श्री साईबाबांची काकड आरती व संस्थानचे इतर कार्यक्रमांचे प्रसारण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.** : नाही.

**प्रास्ताविक:** श्री साईबाबांचे जिवनकार्य, शिकवणूक तसेच संस्थानमार्फत राबविणेत येत असलेल्या विविध सामाजपयोगी उपक्रम व समाधी शताब्दी वर्षात साजरे होणाऱ्या धार्मिक तसेच सांस्कृतीक कार्यक्रम दुरदर्शन वाहिनीवर प्रसारीत करणे संदर्भात दि. 11/05/2017 रोजी दुरदर्शन केंद्र, वरळी मुंबई येथे बैठक आयोजीत करण्यात आली होती.

सदर बैठकीस मा. अध्यक्ष सो., श्री शिवाजी फुलसुंदर, उपमहासंचालक कार्यक्रम, श्री जयु भाटकर, सहाय्यक संचालक कार्यक्रम, श्री राजेश बारापत्रे उपसंचालक (इंजि) व दुरदर्शनचे संबधीत अधिकारी तसेच प्र. माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख व सीसीटिव्ही विभागप्रमुख हे उपस्थित होते.

बैठकीचे सुरुवातीस मा. अध्यक्ष सो., यांनी साईबाबा संस्थानमार्फत राबविण्यात येत असलेल्या तसेच प्रस्तावित महत्वकांक्षी सामाजपयोगी उपक्रमांची माहिती दिली तसेच येऊ घातलेल्या समाधी शताब्दी वर्षातील नियोजीत कार्यक्रमांविषयी माहिती दिली. सदर कार्यक्रमांचे प्रसारण दुरदर्शन वाहिनीवरुन जास्तीत जास्त साईभक्तांपर्यत पोहचविण्यात यावेत असे यावेळी अध्यक्ष सो. यांनी नमुद केले.

बैठकीचे दरम्यान मा. अध्यक्ष सो., यांनी श्री साईबाबांचे थेट दर्शन सुविधा टाटा स्काय व टि व्ही -9 या चॅनेल प्रमाणे दुरदर्शन वाहिनीवरुन प्रसारीत करण्यासंबधी सुचित केले होते . सदरकामी टाटा स्काय व टिव्ही -9 संस्थानला देत असलेले देणगी रकमेबाबत मा. अध्यक्ष सो., यांनी संबधीतांना अवगत केलेले आहे

तसेच विविध कार्यक्रमांचे रेकॉर्डीग करणेकामी स्टुडीओ उभारणेचा संस्थानचा मानस असल्याचे यावेळी मा.अध्यक्ष सो. यांनी अवगत केले.

बैठकीचे दरम्यान संस्थानमध्ये सध्या कार्यान्वीत असलेल्या सीसीटीव्ही कार्यप्रणाली व साउंड सिस्टीमविषयी तसेच टाटा स्काय व टीव्ही-9 यांना देण्यात आलेल्या लाईव्ह दर्शन सुविधेबाबतच्या तांत्रिकबाबींविषयी सविस्तर माहिती संबधीतांना देण्यात आली.

सविस्तर चर्चेअंती दुरदर्शनचे प्रतिनिधींनी दुरदर्शनवर साईबाबा व संस्थान उपक्रमा विषयी प्रसारणाची विभागणी पुढीलप्रमाणे मुख्य तीन भागात करुन याबाबत पुढील कार्यवाही करता येईल असे नमुद केले.

1. श्री साईबाबांचे काकड आरतीचे थेट प्रसारण सहयाद्री वाहिनीवरुन प्रसारण करणे.
2. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील महत्वाचे समारंभ उपक्रम यांचे सहयाद्री वाहिनीवरुन थेटप्रसारण करणे.
3. श्री साईबाबा संस्थानच्या विविध उपक्रमांची माहिती देणारा कार्यक्रम सहयाद्री वाहिनीवरुन थेट प्रसारण करणे.

चर्चेच्या दरम्यान दुरदर्शनचे प्रतिनिधींनी करावयाच्या कार्यवाहीबाबत तुर्त दुरदर्श नमार्फत संस्थानला पत्र देण्यात येईल व या कार्यवाहीसाठी आवश्यक असलेल्या जबाबदारीचे निश्चितीकरण व आर्थिक बांबीविषयी सविस्तर करारनामे करण्यात येतीलअसे नमुद केलेले होते.

बैठकीनंतर दुरदर्शनचे तांत्रिक अधिकाऱ्यांनी प्रआयटी विभाग प्रमुख व ज्यु.ईडीपी मॅनेजर यांना ईबी व्हॅन, न्युज रुम, स्टुडीओ इ. बाबतची सविस्तर तांत्रिक माहिती प्रत्यक्ष जागेवर नेऊन दिली, व संस्थानमध्ये सुरु करावयाच्या स्टुडीओबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले.

दि. 11/05/2017 रोजीच्या बैठकीत कळविलेप्रमाणे दुरदर्शन मुंबई यांनी ई-मेलव्दारे पत्र संस्थानला पाठविलेले आहे. सदर पत्रामध्ये पुढील बाबींचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

1. साईबाबांचे काकड आरतीचे सहयाद्री वाहिनीवरुन थेट प्रसारण संदर्भात दुरदर्शन अधिकारी- तंत्रज्ञ शिरडी येथे येऊन प्रत्यक्ष पाहणी करेल असे कळविलेले आहे.
2. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील महत्वाचे समारंभ उपक्रम यांचे सहयाद्री वाहिनीवरुन थेटप्रसारण (उदा. 1 ऑक्टोबर ध्वजारोहण समारंभ, 15 ऑक्टोबर अंतरराष्ट्रीय मॅरेथॉन इ.) सदर समारंभ/ कार्यक्रम/ उपक्रम यांची यादी दिनांक वेळापत्रक तातडीने कळविण्यात यावे. त्याप्रमाणे प्रसारण दिनांक, वेळ आणि दुरदर्शन फि इत्यादी तपशिल संस्थानला कळविण्यात येईल.
3. श्री साईबाबा संस्थानच्या विविध उपक्रमांची /सेवांची माहिती देणारा कार्यक्रम सहयाद्री वाहिनीवरुन प्रसारीत करण्याबाबत प्रस्तावीत उपक्रमांची यादी कळवावी. त्याप्रमाणे प्रसारण दिनांक, वेळ आणि दुरदर्शन फि संस्थानला कळविण्यात येईल.

दुरदर्शन यांचेकडुन प्राप्त झालेल्या उपरोक्त पत्राप्रमाणे दुरदर्शनवरुन प्रसारीत करावयाच्या कार्यक्रमांबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करता येईल.

1. समाधी शताब्दी वर्षात साजरे होणाऱ्या समारंभ तसेच विविध उपक्रम यांची माहिती व तपशीलवार वेळापत्रक शताब्धी कक्ष व जनसंपर्क विभागामार्फत संकलीत करुन दुरदर्शन यांना देता येईल.
2. संस्थानमार्फत राबविणेत येत असलेल्या व प्रस्तावीत विविध उपक्रम/सेवा उदा. साई रुग्णवाहीका, कर्करोग रुग्णालय, उच्च महाविद्यालय इ. संबधी सविस्तर माहिती संबधीत विभागांमार्फत संकलीत करुन दुरदर्शन यांना देता येईल.
3. पत्रात नमुद केलेप्रमाणे दुरदर्शन यांचेकडून प्रसारण दिनांक/वेळ व दुरदर्शन फि बाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेनंतर मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर पुढील कार्यवाहीचे निर्णयार्थ सादर करता येईल.

उपरोक्तप्रमाणे दुरदर्शन, मुंबई येथे झालेल्या बैठकीचा वृत्तांत व दुरदर्शन यांचेकडून ईमेलद्वारे प्राप्त झालेले पत्र याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर पुढील कार्यवाहीचे निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दुरदर्शन, मुंबई येथे झालेल्या बैठकीचा वृत्तांत व दुरदर्शन यांचेकडून ईमेलद्वारे प्राप्त झालेले पत्र याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर पुढील कार्यवाहीचे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, हि विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :** दुरदर्शन, मुंबई येथे झालेल्या बैठकीचा वृत्तांत व दुरदर्शन यांचेकडून ईमेलद्वारे प्राप्त झालेले पत्र याबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर पुढील कार्यवाहीचे निर्णयार्थ सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दुरदर्शन वाहिनीवरुन श्री साईबाबांची काकड आरती व संस्थानच्या इतर कार्यक्रमांचे प्रसारण करणेस व याकामी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **साईटेक प्रकल्प देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणुक होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्फत प्रकल्प देखभाल सुरु ठेवणेकामी त्यांचेकडून प्राप्त प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (१) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**

०१. दि.०७.११.२००९रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

०२. दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७२.

०३. दि.१९.०९.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६५७

**प्रास्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/११/२००९रोजचे सभेतील निर्णय क्र. ७९९अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१५०३०/२००९ दि.०९.१२.२००९ रोजीकार्यादेश देण्यात आलेला आहे.

साईटेक प्रकल्प कार्यान्वीत करणेकामी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे एप्रिल-२०१७मध्ये संपुष्टातआलेला आहे. सबब,साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया शासनाचे अधिकृत कन्सल्टंसी कंपनीकडून अंतिम करणेकामी निम्नत्तम दरधारकाची नेमणुक व प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभाल चालू ठेवणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६रोजीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं.५७२अन्वये त्यासमान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त निर्देशान्वये साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया राबविणेकरीता शासनाचे अधिकृत कन्सल्टंसी M/S. KPMG यांना जा.क्रं.एसएसएसटी/आयटी/२५७५/२०१६, दि.२३.०८.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे तसेच जा.क्र.एसएसएसटी/ आयटी/ ४१३०/ २०१६ दि.०७.११.२०१६ रोजीचे पत्राद्वारे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना प्रकल्प देखभालीसाठी मुदतवाढीसंदर्भात पत्र देण्यात आलेले आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी त्यांचे दि.१२.११.२०१६ रोजीचे पत्राद्वारे त्यांचे पेमेंट वेळेवर होत नसले कारणाने मुदतवाढ घेण्यास असमर्थता दाखविलेली आहे, तसेच त्यांचे देय असलेले पेमेंट लवकरात लवकर अदा करण्याची विनंती केलेली आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे त्यांचे दि.१४.०३.२०१७रोजीचे पत्राद्वारे पुन:श्च एकदा प्रकल्प देखभालीस एप्रिल-२०१७ नंतर मुदतवाढ घेण्यास असमर्थता दाखविलेली आहे. तसचे पत्रामध्ये त्यांनी प्रकल्प हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया सुरु करण्याबाबत विनंती केलेली आहे व त्यांचे देय असलेले पेमेंट लवकरात लवकर अदा करण्याची विनंती केलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गंत कार्यान्वीत करणेत आलेले कार्यप्रणाली सुरळीत सुरू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच प्रशासकीय कामकाजात अडचण येऊ नये, याकरीता नविन कंपनीची नेमणूक होऊन प्रकल्प हस्तांतरीत होईपर्यंत पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेसाठी मान्यतेचा प्रस्ताव माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि.१२.०४.२०१७ रोजीचे मंजुर टिपन्वीन्वये, मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता.

अ) मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्पाअंतर्गत देय असलेल्या बिलांची रक्कम रुपये ४,३८,६२,६४४/- पैकी काही रक्कम राखीव ठेवून, उर्वरीत रक्कम त्यांना अदा करता येईल व राखीव रक्कम त्यांना उपरोक्त नमुद उर्वरीत कार्यवाही पुर्ण झालेनंतर अदा करता येईल. सदरची कार्यवाही वेळेत पुर्ण करणेसंदर्भात त्यांना पत्राद्वारे कळविता येईल.

आ) कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्प देखभालीसाठी दि.०७.११.२०१६ रोजी देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये "आहे त्याच अटी/शर्तीवर" असा उल्लेख करणेत आलेला होता. परंतु, सद्यस्थितीत त्यांचेकडून फक्त आलेल्या अडचणी सोडविण्याची कार्यवाही अपेक्षित असल्याने त्यांना सुचित केलेप्रमाणे त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचा योग्य विचार करुन, त्यांना कार्यादेश देता येईल.

इ) कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सद्यस्थितीत भाडेतत्वावर वापरात असलेले प्रिंटरचे मासिक भाडे अंदाजे रक्कम रुपये १,७०,०००/- + कर संस्थानमार्फत अदा करुन, सदरचे आवश्यक प्रिंटर्स कार्यान्वीत ठेवता येतील.

उपरोक्त प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.३२७ अन्वये, पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले. "प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे,मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची साईटेक प्रकल्प दुरूस्ती– देखभाल कामीची मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे, सदरहू कामी विहीत पद्धतीने नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत साईटेक कार्यप्रणाली सुरळीत चालू रहावी, साईभक्तांची गैरसोय होऊ नये व संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये यासाठी फक्त Functional support सुरु ठेवणेबाबत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी व यासाठी त्यांचेकडून प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन पुढील सभेसमोर सादर करणेत यावा"

साईटेक प्रकल्पाअंतर्गत अपुर्ण असलेली कार्यवाही पुर्ण करणेबाबत तसेच नविन कंपनीची नेमणूक होऊन प्रकल्प हस्तांतरीत होईपर्यंत प्रकल्प देखभालीची कार्यवाही चालू ठवणेबाबत मे.कॉग्नीझंट यांना जाक्रं. एसएसएसटी/ आयटी/ ५८२/ २०१७, दि.०२/०५/२०१७ रोजीचे पत्राद्वारे कळविण्यात आलेले होते.

मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सामान्य प्रशासन विभाग आवक नंबर ३४३० ने दि.०९ मे, २०१७ रोजीचे पत्रान्वये,साईटेक प्रकल्प देखभालीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावामध्येसाईटेक प्रकल्प देखभालीसाठी दरमहा रक्कम रुपये १४,४४,०००/- मात्र इतका खर्च कळविलेला आहे. तसेच सदर देखभालीचे काम पुढील अटी-शर्तीवर सुरू करणेत येईल, असेही प्रस्तावामध्ये नमुद केलेले आहे.

1. श्री साईबाबा संस्थानने साईटेक प्रकल्पाअंतर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना मार्च-२०१७ अखेर देय असलेली रक्कम रुपये ४,३८,६२,६४४/- मात्र दि.३० एप्रिल, २०१७ पर्यंत अदा करावी.
2. साईटेक प्रकल्प देखभालकामीची मासिक रक्कम रुपये १४,४४,०००/- मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी बिले सादर केलेनंतर विनाविलंब अदा करणेत यावी. बिले अदा करणेस विलंब झाल्यास मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे दोन दिवसाची अग्रिम नोटीस देऊन सदर साईटेक प्रकल्प देखभालीची कार्यवाही थांबवेल.
3. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे किंवा श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना एक महिना अग्रिम नोटीस देऊन सदरचा कार्यादेश संपुष्टात आणता येईल.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेसमोर सादर केलेल्या प्रस्तावानुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत सुरू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये व संस्थानचे कामकाजामध्ये अडथळा येऊ नये याकरीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

4. साईटेक प्रकल्प देखभालीसाठी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार दरमहा रुपये १४,४४,०००/- मात्र रक्कमेप्रमाणे त्यांना कार्यादेश देता येईल.
5. प्रस्तावामध्ये मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांना देय असलेल्या रक्कमेबाबत निर्णय होऊन त्यांना रक्कम अदा करता येईल.
6. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेसमोर सादर केलेल्या प्रस्तावानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सद्यस्थितीत भाडेतत्वावर वापरात असलेले प्रिंटरचे मासिक भाडे अंदाजे रक्कम रुपये १,७०,०००/- + कर संस्थानमार्फत अदा करुन, सदरचे आवश्यक प्रिंटर्स कार्यान्वीत ठेवता येतील.

सद्यस्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत लेखाशाखा विभागामध्ये कार्यान्वीत करणेत आलेल्या ERP या कार्यप्रणाली बाबतची कार्यवाही मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे व लेखाशाखा विभाग यांचेमार्फत अंतिम टप्प्यात आहे. मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना सुचित केलेप्रमाणे त्यांनी दि.०१ मे, २०१७ पासून साईटेक प्रकल्प देखभालीची कार्यवाही पुर्वीप्रमाणेच चालू ठेवलेली आहे. तसेच मे.कॉग्नीझंट, पुणे यांचेमार्फत भाडेतत्वावर असलेली प्रिंटर्स संबंधीतांना सुचित केलेप्रमाणे त्यांनी ते कार्यान्वीत ठेवलेले आहेत.

**मागणी:-** साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेले कार्यप्रणाली सुरळीत सुरू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये, याकरीता प्रस्ताविकेत नमुद मुद्दा **"अ""आ" व "इ"** प्रमाणे कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव तथा निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय:-** साईटेक प्रकल्प दुरुस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेले कार्यप्रणाली सुरळीत सुरू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये, याकरीता प्रस्ताविकेत नमुद मुद्दा **"अ""आ" व "इ"** प्रमाणे कार्यवाही करणेच्या मान्यतेस्तव तथा निर्णयार्थ सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्प दुरस्ती-देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत सदरहू प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत करणेत आलेली कार्यप्रणाली सुरळीत चालू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये तसेच संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये, याकरीता प्रस्ताविकेत नमुद मुद्दा "अ "आ व "इ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **हेलीकॉप्टर एमर्जन्सी मेडीकल सर्व्हीस (HEMS) बाबत.**

**प्रस्ताव-** हृदय प्रत्यार्पण शस्त्रक्रियेत रुग्णाला कमीत कमी वेळेत योग्य हृदय मिळणे गरेजेचे आहे. त्यासाठी हेलीकॉप्टर एमर्जन्सी मेडीकल सर्व्हीस (HEMS) सुरु करणेबाबत श्री वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर एअर एलोरा एविएशन प्रा. लि. यांनी मा. अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना त्यांचे दि. ११ मे २०१७ चे पत्रान्वये कळवून मदतीची मागणी केली आहे.

श्री वाल्मिक केंद्रे, डायरेक्टर एअर एलोरा एविएशन प्रा. लि. यांनी पाठविलेल्या **पत्राचा आशय** खालीलप्रमाणे-

वरील विषयानुसार हेलीकॉप्टर एमर्जन्सी मेडीकल सर्व्हीस (HEMS) आपल्या हक्काची HEMS असावी असे आम्हांला वाटते. कारण अलीकडच्या काळात अवयव दान करणाऱ्या दात्यांची संख्या वाढलेली आहे.

ह्दय प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेत कमीतकमी वेळात गरजू रुग्णाला योग्य ह्दय मिळावे ही पहिली गरज असते. अनेकदा ब्रेनडेड व्यक्तीचे ह्दय आणि गरजु रुग्ण यांच्यातील भौगोलीक अंतरामुळे प्रत्यारोपणासाठी हृदय उपलब्ध असूनही अंतराच्या अडथळयामुळे ते रुग्णास मिळू शकत नाही. आणि हाताशपणे जे घडेल ते पहावे लागते.

विशेष म्हणजे अशावेळी विमान कंपन्यांचे मुल्य लक्षात घेणे गरजेचे आहे. ऐनवेळी आकारले जाणारे मुल्य हे दुप्पट किंवा तिप्पट असते त्यामुळे आम्ही निर्णय घेतला आहे की, देशातली पहिली (HEMS) ॲम्बुलन्स आपल्या महाराष्ट्राची हक्काची असली पाहिजे व ती महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांना परवडणारी असली पाहिजे. यासाठी गरज आहे ती आपल्या मदतीची.

तरी सदरचे पत्र मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी व अवलोनार्थ सादर.

**निर्णय क्र.४३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांसाठी मोफत (१०० तास) हेलीकॉप्टर एमर्जन्सी मेडीकल सर्व्हीस (HEMS) सुरु करणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, इच्छुकांकडून अर्जांची मागणी करणेत यावी.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **संस्थान व रुग्णालय विभागाचा मालमत्ता विमा पॉलीसी व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालमत्तेच् विमा संरक्षण व श्री साईभक्तांना अपघाती विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानने राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून निविदा मागवून न्युनतम दराच्या निविदा स्विकारून विमा संरक्षण घेतले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

**(अ) संस्थान मालमत्ता विमा-** संस्थानच्या मालमत्तेचा विमा दि.११ जुलै,२०१६ ते दि.१० जुलै, २०१७ या एका वर्षासाठी न्युनतम दराने विमा कंपन्यांकडुन निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यातील युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शिर्डी यांची निम्नत्तम दराची म्हणजेच रक्कम रू. ९,५१,०००/- मात्रची निविदा स्विकारण्यात आली होती. या विमापॉलिसीची मुदत दि.१० जुलै, २०१७ रोजी संपत आहे, पुढील एक वर्ष कालावधीकरीता संस्थान मालमत्ता विमा नुतनीकरण तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 3.74 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 4.40 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 165.00 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 0.77 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 481.35 |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 Monthly staff salary is Rs.5.48 Crores. | (Approx 1600 Personnel) |
| | **Total -** | **655.26** |

**(ब) रुग्णालये विभाग मालमत्ता विमा-** रुग्णालये विभागाच्या मालमत्तेचा विमा दि.१० जुलै, २०१६ ते दि.०९ जुलै, २०१७ या एका कालावधीकरीता न्युनतम दराने विमा राष्ट्रीयकत विमा कंपन्यांकडुन निविदा/दर मागविण्यात येवून, त्यातील युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शिर्डी यांची निम्नत्तम दराची म्हणजेच रक्कम रू.३,७८,२४७/- मात्रची निविदा स्विकारण्यात आली होती. या विमापॉलिसीची मुदत दि.०९ जुलै, २०१७ रोजी संपत आहे, पुढील एक वर्ष कालावधीकरीता रुग्णालये विभागाचा मालमत्ता विमा नुतनीकरण तपशिल खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 00.10 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 00.50 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 67.00 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 00.25 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 79.00 |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 Monthly staff salary is Rs.1.80 Crores. | (Approx 600 Personnel) |
| | **Total-** | **146.85** |

**(क) श्री साईभक्तांचा अपघात विमा-** संस्थान परिसरामध्ये श्री साईभक्तांना काही अपघात झाल्यास एका वेळेस २५ साईभक्तांना विमा संरक्षण मिळावे, यासाठी संस्थानने त्यांची अपघाती विमापॉलिसी घेतली आहे. हा विमा, आलेल्या निविदेतील न्युनतम दराप्रमाणे दि ओरीएंटल इंन्शुरन्स कंपनी लि. शिर्डी यांचेकडून २५ भक्तांना विमा संरक्षण देणेसाठी रक्कम रू. ४६,८०५/- ची विमापॉलिसी घेण्यात आली आहे. त्याचा कालावधी दि.१२ऑगस्ट,२०१६ पासून दि. ११ ऑगस्ट,२०१७ पर्यंत असल्याने सदर विमापॉलिसीची मुदत दि.११ ऑगस्ट, २०१७ ला संपत आहे, सदर विमा पॉलिसीमध्ये शिर्डी येथे "श्री" चे दर्शनार्थ येणाऱ्या भक्तांचे सुरक्षिततेसाठी अपघाती वा घातपाती विमा संरक्षण असावे म्हणून विमा पॉलिसी घेणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. सदरहु दुर्दैवी घटना संस्थान मालकीचे सर्व इमारती व त्यांचा परिसर, निवासस्थाने, रुग्णालये व गर्दीच्या काळात फुटपाथवर जिथपर्यंत भक्तांची दर्शन लाईन जाईल तिथपर्यंत तसेच मंदिर परिसर(चावडी, व्दारकामाई, गुरुस्थान व त्यांच्या परिसरात) पालखी/रथ मिरवणूकीच्या दिवशी शिर्डी गावातील पालखी रोड, श्री रामनवमी उत्सवाच्या वेळेस बाबांच्या स्नानासाठी कावडीने पाणी आणणारे साईभक्त, खंडोबा मंदिरते साई समाधी मंदिरापर्यंत पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचा एका वर्षासाठी २५ साईभक्तांसाठी, कोणत्याही वयाचे स्त्री-पुरुष भक्तास एखाद्या दुर्घटनेत अपघाती वा घातपाती मृत्यु झाल्यास रक्कम रु. ०५ लाख, शरीराचे दोन अवयव (हात,पाय किंवा डोळे) कायम स्वरुपी निकामी झाल्यास रु. ०१ लाख, शरीराचे एक अवयव कायम स्वरुपी निकामी झाल्यास रु. ५०

हजार, जबर जखमी झाल्यास किंवा अपघात झाल्यामुळे होणारा दवाखाना खर्च रु. २५ हजार विमा संरक्षण मिळू शकेल.

उपरोक्त विवेचन केल्याप्रमाणे सन २०१७-१८ या कालावधीसाठी संस्थानची मालमत्ता व श्री साईभक्त विमा पॉलिसीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करण्यासाठी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडूनच बंद लिफाफ्यामध्ये निविदा मागविणे आवश्यक आहे कारण ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यास सर्व राष्ट्रीयकृत विमा कंपन्या प्रतिसाद देत नसल्याने संस्थानला विमा पॉलिसीचे स्पर्धात्मक दर प्राप्त होत नाहीत तसेच विमा कंपन्यामध्ये स्पर्धाही होत नाही. हा अनुभव संस्थानच्या वाहनांचा विमा नुतनीकरण मार्च-२०१७ मध्ये करताना आलेला आहे. तसेच विमा नुतनीकरण ही खरेदीची प्रक्रिया नसून सेवा प्रक्रियामध्ये मोडत असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची आवश्यकता नाही. तसेच यासाठी पुरेशी अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात आली आहे.

तरी, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये संस्थान व रुग्णालये विभागाच्या मालमत्तेचा तसेच श्री साईभक्तांचा विमा नुतनीकरण प्रक्रिया फक्त राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून त्यांचे दर बंद लिफाफ्यामध्ये मागवून विमा नुतनीकरणास व त्यावर येणाऱ्या खर्चाच्या मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समितीसमोर सविनय सादर .

**निर्णय क्र.४३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये संस्थान व रुग्णालये विभागाच्या मालमत्तेचा तसेच साईभक्तांचा विमा नुतनीकरण करणेकामी विहीत पध्दतीने राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी श्री. अभिजीत देविदास शिंदे रा. श्रीरामपूर यांना संस्थान मालकीच्या साईप्रसादालय इमारतीत वापरास दिलेल्या जागे व्यतिरीक्त अन्य मागणी केलेल्या मुद्यांबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव -** शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी श्री.अभिजित देविदास शिंदे रा.श्रीरामपूर यांना संस्थान मालकीच्या साईप्रसादालय इमारतीत वापरास दिलेल्या जागे व्यतिरिक्त अन्य मागणी केलेल्या मुद्दयांबाबत..

**प्रस्तावना -** श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांचे दि.०५/०३/२०१६ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना जागा वापरास देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीच्या सभेपूढे सादर करण्यात आला. त्यास अनुसरुन निर्णय क्रं.२८७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी प्रदर्शनाकरीता जागा देणेकामी जागेची निश्चिती करणेत येवून विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी व महाराष्ट्र शासनाची परवानगी मिळालेनंतर ११ महीन्यांचे कराराने परवानगी मिळणेसाठी संस्थान वकीलामार्फत मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद मध्ये अर्ज दाखल करणेत यावा,असे ठरले."

सदर निर्णयाप्रमाणे इकडील पत्र क्रं.एसएसएस/मालमत्ता/१५६४/२०१६ दि.०२/०७/२०१६ अन्वये मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडे अहवाल सादर करणेत आला. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-२०१६/१४२५/प्र.क्र./१७४/का-१६ दि.२६/१०/२०१६ अन्वये श्री.अभिजित देविदास शिंदे,श्रीरामपूर यांना संस्थानची जागा करार करुन केवळ ११ महीन्यांसाठी भाडेतत्वावर देण्यात यावी,असेबाबत आदेश प्राप्त झालेला आहे.

तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८३५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय करणेत आलेला आहे.

"आजचे सभेत अर्जदार श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना बोलविणेत आले होते. सभेने त्यांचेबरोबर या विषयावर चर्चा केली व त्यांचा आशय समजून घेतला. श्री.शिंदे यांनी सभेसमोर सांगितले

की,शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेसाठी आवश्यक फर्निचर व इतर अनुषंगिक बाबी तयार करणेत खर्चिक आहे. त्यामुळे कमीत-कमी ५ वर्षासाठी जागा मिळावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेल्या अटी/शर्तीवर श्री.अभिजित शिंदे यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी तूर्त ११ महीने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येवून लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच त्यांच्या पूर्ण सेटअपची उभारणी झाल्यानंतर भाडे सुरु करण्यात यावे.

श्री.शिंदे यांच्या मागणीनुसार त्यांना ११-११ महीन्यांच्या कराराने पाच वर्षांसाठी जागा उपलब्ध करुन देणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत यावा व संस्थानच्या नियोजित साईसृष्टी प्रकल्पामध्ये शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेबाबतचा समावेश करणेत यावा,असे ठरले."

तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

श्री.अभिजित शिंदे यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी तूर्त ११ महीने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येवून लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देणेबाबत दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेमध्ये निर्णय संमत झालेला आहे. श्री.अभिजित शिंदे,श्रीरामपूर यांनी आजचे सभेत येवून ते करत असलेल्या कामामुळे देशभरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पोहोचणार असलेबाबत माहीती दिली व सदरहू ठिकाणचे भाडे कमी करणेबाबत सभेस विनंती केली.

सभेने यावर चर्चा करुन छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी श्री.अभिजित शिंदे यांना लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर देण्यात येणा-या हॉलचे रु.१०,०००/- मात्र मासिक भाडे,विद्युत बील वेगळे याप्रमाणे आकारणेत यावे.

उपरोक्त ठरावांच्या अनुषंगाने श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून दि३१/०१/२०१७ रोजी ११ महीन्यांच्या मुदतीचा लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

तद्नंतर श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी दि२८/०४/२०१७ रोजीचे अर्जान्वये उक्त ठिकाणी काही कामे करणेकामी खालील नमूद बाबींवर संस्थानची परवानगी मागितली आहे.

१) हॉल बाहेरील गॅलरी १५X१२० या जागेत मांडव टाकण्यासाठी परवानगी.
२) याच गॅलरीसमोरील जागेत सागरी किल्ले यांचे मॉडेल ठेवण्यासाठी परवानगी.
३) हॉलकडे जाताना जो जिना आहे या जिन्याला प्रवेश कमानी बसविण्यासाठी परवानगी तसेच या ठिकाणी ध्वनिफित चालवण्यासाठी परवानगी मिळावी.
४) फायबरचा हत्ती बसवण्यासाठी जागा (प्रसादालयामधून बाहेर पडल्यावर समोर लाडू बनविण्यासाठीचे शेड व बांधकाम विभाग या दोन्हीमधील मोकळी जागा. सध्या या जागेत कचरा आहे.)
५) माहीती फलक (शिवस्पर्श) बाबतचे प्रसादालय परिसरात लावणेसाठी परवानगी मिळावी. (प्रसादालय प्रवेश करताना, प्रसादालयातून बाहेर पडताना व प्रसादालय परिसरात प्रसादालय प्रतिक्षा रांगेच्या बाजूला अशी एकूण १५ फलेक्सचे बोर्ड व दिशादर्शक फलक)
६) वरील सर्व ठिकाणी लाईट व्यवस्थेचा वापर मोफत मिळावा.
७) प्रवेश कमानीजवळ सी.सी.टि.व्ही.कॅमेरा बसविण्याची परवानगी मिळावी.

उपरोक्त बाबींसाठी श्री.अभिजित शिंदे यांना परवानगी देणेकामीचे संबंधीत विभागांकडून इकडील पत्र जा.नं. एसएसएसटी/ मालमत्ता/७६८/२०१७ दि.१०/०५/२०१७ अन्वये साईप्रसादालय विभाग,बांधकाम विभाग, विद्युत विभाग व सी.सी.टि.व्ही विभाग यांचे अभिप्राय मागविण्यात आले. त्याप्रमाणे साईप्रसादालय,बांधकाम विभाग व सी.सी.टि.व्ही विभाग यांनी त्यांचे अभिप्राय सादर केलेले आहेत.

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्त बांधकाम विभाग,साईप्रसादालय विभाग व सी.सी.टि.व्ही.विभाग यांचे अभिप्रायाचे अवलोकन केले असता अर्जदार यांचे विनंतीप्रमाणे १) हॉल बाहेरील गॅलरीत मांडव टाकण्यासाठी परवानगी दिल्यास त्याठिकाणी असलेल्या संस्थानचे आय.टी.विभागास अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. २) गॅलरी समोरील जागेत सागरी किल्ले यांचे मॉडेल ठेवण्यासाठी परवानगी दिल्यास

गॅलरीतून जाण्या-येण्यासाठी अडचण निर्माण होणार आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीचा विचार करता सदर गॅलरी ही येण्या-जाण्यासाठी पूर्णपणे मोकळी ठेवणे अत्यावश्यक आहे. ३) अर्जदार यांना वापरास दिलेल्या हॉलकडे जातांना जो जिना आहे त्या जिन्याला प्रवेश कमानी बसविण्यासाठी व त्या ठिकाणी ध्वनिफित चालविण्यासाठी परवानगी दिल्यास आय.टी.विभागास अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय ध्वनिफितीमुळे ध्वनी प्रदुषण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. ४) लाडू बनविण्याचे शेड व बांधकाम विभाग यामध्ये फायबरचा हत्ती बसविण्यासाठी परवानगी दिल्यास सदर ठिकाणी लाडू विभागाच्या भट्टया नेहमी चालू असतात. त्यामुळे भविष्यात त्याठिकाणी काही विपरीत घटना घडल्यास त्यापासून मोठी हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी सदर जागा मोकळी असणे आवश्यक आहे. ५) शिवस्पर्शाबाबतचे माहीती फलक साईप्रसादालय परिसरात लावणेस परवानगी दिल्यास संस्थानचे फलेक्स बोर्ड लावण्यास दाटी निर्माण होईल. तसेच साई प्रसादालयाच्या परिसरात इतर खाजगी व्यक्ती देखील अशा प्रकारचे फलेक्स बोर्ड लावण्यासाठी परवानगीची मागणी करण्याची शक्यता नाकारता येणार नाही. ६) अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना विद्युत व्यवस्थेचा वापर मोफत देता येणार नाही. तसे उक्त करारनाम्यात स्वयंस्पष्ट नमूद केलेले आहे. ७) अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे कमानी करण्यास परवानगी न दिल्यास त्यांचे विनंती प्रमाणे त्याठिकाणी सी.सी.टि.व्ही.बसविण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही.

उक्त प्रदर्शनाचा मुख्य हेतू शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणे हा आहे. त्यामुळे अर्जदार यांनी मागणी केलेल्या उपरोक्त बाबींना परवानगी न दिल्यास प्रदर्शनाच्या मुख्य हेतूवर काही परिणाम होईल असे वाटत नाही. अर्जदार यांनी करुन दिलेल्या दि.३१/०१/२०१७ रोजीच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनाम्यातील अटी व शर्तीचा विचार करता त्यात नमूद केलेल्या जागेव्यतिरिक्त अतिरिक्त जागा अर्जदार यांचे उपरोक्त विनंती अर्जाप्रमाणे वापरास देणे व त्यांच्या मागण्या मान्य करणे विधीग्राहय ठरणार नाही.

तसेच दिलेल्या जागेचे एकूण क्षेत्रफळ ७२०० चौ.फूट असून आकारण्यात आलेले दरमहा भाडे रु.१००००/- खूपच कमी आहे. सदर जागेचे भाडे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित करुन त्याप्रमाणे आकारण्यास व त्याची अंमलबजावणी त्वरीत सुरु करण्याच्या मान्यतेस्तव तसेच अर्जदार यांचा दि.२८/०४/२०१७ रोजीचा अर्ज निकाली ठेवण्याच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी श्री.अभिजीत देविदास शिंदे, श्रीरामपूर यांना साईप्रसादालय इमारतीत जागा दिलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत सदरहू प्रदर्शन सुरु केलेले नाही. याकरीता त्यांचा दि.२८.०४.२०१७ रोजीचा मागणी अर्ज निकाली काढणेत यावा. तसेच त्यांना दिलेल्या एकूण ७२०० चौ.फुट जागेचे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करुन घेऊन, त्याप्रमाणे भाडे आकारणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलनात साई भजन संध्याकार्यक्रम आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय -** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.३४३ नुसार साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या पदयात्री पालख्यांचे संमेलन आयोजित करणेकामी येणा-या रु.१२,१८,६०१/- चे अंदाजे येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

**प्रास्ताविक:-** जा.नं.एसएसएस/वशी-प्र.अ./३१८/२०१७ दि.१५.०४.२०१७ चे आदेशानुसार श्री साईबाबा संस्थानमध्ये साईसेवक योजना सुरु करणे संदर्भात, शिर्डीस पालखी घेऊन येणारे पालखीधारकांची सेवा घेणेकामी दि.१४.०६.२०१७ रोजी प्रतिनिधींचे संमेलन सिध्द संकल्प लॉन्स, नगर –मनमाड रोड साकूरी या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. सकाळ सत्रामध्ये सकाळी १०.०० ते ०२.०० संमेलन व दुपारच्या सत्रामध्ये दु.३.००.ते ०५.०० साई भजनसंध्या कार्यक्रम ठेवणेबाबत ठरले आहे.

**अ) श्री. सच्चिदानंद (आप्पा) मुंबई** यांनी इमेलमध्ये नमुद केले आहे की, श्री साई पालखी उत्सव सोहळा शिर्डी येथे संपन्न होणार आहे. या सोहळयात मुंबई तसेच महाराष्ट्रातील साई पालखी पदयात्री मंडळे सामील होणार आहेत.

तरी, या कार्यक्रमात आम्ही **"एक शाम साई के नाम"** हा साई भजनांचा कार्यक्रम करु इच्छितो कारण ही सर्व पालखी पदयात्रा मंडळे पालखी पदयात्रेत साई भजने गात गात व ऐकत पदयात्रा करीत असतात. जर

आपण हा कार्यक्रम करण्यास संधी दिली तर आमच्या कार्यक्रमातील १६ कलाकारांची कार्यक्रमाच्या आगोदर एक दिवस व कार्यक्रमाचे दिवशी अशी दोन दिवस राहण्याची व जेवणाची व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात यावी तसेच कलाकांराचे मानधन म्हणून रु.१,०१,०००/- व कलाकारांच्या ४ वाहनांचा प्रवासखर्च २०,०००/- असा एकूण रु.१,२१,०००/- मात्र मंजूर करावेत अशी विनंती केली आहे.

**ब) श्री.किशोर गागरे, साईभजन गायक व श्री. किशोर सासवडे, साई पोवाडा गायक** यांनी दि.२६.०४.२०१७ चे पत्रान्वये विनंती केली आहे. की, आम्ही कलाकार श्री साईबाबांच्या सेवेत कार्यरत असून साईबाबांची हिंदी व मराठी भजनाची इतरत्र ठिकाणी कार्यक्रम करतो. आम्ही वादक साथीदारांसह ०९ कलाकार असून आजवर ब-याच ठिकाणी साईभजन संध्येचे कार्यक्रम केलेले आहेत. आम्ही गायन केलेल्या साई गीतांच्या कॅसेट, सीडीज् बाजारपेठेत आलेल्या असून आमची साई चरणी साईभजन संध्या कार्यक्रम करण्याची इच्छा आहे.

त्यांनी साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलनात आमच्या स्थानिक कलाकारांना श्रींचे दरबारात भजन करण्याची संधी देवून उपकृत करुन, आमचे वादक कलाकारांना जाणे-येणे प्रवासभाडे व मानधन रु.११,०००/- (अक्षरी रुपये एकरा हजार) मात्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

**क) श्रावण (बाळा) इंगळे, संस्थापक साईलीला मंडळ, लालबाग, मुंबई** यांनी दि.०५.०५.२०१७ चे पत्रान्वये साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलनात "**झाले तुझे दर्शन साई**" हा कार्यक्रम सादर करणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केली असुन त्यांनी मुंबईतील नामवंत ९ ते १० गायक, १ संगीतकार, ४ वादक, ४ कोरस, १ निवेदक इत्यादी कलाकारांचा समावेश असेल, साधारण २० ते २२ कलाकरांच्या राहण्याची व जेवणाची सोय विनामुल्य होणेस विनंती केली आहे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** वरील "अ" मधील श्री. सच्चिदानंद (आप्पा), मुंबई यांचे साईबाबांचे पालखीवर अनेक प्रकारचे भजने/गाणे त्यांनी गायलेले आहे. त्यांची पालखी भजने/गाण्याला महाराष्ट्रात व महाराष्ट्रा बाहेर दुवर प्रसिद्धी मिळालेली आहे. त्यांचा गायणाचा कार्यक्रम दर्जेदार असून त्यांचा आवाज सुमधूर,पहाडी पद्धतीचा असून मनाला गोडवा निर्माण करणारा आहे. शिर्डी महोत्सव २०१६ मध्ये साईनगर मैदानावर त्याचा गायनाचा कार्यक्रम झाला होता सदर कार्यक्रमास भक्तांचा प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळालेला आहे. त्यामुळे साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलनात त्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा असे वाटते.

तरी साई पालखी मंडळ प्रतिनिधींचे संमेलनात भजन संध्या कार्यक्रम करणेकरीता उपरोक्त **"अ", "ब" व "क"** बाबत योग्य निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री.सच्चिदानंद आप्पा, मुंबई व श्रावण (बाळा) इंगळे, संस्थापक साईलीला मंडळ, लालबाग, मुंबई यांनी श्री साईबाबांच्या पालखीवर अनेक प्रकारची भजने/ गाणे गायलेले असून त्यांच्या पालखी भजने/ गाण्याला महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर दुरवर प्रसिद्धी मिळालेली आहे. याकरीता साईसेवक संमेलनामध्ये साईभजनांचा कार्यक्रम आयोजित करणेसाठी समिती सदस्य मा.श्री.सचिन तांबे यांनी श्री.सच्चिदानंद आप्पा, मुंबई व श्रावण (बाळा) इंगळे, मुंबई यांचेबरोबर चर्चा करुन, जे मोफत साईभजन कार्यक्रम करणेस तयार असतील, त्यांचा कार्यक्रम आयोजित करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **कॅन्टीन विभागाकडील भांडी धुन्यासाठी लिक्वीड सोप खरेदी.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग १) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील १७ (१) मधील कलमानुसार भक्तांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

**प्रस्ताविक-** कॅन्टीन विभागात चहा, कॉफी तयार करणेसाठी मोठया आकाराचे पातेले, टी जार व इतर भांडी वापरण्यात येत असुन सततच्या वापरामुळे पातेले व भांडी खराब होतात. त्यामुळे ते दररोज प्रत्येक वेळी घासुन स्वच्छ करावे लागतात. तसेच टी जार देखील प्रत्येक वेळी धुवुन स्वच्छ करावे लागतात . यासाठी मॅन्युअल लिक्वीड सोपचा वापर केला जातो. यापुर्वी लिक्वीड सोपची खरेदी ही ३ ते ४ महिन्यासाठी आवश्यक असणारे लिक्वीड सोप कोंटेशन मागवुन वेळोवेळी खरेदी केली जात होते.

कॅन्टीन विभागामधील भांडी धुण्यासाठी मॅन्युअल वापराकरीताचे सन २०१७/२०१८ करीता १८०० लिटरची आवश्यकता असुन त्याकामी अंदाजे रू.७२,०००/- अक्षरी रुपये बहात्तर हजार खर्च असुन सदरचा खर्च

कॅन्टीन खर्च या अंदाजपत्रकिय तरतुदीमधुन करता येईल तरी सदर खर्चास व आवश्यक असलेले लिक्वीड सोप श्री साई प्रसादलयासाठी खरेदी करण्यात येणारे खरेदी प्रक्रियेमध्ये याचा समावेश होवुन खरेदी विभागामार्फत (जाहिरात देण्यापासुन ते पुरवठा आदेश देणेपर्यतच्या सर्व समावेषक प्रक्रियांसह) सदरचे लिक्वीड सोप खरेदी करून मिळावे .

**विभागाची मागणी:-** कॅन्टीन विभागासाठी मॅन्युअल लिक्वीड सोप १८०० लि. व त्याकामी येणारे अंदाजे रू.**७२,०००/-** मात्र चे खर्चास मान्यता मिळुन सदरची खरेदी, खरेदी विभागामार्फत (जाहिरात देण्यापासुन ते पुरवठा आदेश देणेपर्यतच्या सर्व समावेशक प्रक्रियांसह) करून मिळावी ही विनंती.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत-** मॅन्युअल लिक्वीड सोप चा वापर हा कॅन्टीन विभागा व्यतिरिक्त श्री साई प्रसादालय विभागात देखील भांडी धुण्यासाठी होत आहे. त्यांचे कडील वार्षिक खरेदी ही खरेदी विभागामार्फत केली जाते. याकरीता या दोन विभागांसाठी आवश्यक असलेले लिक्वीड सोप एकत्रित खरेदी करणेस मान्यता मिळावी.

उपरोक्त विषय निर्णयार्थ सविनय सादर

**निर्णय क्र.४३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागातील भांडी धुणेकरीता आवश्यक असणारा वार्षिक लिक्वीड सोप खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईप्रसादालय व कॅन्टीन विभागाकरीता वार्षिक लिक्वीड सोपची एकत्रित खरेदी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग/ प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **साईआश्रम, साईबाबा व व्दारावती भक्तनिवास मधील खोल्यांमध्ये साईभक्तांच्या सुविधेसाठी साबण खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी २००४ मधील २१ (ग) (१) " भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. पोट कलम (ख) (१) (२) " भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे ."

**प्रास्ताविक:-** साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये साईभक्तांच्या निवासासाठी एकुण १२ निवासी इमारती असुन प्रत्येक इमारतीमध्ये १२८ खोल्या आहेत. त्यापैकी ३८४ खोल्या वातानुकूलीत असुन, १,१५२ खोल्या विनावातानुकूलीत आहेत. वातानुकूलीत खोल्यांमध्ये साईभक्तांच्या सुविधेसाठी टॉवेल व छोटी साबण पुरविण्यात येते.

दि.०७/०५/२०१६ रोजीची मंजुर टिपणीनुसार चोलाईल कंपनीचे मेडिमिक्स साबण (१२ ग्रॅम वजानाची वडी) ३५,७१२ नग खरेदीकामी अंदाजे दर प्रति नग रु.२.५० पैसे प्रमाणे एकुण रक्कम रु.८९,२८०/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता घेऊन सदरचा विषय दि.१४/०६/२०१६ रोजीचे मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता.

दि.१४/०६/२०१६ रोजीचे मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.३४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासमधील खोली साईभक्तांना देते वेळेस प्रत्येक वातानुकूलीत खोलीमध्ये एक याप्रमाणे सर्व खोल्यांमध्ये ३५,७१२ नग मेडिमिक्स साबण विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८९,२८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच उपरोक्त निर्णय क्र.३४४ मध्ये साईबाबा निवासस्थान इमारतीमधील खोली साईभक्तांना देते वेळेस प्रत्येक खोली मध्ये एक याप्रमाणे सर्व खोल्यांमध्ये ठेवण्यासाठी विहीत पध्दतीने छोटे साबण खरेदी करणेत यावे,असे ठरले व याकामी प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.

दि.२६/०७/२०१६ रोजीचे खरेदी विभागाला दिलेले पत्र संमत झाल्यानंतर साईआश्रम भक्तनिवास व साईबाबा भक्तनिवास या दोन्हीही विभागांसाठी मेडिमिक्स साबण खरेदी करणेकामी पुढील कार्यवाही खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया पध्दतीने करणेबाबत जा.न.७० दि.२६/०७/२०१६ रोजीचे पत्राव्दारे कळविण्यात आले होते.

दि.२९/०३/२०१७ रोजीचे खरेदी विभागाचे पत्राव्दारे खरेदी विभागामार्फत दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.२/२४ यावर सविस्तर चर्चा होऊन मेडिमिक्स या एकाच कंपनीचे छोटे साबण घेणेऐवजी इतर छोट्या साबण निर्मात्या कंपन्यांचा समावेश करण्यात येऊन, फेर ई-निविदा मागविण्यात याव्यात. यामध्ये एका कंपनीच्या कमीत कमी ३ पुरवठाधारकांकडुन दर मागवावेत. अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. असा निर्णय झालेला आहे.

दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील वरील निर्णयान्वये इतर छोट्या साबण निर्मात्या कंपन्यांची माहिती घेऊन, फेर प्रस्ताव तयार करुन पुढील उचित कार्यवाही करावी असे खरेदी विभागामार्फत दि.२९/०३/२०१७ रोजीचे पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार स्थानिक पुरवठाधारकांकडे छोटे साबण खरेदी करणेबाबत प्रत्यक्ष चौकशी केली असता, पुढील तक्त्यात नमुदप्रमाणे साबण बाजारपेठेत उपलब्ध असल्याची माहिती मिळालेली आहे.

| अ.नं. | कंपनीचे नाव | साबणाचे नाव | वापराचा कालावधी तयार केल्यापासुन (एक्सपायरी डेट) | वजन प्रति नग | दर प्रति नग रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | चोलाईल प्रा. लि. | मेडिमिक्स | ०२ वर्ष | १२ ग्रॅम | ३/- |
| २ | चोलाईल प्रा. लि. | मेडिमिक्स | ०२ वर्ष | २५ ग्रॅम | ५/- |
| ३ | गोदरेज कंझ्युमर प्रॉडक्ट लि. | सिंथॉल | ०२ वर्ष | ३० ग्रॅम | ५/- |
| ४ | हिंदुस्थान युनिलीवर लि. | लाईफबॉय | ०२ वर्ष ०६ महिने | ३० ग्रॅम | ५/- |
| ५ | हिंदुस्थान युनिलीवर लि. | लक्स | ०२ वर्ष ०६ महिने | ३० ग्रॅम | ५/- |
| ६ | विप्रो एंटरप्रायजेस लि. | संतुर | ०३ वर्ष | ३० ग्रॅम | ५/- |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे छोटे साबण बाजार पेठेत उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे. एका रुममध्ये एका कुटूंबासाठी ३० ग्रॅम वजनाची एक साबन वडी देणे योग्य होईल.

**मागणीः-** साईआश्रम भक्तनिवास मधील वातानुकुलीत खोल्यांमध्ये व साईबाबा व व्दारावती भक्तनिवास मधील सर्व खोल्यांमध्ये साईभक्तांच्या सुविधेसाठी खालील तक्त्यात नमुदप्रमाणे साबण खरेदी करावे लागतील.

| अ.नं. | विभाग | वस्तुचा तपशील | कंपनी | अंदाजे दर प्रति नग रु. | मागणी नग | एकुण अपेक्षित खर्च रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईआश्रम भक्तनिवास | ३० ग्रॅम साबन वडी | नामांकीत कंपनीचे | ५/- | १,३८,२४० | ६,९१,२००/- |
| २ | साईबाबा भक्तनिवास | | | | १,७४,२४० | ८,७१,२००/- |
| ३ | व्दारावती भक्तनिवास | | | | १,१३,७६० | ५,६८,८००/- |
| (अक्षरी रुपये एकवीस लाख एकतीस हजार दोनशे मात्र) | | | | एकुण | **४,२६,२४०** | **२१,३१,२००/-** |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमानः-** प्रशासकीय मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत / अभिप्रायः-**

१) उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे नामांकित कपन्यांची ३० ग्रॅम साबणवडी खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत,

२) साईआश्रम, साईबाबा व व्दारावती भक्तनिवास या तिनही विभागांसाठी आवश्यक ४,२६,२४० नग साबण खरेदी विभागामार्फत ई-निविदा प्रक्रिया पध्दतीने खरेदी करणेस,

३) याकामी येणा-या एकुण अपेक्षीत खर्च रु.२१,३१,२००/- (अक्षरी रुपये एकवीस लाख एकतीस हजार दोनशे मात्र) चे खर्चास,

उपरोक्त १ ते ३ चे बाबींवर निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेमध्ये निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम, साईबाबा व व्दारावती भक्तनिवास या विभागांसाठी सिंथॉल, लाईफबॉय, लक्स व संतुर या कंपन्याच्या ३० ग्रॅम साबण वडया खरेदी करणेत याव्यात. यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **डॉ.प्रितम बाळासाहेब जपे यांचा श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये व्हिजीटींग आर्थोसर्जन या पदावर नेमणूकीसाठीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** **अधिनियम कलम २००४ तरतुद–** कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात्त येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ – "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतानासमितीनेसदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी."तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावरकिंवाकंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापननिधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –

१) दि. २२/०९/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७७०.

"पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०%वर, जनरल सर्जरी वर डॉक्टर ५५.५५% भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५ %, भुलतज्ञ १३% पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणेच जनरल वॉर्डप्रमाणेच कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व ह्दय शस्त्रक्रियाविभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रति केसनुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यास मान्यता देण्यात आली."

२) दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३७५(५)

"संस्थान रुग्णालयामध्ये व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याचीसंधी मिळावी, यासाठीबरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेमध्ये सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरिता यापुढे व्हिजीटींग पद्धतीने सेवा करण्याची इच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकारी कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. "

३) दि. ०६/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७८

"डॉ. विद्युतकुमार सिन्हा, कार्डीयाक सर्जन, डॉ. प्रशांत पवार, वरिष्ठ भुलतज्ञ यांची श्री साईबाबा रुग्णालयामध्ये झालेली प्रदीर्घ सेवा, अनुभव व कार्यक्षमता यांचा सर्वांगिण विचार करता, त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये कार्डीयाक सर्जनची विहीत पद्धतीने नेमणूक होईपर्यंत व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देणेत यावी."

तसेच डॉ. प्रितम जपे, आर्थोसर्जन यांचे बाबतीत रुग्णांना अनेक तक्रारी असल्यामुळे त्यांना व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक देणे उचित होणार नाही.

<u>प्रास्ताविक –</u>

डॉ. प्रितम बाळासाहेब जपे, यांचा दि. ०३/०३/२०१७ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

I undersigned Dr. Pritam Jape kindly request you to join me as a visiting faculty once a week in Superspeciality Hospital.

I had worked as a full time surgeon in the hospital since 2007 to 2016 Feb.

I want to work as a visiting faculty only.

अर्जासोबत डॉ. जपे यांनी एमएस (आर्थो) २००७ रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट जोडलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| पुर्ण नाव | – | डॉ. प्रितम बाळासाहेब जपे |
| पत्ता | - | इंद्रपथ, १३ बंगले, कोपरगावं, ता. कोपरगाव ४२३६०१. |
| जन्मतारीख व वय | - | ०९/०७/१९७९ ३७ वर्ष, ८ महिने |
| शिक्षण | - | एमबीबीएस २००२, एम एस आर्थो २००७ |
| नेमणूक तारीख | - | १८/०५/२००७, हजर तारीख –दि. २८/०५/२००७ |
| राजीनामा दिनांक | - | १४/०२/२०१६ |

डॉ. जपे यांनी सन २०१६-२०१७ या कालावधीत केलेल्या आर्थो जॉईंट सर्जरी टीकेआर व टीएचआर बाबतची माहिती-

| अ.नं. | वर्ष | टीकेआर | टीएचआर | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१. | २०१३ | ६२ | ७१ | १३३ |
| ०२. | २०१४ | ६४ | ७९ | १४३ |
| ०३. | २०१५ | १६ | १७ | ३३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४. | २०१६ | ०३ | ०३ | ०३ |
| | **एकूण** | **१४५** | **१७०** | **३१५** |

मंजूर आकृतीबंधानुसार आर्थोसर्जन या पदाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| **पदनाम** | **डीन, बीजे मेडीकल कॉलेज, पुणे यांनी आर्थोपेडीक सर्जन या पदासाठी प्रस्तावित केलेली शैक्षणिक पात्रता** | **मंजूर पदे** | **स्थायी स्वरुपात भरलेली पदे** | **व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात भरलेली पदे** | **स्थायी रिक्त पदे** |
|---|---|---|---|---|---|
| आर्थोपेडीक सर्जन | 1) Age not more than 45 yrs. Age relaxation of 5 yrs to candidate from reserve category. Upper limit of age will be relaxed for candidate with exceptional qualification and experience.<br>2) MBBS<br>3) MS/DNB Orthopedic surgery with minimum experience of 2 years in Orthopedic Surgery.<br>Or<br>3)FCPS surgery with minimum experience of 3 years in Orthopedic Surgery<br>4) MS-CIT<br>5) MMC/MCI Registration with renewal is mandatory. | ०३ | ०१<br>(डॉ. खुराणा) | ०६<br>(डॉ. रामराव,<br>डॉ. शिरसाठ,<br>डॉ. नाईकवाडे,<br>डॉ. चव्हाण,<br>डॉ. काळे,<br>डॉ धारस्कर) | ०२ |

डॉ. जपे हे दि. २८/०५/२००७ पासून आर्थोसर्जन पदावर कार्यरत होते त्यांनी दि. १५/०१/२०१६ पासून एक महिना पूर्व राजीनामा नोटीस दिल्याने त्यांचा आर्थोपेडीक सर्जन या पदाचा दि. १४/०२/२०१६ अखेर पासून राजीनामा मंजूर केलेला आहे. तदनंतर त्यांनी दि. १४/०१/२०१६ रोजीच्या अर्जान्वये व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक मिळणेकामी विनंती केली होती. डॉ. जपे यांचे अर्जावर निर्णय होणेकामी दि. ०६/०५/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर विषय सादर करणेत आला होता त्यावर उपरोक्त निर्णय क्र. २७८ झालेला आहे.

**मागणी-** डॉ. प्रितम जपे यांना व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक द्यावयाची झाल्यास सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसादर सादर करणेबाबत.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –** संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –** अर्जदार डॉ. प्रितम बाळासाहेब जपे यांनी आर्थोपेडीक सर्जन या पदावर व्हिजीटींग पद्धतीने नेमणूक मिळणेकामी अर्ज केला असुन त्यांचेकडे मा. डीन, बी.जे.एम.सी, पुणे यांनी प्रस्तावित केलेली शैक्षणिक पात्रता आहे. डॉ.जपे यांनी राजीनामा दिल्यापासुन टीकेआर, टीएचआर ची संख्या कमी झालेली आहे.

डॉ.जपे यांचा जॉईंट रिप्लेसमेंट व आर्थोस्कोपी सर्जरीचा अनुभव लक्षात घेता डॉ जपे यांना व्हिजीटींग पध्दतीने नेमणूक देणे उचित राहिल.

तरी, डॉ प्रितम बाळासाहेब जपे यांना व्हिजीटींग आर्थोसर्जन म्हणून नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे डॉ.जपे यांचा जॉईंट रिप्लेसमेंट व आर्थोस्कोपी सर्जरीचा अनुभव लक्षात घेता, डॉ.जपे यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये विहीत पध्दतीने स्थायी स्वरुपात पुर्णवेळ आर्थोसर्जनची नेमणूक होईपर्यंत अथवा ११ महिने कालावधीसाठी व्हिजीटींग पध्दतीने आर्थोसर्जन म्हणून नेमणूक देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **श्री.कुमावत रविंद्र शिवाजी यांचे Implant (THR) चे बीलाबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० निर्णय क्र.७०५, तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९/१०/२०१६ निर्णय क्र.६९० (०६)

**प्रास्ताविक:-** श्री.कुमावत रविंद्र शिवाजी, वय- ३२ वर्षे, प्रसादालय विभाग यांचा पाय दुखत असल्यामुळे त्यांनी श्री साईबाबा हॉस्पिटल मधील डॉ. रामाराव यांना दाखविण्यात आले होते. सदर रुग्णावर दि.२९/१२/२०१६ रोजी डॉ. रामाराव यांनी THR ची शस्त्रक्रिया केलेली आहे व त्यांनी सदर रुग्णाचे फाईलवर खालील प्रमाणे शिफारस केलेली आहे. "My patient Mr. Ravindra Kumavat is suffering from osteoarthritis of hip & has been having severe pain & restricted movement. He needed total hip replacement at the earlist and has been admitted for the same. For a better clinical outcome find for longeVity of implant, I have choosenDepox ceramic on poly THR"

सदर शस्त्रक्रिया करतांनी डॉ. रामाराव यांनी त्यांना उपरोक्त प्रमाणेImplant टाकलेले आहे. सदर Implant करीता सन २०१४-१५ चे वार्षिक औषधे खरेदीमध्ये सदर Implant चे दर हे रक्कम रु. १,३८,२००/- इतके होते. परंतू सदर रुग्णाची परीस्थिती ही नाजूक असल्यामुळे मा.वैद्यकयि संचालक यांनी M/s. Gurukrupa Enterprises, Nashikयांना सदर रुग्णाकरीता दरात सवलत देणेकामी विनंती केली होती. त्यानूसार M/s. Gurukrupa Enterprises, Nashikयांनी बील नं.१६३ दि.२९/१२/२०१६ अन्वये सदर Implant चे दर रक्कम रु. १,००,०००/- इतके दिलेले आहे.

या अगोदर अशाप्रकारे तातडीने सदरImplant खरेदी करण्यात आलेले होते त्यास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१४/०६/२०१६ निर्णय क्र.३६१ अन्वये मान्यता घेण्यात येऊन M/s. Gurukrupa Enterprises, Nashikयांचे रु.५,५८,७००/- मात्रचे बील अदा करण्यात आलेले आहे.

सदर रुग्णास उच्च प्रतीचे Implant वापरण्यात आलेले आहे, त्याकरीता सदर रुग्णाचे फाईलवर वैद्यकिय संचालक यांनी देखील अभिप्राय दिलेला आहे. त्यानूसार सदर Implant चे दरातील फरकाचीरक्कम हीरु.२०,१००/- इतकी आहे. (१,००,०००.०० – ७९,९००.०० = २०,१००.००)

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० निर्णय क्र.७०५ अन्वये श्री. भगवान नरहरी मते, लिपिक यांचे अवलंबीत आईचा बसविण्यात आलेला साधा गुडघा व महागडा गुडघा यांतील फरक रक्कम रु.३५१६४/- संबंधित कर्मचा-याकडून भरुन घेण्यात यावा, असे ठरले होते. त्यानुसार श्री. भगवान नरहरी मते यांचेकडून सदर रक्कम भरुन घेण्यात आलेली आहे.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०९/१०/२०१६ निर्णय क्र.६९० (०६) अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल वश्री साईनाथ रुग्णालयामध्ये वैद्यकिय बिलात देण्यात येणा-या सवलतींची सुधारीत नियमावली सादर करण्यात आलेली आहे. त्यामधील मुद्दा क्र.१९. रुग्णाने किंवारुग्णाचे नातेवाईकाने Implant वापरण्याची मागणी केल्यास, त्या रुग्णाला Implant चे बीलामध्ये सवलत दिली जाणार नाही, तसेच उच्च प्रतीचे Implant वापरावयाचे झाल्यास हॉस्पिटलचे बील यामध्ये कोणतीही सवलत लागू राहणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** त्यानूसार डॉ.रामाराव व वैद्यकिय संचालक यांचे शिफारशीनुसार उपरोक्त बिलाचे व मंजूर रक्कमेतील फरकाची रक्कम रु.२०,१००/- सवलत मिळणेकामीच्या प्रस्तावावर निर्णय होणेकामीचा तसेच M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचेकडून सदर Implant खरेदीस व याकामी आलेल्या रक्कम रु.१,००,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.४४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **M/s. Gurukrupa Enterprises, Nashik यांचेकडून खरेदी केलेल्याण Implant चे खरेदीस व खर्चास कार्योत्तर मंजूरी घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील ऑर्थोपेडीक विभागात रुग्णांवर वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यानूसार Girase Babanbai Sattarshing व Kale Bhaskar Pandurang या रुग्णाची शस्त्रक्रिया व औषधोपचाराकरीता होणारा खर्च भागविण्यासाठी मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून अर्थसहाय्य मंजूर केलेले असून सदरहू रक्कम श्री साईबाबा रुग्णालयाच्या नावे काढलेला स्टेट बॅंकवरील UTR नंबर अन्वये जमा करण्यात आलेले आहे.

त्यानूसार मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मंजूर केलेले रक्कम रु.१,८७,५००/- इतके अर्थसहाय्य संस्थानचे वित्त विभागात जमा आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| **Sr. No.** | **Name of Item** | **UTR No.** | **Amount** |
|---|---|---|---|
| 1 | Girase Babanbai Sattarshing | MAHB160932551453<br>SBIN716093942299 | 1,00,000.00 |
| 2 | Kale BhaskarPandurang | MAHB162584635597<br>SBIN516258340580 | 87500.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | **1,87,500.00** |

त्यानुसार Girase Babanbai Sattarshing या रुग्णावर डॉ. खुराणा यांनी TKR (Total Knee Replacement) ची शस्त्रक्रिया केलेली आहे तर Kale BhaskarPandurang या रुग्णावरडॉ. खुराणा यांनी THR ची शस्त्रक्रिया केलेली आहे.

सन २०१५-१६ चे वार्षिक औषधे खरेदीमध्ये सदर Implant चे दर प्राप्त झालेले नव्हते. त्यामुळेया अगोदर अशाप्रकारे तातडीने सदरImplant खरेदी करण्यात येऊन त्यास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१४/०६/२०१६ निर्णय क्र.३६१ अन्वये मान्यता घेण्यात येऊन M/s. Gurukrupa Enterprises, Nashikयांचे रु.५,५८,७००/- मात्रचे बील अदा करण्यात आलेले आहे.

त्याचप्रमाणेJ & J कंपनीचे अधिकृत विक्रेते M/s. Gurukrupa Enterprises, Nashikयांचेकडून सदर Implant खरेदी करण्यात आलेले आहे.

त्याचातपशील खालीलप्रमाणे –

| **S. N.** | **Name of Item** | **Bill No. & Dt.** | **Rate Per in Rs.** | **Total Amt. in Rs.** |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Gurukrupa Enterprises, Nashik | 1112 – 31/05/2016 | 79900.00 | 79900.00 |
| 2 | M/s. Gurukrupa Enterprises, Nashik | 011 – 18/10/2016 | 79900.00 | 79900.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **159800.00** |

उपरोक्त दोनही रुग्णावरशस्त्रक्रिया करणेकरीता J & J कंपनीचे Implant खरेदीकामी रक्कम रु.१,५९,८००/- इतका खर्च आलेला आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त दोनही रुग्णावरशस्त्रक्रिया करणेकरीता J & J कंपनीचे Implant खरेदीकामी रक्कम रु.१,५९,८००/- इतका खर्च आलेला आहे.

तरी उपरोक्त Implant (TKR Set)चे केलेल्या खरेदी व याकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता असावी.

**निर्णय क्र.४४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रीकीकरणासह स्वच्छता कामाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी दि.२७ मार्च २०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेचे निर्णयाने मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/पीआरओ/१/६८/२०१७ दि.१२ एप्रिल २०१७ रोजीचे पत्रान्वये व ई-मेलव्दारे दि.०१ मे २०१७ ते दि.३० एप्रिल २०१८ या एका वर्षाचे कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यास अनुसरुन सदर कार्यादेश स्विकारले संदर्भातील त्यांचे दि.१३ एप्रिल २०१७ रोजीचे स्विकृतीपत्र मिळाल्याने मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांना उर्वरित अनामत रक्कम जमा करुन रितसर करारनामा करणेकामी वेळोवेळी संपर्क करण्यात आला. दि.२७ एप्रिल २०१७ रोजीचे ई-मेलव्दारेही अवगत करण्यात आले असता त्यांनी करारनामा करण्यापूर्वी त्यांचे दि.१८ व दि.२५ एप्रिल २०१७ रोजीचे मा.अध्यक्ष, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी यांना पाठविलेल्या पत्राबाबत खुलासा मिळावा असे दि.२७ एप्रिल २०१७ रोजीचे ई-मेलव्दारे इकडील कार्यालयास कळविले होते. त्यानुसार त्यांना जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/ पीआरओ/ ३७१/ २०१७, दि.०४ मे २०१७ रोजीचे पत्रान्वये खुलासा कळवून उर्वरित अनामत रक्कम जमा करुन रितसर करारनामा करुन काम सुरु करणेस दि.१५ मे २०१७ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

त्यानंतर मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांनी दि०६ मे २०१७ रोजीचे पत्रान्वये, मला जुलै २०१७ पासून वाढ द्याल किंवा हा कार्यादेश रद्द करून निविदेच्या कामाच्या जबाबदारीतुन मुक्त कराल असे कळविले आहे. सदर पत्रानुसार मे. श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई हे निविदा व कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार निविदा कालावधीत मंजुर दरात काम करण्यास असमर्थता दर्शवित आहे.

**<u>सध्यस्थिती –</u>** मे. श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांनी अद्याप उर्वरित अनामत रक्कम जमा करून रितसर करारनामा करून कामकाज सुरु केलेले नाही. त्यामुळे मे.बी.व्ही.जी. इंडीया लि. पुणे यांचेकडून पुढील कार्यवाही पुर्ण होई पर्यंत मागिल मंजुर दरात कामकाज सुरू ठेवले आहे.

**<u>मा.व्यवस्थापन समिती निर्णय-</u>** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९ सप्टेंबर २०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६५ नुसार, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे दि २७ मार्च २०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.२२५ नुसार, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाच्या यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी, मे. श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांचे एकत्रित रु२,१९,३६,३७२/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा असा निर्णय झाला.

**<u>मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांची मागणी-</u>** दि.१८ एप्रिल २०१७ रोजीच्या पत्रात, कदाचित १ जून २०१७ पासून राज्यातील कर्मचा-यांच्या बेसिक व महागाई भत्ता यात फार मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. केंद्रीय कर्मचा-यांना ४०% भरमसाठ वाढ १९ जानेवारी २०१७ पासून लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्य सरकारनेही ही वाढ लागू केल्यास सदरची वाढ खुप मोठ्या प्रमाणात असण्याची शक्यता असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ह्यांनी ही वाढ आम्हाला करुन द्यावी, असे नमूद केले आहे.

त्यानंतर मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांनी दि०६ मे २०१७ रोजीचे पत्रात, मला जुलै २०१७ पासून वाढ द्याल किंवा हा कार्यादेश रद्द करून निविदेच्या कामाच्या जबाबदारीतुन मुक्त कराल, असे नमुद केले आहे.

**<u>निविदेतील अटी व शर्ती –</u>** निविदेतील अटी व शर्ती क्र.३७ व कार्यादेशातील अटी व शर्ती क्र.१३ मध्ये, सदर कामासाठी लावणेत येणा-या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यानिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडंड फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जसह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबत सर्व कायदेशीर जबाबदारी आपली राहील. यापैकी कोणतीही जबाबदारी संस्थान घेणार नाही. कर्मचारी वेतन कायदा १९३६, कर्मचारी नुकसान भरपाई १९६१, कर्मचारी जबाबदार कायदा १९३८, कर्मचारी नियमीत करणे व काढून टाकणेचा कायदा १९७९ नूसार वेळोवेळी झालेल्या कायदेशीर सुधारणा आपणावर बंधनकारक राहतील. असे नमुद केले आहे.

निविदेतील अटी व शर्ती क्र.४६ मध्ये, निविदेमध्ये नमुद केलेल्या दरामध्ये कामगार वेतन, कामगारांसाठी देण्यात येत असलेल्या सोई सवलती करीता येणारा खर्च, केमिकल, कन्झुमेबल साहित्य, मशिनरी भाडे, मशिन दुरूस्ती व देखभाल व व्यवस्थापन खर्च आणि नफा यांचा समावेश असावा, असे नमुद केले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांनी भविष्यातील होणा-या किमान वेतन वाढीबाबत खुलासा मागितला होता. निविदेतील व कार्यादेशातील अटी व शर्ती नुसार कंत्राटदाराने मंजुर दरात त्यांचेकडील कर्मचा-यांना किमान वेतन देणे बंधनकारक आहे निविदेमध्ये नमुद केलेल्या दरामध्ये कामगार वेतन, कामगारासाठी देण्यात येत असलेल्या सोई सवलती करीता येणारा खर्च, केमिकल, कन्झुमेबल साहित्य, मशिनरी भाडे, मशिन दुरूस्ती व देखभाल व व्यवस्थापन खर्च आणि नफा यांचा समावेश आहे. त्यामुळे मे. श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांचे पत्राचा विचार करता येणार नाही, असे नम्र मत आहे.

तसेच मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांनी कार्यादेशानुसार दि०१ मे २०१७ रोजी पासून कामकाज सुरु केलेले नाही. निविदेतील अटी व शर्ती नुसार निविदा मंजुर झाल्याचे कळविले पासून १५ दिवसांच्या आत करारनामा करुन देणे बंधनकारक असतानाही करारनामा करुन दिलेला नाही. कंत्राटदाराने निविदा व कार्यादेशातील अटी व शर्तीचा भंग केलेला आहे. कंत्राटदारास दि.१५ मे २०१७ रोजी पर्यंत उर्वरित अनामत रक्कम संस्थानमध्ये जमा करुन तातडीने रितसर करारनामा करुन देण्यास मुदत देण्यात आली होती. त्यानंतरही कंत्राटदाराने कामकाज सुरू न करता निविदा कालावधीत मंजुर दरात काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने सदरचा कार्यादेश रद्द करुन त्यांची बयाणा रकमेच्या स्वरुपात प्राप्त झालेली रक्कम रु.२,२८,०००/- (दोन लाख अठाविस हजार मात्र) जप्त करुन नविन ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागेल, असे नम्र मत आहे.

**मागणी-** मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांची बयाणा रकमेच्या स्वरुपात प्राप्त झालेली रक्कम रु.२,२८,०००/- (दोन लाख अठाविस हजार मात्र) जप्त करुन कार्यादेश रद्द करणे व नविन ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामीच्या ई-निविदाप्रक्रियेमधील निम्नतम दरधारक मे.श्री राम इंटरप्रायसेस, मुंबई यांना कार्यादेश देण्यात येऊनही त्यांनी आजतागायत कामास सुरुवात केलेली नाही, यावरुन ते सदरहू काम करणेस असमर्थ आहेत, असे निदर्शनास येते. याकरीता त्यांना देण्यात आलेला कार्यादेश रद्द करणेत येऊन, त्यांची संस्थानकडे असलेली रु२,२८,०००/- मात्र बयाणा रक्कम जप्त करणेत यावी. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **सन २०१७-१८ करीताचे तांदुळनमुन्याचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

**प्रास्तविक:-** उपरोक्त विषयांस अनुसरुन, सन २०१७-२०१८ सालाकरीता श्री साई प्रसादालयातील तांदुळ खरेदीबाबत खरेदी विभागाकडून प्राप्त झालेल्या तांदुळाच्या नमुन्यातील खालीलप्रकारचे काही नमुने, किराणा माल निवड समितीने (डॉ.गायकवाड, डॉ.कड हे दोनही शास्त्रज्ञ, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी तसेच श्री सांबारे व श्री कर्डीले, आचारी श्री साई प्रसादालय) प्रसादालय विभागाकडे शिजवून पाहणेकामी पाठविले होते.

१) इंद्रायणी नमुना – १ ४) सोना मसुरी - B
२) इंद्रायणी नमुना – २ ५) सोना मसुरी - C
३) इंद्रायणी नमुना - ३

उपरोक्त पाचही प्रकारचे नमुन्यांचे तांदुळ प्रसादालयातील वेगवेगळया सोलर कुकरमध्ये शिजवून, सदर शिजवलेले तांदुळ (भात) किराणा माल निवड समितीस दाखविला असता, समितीने सदर पाचही नमुन्यांचा भात हा शिजविल्यानंतर चिकट झाला असून तो भक्तांना प्रसादभोजनात देणेस योग्य नाही असे मत व्यक्त केलेले आहे.

तदनंतर सदरचे पाचही शिजविणेत आलेल्या भाताचे नमुने, मा.व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष, श्री कदम साहेब, सदस्य श्री तांबे साहेब, सौ.शेळके मॅडम व मा.कार्यकारी अधिकारी मॅडम तसेच मुख्यलेखाधिकारी श्री घोरपडे साहेब यांना दाखविला असता, सदर भात चिकट असल्याचे त्यांचेही निदर्शनास आलेले आहे.

यावर, मा.कार्यकारी अधिकारी मॅडम यांनी अशा सुचना केल्या की, "प्रसादालयातील आचारी हे प्रत्यक्ष काम करत आहेत. त्यांना ज्या अडीअडचणी येतात त्याचा विचार करुन त्यांना आवश्यक असलेला (तयार करणेसाठी व वितरण करणेसाठी योग्य) तांदुळ खरेदी करणेसाठी त्यांचे सुचनांचा विचार करुन खरेदी विभागाकडून तांदुळाबाबत किराणा माल निवड समितीचे खालील मागणीप्रमाणे नव्याने ई-टेंडर मागवून तांदुळ खरेदी करावा" असे निर्देश दिलेले आहेत.

१) सोना मसुरी जुना - a) मदर इंडिया, b) एच.एम.टी, c) सोना स्टीम
२) जुना घोटी - a) कोळपी
३) आंबेमोहोर -
४) अखंड बासमती - a) कोहीनूर b) सेला

**मागणी:-** सन २०१७-२०१८ करीता मागविणेत आलेला तांदुळाचा भात शिजवल्यानंतर चिकट झालेला असल्याने वाढणेकामी अडचणीचे होणार आहे तसेच प्रसादभोजनात चिकट भात देणे योग्य होणार नाही. याबाबत भक्तांच्या तक्रारी येणे नाकारता येणार नाही. करीता साईभक्तांना वाढणेसाठी सोपा व मोकळा शिजणारा, चिकट न होणारा तांदुळ नव्याने ई-टेंडर मागवून खरेदी करावा लागेल. असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान:-** आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी उपरोक्तप्रमाणे सन २०१७-२०१८ करीता दिनांक १२/०५/२०१७ रोजी निवड समितीने निर्देश दिलेनूसार वरीलप्रमाणे तांदुळ ई-टेंडर मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ साठी आवश्यक असणारा तांदूळ जुना सोना मसुरी या जातीचा खरेदी करण्यात यावा, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs, Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणेसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:** अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.२०९ खालीलप्रमाणे समंत करण्यात आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, दादर, मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रुफिंग व संस्थान वापरामध्ये असलेल्या भागाची प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. या ठिकाणी संस्थानच्या नावाचा नवीन फलक बसविणेत यावा व लिफ्ट बसविणेसाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच कार्यकारी अधिकारी व समिती सदस्यांनी या इमारतीची पाहणी करावी, असे ठरले."*

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीची दादर (मुंबई) येथे "साई निकेतन" ही ०४ मजली इमारतआहे. उपलब्ध कागदपत्रांच्या अधारे असे दिसून येते की, १९३४-१९३५ च्या दरम्यान या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात्त आले आहे. सदरहू इमारत ही सन १९६० रोजी साईबाबा संस्थान मार्फत खरेदी करण्यात आलेली आहे.

संस्थानचे दादर येथील साईनिकेतन इमारतीमध्ये संस्थान तर्फे प्रकाशीत करण्यात येणारी सर्व पुस्तके, फोटो व इतर साहित्य विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आहे. तसेच या ठिकाणी संस्थानतर्फे प्रकाशीत करण्यात येणारे "श्री साईलिला" हे द्वैमासीक मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांमधून प्रसिद् ध करण्या त येते. तसेच साईभक्तांकडून

चेक, मनिऑर्डर, डी.डी. व रोख स्वरुपात अदा करण्यात येणारी देणगी स्विकारण्यात येते. तसेच साईभक्तांना शिर्डी येथे जाण्याचा मार्ग, निवासव्यवस्था, मंदिरातील कार्यक्रम उत्सव इत्यादी बाबत माहिती व मार्गदर्शन करण्यात येते. तसेच गरजु साईभक्तांना संस्थानतर्फे वैद्यकिय मदतीबाबत माहिती देणेत येते. या ठिकाणी साईबाबांची मुर्ती ठेवण्यात आलेली असून साईभक्त तिच्या दर्शनाचा लाभ घेतात. दर गुरुवारी तेथे आरती करण्यात येते.

संस्थानचे मुंबई येथील साईनिकेतन दादर या इमारतीचे स्ट्रक्चयरल ऑडीट करणेसाठी म्हाडा मुंबई बिल्डींग रिपेअर्स अॅण्ड् रिकन्ट्रक्शन बोर्ड तर्फे कार्यकारी अभियंता, एफ. एन. डिव्हीजन, एम.बी. आर. अॅण्ड आर. बोर्ड, मुंबई यांचे जा नं. ई ई / एफ एन/४००१/ ५८/२०१५ यांनी दि.१७/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. सदर इमारतीचा वापर सुरु झालेनंतर तिस वर्षांनी नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून झारत वापरासाठी योग्य/ असल्याचे प्रमाणपत्र घेवून आयुक्त, म्हाडा, मुंबई यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे त्याचसाठी म्हाडा यांचे MBR & R बोर्डाकडे नोंदणीकृत स्ट्रयक्चरल इंजिनिअर यांचेकडून साईनितेकन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेत आली. त्यापैकी Barve Consultant, Chembur, Mumbai यांनी नाममात्र रु.१/- मात्र अधिक १४.५% सर्व्हिस टॅक्स इतक्या फी ची मागणी केली होती. त्यानुसार त्यांना इकडील जा नं.६१६९/२०१६ दि.०८/०२/२०१६ अन्वये या कामासाठी कार्यादेश देणेत आला होता.

Barve Consultants, Chembur, Mumbai यांनी संपूर्ण इमारतीची पाहणी केली व छायाचित्रे घेतली. तसेच आवश्यकतेनुसार NDT तपासण्या करुन सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन दिले असून, त्याचा रिपोर्ट त्यांनी दि.१८/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये सादर केला आहे. सदरचा अहवाल मुंबई महानगरपालीका आयुक्त व कार्यकारी अभियंता, FN Divison, M.B.R.& R.Board यांना संस्थानचे जा.क्र. २१३४/२०१६, दि.३०/०७/२०१६ रोजीचे पत्राव्दारे सादर केलेला आहे. सदरचे रिपोर्टमध्ये बर्वे कन्सल्टंट यांनी नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती देखभालीचे काम करणेसाठी त्यांनी सादर केलेले रु.१९,६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला असता सदरहू प्रस्तावाबाबत वरीलप्रमाणे निर्णय क्र. २०९ संमत करणेत आलेला आहे.

तसेच दि.२६/०४/२०१७ रोजी मा. कार्यकारी अधिकारी महोदया, यांनी संस्थानचे संबंधित अधिकारी व श्री. सुहास बर्वे, कन्सल्टंट, मुंबई यांचे समवेत सदरहू इमारतीची पाहणी करुन संस्थान वापरात असलेले कार्यालय, कार्यकारी अधिकारी निवास कक्ष व मा. विश्वस्त निवास कक्ष यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या, फेरबदल व नूतनीकरण करण्यात यावे अशा सूचना दिल्या आहेत. त्यानुसार आवश्यकतेनुसार नविन सिपोरेक्स विटा वापरुन बांधकाम करणे,व्हिट्रीफाईड फ्लोअरींग टाईल्स बसविणे, अॅल्युमिनीअम स्लायडींग विंडो बसविणे, अंतर्गत लस्टर पेंटने रंगकाम करणे तसेच फॉल्स सिलींग पार्टीशन, कॉन्फरंस टेबल, रिसेप्शन काऊंटर व सोफा, चेअर्स याशिवाय जी.आय. पाईप लाईन व वॉटरप्रुफींग करणे याकामांसाठी सल्लागार बर्वे कन्सल्टंटस यांनी त्यांचे दि.२७/०४/२०१७ रोजीचे ई-मेलव्दारे खर्च कळविला आहे. तसेच मेकॅनिकल विभागामार्फत दि.२७/०४/२०१७ रोजीचे ई-मेलव्दारे सदर ठिकाणी ९ ए.सी. बसविणेकरीता रु.४,२३,०००/- मात्र खर्च कळविलेला आहे. त्यानुसार साईनिकेतन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट नुसार करावयाच्या दुरुस्तीच्या कामांकरीता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

खालीलपैकी विद्युत कामांसाठीचा खर्च हा सल्लागार यांनी सादर केलेल्या ढोबळ अंदाजपत्रकानुसार आहे.

| Sr. No. | Description of Item | Estimated Amount |
|---|---|---|
| 01 | Structural repairs. Water proofing to terrace, external Plumbing, painting etc. | 19,65,000/- |
| 02 | Civil Works | 21,35,378/- |
| 03 | Furniture Works | 22,03,975/- |
| 04 | Plumbing works | 7,89,188/- |
| 05 | Air Conditioning works | 4,23,000/- |
| 06 | Electrical works | 17,25,000/- |
| | Total Amount Rs. | 92,41,541/- |
| | Add Consultancy Fee Rs. | 5,70,000/- |
| | **Total Estimated Cost Rs.** | **98,11,541/-** |

**प्रस्ताव:** वर नमूद केलेप्रमाणे स्ट्रक्चर रिपेअर्स व इतर कामांसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार एकूण अंदाजे रु.९८,११,५४१/- इतका खर्च अपेक्षित आहे. तथापी यापैकी स्ट्रक्चरल रिपेअर्सचे काम हे विशेष (Specialized) स्वरुपाचे असून ते पहील्या टप्प्यात पूर्ण करुन घेणे आवश्यक आहे. तरी त्याकरीता सदरहू प्रस्तावाबाबत खालिल बाबींविषयी निर्णय होणे आवश्यक आहे.

1. वर नमूद कामांसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार येणारे रु.९८,११,५४१/- इतक्या खर्चास मान्यता देणे.
2. त्यापैकी पहील्या टप्प्याचे अंदाजे रु.२० लक्ष खर्चाचे स्ट्रक्चरल रिपेअर्सचे कामासाठी मे.बर्वे कन्सल्टंटस् , मुंबई यांनी दिलेल्याफीचे प्रस्तावाबाबत त्यांचेशी चर्चा/वाटाघाटी करुन फी निश्चित करणे व त्यांची सदर पहिल्या टप्प्याचे कामासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणे.
3. पहील्या टप्प्याचे स्ट्रक्चरल रिपेअर्स कामासाठी सल्लागार यांचेमार्फत सविस्तर अंदाजपत्रक व निविदा तयार करुन ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.
4. वरीलपैकी स्ट्रक्चरल रिपेअर्स वगळता इतर कामे दुस-या टप्प्यात हाती घेणेसाठी सल्लागार नेमणुकीकरीता ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.

तरी वरील बाबींविषयी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीची दुरुस्ती (Structural Repairs, Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **साईभक्तांना मार्गदर्शनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ह्या वेबसाईटचे नुतनीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी पात्र ई-निविदांचे तांत्रिक सादरीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी-सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९.०९.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५६

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६५

**प्रास्ताविक:-** साईभक्तांना मार्गदर्शनाकरीता संस्थानमार्फत www.sai.org.in हि वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. अधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन वेबसाईटचे अद्यायावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेस मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन,निर्णय क्र.८६५ अन्वये, वेबसाईटचे नुतनीकरण तसेच मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.१४.०२.२०१७ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, दि.२३.०२.२०१७ ते दि.२५.०३.२०१७ या कालावधीमध्ये सदरकामी ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेली होती. सदर कालावधीमध्ये एकुण १६ निविदाधारकांच्या ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त निविदांच्या ऑनलाईन तांत्रिक निविदा व बंद लिफाफे दि०३.०४.२०१७ रोजी मा. खरेदी समिती समोर उघडणेत आलेल्या असून त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| Sr No | Name of Bidder | Tender Fess Rs 3000 | EMD Rs 50000 | Firm Registration | Pan/ST no | ITR | Bal sheet | TURNOVER > 30,00,000 | Client List |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CRISP- Center for Research and Industrial Staff performance | ICICI 500766 | ICICI 500767 | 5072/97 | AAATC1353N | 2014-2015 2015-2016 | 2014-2015 2015-2016 | YES | 45 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | Marketing Mindz | ICICI 502701 | ICICI 502702 | 080122109014-II JAIPUR | AEZPG6224R | 2015-2016 2016-2017 | 2015-2016 2016-2017 | YES | 5 |
| 3 | Cronj IT Technologies Pvt Ltd, Banglore | SBI-934269 | SBI-934270,71 (20000 + 30,000) | U72300TG2014PTC094765 | AAFCC7018Q AAFCC7018QSD001 | 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 | YES | 5 |
| 4 | Solaramengg project Pvt Ltd, New delhi | CB-664816 | CB-664815 | U29299DL2001PTC110283 | AAFCS5627P | 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 | YES | 6 |
| 5 | Business News and Information Services Pvt Ltd | HDFC 001082 | HDFC 001083 | 55-63154 Delhi | AAACB5323J AAACB5323JST001 | 2014-2015 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 2016-2017 | YES | 68 |
| 6 | Vidya Online Services Pvt Ltd Pune. | PNB-018671 | PNB-018670 | U72200PN2011PTC140684 1631000310207576 | AADCV8712A AADCV8712ASD001 | 2014-2015 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 | YES | 10 |
| 7 | Web Werks, Mumbai CMMi3 | ICICI-002989 | ICICI-002988 | 11-127830 Mumbai | AAACW3955H AAACW3955HST001 | 2014-2015 2015-2016 | 2014-2015 2015-2016 | YES | 6 |
| **8** | **InfoigySolapur** | **Eco 243217** | **Eco 243216** | **II8192/98 Solapur 16/03/2014** | **BJVPS0041J** | **2014-2015 2015-2016** | **2014-2015 2015-2016** | **NO** | **6** |
| 9 | Pinnacle Teleservices Pvt Ltd | ICICI 007042 | ICICI 007041 | U64200MH2008PTC181473 | AAECP7015K AAECP7015KST001 | 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 | YES | 14 |
| 10 | Cyfuture India Pvt Ltd CMMI5 | IDBI - 019841 | IDBI019840 | U72200RJ2001PTC017138 | AABCC7015R AABCC7015RST001 | 2014-2015 2015-2016 2016-2017 | 2013-2014 2014-2015 | YES | 25 |
| 11 | Cygnet InfotechPvt Ltd Ahmedabad | ICICI-061066 | ICICI-061067 | 04-38563 GUJ | AABCC5127A AABCC5127AST001 | 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 | YES | |
| 12 | Xtensible Software Technologys Pvt Ltd Pune. | HDFC-015904 | HDFC - 015903 | U72200PN2005PTC020108 | AAACX0365Q AAACX0365QSD001 | 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 | YES | 16 |
| 13 | Bharti Web Private Ltd Nagpur | IDBI-009388 | IDBI-9389 | U72200MH2001PTC130997 | AABCN7340Q AABCN7340QSD001 | 2014-2015 2015-2016 | 2014-2015 2015-2016 | YES | |
| 14 | KrishCompusoft Services Pvt Ltd Ahmedabad | SBI585700 | SBI-585699 | U72500GJ2007PTC050967 | AADCK2319L AADCK2319LSD001 | 2015-2016 2016-2017 | 2014-2015 2015-2016 | YES | 18 |
| 15 | EQL Business Solutions Pvt Ltd Pune | UBI-006176 | UBI-006175 | U72200PN2001PTC16359 | AABCE0909BJ AABCE0909BJSD001 | 2014-2015 2015-2016 2016-2017 | 2012-2013 2013-2014 2014-2015 | YES | 15 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 16 | YTR Technologies Private Limited Vishakhapatnam | SBI-934281 | SBI-934280 | U72200AP2011PTC077308 | AACCJ7027K AACCJ702KSD001 | 2014-2015 2015-2016 2016-2017 | 2013-2014 2014-2015 2015-2016 | YES | 5 |

तांत्रिक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता केलेले उपरोक्त तक्त्यातील १६ निविदाधारकांचे तांत्रिक सादरीकरण घेणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे तांत्रिक सादरीकरण घेऊन किमान ७० % गुण प्राप्त केलेल्या निविदाधारकांना पात्र ठरविता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे वेबसाईट अद्यायावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता केलेल्या १६ निविदाधारकांचे तांत्रिक सादरीकरण घेऊन किमान ७०% गुण प्राप्त केलेल्या निविदाधारकांना पात्र ठरविणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त नमुद केलेप्रमाणे वेबसाईट अद्यायावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी तांत्रिक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता केलेल्या १६ निविदाधारकांचे तांत्रिक सादरीकरण घेऊन किमान ७०% गुण प्राप्त केलेल्या निविदाधारकांना पात्र ठरविणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.४४५** **आजचे सभेत वेबसाईट अद्यायावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी प्राप्त झालेल्या १६ निविदाधारकांपैकी १२ निविदाधारकांनी सभेसमोर याबाबतचे सादरीकरण केले. त्याचे सादरीकरणाचे परिक्षण करुन समितीने त्यास खालीलप्रमाणे गुण दिले.**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|---|
| 1 | CRISP-Center for Research and Industrial Staff performance | 80 |
| 2 | Cronj IT Technologies Pvt Ltd, Banglore | 72.5 |
| 3 | Solaramengg project Pvt Ltd, New delhi | 72.5 |
| 4 | Vidya Online Services Pvt Ltd Pune. | 75 |
| 5 | Web Werks, Mumbai CMMi3 | 72.5 |
| 6 | Infoigy Solapur | 35 |
| 7 | Pinnacle Teleservices Pvt Ltd | 80 |
| 8 | Cyfuture India Pvt Ltd, CMMI5 | 70 |
| 9 | Xtensible Software TechnologysPvt Ltd Pune. | 45 |
| 10 | Bharti Web Private Ltd Nagpur | 75 |
| 11 | Krish Compusoft Services Pvt Ltd, Ahmedabad | 47.5 |
| 12 | YTR Technologies Private Limited, Vishakhapatnam | 77.5 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानची अधिकृत वेबसाईटचे अद्यायावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी प्राप्त झालेल्या उपरोक्त निविदाधारकांपैकी तांत्रिक बाबींमध्ये पात्र असलेल्या व सादरीकरणामध्ये कमीत-कमी ७० गुण धारण केलेल्या निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा विहीत पध्दतीने उघडणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.४४६** व्योमपाडा दास, अध्यक्ष, हरेकृष्णा मुव्हमेंट यांनी त्यांचे अक्षयपात्र योजनेअंतर्गत शहरी भागातील गरीबगरजु लोकांना शिजवलेले अन्नाचा पुरवठा करणेसाठी संस्थानकडून बॉडीबिल्डींगसहीत (Distribution Vessels) वाहनांची मागणी केली आहे. तरी त्यांचेकडून याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मागविणेत येऊन व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा व त्यांनाही सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**निर्णय क्र.४४७** आजचे सभेत गेट नं.४ चे समोरच्या सर्व्हे नं.१ मधील दुकानदारांनी सभेसमोर येऊन, दि.०५.०४.२०१६ रोजी, मा.ना.मुख्यमंत्री श्री.देवेन्द्रजी फडणवीस साहेब, मा.श्री.अनिलजी कवडे साहेब (जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य, त्रिदस्य समिती), श्री.कुंदनकुमार सोनवणे, (उपविभागीय अधिकारी, शिर्डी तथा कार्यकारी अधिकारी) व दुकानदार प्रतिनिधी यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी होणेबाबतचे निवेदन समिती सभेस दिले.

या निवेदनावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०५.०४.२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे दालनात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व निवेदनामधील मुद्द्यांच्या अनुषंगाने या दुकानदारांचे पुनर्वसन करणेसाठी, या दुकानदारांनी मागणी केलेल्या जागेची पहाणी करुन, महसुल विभागासोबत चर्चा करावी. तसेच याबाबतच्या सर्व कायदेशीर बाजु व मा.सर्वोच्च न्यायालयाचा आदेश याचा सर्वांगीन अभ्यास करुन पुढील कार्यवाही करावी, असे मा.कार्यकारी अधिकारी यांनी मत प्रदर्शित केले.

परंतु सर्व्हे नं.१ मधील दुकानदार अतिक्रमीत झालेले असून त्यांचे पुनर्वसन करणेसाठी या दुकानदारांना त्यांनी मागणी केलेली जागा देण्यात यावी व दुकानदारांनी सर्व्हे नं.१ मधील अतिक्रमण हटवावे असे समिती सदस्यांनी मत मांडले, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच दुकानांसाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या सदरहु दुकानदारांनी प्राप्त करुन घ्याव्यात, असे त्यांना कळविणेत यावे. याचबरोबर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दुकानदारांना नुकसान भरपाई देणेकामी मा.उच्च न्यायालयामध्ये जमा केलेली संस्थानची रक्कम परत घेणेसाठी कायदेशीर कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

**निर्णय क्र.४४८** श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व), जि.ठाणे यांनी त्यांचे मालकीच्या मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भूखंड क्रं.१ मधील बी व डी इमारती देणगी स्वरुपात संस्थानला दिलेल्या आहेत. आजचे सभेत ते उपस्थित होते व त्यांनी समिती सभेसमोर सदरहू इमारतीची ताबा पावती मा.अध्यक्ष महोदय यांना दिली. त्यानंतर सभेने त्यांचा व त्यांचे सहकाऱ्यांचा शॉल, श्रीफळ व उदी देऊन सत्कार केला.

या देणगी मिळालेल्या इमारतींमध्ये उपेक्षित, वंचित, आदिवाशी तसेच खेडोपाडयामधील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी आय.ए.एस. ॲकॅडमी सुरु करणेचा यापुर्वीच समितीने निर्णय संमत केलेला होता. यावेळी मा.अध्यक्ष महोदय यांनी सभेस माहिती दिली की, सेवानिवृत्त जेष्ठ सनदी अधिकारी श्री.सुधीर ठाकरे यांनी विनामोबदला या ॲकॅडमीच्या गव्हर्निंग कौन्सीलचे अध्यक्षपद स्विकारणेस संमती दिलेली आहे. श्री.सुधीर ठाकरे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे ३ वर्ष अध्यक्ष होते. दि.०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवास प्रारंभ होत असून, त्याच दिवशी सदरहू आय.ए.एस. ॲकॅडमी सुरु करण्यात यावी. यासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना याकामी नेमणूक पत्र देणेकामी व गव्हर्निंग कौन्सीलसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच आय.ए.एस. ॲकॅडमीसाठीची सविस्तर नियमावली तयार करणेत येऊन, ती समिती सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कनिष्ठ महाविद्यालय)

---

**निर्णय क्र.४४९** सर्व साईभक्तांना श्रींना वस्त्र चढविणेसाठी समान संधी मिळावी, याकरीता मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार सध्या सोडत पध्दतीने वस्त्रांची निवड केली जाते. यामध्ये व्यवस्थापन समिती सदस्यांनाही श्रींना वस्त्र चढविता यावे, यासाठी प्रत्येक गुरुवारी काकड आरतीसाठी व प्रत्येक रविवारी माध्यान्ह आरतीसाठीची वस्त्रे राखीव ठेवण्यात यावी. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी/ मंदिर विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.४५०** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा कन्याशाळा व कनिष्ठ महाविद्यालय नावाजलेले असून तेथे कला, वाणिज्य व विज्ञान शाखेमध्ये जवळपास १३५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इ.१२ वी नंतर उच्च शिक्षणाची सुविधा नसल्याने शिर्डी व परिसरातील विद्यार्थी/ विद्यार्थीनींना उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागते. याकरीता यापुर्वीचे व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७(४) व दि.०६.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९६४ अन्वये शिर्डी येथे संस्थानचे कला, वाणिज्य, विज्ञान शाखेचे वरीष्ठ महाविद्यालय सुरु करणेस तसेच त्यासाठी राहाता तालुक्याचा बृहद आराखडयात समावेश करणेस मान्यता मिळालेली आहे. याचा पाठपुरावा करणेत येऊन, पुढील शैक्षणिक वर्षामध्ये शासन मान्यता मिळून वरीष्ठ महाविद्यालय सुरु करता येईल, अशी कार्यवाही करणेत यावी. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**निर्णय क्र.४५१** पुर्वी ठरलेप्रमाणे प्रत्येक सोमवारी खरेदी समिती सभा व प्रत्येक शुक्रवारी स्थानिक उपसमितीची सभेचे आयोजन करणेत यावे. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**निर्णय क्र.४५२** संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल, अकुशल, सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांनी यापुढे बंद पुकारल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील, अशी करारनाम्यामध्ये अट ठेवणेत यावी. तसेच कंत्राटी कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारांना, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे/ गैरवर्तनाबाबत दंड करणेचे अधिकार देण्यात यावेत.

त्याचबरोबर मंदिर परिसरामध्ये व इतरत्र काही कर्मचारी तंबाखु, गुटखा खाऊन थुंकताना व मोबाईलवर खेळताना दिसून येतात, अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय स्तरावरुन कारवाई करणेत यावी.

तसेच बऱ्याच कालावधीपासुन अनुकंपावरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली नाही, त्यांचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- कामगार अधिकारी/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**निर्णय क्र.४५३** एकाच प्रकारच्या साहित्याची विविध विभागांकडून वेगवेगळी खरेदी करण्यात येते. त्यामुळे वेळही वाया जातो व जाहिरातींसाठी खर्चही होतो. याकरीता विविध विभागांसाठी आवश्यक असलेले एकाच प्रकारचे साहित्य खरेदी करणेसाठी संबंधीत विभागांनी खरेदी विभागाकडे निर्धारित वेळेत मागणी द्यावी व खरेदी विभागामार्फत एकत्रित खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी. (कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.४५४** श्रींचे चावडीमध्ये स्त्री व पुरुष साईभक्तांसाठी वेग-वेगळी दर्शनव्यवस्था करण्यात आलेली आहे. परंतु त्याठिकाणी एन्ट्री व एक्झीटसाठी एकच जिना (पायऱ्या) आहेत. त्यामुळे तेथे खुप गर्दी होते. तरी याठिकाणी एन्ट्री व एक्झीटसाठी वेगवेगळया पायऱ्या तयार करणेत याव्यात. तसेच बांधकाम विभागाकडे जुना लोखंडी पुल पडून आहे, त्याचा इतर ठिकाणी वापर करणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.४५५** संस्थानच्या सर्व शैक्षणिक संकुलामधील विद्यार्थ्यांना पिण्याचे शुध्द पाणी मिळावे, याकरीता सर्व शैक्षणिक संकुलांमध्ये आर.ओ. वॉटर कुलर बसविणेत यावे.
(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.४५६** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७२ अन्वये रु.२५,०००/- मात्र किंवा त्यापेक्षा अधिक रोख अथवा वस्तुस्वरुपात देणगी देणाऱ्या साईभक्तांना भेट म्हणून बाबांच्या चांदिच्या पादुका देणेचे ठरलेले आहे व त्यास शासन मान्यताही मिळालेली आहे. परंतु सोने-चांदी वितळविणेसाठी आजतागायत शासन मान्यता मिळालेली नाही. तसेच समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या गुरुपौर्णिमा उत्सवापासून देणगीदार साईभक्तांना चांदीच्या पादुका भेट स्वरुपात देण्यात याव्या, असा समितीचा मानस आहे. याकरीता संस्थानकडील सोने-चांदी वितळविणेस शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत विहीत वित्तीय पध्दतीने प्रत्येकी २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या पादुका खरेदी करण्यात येऊन, गुरुपौर्णिमा उत्सव- २०१७ पासून देणगीदार साईभक्तांना भेट स्वरुपात देण्यात याव्यात. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**निर्णय क्र.४५७** समाधी शताब्दी महोत्सवास विस्तृत प्रसिध्दी मिळावी व सदरहू महोत्सवानिमित्ताने संस्थानमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे/ प्रकल्पांची माहिति सर्व साईभक्तांना मिळावी, याकरीता दि.०१ जुन रोजी मुंबई येथे इलेक्ट्रॉनिक्स व प्रिन्ट मिडीयासमोर प्रेस कॉन्फरन्स आयोजित करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

वरील निर्णय क्र.३५७ ते ४५७ सर्वानुमते घेण्यात आले .

यानंतर सायंकाळी ०७.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी